श्रीगणेशदत्त गुरुभ्योनमः

(श्रीगुरुप्रतिपदा शके १८९१)

प. प. श्री वासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराज विरचित

श्रीदत्तपुराण (सार्थ)

[illegible]

वेदमूर्ती श्री. वामनशास्त्री गोविंदशास्त्री पुजारी

किंमत रु. २८ फक्त

प्रकाशक : व. न. घारे, श्रीनृसिंहसरस्वती सेवा मंडळ, क्वार्टर नं. [illegible],
सेक्टर नं. ६, गणपेट कॉलनी, कोळीवाडा, मुंबई नं. ३७.
मुद्रक : ल. ग. जोशी, श्री [illegible] प्रिंटिंग प्रेस, पुणे-२

॥ ॐ नमो भगवते दत्तात्रेयाय ॥

प. प. श्री वासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराज विरचित

॥ श्रीदत्तपुराण (सार्थ) ॥

भाषांतरकार :

वेदमूर्ती श्री. वामनशास्त्री गोविंदशास्त्री पुजारी

प्रकाशक :

व. न. झुरळे

श्रीनृसिंह सरस्वती सेवा मंडळ,

गव्हर्मेंट कॉलनी, कोळीवाडा, मुंबई नं. ३७

◇

किंमत रु. २५ फक्त

श्रीगुरु प्रतिपदा शके १८९९]

[दि. २४-२-७८

॥ श्री गणेशदत्त गुरुभ्योनमः ॥



निवेदन

जे जे मनी इच्छावे ते ते भगवत् कृपे पावावे. परम मंगल परम पावन भगवान श्री दत्तात्रेयांचे कृपेने आजच्या मंगल प्रसंगी प. प. श्री वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज कृत श्रीदत्तपुराण हा दिव्य ग्रंथ भाषांतरासहित जनता जनार्दनाचे चरणी अर्पण करण्यास आम्हास फार आनंद होतो. श्रीस्वामी महाराज यांनी आत्यंतिक कळवळ्याने ज्या अनेक ग्रंथांची रचना केली त्यामध्ये हा विषेश महत्वाचा ग्रंथ आहे. सर्व पुराणामधील भगवान श्री दत्तात्रेयांचे संबंधीचे ज्ञान या ग्रंथात समाविष्ट केले आहे. या शिवाय अनेक विषयांवर या ग्रंथामध्ये उहापोह केला आहे. पण हा ग्रंथ मुळात संस्कृत असून याची आठ अष्टके व ६४ अध्याय आहेत. हा तीन कांडात विभागला आहे. ज्ञान कर्म व उपासना याचे ३५०० श्लोक असून त्यावर विस्तृत चूर्णिकाही आहे. सर्व थरातील साधकांना हा दिव्य ग्रंथ अत्यंत उपयुक्त असून सध्याच्या धकाधकीच्या काळातही अचूक मार्गदर्शन करणारा आहे. याचे भाषांतरही ओघवत्या व सोप्या भाषेमध्ये श्रीनृसिंहक्षेत्र निवासी वेदमूर्ती श्री. वामनशास्त्री गोविंदशास्त्री पुजारी यांनी आत्मीयतेनें करून जिज्ञासूना ज्ञानाचे नवीन दालन मोकळें केले आहे. अत्यंत परिश्रमपूर्वक केलेले हे भाषांतर जिज्ञासूना उद्बोधक तर आहेच पण याचे वाचन करीत असतांना उत्सुकताच वाढत असते. समाजातील सर्व थरातील साधकाना याचा आस्वाद घेता यावा याच एका उद्देशाने प्रचंड अशा या ग्रंथाची किमत केवळ रु. २५ ठेविली आहे. आतापर्यंत या मंडळानें अनेक लहान लहान पुस्तिका विनामूल्य दिल्या आहेत व देत आहे. मंडळातर्फे तीन मोठे ग्रंथ प्रसिद्ध होऊन हा चौथा ग्रंथ जनता जनार्दनाचे सेवेस येत आहे. या दिव्य सेवेबद्दल वेदमूर्ती श्री. वामनशास्त्री यांचे जेवढे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत. या दिव्य ग्रंथाचे प्रकाशनासाठी अनेक साधकानी जे आर्थिक सहाय्य केले त्यांचा नामनिर्देश न करता त्यांच्या आत्मीयतेबद्दल व मंडळावरील विशेषतः भगवान श्री दत्तात्रेयांचे वरील असीम श्रद्धेबद्दल आम्ही ऋणी आहोत. त्यांचे सर्वांगीण कल्याणाबद्दल भगवान श्री अत्रीनंदनांचे जवळ सतत प्रार्थना आहे. असेच त्यांचे सहाय्य मंडळास या पुढेंही लाभेल अशी सदिच्छा या प्रसंगी व्यक्त केल्यास ते योग्यच ठरेल. या ग्रंथाची छपाई व मांडणी श्री समर्थ प्रिंटिंग प्रेसचे मालक श्री. स. पां. जोशी व प्रेसमधील आमचे कामगार बंधू यांनी फार सुबक केली त्याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोत. या पुढील आमचे प्रकाशन ब्रह्मनिष्ठ श्री. वामनबुवा वामोरीकर यांचे श्री स्वामी समर्थ चरित्र म्हणजेच श्री गुरु लीलामृत हे होईल. शेवटी या ग्रंथाचे पूर्णतेस ज्या महाभागानी हातभार लावला त्यांचेवर भगवान श्री नृसिंह सरस्वती स्वामी महाराज पूर्ण कृपा करोत अशी प्रार्थना करुन हा दिव्य ग्रंथ भगवान श्रीपाद श्रीवल्लभ श्रीनृसिंह सरस्वती स्वरुपी श्री दत्तात्रेयांचे चरणी अर्पण करुन हे निवेदन संपवितो.

श्रीगुरुप्रतिपदा शके १८९९

व. न. झुरळे

श्री नृसिंह सरस्वती सेवा मंडळ, कोळीवाडा, मुंबई

परिशिष्ट १

श्री नृसिंह सरस्वती सेवा मंडळाने विनामूल्य दिलेले वाङ्मय

प. प. श्री. वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज विरचित–

१) श्री सप्तशतीगुरुचरित्र सार
२) श्रीदत्त लिलामृताब्धिसार
३) श्रीदत्त भाव सुधारस स्तोत्र (सार्थ)
४) श्री विज्ञान सागर
श्री. नारायण महाराज जालवणकर
५) श्री गुरुप्रसाद
श्री शंकरानंद भारती स्वामी महाराज विरचित–
६) श्री वासुदेव सप्तशती
परम वंदनीय श्रीरंग अवधूत महाराज विरचित–
७) श्री समर्थानुभव
लेखक : श्री. स्वामी सुत
८) श्रीदत्तात्रय कल्प
विविध स्तोत्राचा संग्रह
९) श्री उपासना मार्ग प्रदीप

याशिवाय श्रीदत्तात्रय फोटो वगैरे वाङ्मय
खालील ठिकाणाहून विनामूल्य मिळेल.

श्री. व. न. झुरळे, श्रीनृसिंह सरस्वती सेवा मंडळ,
सेक्टर ६, खोली नं. २१६७, गव्हर्नमेंट कॉलनी, कोळीवाडा, मुंबई–३७.

भगवान श्री दत्तात्रेय



दत्तात्रेय हरेकृष्ण उन्मत्तानंद दायक ।
दिगंबर मुनेबाल पिशाच ज्ञानसागरः ॥

भगवान श्री श्रीपाद श्रीवल्लभ




काषाय वस्त्रं करदंड धारिणं ।
कमंडलु पद्म करेण शङ्खम् ॥
चक्रं गदा भूषित भूषणाढ्यं ।
श्रीपाद राजं शरणं प्रपद्ये ॥

भगवान श्री नृसिंह सरस्वती स्वामी महाराज




औदुंबरा तळवटी नरसिंह योगी ।
कृष्णातटी परम शांत सुखास भोगी ॥
ध्यानस्त होउनि समस्त चरित्र पाहे ।
अनन्य जो शरण इच्छित देत आहे ॥

परम योगिराज श्री अक्कलकोट स्वामी महाराज



अनन्याश्चितयंतो मां येजना पर्युपासते ।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेम वहाम्यहम् ॥

सकलमताचार्य श्री माणिक प्रभु महाराज



प. प. श्री वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज (टेंबे स्वामी)



श्री महापूजा (नृसिंहवाडी)



त्रैमूर्ति राजा गुरु तूचि माझा। कृष्णा तिरी वास करूनि वोजा॥
सुभक्त तेथे करिती आनंदा। ते सुर स्वर्गी पहाती विनोदा॥

श्रीरेणुका माता (माहूर)



करवीर निवासिनी श्री महालक्ष्मी




ज्ञान ब्रह्मेश्वरी देवी ब्रह्म कैवल्य रूपिणी ॥
ब्रह्म ज्ञानेश्वरी देवी ज्ञान ब्रह्म परात्मिका ॥

श्री तुळजापुरवासिनी जगदंबा



सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके ।
शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणि नमोऽस्तुते ॥

महासिद्ध श्रीदत्तात्रेय यंत्र



श्रीदत्तपुराण भाषांतरकार



वेदमूर्ती श्री. वामनशास्त्री गोविंदशास्त्री पुजारी वाडीकर

॥ श्री मन्मंगलमूर्तये नमः ॥

॥ नमः श्रीदत्तवासुदेवगणेशगुरूभ्यः ॥

॥ श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंदसरस्वती विजयतेतराम् ॥

॥ श्रीदत्तपुराणम् ॥

— प्रथमाष्टक —

अध्याय १

वेदपादस्तुतिः ॥

॥ ॐ ॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरूभ्यो नमः

॥ श्रीदत्तात्रेयगुरुचरणाभ्यां नमः ॥

श्रीदत्तेनोदिता टीका वासुदेवसरस्वतीम् ॥
निमित्तीकृत्य विभुना चरितस्य गुरोर्वरा ॥ १ ॥
अथान्यापि तथैवेयं दत्तमाहात्म्यार्थबोधिनी ॥
स्वल्पग्रन्था स्फुटार्था च टीका तेनैव तन्यते ॥ २ ॥
सरस्वतीमहानद्यास्तीरे सिद्धाश्रमेऽश्रमे ॥
श्रीक्षेत्रे विमले दत्तभक्त प्रार्थनया स्फुटम् ॥ ३ ॥

अग्निमीळे परं देवं यज्ञस्य त्वां त्र्यधीश्वरम् ॥
स्तोमोऽयमग्रियोऽर्थ्यस्ते हृदिस्पृगस्तु शंतमः ॥१॥

अर्थ : "अथ" शब्दानें मंगल करून श्रीवासुदेवानंदसरस्वती वेदपाद-स्तुतिरूपानें श्रीदत्तपुराण लिहिण्यास आरंभ करतात. "यज्ञाचा स्वयंप्रकाशमान असणारा जो अग्निदेव त्याची मी स्तुति करतो. कारण तो कर्मफल पोहोचविणारा, तीन स्वरूपानें म्हणजे अग्नि, आदित्य, वायुरूपानें सकल विश्वांत व्यापून राहणारा, अन्तर्यामिरूपानें सूर्य, पावक, वायु यांचा नियामक असा, म्हणजे त्रिगुणमायानियन्ता श्रीदत्तदेवच आहे. त्याचीच ही स्तुति मी करतो. करीता असलेल्या आणि वर्णिलेल्या पुढील स्तुतीनें साधकांना चतुर्विध पुरुषार्थांचा लाभ होईल. कारण स्वयंप्रकाशित श्री अग्निदेव म्हणजेच श्रीदत्तात्रेय देव हा भक्तांना फल देणारा आहे. शिवाय तो श्रीदत्तदेव कल्याणप्रदहि आहे. त्या देवांना आमची ही स्तुति आवडणारी अशीच आहे. करितां, हे देवा ! आम्ही परंपरागत केलेली स्तुति तुझ्या अंतरांत चिरकाल राहो."

अयं देवाय दूराय गिरां स्वाध्याय सात्वताम् ॥
स्तोमोऽस्त्वनेन विन्देयं तद्विष्णोः परमं पदम् ॥२॥

अर्थ : स्वयंप्रकाश आणि वाणीच्या पलीकडे असलेल्या अशा या देवाची आम्ही करीत असलेली स्तुति भक्तांच्या आराधनेस उपयुक्त अशीच असो (होवो). "या स्तुतीनें साधकांना कोणता लाभ मिळेल ?" अशी शंका घेऊन ग्रंथकार उत्तर देतात, "हे देवा, तुझी स्तुति विश्वव्यापक अशा तुझ्या निरतिशयानंद पदास (मोक्षास) साधकांना पोहोचविते. (साधक निरतिशयानंद मोक्षसुखाचा अनुभव घेतात)."

एता या लौकिकाः सन्तु हीना वाचोऽपि नः प्रियाः ॥
बालस्येव पितुस्ते त्वं स नो मृळ महाँअसि ॥३॥

अर्थ : वाणीस अगम्य अशी तुझी ही स्तुति माझ्या अंतकरणांत चिरस्थायी व प्रेमपात्र कशी होईल ? अशी शंका घेऊन ग्रंथकार म्हणतात, जरी ही स्तुति आमच्या मनांत असलेल्या व अलंकाररहित प्राकृत वाणीची स्तुति असली तरी, यद्वत् मुलांची वाणी (स्तुति) पित्यास आवडते, (आनंददायक होते) तद्वत् हे दत्तदेवा, तुला ती प्रिय होईलच. कारण तूं सर्वांचा पिता आहेस, पूज्य आहेस, म्हणून आमच्या प्रेमवाणीने स्तविलेला असा तूं आम्हांस सुखी कर. उभयत्र क्षेम कर.

अयं वां नात्मनोस्तत्त्वमधिगम्यास्ति दुर्मनाः ॥
हृद्रोगं मम सूर्य त्वं हरिमाणं च नाशय ॥४॥

अर्थ : या स्तुतीनें कोणता लाभ मिळणार ? अशी शंका घेऊन ग्रंथकार सांगतात कीं भक्त हा इंद्रियें, वाणी, मन यांस अगम्य असणाऱ्या दत्तात्रय देव स्वरूपास जाणत नाहीं. कारण तें गूढ आहे. उपाधिप्रतिबंधामुळें तत्त्वं-पदार्थाचें निःसंशय ज्ञान भक्तास नसतें. त्यामुळें तो दुःखी व खिन्न होतो. म्हणून हे अग्निदेवा, तुझ्या स्तोत्रानें आमचा त्रिविध ताप नाहीसा होवो व तुझा आत्मा जो सूर्य, जो उत्पत्ति स्थिति प्रलय यांस निमित्तोपादान कारण, तो भगवान् सूर्यदेव आमचे कामादि षड्विकारजनित हृद्रोग दूर करो आणि तत्त्वं पदार्थाच्या उपाधींचा नाश करून आम्हांस शुद्ध स्वरूपी नेवो.

प्रमन्महेस्मा ऽ न्विध्दीतिस्तोतारस्ते वयं नमः ॥
भगवो देव ते स्तोममारे अस्मे च शृण्वते ॥५॥

अर्थ : हे भगवन् देवा, आम्ही तुमचे प्रियभक्त आहोत, हे मान्य करा. परमात्मस्वरूपापासून आमच्या वाणी फारच दूर आहेत आणि आम्ही तर बहिर्मुख असल्यानें सच्चिदानंद स्वरूपापासून दूर राहिलो आहोत. म्हणून आमची स्तुति बालवाणी समजून ऐकावी. आमचा तुम्हाला नमस्कार असो.

इन्द्रो मदाय यातीह सत्वरं सोमिनो यथा ॥
स्तोतृनेहि तथा ऽ स्माँस्ते माध्वीर्गावो भवन्तु नः ॥६॥

अर्थ : हे देवा, ज्याप्रमाणें इंद्र सोम करणाऱ्यांच्याकडे पुष्ट्यर्थ जातो, त्याप्रमाणें तूं तुझे स्तोत्र गाणाऱ्या आमच्याजवळ ये. आमची ही स्तुतिरूप रसभरित गोड बालवाणी ऐक. त्याशिवाय आमचा दुःखनाश होणार नाहीं.

द्वे विरूपे ऽ त्र मायायास्ते ऽ त्र मग्नो ऽ स्मि पीडितः ॥
मामितः संतपन्तीह सपत्नीरिव पर्शवः ॥७॥

अर्थ : इतकेंच नाहीं तर, हे देवा, या जगांत विक्षेप आणि आवरण-शक्ति अशी मायेची भिन्नभिन्न दोन स्वरूपें आहेत. त्यांत मी पार बुडालो आहे व पीडिलो आहे. या जगांत, अनेक स्त्रिया असलेल्या पतीस ज्याप्रमाणें चोहोबाजूनें व सर्वप्रकारें सवतीमत्सरानें पीडतात, त्याप्रमाणें सर्व मानसिक व शारीरिक पीडा माझ्यावर तुटून पडून मला पीडा देत आहेत.

इदं श्रेष्ठमपि प्राप्य जन्म गन्ताध एव तत् ॥
कुरु प्रसादं ज्ञात्वैतत्तेनाहं भूरि चाकन ॥८॥

अर्थ : हे देवा, श्रेष्ठ मानवजन्म मिळूनसुद्धां या सांसारिक त्रिविध तापानें मी अधोगतीस चाललो आहे. हे समजून माझ्यावर सत्वर कृपा करावी. सर्व पीडापरिहारक अशा तुझ्या कृपेनें मी पुष्कळशा गोष्टींची इच्छा करून राहिलो आहे. कारण शेवटी तारक अशी तुझीच कृपा आहे.

अयं देवाय दूराय गिरां स्वाध्याय सात्वताम् ॥
स्तोमोऽस्त्वनेन विन्देयं तद्विष्णोः परमं पदम् ॥२॥

अर्थ : स्वयंप्रकाश आणि वाणीच्या पलीकडे असलेल्या अशा या देवाची आम्ही करीत असलेली स्तुति भक्तांच्या आराधनेस उपयुक्त अशीच असो (होवो). " या स्तुतीनें साधकांना कोणता लाभ मिळेल ?" अशी शंका घेऊन ग्रंथकार उत्तर देतात, " हे देवा, तुझी स्तुति विश्वव्यापक अशा तुझ्या निरतिशयानंद पदास (मोक्षास) साधकांना पोहोचविते. (साधक निरतिशयानंद मोक्षसुखाचा अनुभव घेतात)."

एता या लौकिकाः सन्तु हीना वाचोऽपि नः प्रियाः ॥
बालस्येव पितुस्ते त्वं स नो मृळ महाँअसि ॥३॥

अर्थ : वाणीस अगम्य अशी तुझी ही स्तुति माझ्या अंतकरणांत चिरस्थायी व प्रेमपात्र कशी होईल ? अशी शंका घेऊन ग्रंथकार म्हणतात, जरी ही स्तुति आमच्या मनांत असलेल्या व अलंकाररहित प्राकृत वाणीची स्तुति असली तरी, यद्वत् मुलांची वाणी (स्तुति) पित्यास आवडते, (आनंददायक होते) तद्वत् हे दत्तदेवा, तुला ती प्रिय होईलच. कारण तूं सर्वांचा पिता आहेस, पूज्य आहेस, म्हणून आमच्या प्रेमवाणीने स्तविलेला असा तूं आम्हांस सुखी कर. उभयत्र क्षेम कर.

अयं वां नात्मनोस्तत्त्वमधिगम्यास्ति दुर्मनाः ॥
हृद्रोगं मम सूर्य त्वं हरिमाणं च नाशय ॥४॥

अर्थ : या स्तुतीनें कोणता लाभ मिळणार ? अशी शंका घेऊन ग्रंथकार सांगतात कीं भक्त हा इंद्रियें, वाणी, मन यांस अगम्य असणाऱ्या दत्तात्रय देव स्वरूपास जाणत नाहीं. कारण तें गूढ आहे. उपाधिप्रतिबंधामुळें तत्त्वं-पदार्थाचें निःसंशय ज्ञान भक्तास नसते. त्यामुळें तो दुःखी व खिन्न होतो. म्हणून हे अग्निदेवा, तुझ्या स्तोत्रानें आमचा त्रिविध ताप नाहीसा होवो व तुझा आत्मा जो सूर्य, जो उत्पत्ति स्थिति प्रलय यांस निमित्तोपादान कारण, तो भगवान् सूर्यदेव आमचे कामादि षड्विकारजनित हृद्रोग दूर करो आणि तत्त्वं पदार्थाच्या उपाधींचा नाश करून आम्हांस शुद्ध स्वरूपी नेवो.

प्रमन्महेस्मा ऽ न्विध्दीतिस्तोतारस्ते वयं नमः ॥
भगवो देव ते स्तोममारे अस्मे च शृण्वते ॥५॥

अर्थ : हे भगवन् देवा, आम्ही तुमचे प्रियभक्त आहोत, हे मान्य करा. परमात्मस्वरूपापासून आमच्या वाणी फारच दूर आहेत आणि आम्ही तर बहिर्मुख असल्यानें सच्चिदानंद स्वरूपापासून दूर राहिलो आहोत. म्हणून आमची स्तुति बालवाणी समजून ऐकावी. आमचा तुम्हाला नमस्कार असो.

इन्द्रो मदाय यातीह सत्वरं सोमिनो यथा ॥
स्तोतृनेहि तथा ऽ स्माँस्ते माध्वीर्गावो भवन्तु नः ॥६॥

अर्थ : हे देवा, ज्याप्रमाणें इंद्र सोम करणाऱ्यांच्याकडे पुष्ट्यर्थ जातो, त्याप्रमाणें तूं तुझे स्तोत्र गाणाऱ्या आमच्याजवळ ये. आमची ही स्तुतिरूप रसभरित गोड बालवाणी ऐक. त्याशिवाय आमचा दुःखनाश होणार नाहीं.

द्वे विरूपे ऽ त्र मायायास्ते ऽ त्र मग्नो ऽ स्मि पीडितः ॥
माभितः संतपन्तीह सपत्नीरिव पर्शवः ॥७॥

अर्थ : इतकेंच नाहीं तर, हे देवा, या जगांत विक्षेप आणि आवरण-शक्ति अशी मायेची भिन्नभिन्न दोन स्वरूपें आहेत. त्यांत मी पार बुडालो आहे व पीडिलो आहे. या जगांत, अनेक स्त्रिया असलेल्या पतीस ज्याप्रमाणें चोहोबाजूनें व सर्वप्रकारें सवतीमत्सरानें पीडतात, त्याप्रमाणें सर्व मानसिक व शारीरिक पीडा माझ्यावर तुटून पडून मला पीडा देत आहेत.

इदं श्रेष्ठमपि प्राप्य जन्म गन्ताध एव तत् ॥
कुरु प्रसादं ज्ञात्वैतत्तेनाहं भूरि चाकन ॥८॥

अर्थ : हे देवा, श्रेष्ठ मानवजन्म मिळूनसुद्धां या सांसारिक त्रिविध तापानें मी अधोगतीस चाललो आहे. हे समजून माझ्यावर सत्वर कृपा करावी. सर्व पीडापरिहारक अशा तुझ्या कृपेनें मी पुष्कळशा गोष्टींची इच्छा करून राहिलो आहे. कारण शेवटी तारक अशी तुझीच कृपा आहे.

प्रवस्तुज्ञानाज्जहाति निष्कामश्चेन्मृतिं त्वहम्
न तादृशो ऽतः कामादि सर्वे रक्षो निबर्हय ॥९॥

अर्थ : सन्निहित दृग्गोचर पदार्थ ज्ञानाने जर मानव निष्काम झाला तर तो मृत्यूसहि जिंकू शकतो. पण मी मात्र तसा निष्काम नाही. मजला काममोहादि राक्षस पीडा करतात. त्यामुळें माझी सुवासनापूर्ति अवघड झाली आहे. म्हणून तूं आमचे अविद्या, काम कर्मादि बंध नाहींसे करावेस.

सुषुमामूर्धियः स्तोमैरागच्छैते वयं विभो ॥
त्वदंशास्त्वं पतिर्नो ऽ सि देवो देवेषु मेधिरः ॥१०॥

अर्थ : हे व्यापक देवा, याप्रमाणें जर तूं आमचे दुःखमूलक संसारबंध नाहींसे केले नाहींस तर तुझी स्तुति करणारे आम्ही तुझ्या स्तोत्रांनीं आमच्या बुद्धिचा शोध करूं, आणि शुद्रसत्वोपाधि व प्रकाशमान अशा तुझ्या ज्ञानस्वरूपाप्रत पोंचू. कारण आम्ही तुझेच अंश आहोत. तूं आमचा पालन कर्ता आहेस.

वसू रूपं रूपमिह प्रतिरूपोऽसि नो पृथक् ॥
एतानि भूतानि विदुर्ब्राह्मणा ये मनीषिणः ॥११॥

अर्थ : हे देवा, तूं चराचर जीवांचा आत्मा आहेस. मननशील विद्वान् ब्राह्मण चराचर सर्व सृष्टि तूंच आहेस असे समजतात कारण या सृष्टीस विवर्तोपादान तूंच आहेस. हिरण्यापासून तयार झालेल्या कुंडलादि अलंकाराप्रमाणें सर्वत्र सुवर्ण एक असते. नामरूप मात्र भिन्न असते. ही वेगवेगळी भासणारी जीवसृष्टी तुझ्याहून निराळी नाही.

तं नु त्वां किं ब्रुवेऽल्पज्ञो भगवंतं क्षमस्व भोः ॥
ओषमागहि मां त्वं चेत्सखा सन्नतिमन्यसे ॥१२॥

अर्थ : श्रीदत्ता, मी अंतःकरण संभिन्न असल्यानें अल्पज्ञ आहे. तूं मात्र इंद्रियज्ञानातीतअसून उत्पत्ति, विनाश, विद्या, अविद्या इत्यादींचा ज्ञाता म्हणजे सर्वज्ञ भगवान् आहेस. म्हणून मी तुझें स्वरूप एकदम निश्चयपूर्वक जाणूं शकत नाही. मी यापेक्षां जास्त काय बोलणार ? कांहींच बोलत नाहीं. हे भगवन्, माझ्याकडून अपराध झालेले आहेत. तूं मला क्षमा कर, कारण तूं माझा मित्र आहेस. खरोखरच मी तुला अतिप्रिय वाटत असेन तर, ज्याप्रमाणें धेनु वत्साकडे धांवत येते त्याप्रमाणें तूं माझ्याकडे सत्वर धांवत ये.

ता वासना घ्नन्ति यथा वृश्चिकस्यारसं विषम् ॥
अतो मां पाहि भूयिष्ठां नमउक्तिं विधेम ते ॥१३॥

अर्थ : हे देवा, तूं जर आतां न येशील तर मी मरून जाईन. ज्याप्रमाणे इंगळीचे विष मनुष्यास ठार करते, त्याप्रमाणे अनेक जन्मांतील वासना माझा घात करतील. म्हणून मी तुला वारंवार नमस्कार करीत आहे. कारण हे प्रभो, नमस्कार केला असतांना तूं भक्तांना ओलांडून जात नाहीस असे श्रुतिवचन आहे व त्यावर आमचा पूर्ण विश्वास आहे.

नि होता सीदसि विभो यस्त्वं यष्टुर्गृहे प्रिय ॥
तं त्वाह्वये ज्येष्ठराजं ब्रह्मणां ब्रह्मणस्पते ॥१४॥

अर्थ : हे व्यापक देवा, यज्ञकर्त्या यजमानाच्या गृहांत अग्निरूपानें तूं हवनकर्ता होऊन रहात आहेस. हे प्रियदेवा, अन्न, वेदी वगैरेना वेदांत ब्रह्म असेंच म्हटले आहे. तूं वेदांचा अधिपति आहेस. करितां ज्येष्ठराज अशा तुला मी पाचारण करीत आहे.

सेमामविड्ढि प्रभृतिमीशिषे योऽव मानिशम् ॥
त्वं विश्वेषां यदिशानो ब्रह्मणा वेषि मे हवम् ॥१५॥

अर्थ : हे प्रभो, तूंच आमचे पोषण कर व मायामय प्रपंचापासून आमचे रक्षण कर, कारण तूं सर्व विश्वाचा सत्ताधीश आहेस. वैदिक मंत्रानें केलेल्या माझ्या निमंत्रणाचा स्वीकार करून माझी प्रार्थना मान्य कर, आणि माझ्या सन्निध प्रकट हो.

मन्दः स्वकोऽयं दीनोऽज्ञ इति विद्वान्भवान्प्रभुः ॥
इंद्र आशाभ्यः परि मां सर्वाभ्यो अभयं करत् ॥१६॥

अर्थ : हे देवा, मी जरी मतिहीन व दीन असलो तरी तुझा भक्त आहे असेच समज. तूं मात्र समर्थ व परमेश्वर आहेस म्हणून सर्व दिशांपासून (चोहोंकडून) माझे रक्षण कर, व आशापाशांतून माझी सोडवणूक कर. जे

आशेचे दास बनले ते अखिल जगांत भ्रमण करतात व दुःख पावतात. आणि जे आशादास बनले नाहींत ते सुखमय जीवन जगतात आणि पाशमुक्त होतात. अर्थात् जगच त्यांचे दास बनते, असें गरुड पुराणात म्हटले आहे. म्हणून ते स्वर्गसुख अनुभवतात.

प्र य आरुपितां भ्रांन्ति त्वत्प्रसादाज्जहाति सः ॥
विमुच्यते तद्विप्रास्त्वां जागृवांसः समिन्धते ॥१७॥

अर्थ : अनात्मस्वरुप अशा देहादि जड वस्तूंचे ठिकाणीं आत्मस्वरुपाची भ्रांति (देहादिकांना आत्मस्वरुप समजणें) सामान्य जनांस असणें स्वाभाविक आहे. परंतु अशा प्रकारची (देहादिकच आत्मा) भ्रांति केवळ तुझ्या कृपेनेच नाश पावते. म्हणून विचारशील ज्ञानी लोक आत्मस्वरूपबोधाविषयीं सदैव जागे (दक्ष) राहतात, आणि सावधानता ठेवून तुझी म्हणजे भगवंताची उपासना करतात.

इच्छन्ति देवा अपि ते प्रसादाय नृजन्म तत् ॥
विद्वान्नामानि ते दत्त विश्वाभिर्गीर्भिरीमहे ॥१८॥

अर्थ : श्रीदत्तदेवा, केवळ सुखमय अशा स्वर्गलोकांत वास्तव्य करून मग्न झालेले देव सुध्दां तुझी कृपा मिळावी म्हणून भूलोकीं नरजन्म मिळाव अशी इच्छा करतात. म्हणून भो दत्तात्रेया, आम्ही प्राकृत, संस्कृत, लौकिक व अलौलिक वाणीनें तुझे गुण गायन करतो. आणि आमच्याकडून तसें घडावें एतदर्थ प्रार्थना करतो. कारण स्वर्गामध्यें सुध्दां, प्रेमानें तुझें गुणगान करण्यास मिळणें कठीण आहे. कारण मानवलोकांतच तुझें नामगायन चित्तांत स्फुरण पावते. अर्थात् ही तुझीच कृपा आहे. मानवजन्मांतच भगवन्नामगायन होते.

इन्द्र त्वा भजतः सूरेर्दुलभं किं तरामि तत् ॥
भक्त्या क्लेशादि ते नावा गम्भीराँ उदधीँ रिव ॥१९॥

अर्थ : अहो परमेश्वर श्रीदत्तदेवा, भक्तीने तुमचे भजन करणाऱ्या ज्ञानी माणसास अशक्य काय आहे ? अर्थात् कांहींच नाहीं. म्हणून नौकेने जसा महासागर तरतां येतो, त्याप्रमाणेंच तुमच्या भक्तिरूप नावेनें अनेक

जन्मांतरांतील देहांमुळें दुःखमय झालेल्या संसारसागरांतून मी तरून जाईन. सांप्रतचा काळ भक्तियोगास सुलभ आहे. तात्पर्य, कलिकालांत ईश्वरप्राप्ति भक्तीनेंच सुकर झाली आहे.

न ता रोद्धुं धियः शक्ता योगेनापि ततः सदा ॥
त्रातारं धीमहीश त्वां धियो यो नः प्रचोदयात् ॥२०॥

अर्थ : भो दत्तदेवा, कामरागद्वेषादि बुध्दिवृत्तींचे निरोधन करण्यास आम्ही समर्थ नाही. योगाभ्यासानेही वृत्तिनियमन दुःसाध्य वाटतें. मग उपायांवाचून हें कसें जमणार ? हे देवा, तूं सदैव सर्वांचें रक्षण करतोस, करितां तुझेंच आम्ही ध्यान करतो. ईश्वराचें ध्यान नेहमीच मनाची प्रवृत्ति धर्माकडेच करते. तात्पर्य, ईशध्यान वृत्तिनियामक व सत्प्रवर्तक आहे.

वैश्वानराय दत्वाऽन्नं विधिलब्धं सदैव ते ॥
भवामो भजने सक्ता अस्माकं श्रृणुधी हवम् ॥२१॥

अर्थ : सर्व जगतातील जीवांचा हितकर्ता किंवा सर्व जीवांचे आत्मत्वानें नियमन करणारा असा जो वैश्वानर देव, त्याचें आम्ही दैवयोगानें मिळालेल्या अन्नानें हवन करून भजन करतो. म्हणून हे देवा तूं आमचें आव्हान ऐक. तात्पर्य, वैश्वदेवरूप उपासना करीत आहोत. प्रसन्न हो.

एवा त्वामिन्द्र विप्रासो जागृवांसो विपन्यवः ॥
स्तुवन्त्येभ्यो हि ते कोऽपि न ज्यायाँ अस्ति वृत्रहन् ॥२२॥

अर्थ : हे ईशा, तुझीच आम्ही वैदिक मंत्रानें स्तुति करीत आहोत. आमच्या वैदिक मंत्राच्या स्तुतीपेक्षां मोठें असें दुसरे कांहीं नाही. जागरूकपणें विशेषेंकरून स्तवन करणारे ज्ञानी रंगवर्णाचा द्विमात्रोच्चार करतात. हृदयांत एक मात्रा, मूर्धास्थानी अर्धमात्रा, आणि नासिकास्थानी अर्धमात्रा, अशी दोन मात्रोच्चाराची स्तुति करतात. म्हणून हे अज्ञाननाशका देवा, या स्तुतीनें आमचें आत्मज्ञानावरणरूप अज्ञान नाश पावो.

प्रऋभुभ्यो गृणद्भ्यस्ते मर्त्येभ्यो ऽप्यमृतत्वमित् ॥
दत्तं स्मृत्वा तव मनोरथ आयातु पाजसा ॥२३ ॥

अर्थ : हे देवा, तुझें स्तुतिरूपच अन्न स्तुति करणाऱ्या अशा आम्हाला दे. हेच अन्न श्रेष्ठ आहे. या अन्नाचें भक्षण करून साधु तृप्त होतात. याच्यापुढे लोकप्रसिद्ध अन्नाचा उपयोग काय ? तात्पर्य, ईश्वरभजन हेच भक्तजनांचे अन्न, भोजनामृत आहे.

इदमु त्यदिषं श्रेयो यज्जग्ध्वा परितृप्यति ॥
साधुस्तद्भजनं तेऽस्मै इषं स्तोतृभ्य आभर ॥२४॥

अर्थ : हे अग्निदेवा, हे विषान्न अमृत आहे. हेंच अन्न सर्वांत श्रेष्ठ आहे. कारण तें अन्न भक्षण करून साधु लोक तृप्त होतात. लोकप्रसिध्द अन्न खाण्यास योग्य नाही काय ? आहे. परंतु त्या अन्नानें केवळ शरीर पोषण होते. ज्ञानामृत भोजनतृप्ति मिळत नाही. म्हणून तुझी स्तुति गाणाऱ्या आम्हांस तुझें भजनरूप असेंच अन्न दे.

त्वामग्ने मायिनं मायां जेतारमपराजितम् ॥
हित्वा कं शरणं यामः स नो बोधि सुश्री त्वम् ॥२५॥

अर्थ : हे अग्निदेवा, मायेवर सत्ता तुझीच आहे. मायेला तूं ताब्यांत ठेवले आहेस, व तूं मायेचा जेता आहेस. अशा तुला सोडून आम्ही कोणास शरण जावे ? तुझ्याशिवाय आमचा रक्षणकर्ता अन्य कोण आहे ? कोणीच नाही. यास्तव आम्ही तुला शरण आलो आहोत. व म्हणून तूं आमची प्रेमाची हांक ऐक.

मही महेशो ऽज्ञानेन भवानवतु मावृतम् ॥
यथा वै सूर्यं स्वर्भानुस्तमसाविध्यदासुरः ॥२६॥

अर्थ : नित्योत्सवानी युक्त असलेल्या अशा हे महेशा, किंवा ज्ञानरूप भूमीच्या ईशा, किंवा हे ब्रह्मांडाच्या ईशा, अज्ञानानें आवृत्त असलेल्या आणि स्वांशभूत असलेल्या अशा माझ्या आवरणाचा परिहार करून रक्षण कर. स्वांशभूत असणाऱ्या तुला आवरण कसें झाले ? ज्याप्रमाणें पूर्वकाली राहु

हा सूर्याला आणि चंद्राला झाकून टाकतो त्याप्रमाणें मायेनें मला झांकून टाकले आहे. आवरणरूपरहित वास्तवस्वरूप असणेंच योग्य आहे असें श्रुतींत वर्णिलें आहे.

प्रयुञ्जती यदात्मानं मनीषा मनसा सह ॥
तदैव भवतैकान्तं जानता संगमेमहि ॥२७॥

अर्थ : हे देवा, सच्चिदानंदाच्या निर्भेळ साक्षात्काराकरतां, अज्ञानानें आवृत्त अशा मनासह मनोनिग्रह करणारी बुध्दि ज्यावेळीं प्रत्यगात्मस्वरूपाशीं विशेषेकरून तादात्म्यस्वरूपाप्रत पोचते त्याचवेळीं तुझ्या कृपेचा योग्य काळ असतो, हें जाणणाऱ्या अशा तुझ्या स्वरूपी आणि तत्पदलक्ष्यभूत अशा शुध्द स्वरूपाशी त्वंपदाने लक्षित असलेले असे आम्ही संगत (युक्त) होतो. तात्पर्य, एकान्तमत्यन्तमखंडैकरसरूप बनतो. म्हणजेच जीवशिवाचें संपूर्ण ऐक्य होते.

ऋतस्य गोपास्त्वं देहि मह्यं शं युञ्जते धियः ॥
भीताय नाधमानाय ऋषये सप्तवध्रये ॥२८॥

अर्थ : हे प्रभो, तूं अवश्यंभावी कर्मफलाचा पालनकर्ता आहेस. तुझ्या ठिकाणीं भक्तियोग करणाऱ्या माझें त्रिविध दुःख नाहीसें कर. आणि बुद्धिग्राह्य व आत्यंतिक असें सुख दे. कारण मी संसारापासून भयभीत झालो आहे. "युंजते मन उत युंजते धियः" या मंत्रानें मी आपली प्रार्थना करीत आहे. देहातिरिक्त आत्मप्राप्तिरूपाकडे जाण्याचा माझा स्वभाव आहे. करितां सर्वतोपरि माझें रक्षण कर.

त्वं हि पाताऽसि नो दत्त परिबाधस्व दुष्कृतम् ॥
कामादीन्यस्य बीजानि जहि रक्षांसि सुक्रतो ॥२९॥

अर्थ : हे दत्तदेवा, ज्याअर्थी तू आमचा रक्षक आहेस, त्याअर्थी तूं आमचें दुष्कृत म्हणजे ज्ञानप्रतिबंधक पातक दूर कर, नाहीसे कर. कारण या पातकांचे मूळ कारण काम, राग, मोहादि आहेत. ते सर्वभक्षक आहेत. स्मृतीने या राक्षसाचें वर्णन "महाशनी महापाप्मा" असें केलें आहे. भक्तांच्या दुष्कृताचा नाश करणाऱ्या आणि भक्तोद्धरण करणाऱ्या हे सुक्रतो, हे दत्ता, आमची सकल पापकर्मे नष्ट कर.

पिबा सोममिति श्रुत्वा यष्टुहूतिं शुभं द्रवत् ॥
आयासि पुरुरूप त्वमासु गोषूपपृच्यताम् ॥३०॥

अर्थ : हें इंद्ररूपी दत्ता, "पिबा सोममिती" अशा मंत्रानें यजन करणाऱ्या यजमानाचें निमंत्रण तूं स्वीकारतोस, आणि त्या शुभकारक यज्ञामध्यें तूं उपस्थित असतोस. हे पुरुहूता, हे पुरुष्टुता, इंद्रा, सेंद्रियांतःकरणाची तूं तृप्ति करतोस. त्यायोगें यजमानाच्या सकल आशाआकांक्षा तृप्त होऊन इंद्रियांकरवीं विषयसेवन घडून शांतता व समाधान लाभणें सुकर होईल. तात्पर्य, इन्द्रिय-तोषानंतर ईशप्राप्तिचा मार्ग सुगम होण्याची एकप्रकारें शक्यता होते.

इंद्रं वोतान्यं न पृथङ् मन्ये मायाभिरिद्भवान् ॥
पुरुरूप इतीक्षे त्वममित्राँ सुषहान्कृधि ॥३१॥

अर्थ : हे देवाधिदेवा, यदर्थ सर्व कामना परिपूर्ण करण्यास सोमप्रिय इंद्र आहे तर त्यालाच बोलवावे, तुला बोलविण्याचें कारण नाहीं असें तुम्हास वाटत असेल तर आमचे असें म्हणणें आहे कीं देवराज इंद्र, वायु, किंवा अग्नि इत्यादि देवता तुझ्यापासून निराळ्या नाहींत. कारण मायेनें ईश्वर पुष्कळ रूपें धारण करतो, असें श्रुतिवचन आहे. म्हणून आमच्या शत्रुरूप काममोहादिकांचा, बहुरूपी असा तूं, नाश कर. किंवा ते शत्रु आम्हास सुसह्य होतील असें कर. तेणेंकरून शत्रूंचा त्रास आम्हास होणार नाहीं.

यज्ञा यज्ञाधीश सर्वे त्वन्मया अपि तेषु नः ॥
जपयज्ञो मतस्तेन सगु पूष्णा गमेमहि ॥३२॥

अर्थ : हे यज्ञाधीशा देवा, "दैवमेवापरेयज्ञं" इत्यादि (१२) यज्ञ आहेत. ते सर्व तुझेच स्वरूप आहेत. परंतु त्या सर्व यज्ञांत जपयज्ञ अधिक व आम्हांस मान्य असा आहे. "यज्ञानां जपयज्ञोऽस्मि" या वचनानें अखिल यज्ञ म्हणजे तुझीच विभूति (स्वरूप) आहे, असें वर्णिलें आहे. तरी पण इतर यज्ञ अनात्मव्यापार उत्पन्न करणारे, अन्य गोष्टी निर्माण करणारे असतात. जपयज्ञानें मात्र मनाची परिपक्वता करून आत्मस्वरुपाची अभिव्यक्ति (ओळख) करविण्यास मदत होते. "श्रेयान्द्रव्यमयाद्यज्ञाज्ज्ञानयज्ञः" या वचनानुसार

सृष्टि, स्थिति, लय, यापासून तूं जगताचें रक्षण, पालन करतोस. म्हणून तत्पदलक्ष्य अशा तुझ्याशी त्वंपदलक्ष्य असे आम्ही एकरूप होतो. तात्पर्य, जपयज्ञानें तुझे सत्यस्वरुप आम्हांस मिळावें.

स्तुषे नराप्यं तुष्टः सन्नथो यस्या अयोमुखम् ॥
मायां जित्वा भवान्तां मे विश्वाहा शर्म यच्छतु ॥३३॥

अर्थ : हे देवा, मानवांनाच मिळविण्यास योग्य अशा भगवान नारायणाची आम्ही स्तुति करतो. त्यायोगें तुझी कृपा होईल. तूं प्रसन्न झाल्यानें, लोखंडाप्रमाणें जिचें तोंड कठीण व भयंकर आहे अशा मायेचा जय करतां येईल. हे देवा, तूं आमचे आत्यंतिक कल्याण कर, व ज्ञानानंद देऊन सुखी कर.

जुषस्व स्तोममीशैते प्रियासः सन्तु सूरयः ॥
वयं स्तोमप्रियानेन यच्छा नः शर्म दीर्घश्रुत् ॥३४॥

अर्थ : हे ईशा, तूं आमच्या या स्तुतीचा स्वीकार कर. (श्रवण कर) हे स्तुतिप्रिया, तुझी स्तुति करणारे माझ्यासारखे तुला प्रिय होवोत. तुझी स्तुति करून आम्ही सुद्धां तुला प्रिय होऊंच. जरी तू आमच्यापासून भिन्न व दूरस्थित आहेस तरी आम्ही केलेली स्तुति तुला ऐकू येईलच. कारण तूं दूरचेही ऐकणारा (दीर्घश्रुत) आहेस. करितां आमची स्तुति ऐकून आमचें उभयत्र सत्वर कल्याण कर. तुझ्याविना आमचें कल्याण होणार नाहीं.

उग्रो जज्ञे मृत्युरयमदुग्धा इव धेनवः ॥
धियो मेऽनेनेद्गीश न जातो न जनिष्यते ॥३५॥

अर्थ : हे श्रीदत्ता, माझ्या मनामध्यें जो प्रमादरूप (अनवधानता) काळ उत्पन्न झाला आहे तो फारच भयंकर आहे. त्यांनी माझी बुद्ध्यादि इंद्रियें (इंद्रियरूपि गाई) निष्क्रिय, निष्फळ बनविली आहेत. ज्याप्रमाणे नुकत्याच प्रसूत झालेल्या गाई, अर्थात तरुण धेनु दूध देत नाहीत (त्या जशा निरर्थक असतात) त्याप्रमाणे माझी गात्रें निरुपयोगी झाली आहेत. प्रसिद्ध महामृत्यु-पेक्षांही प्रमादमृत्यु महाभयंकर आहे. घात करणारा त्याच्यापेक्षां दुसरा कोणी झाला नाही, पुढेही होणार नाही. कारण मृत्यु देह आणि प्राण याचाच

वियोग करतो. परंतु हा मात्र जीवनभूत अशा तुझ्याशी अनवधानतेने वियोग करतो. तात्पर्य, अनवधानता दोषामुळे सन्निध अशा जीवशीवाचे ज्ञान होत नाहीं. ही फारच भयंकर, मृत्युवर मात करणारी हानि आहे.

प्रब्रह्मैहीदमाकर्ण्योर्वारुकमिव बन्धनात् ॥
मृत्युंजय प्रमादाख्यान्मृत्योर्मुक्षीय माऽमृतात् ॥३६॥

अर्थ : हे भगवन्, आपण वर केलेली स्तुति ऐकावी व माझ्या समीप यावे. ज्याप्रमाणें पिकलेले फळ देठापासून आपोआप गळून पडते त्याप्रमाणेंच हे मृत्युंजया, प्रमादरूप मृत्युपासून माझी सुटका कर व अमृतस्वरूप मोक्ष दे. कारण अभ्युदय आणि निःश्रेयस् अशा या दोन्ही फलापासून मी भ्रष्ट होता कामा नये. भावार्थ, मला निरतिशय सुख मिळून कृतार्थता, धन्यता मिळाली पाहिजे.

यदद्य वर्ष्म तेनैव पश्येम शरदः शतम् ॥
स्तोत्राय ते हते मृत्यौ जीवेम शरदः शतम् : ॥३७॥

अर्थ : हे देवा, आम्ही करीत असलेल्या व केलेल्या या तुझ्या स्तोत्रामुळेच आमचे शरीर आम्ही १०० वर्षे पूर्णपणें पाहूं शकू. हें शरीर क्षणभंगुर, मृत्युनें नाश पावणारे असे जरी आहे, तरी सुद्धा मानव देहाची सार्थकता म्हणून तुझ्या स्तुतिसाठीच केवळ १०० वर्षे जीवंत राहूच. इतर कोणत्याही गोष्टींनीं मानवजन्म सफल होत नाहीं व मानवजन्मीच तुझे स्तवन घडणार आहे, अन्यत्र नाहीं.

प्रत्युत्तमं महेश त्वां मनामह इहागहि ॥
मृळा सुक्षत्र मृळय मा नो दुःशंस ईशत ॥३८॥

अर्थ : हे महेशा, तूं उत्तम आहेस, म्हणूनच तुझ्याकडेच मी प्रार्थना करुन याचना करीत आहे. तूं मला दर्शन दे. हे सुक्षत्रा (महाबलिष्ठा) आम्हाला सुखी कर व दुर्जनानी आमच्यावर केलेले शापप्रयोगादि निष्फल होवोत, हीच आमची तुझ्याजवळ सतत प्रार्थना आहे.

तिस्रो वाचस्तेऽत्र वरां क ईशानं न याचिषत् ॥
भक्त्या गृणीमस्त्वां स्तोत्रैस्तमिर्नरतूयमागहि ॥३९॥

अर्थ : हे देवा, तुझी कृपा मिळविण्यासाठीं क्रिया, भक्ति व ज्ञान या तीन प्रकारच्या वाणीचा उपयोग होतो. पैकी सुलभ अशा भक्तिरूप वाणीचा उपयोग कोण करणार नाहीं ? सर्वच करणार. भक्तिस्तोत्रांनीच आम्ही तुझें ग्रहण करतो. तू लवकर आमच्या सन्निध ये, आणि आमच्येवर अनुग्रह कर.

दूराद्विहाय सर्वं त्वामृषयो ये च तुष्टुवुः ॥
मर्ता अमर्त्यस्य ते तम्दूरि नाम मनामहे ॥४०॥

अर्थ : हे प्रभो, प्राचीन ऋषी योग, तप, यज्ञादि कर्मे जपादि अनुष्ठानें, करण्याचें सोडून केवळ भक्तीनें तुझें स्तवन करतात, म्हणून मर्त्य असे आम्ही संसारधर्मवर्जित अशा तुझेंच नामस्मरण बव्हंशी करतो. कारण तुझे नामस्मरण अनादि व विस्तीर्ण संसाराच्या नाशास कारणीभूत होते. ते संसारिक विषय-नाशास पूर्णपणें समर्थ असेच आहे. संसारी जीवांना नामस्मरण हाच एक सुलभ, सर्वत्रसाध्य, सर्वावस्थेंत योग्य असा तरणोपाय आहे.

य इन्द्र त्वं यो नमसा स्वध्वरो हीति संस्तुतः ॥
इन्द्रो बह्येंद्र ऋषिरित्युप ब्रह्माणि नः श्रुणु ॥४१॥

अर्थ : हे देवा, " नमस्कारेणैवशोभनोऽध्वरः " इत्यादि वेदवाक्यांनीं (स्तोत्ररूपांनीं) तुझी आम्ही स्तुति केली आहे. तूंच इन्द्र, ब्रह्मा व प्रजापति आहेस. म्हणून आमची स्तुति ऐक आणि आमच्या सन्निध रहा.

वयमु त्वा वरं देवमस्मभ्यं शर्म सप्रथः ॥
मनामहे पृणन्तं तदभित्वामिन्द्र नोनुमः ॥४२॥

अर्थ : हे देवा, तूंच अखिल जगतांचा विस्तार करणारा आहेस असेंच आम्ही समजतो. तूच सर्वकल्याणकारी आहेस, श्रेष्ठ आहेस, शूर आहेस, प्रसिद्ध आहेस, म्हणूनच प्रामुख्यानें तुझीच स्तुति आम्ही करीत आहोत. इतरांची स्तुति नाहीं.

प्रकृतान्यपि सूक्तानि श्रुण्वंतं जातवेदसम ॥
त्वां गृणन्ति न के त्वं हि येषामिंद्रो युवा सखा ॥४३॥

अर्थ : हे देवा, आम्ही करीत असलेली प्रस्तुत स्तोत्रें तू प्रेमानें ऐकत आहेस अशीच आमची समजूत आहे. तदर्थ आमच्या सन्निध तुझें वास्तव्य झाले आहे. मग आमच्या इतक्या जवळ तूं असतांना कोणता समंजस माणूस तुझें ज्ञान ग्रहण करणार नाहीं? तुझें ज्ञानग्रहण करणाऱ्या अशा आम्हा सर्वांचा तू नित्य जिवलग मित्र आहेस. तूंच भवतारक आहेस.

त्वावतः पाहि नो मर्त्यान्यत इन्द्र भयामहे ॥
आदिश्य पदभक्तिं ते ततो नो अभयं कृधि ॥४४॥

अर्थ : हे देवा, आम्ही सर्वजण तुझे स्तुतिपाठक आहोत. आम्ही मर्त्य (मरणधर्माचे) आहोत. आमचे सर्वत्र रक्षण कर. कारण हे दत्ता, आम्ही संसाराला अतिशय भ्यालो आहोत. संसार हा महाभयप्रदच आहे. आम्ही तुझ्या चरणकमलांची निःसीम भक्ति करीत आहोत. ती ध्यानीं घे आणि आम्हास संसारापासून निर्भय कर. तात्पर्य, जेणेकरून आम्हांस कोठूनही भय राहाणार नाहीं असें कर.

आ त्वा रथं न तुरगैः स्तोत्रैस्त्वा वर्तयामसि ॥
स त्वं न इन्द्र मृळय यस्य ते स्वादु सख्यमित् ॥४५॥

अर्थ : हे देवा, ज्याप्रमाणें घोड्यांच्या सहाय्यानें सारथी रथाला वाटेल तसें वळवितो त्याप्रमाणेंच स्तोत्रसामर्थ्यानें तुला (तुझी कृपादृष्टि) आम्ही यथाभिमत (पाहिजे तशी) वळवूं शकतो. म्हणून तूं आम्हास सुखी कर. कारण तुझी मैत्री अति गोड व हितकर आहेच. तुझ्या भक्तिमुळेच मोक्ष मिळूं शकतो. तदर्थ तूं आम्हांस सर्व प्रकारांनीं सुखी ठेव.

आ प्रबोधं भवोऽबोधः स्वप्नवद्दुःखदोऽशुचिः ॥
पतितान्दुःखितान्नृन्नः पाहि त्वं शृणुधी गिरः ॥४६॥

अर्थ : हे देवा, निर्मळ व सत्य ज्ञान झाल्यानंतर संसार आणि तज्जन्य सुखदुःखें राहात नाहींत हें जरी खरें आहे तरी संसार हाच मुळीं ज्ञानविरोधी

आहे. त्यामुळेंच संसारी जीवांना लवकर ज्ञानबोध होत नाहीं. मुळातच संसार हा दुःखपर्यवसायी, अपवित्र व केवळ सुखाभास निर्माण करणारा असाच आहे. म्हणून संसारांत पडलेल्या अशा आमचें रक्षण कर. तूं भवतारक आहेस. तूं आमची स्तोत्ररूपवाणी प्रसन्न अंतःकरणानें श्रवण कर.

इंद्राय साम ते गातुं न क्षमो नाम ते गृणे ॥
बण्महाँऽअसि सूर्य त्वं सत्रादेव महाँऽअसि ॥४७॥

अर्थ : हे इन्द्ररूपी देवा, तुझें गायन सामवेदानीं करणे आम्हांस शक्य नाहीं. म्हणून आतां आम्हीं तुझें केवळ नामस्मरणच करतो आहोत. हे सूर्यदेवा, तूं खरोखरीच फार मोठा आहेस. तूंच जगतांची प्रेरक शक्ति आहेस. तात्पर्य, सर्वजगताची अंतर्यामी प्रेरक शक्ती तुझेंच खरूप आहे. हिरण्यगर्भरूपानें तूंच जगतात आहेस.

सोमः पुनानोंतारामो मया त्वं नाधिलक्षितः ॥
ईक्षे तुच्छान्बहिर्भोगान् योषा जारमिव प्रियम् ॥४८॥

अर्थ : हे प्रभो, अंतर्हृदयांत आराम करून तूं राहिला आहेस. तूं केवळ आत्मविद्याच आहेस. परंतु येवढ्या जवळ असूनसुद्धां तुला मी पाहूं शकत नाहीं. कारण मी तुच्छ अशा बाहेरच्या भोगांच्या नादीं लागलो. ते विषय क्षणभरच सुखदायी वाटतात व त्यामुळें मी पराधीन बनतो. ज्याप्रमाणें तरुण कामिनी स्त्री आपल्या पतीला सोडून जाराकडे धावते, त्याप्रमाणें मी परतंत्र होऊन विषयांकडे धांव घेत आहे व दुःखी होत आहे.

प्रण इन्दोरपि स्मेरं रूपं ते दर्शयामलम् ॥
नृन्स्तोतृन्पाह्यहंसो नो जहि रक्षांसि सुक्रतो ॥४९॥

अर्थ : हे परमेश्वरा, चंद्रापेक्षांही अधिक तेजस्वी आणि अतिपवित्र असें तुझें रूप तूं आम्हांस दाखव. कारण आम्ही तुझी नित्य स्तुति करीत आहोत. पापापासून आमची सोडवणूक कर. हे सुक्रतो, शोभनप्रज्ञा, आम्हांस समूळ भक्षण करणारे काममोहादि क्रूर राक्षस यांचा तूं मूलतः नाश कर. काममोहामुळें परतंत्र झालेल्या अशा आमचें तूंच रक्षण करणार आहेस.

हि न्वन्ति द्वैतमस्त्यस्माद्भयं विन्दति मामिह ॥
यदन्ति दूरके यच्च पवमान वि तज्जहि ॥५०॥

अर्थ : हे देवा, आमच्या सभोवार द्वैताचा पसारा फारच झाला आहे. त्यापासून आम्हांस अतिशय भय वाटतें. "द्वितीयाद्वैभयं भवति" असें शास्त्रवचन आहेच. हें जे आमचे सन्निध ठाण मांडून बसलेलें आभासस्वरूप व तिरस्करणीय असें भय (द्वैतभय) त्याचा तू सत्वर नाश कर. संसारभीति अतिशय दूर असली तरीसुद्धा तिच्यापासून साधकांना फारच मोठा धोका उत्पन्न होण्याची शक्यता असते. करितां, दूर अथवा जवळ असलेलें संसारभय मुळासकट नाहीसें कर, कारण ते अपवित्र आहे व तूं मात्र पवित्र आहेस.

धर्ता कारकशक्तीनां सर्वेषां त्वमिहैक इत् ॥
यशो ऽत्रेदं पवित्रं ते विततं ब्रह्मणस्पते ॥५१॥

अर्थ : हे देवा, जगतातील अखिल कारकशक्तीचा धारणकर्ता तूंच एक आहेस. म्हणून सुखदुःखादि द्वैतविकारांनीं भीतिमत झालेल्या अशा संसारसंकटांतून रक्षणकर्ता तुझ्याविना दुसरा कोणीच नाहीं. हे वेदपालका परमेश्वरा, म्हणून तूंच भक्तोद्धारक, तारक आहेस. अशा प्रकारचें तुझें यश अवनीतलावर विस्तारानें प्रसिद्ध पावलें आहे.

असर्जि भवता विश्वमनित्यमवशं बृहत् ॥
त्वं संस्मर ज्ञ शरण वत्सं जातं न धेनवः ॥५२॥

अर्थ : हे भगवंता, तूच हे जडाजड स्वरूप, अनित्य, परतंत्र आणि अतिशय विस्तारात्मक ब्रह्मांड उत्पन्न केलें आहेस. कर्मफल जाणणाऱ्या हे ईश्वरा, तूंच आमचा शरण आहेस, भक्तरक्षक आहेस. करितां, ज्याप्रमाणें नूतनोत्पन्न वत्साचें माई सतत स्मरण ठेवतात, त्याचप्रमाणें आमचेही स्मरण तुझ्या चित्तांत सतत ठेव, व आमच्यावर प्रेम कर.

पुरोजितीश भो भूमन्तत्र माममृतं कृधि ॥
यत्रानन्दाश्च मोदाश्च मुदः प्रमुद आसते ॥५३॥

अर्थ : हे त्रिपुरनाशका गिरिजापते, हे जगद्व्यापका ईशा, पितृलोकांत पितरांना जे आनन्द मिळतात, देवलोकांत देवांना मिळणारे आनंद, इंद्रलोकात

॥ श्रीगुरु श्रीदत्तःशरणम् ॥

— अर्पण पत्रिका —

माझे परम पूजनीय गुरूजी प. प. श्रीसच्चिदानंद
अभिनव विद्याशंकर भारती श्रीमज्जगद्गुरु
श्री शंकराचार्य (वाडीकर जेरे) स्वामी
महाराज संस्थान मठ संकेश्वर व करवीर
यांचे चरणारविन्दी सेवा भावाने
सादर समर्पण

श्री मद्दत्त पुराणाख्यं ग्रंथ गीर्वाण भाषया
रचयामास यतिराट् वासुदेव सरस्वतिः ॥१॥
गृहित्वानुमतिं दत्त देवस्य यतिपुंगवः
श्रेयोऽर्थं जन भक्त्यर्थं लोक कल्याण हेतवे ॥२॥
श्रीदत्त कृपया पूर्णः प्रेरितो जनजागृतौ
धर्मभक्ति प्रसाराय कला वा स्मिन्समुद्यतः ॥३॥
तद् ग्रंथस्यानुवादं तु महाराष्ट्रीय भाषया
सामान्य जन सेवार्थै नृहर्यात्मज सूचनाम ॥४॥
मत्वा[illegible] कृतवान[illegible] सुधमस्
ऋतु राजो यथामान्यो तथैव जनसंमतः ॥५॥
मुंबापुर्यां निवसति वसन्तोदार भाविकः
दत्तभक्ति परःशुद्धः सदाचार रतः सदा ॥६॥
प्रश्नस्याक्षर [illegible] वासुदेव विनिर्मिते
पृच्छकस्योत्तरं लाभःयदिचेत् संभविष्यति ॥७॥
श्रीमद्दत्त पुराणस्य वाचनं कुरुश्रद्धया
तस्य कार्यं भवेत्सम्यगपेक्षा लेखनेकृता ॥८॥

हि न्वन्ति द्वैतमस्त्यस्माद्भयं विन्दति मामिह ॥
यदन्ति दूरके यच्च पवमान वि तज्जहि ॥५०॥

अर्थ : हे देवा, आमच्या सभोवार द्वैताचा पसारा फारच झाला आहे. त्यापासून आम्हांस अतिशय भय वाटतें. "द्वितीयाद्वैभयं भवति" असें शास्त्रवचन आहेच. हें जे आमचे सन्निधं ठाण मांडून बसलेलें आभासस्वरूप व तिरस्करणीय असें भय (द्वैतभय) त्याचा तू सत्वर नाश कर. संसारभीति अतिशय दूर असली तरीसुद्धा तिच्यापासून साधकांना फारच मोठा धोका उत्पन्न होण्याची शक्यता असते. करितां, दूर अथवा जवळ असलेलें संसारभय मुळासकट नाहीसें कर, कारण ते अपवित्र आहे व तूं मात्र पवित्र आहेस.

धर्ता कारकशक्तीनां सर्वेषां त्वमिहैक इत् ॥
यशोऽत्रेदं पवित्रं ते विततं ब्रह्मणस्पते ॥५१॥

अर्थ : हे देवा, जगतातील अखिल कारकशक्तीचा धारणकर्ता तूच एक आहेस. म्हणून सुखदुःखादि द्वैतविकारांनीं भीतिमत झालेल्या अशा संसारसंकटांतून रक्षणकर्ता तुझ्याविना दुसरा कोणीच नाहीं. हे वेदपालका परमेश्वरा, म्हणून तूंच भक्तोद्धारक, तारक आहेस. अशा प्रकारचें तुझें यश अवनीतलावर विस्तारानें प्रसिद्ध पावलें आहे.

असर्जि भवता विश्वमनित्यमवशं बृहत् ॥
त्वं संस्मर ज्ञ शरण वत्सं जातं न धेनवः ॥५२॥

अर्थ : हे भगवंता, तूच हे जडाजड स्वरूप, अनित्य, परतंत्र आणि अतिशय विस्तारात्मक ब्रह्मांड उत्पन्न केलें आहेस. कर्मफल जाणणाऱ्या हे ईश्वरा, तूंच आमचा शरण आहेस, भक्तरक्षक आहेस. करितां, ज्याप्रमाणें नूतनोत्पन्न वत्साचें गाई सतत स्मरण ठेवतात, त्याचप्रमाणें आमचेही स्मरण तुझ्या चित्तांत सतत ठेव, व आमच्यावर प्रेम कर.

पुरोजितीश भो भूमन्तत्र माममृतं कृधि ॥
यत्रानन्दाश्च मोदाश्च मुदः प्रमुद आसते ॥५३॥

अर्थ : हे त्रिपुरनाशका गिरिजापते, हे जगद्व्यापका ईशा, पितृलोकांत पितरांना जे आनन्द मिळतात, देवलोकांत देवांना मिळणारे आनंद, इंद्रलोकात

॥ श्रीगुरु श्रीदत्तःशरणम् ॥

— अर्पण पत्रिका —

माझे परम पूजनीय गुरूजी प. प. श्रीसच्चिदानंद
अभिनव विद्याशंकर भारती श्रीमज्जगद्गुरु
श्री शंकराचार्य (वाडीकर जेरे) स्वामी
महाराज संस्थान मठ संकेश्वर व करवीर
यांचे चरणारविन्दी सेवा भावाने
सादर समर्पण

श्री मद्दत्त पुराणाख्यं ग्रंथ गीर्वाण भाषया
रचयामास यतिराट् वासुदेव सरस्वतिः ॥१॥

गृहित्वानुमतिं दत्त देवस्य यतिपुंगवः
श्रेयोऽर्थं जन भक्तयर्थं लोक कल्याण हेतवे ॥२॥

श्रीदत्त कृपया पूर्णः प्रेरितो जनजागृतौ
धर्मभक्ति प्रसाराय कला वा स्मिन्समुद्यतः ॥३॥

तद् ग्रंथस्यानुवादंतु महाराष्ट्रीय भाषया
सामान्य जन सेवायै नृहर्यात्मज सूचनाम ॥४॥

मत्वामूपादस्त्वहिलं कृत्वानह मुखमम्
ऋतु राजो यशामान्यो तथैव जनसंमतः ॥५॥

मुंबापुर्यां निवसति वसन्तोदार भाविकः
दत्तभक्ति परःशुद्धः सदाचार रतः सदा ॥६॥

प्रश्नस्याक्षर पत्रेच वासुदेव विनिर्मिते
पृच्छकस्योत्तरं लाभःयदिचेत् संभविष्यति ॥७॥

श्रीमद्दत्त पुराणस्य वाचनं कुरुश्रद्धया
तस्य कार्यं भवेत्सम्यगपेक्षा लेखनेक्षिता ॥८॥

आशास्महे वयं तावत् श्रीदत्तस्य कृपांखलु
अनेन कर्मणा देवः भूयस्तुष्यतु लेखनात् ॥९॥
जनतारूप विश्वात्मा मोदतां मे सदाशिवः
एतेन कर्मणा सर्वे जीवन्तु शरदां शतम् ॥१०॥
ययाचे परमप्रेम्णा दत्तस्य पदपंकजम्
सदा मे हृदये चास्तु करोतु शुभ मंगलम् ॥११॥
पुत्रपौत्र परीवारं मयासाकं चिरंतनम्
श्रीवनादि समृद्धिंच सदा यच्छतुमेयतिः ॥१२॥
संसारोपरतिं कृत्वा चतुर्वर्ग फलाप्तये
सदा भवतु मे दत्तः प्रीतो भवतु संकटे ॥१३॥
दिगंबरो जटाधारी कुलस्वामी यतीश्वरः
प्रसन्नोऽस्ति प्रसन्नोऽस्ति गर्जत्वत्रयशोध्वनिः ॥१४॥
वामनो वामनमतिः सद्गुरोश्चरणां बुजे
सुमनांजलेरस्य वचां अर्पणं कुरुतेमुदा ॥१५॥
प्रसन्नोभव दत्त त्वं यच्छ मे चरणाश्रयम्
निर्भयं कुरु सर्वत्र श्री दत्तः शरणं मम ॥१६॥
निश्चिंत कुरु मां दत्त पाहिमामक सागरात्
भवबंधन मुक्तोमां कुरु दत्त दयानिधे ॥१७॥
इत्येषा वाङमयी पूजा शंकर श्रीपादपादयोः
अर्पिता च तथा दत्तः प्रीयतां माधवात्मजः ॥१८॥
रक्ष रक्ष यति श्रेष्ठ स्वापराधान् क्षमस्व मे
प्रसीदत्वं प्रसीदत्वं दत्त तेऽस्तुकृपांमयि ॥१९॥
श्रुणु मे प्रार्थनां दत्त पाहिमां शरणागतम
विद्यावन्तं यशस्वन्तं लक्ष्मीवन्तं कुरुष्व मां ॥२०॥

भाषांतरकर्ता गुरुकृपाकांक्षी शिष्य
—पं. वामनशास्त्री पुजारी

॥ श्रीगुरु श्रीदत्तः शरणं मम ॥

— भाषांतरकर्त्यांचे आत्मनिवेदन —

मूकं करोती वाचालं पंगुं लंघयते गिरिम् ॥
यत्कृपा तमहं वन्दे परमानन्द माधवम् ॥ (महाभारत)

भगवान प्रभु श्रीगुरुदत्त महाराजांच्या कृपेने मराठी वाचकांच्या हातांत आज सार्थ श्रीदत्तपुराण हा ग्रंथ आम्ही देत आहोत हे आमचे मोठेच भाग्य आम्ही समजतो व त्यामुळे आम्हांस अतिशय आनंदही होत आहे. ही एक प्रकारे श्रीदत्त कृपाच आमच्यावर झाली असून यापुढेही श्रीदत्ताचा कृपाबरद अभयदान हस्त नेहमीच आमच्या मस्तकांवर राहील याविषयी आम्हांस आत्मविश्वास वाटतो. परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंदसरस्वती स्वामी महाराजांनी श्रीदत्तपुराण हा संस्कृत ग्रंथ गंगातीरावर ब्रह्मावर्त क्षेत्रीं लिहिला आणि त्यावरील संस्कृत टीकासुद्धां सरस्वती तीरावर सिद्धाश्रम (सिद्धपूर) मातृमार्ग क्षेत्रीं लिहिली. ही दोन्ही कार्ये श्रीदत्तमहाराजांनी स्वतःच प्रेरणा देऊन आपणा-कडून करवून घेतली अशा प्रकारचा मजकूर अन्य ग्रंथांत स्वतः स्वामी महाराजांनीच लिहिला आहे. या ग्रंथांत अध्याय ६४ असून अष्टके ८ आहेत. अष्टक १ अध्याय पहिला याचे नाव वेदपादस्तुति असे आहे. या अध्यायात ६८ श्लोक आहेत. आरंभीच्या ५ श्लोकांत (अग्निमीळे) (अयं देवाय) (एताया) (अयं वा) (प्रमन्महे) या ५ श्लोकांचा आरंभ ऋक्संहिता अध्याय १, २, ३, ४, ५ यांतील मंत्र चरणांचा आरंभीचा उल्लेख जसा आहे तसाच उल्लेख याहि श्लोकांत केला आहे. शिवाय यापुढील श्लोकांत ऋक्संहिता अध्याय अनुक्रमणिकेप्रमाणे ६४ श्लोकापर्यंत प्रत्येकांत ऋक्संहिता अध्याय मंत्रारंभीचे प्रथम चरण घेतले आहेत. अष्टक १ अध्याय १ मधील श्लोक ६५, ६६, ६७ यांचा आरंभही अनु-क्रमानुसार इतर ३ वेद मंत्रचरण घेऊनच केलेला आहे.

यावरुन दत्त पुराण रचना ऋकुसंहितेप्रमाणेच श्री महाराजाना अभिप्रेत होती असे मानावयास हरकत नाही. (इषेत्वोर्जे) (अग्नआयाहि) (शंनोदेवी) असे ते चरण आहेत. हा एक प्रकार झाला. याखेरीज या ग्रंथांत इतर अध्यायांच्या श्लोकारंभी सुद्धा संहिताध्याय क्रमवारी प्रमाणे त्या त्या मंत्र चरणांचा उल्लेख स्वतंत्रपणे केलेला आहेच. हा दुसरा प्रकार झाला. श्री वासुदेवानंद महाराजानी विविध व पुष्कळ मोठी ग्रंथसंपत्ती लिहून ठेविली आहे. त्यांत संस्कृत व प्राकृत हे दोन्ही प्रकार आहेत. समश्लोकी गुरुचरित्र, द्विसाहस्री गुरु चरित्र, त्रिशती गुरुचरित्र काव्य, श्रीकृष्णाहरी, बावन्नश्लोकी गुरुचरित्र, श्रीदत्त पुराण, श्रीदत्त चंपु, वृद्धशिक्षा, स्त्रीशिक्षा, युवशिक्षा, पंचपाक्षिक, श्री सत्यदत्त व्रत पूजाकथा, मानसपूजा, श्रीदत्त पुराण चूर्णिका, समश्लोकी गुरु चरित्र चूर्णिका, द्विसाहस्री गुरु चरित्र चूर्णिका इत्यादी संस्कृत ग्रंथ आणि श्री दत्त महात्म्य, सप्तशती गुरु चरित्र, श्री दत्तलीलामृताब्धिसार इत्यादि प्राकृत ग्रंथहि स्वामी महाराजानी लिहिलेले आहेत. त्याखेरीज सर्व देवांचा संस्कृत मराठी स्तोत्र संग्रह, आरत्या, सूपाळ्या, प्रातःस्मरणे, संगीतपदे, करूणात्रिपदी, कांही अभंग, अनेकविध भजने, गीते, प्रार्थनाष्टके प्रासंगिक काही गद्य–पद्यात्मक लिखाण, विशिष्ट मंत्राची टिपणे, वनस्पती औषधांची यादी, काही वैयक्तिक भक्तांच्या साठी लिहिलेला उपयुक्त लेखनव्यवहार, योगशास्त्राभ्यास, संकीर्ण व स्फुट लिखाण इत्यादि अमर्याद व विविध लेखनसंभार स्वामी महाराजांनी लोकोद्धारासाठीं लिहून ठेवला आणि जनमानसांत श्रीदत्त-भक्तिचा जिवंत झरा निर्माण केला. समर्थ स्वामी महाराजांचे हे लोकोत्तर दिव्य कार्य जगभर प्रसिद्ध असून लोकांस परिचित झाले आहे. आणि त्यामुळे स्वामी महाराजासंबंधी भारतभर परमादर निर्माण झाला आहे. उत्तरोत्तर महाराजांची शिष्यशाखा व परंपरा वाढतच असून सर्वत्र त्यांची स्मारके होत आहेत. हे त्यांच्या दिव्यत्वाचे द्योतकच आहे असे मानले पाहिजे. आणि म्हणूनच स्वामीमहाराज म्हणजेच साक्षात् श्रीदत्तावतारच आहे असा जनमानसाचा दृढ विश्वास निर्माण झाला आहे. प्रस्तुत ग्रंथाच्या समारंभासंबंधींचा दुसरा एक महत्वाचा भाग म्हणजे, स्वतःची उपास्य देवता श्रीदत्त-

महाराज यांचे संबंधी सर्व प्रकारचे साहित्य उपलब्ध झाले पाहिजे. त्यांत कोणतीच उणीव असता कामा नये. म्हणून ह्यांनी सर्व प्रमाणांत श्रीदत्त प्रासादिक वाङ्मयाची निर्मिती करुन वाङ्मय क्षेत्रांत मोलाची भर टाकली आहे. माझ्या दत्तात्रयाचे सर्व प्रकारचे वाङ्मय आहे व ते असलेच पाहिजे, असा सात्विक अभिमान त्यांनी कटाक्षाने स्वमानसांत ठेवला असल्याचे या वरुन दिसून येते. अशा या असामान्य महादत्तोपासक स्वामी महाराजांनी लिहिलेल्या अलौकिक श्रीदत्तपुराणाचे भाषांतर करून लिहिण्या संबधी चि. श्री. वसंतदादा झुरळे यांनी प्रथम सूचना केली. तो प्रसंग असा की, कांही प्रसंगाने मी स्वतः मुंबईत त्यांचेकडे गेलो होतो. सायंकाळी वरच्या देवाची आरती मंत्रोपचार पूजा झाल्यानंतर चि. वसंतदादा मला म्हणाले की, "अहो काका, तुम्ही श्रीदत्तपुराणाचे मराठी भाषांतर करून आम्हास द्या. कारण श्री वासुदेवानंद महाराजांनी एक प्रश्नावली तयार केली असून त्यातील उत्तरांत श्रीदत्तपुराण वाचा असे उत्तर मिळते. परंतु श्रीदत्तपुराण संस्कृतांत असल्यानें मराठी वाचकांना त्याचे वाचन करणे अडचणीचे होते. आणि अर्थबोध होत नसल्याने वाचनांतील शब्दोच्चार सुस्पष्ट व शुद्ध होत नाहींत या करितां सार्थ दत्तपुराणाची नितांत जरुरी आहे." दादांचे हे म्हणणे ऐकून प्रथम मी असे म्हणालो की, "तुमचे म्हणणे खरे आहे. परंतु हे काम माझेकडून होणार नाही. कारण भगवान श्रीवासुदेवानंदांचा श्रीदत्तपुराणग्रंथ, माझ्या समजुतीप्रमाणे म्हणावा तेवढा सोपा नाही म्हणून हे काम अन्य कोणाकडे सोपवावे हे बरे." ते ऐकून चि. दादा म्हणाले कीं, अहो काका, आतांच आरतीच्या वेळीं मला दत्तमहाराज व श्रीवासुदेवानंद महाराजांनी अशीच प्रेरणा देऊन सांगितले आहे की, सदर ग्रंथाचे मराठी भाषांतर तुम्हीच केले पाहीजे व छापून आम्ही प्रसिद्ध करुं. झाले—त्या नंतर माझ्या मनांत थोडा गोंधळ निर्माण झाला. काय करुं, कसे करुं हा अष्टाक्षरी मंत्र सुरु झाला. तथापि हे काम करणेचे मी शेवटी कबूल केले. माझे मनांत कामाचा विचार सुरु झाला. मी पुण्यास परतलो. श्री पूजनीय योगीराज गुळवणी महाराजांची भेट घेतली. त्यांचेही मत चि. वसंतदादाप्रमाणे असल्याचे दिसून आले. मग मात्र मी भाषांतराचे काम श्री दत्तप्रभुंचे व श्रीवासुदेवानंदांचे नामस्मरण करुन नेटाने सुरु


केले. वाडी मुक्कामी माझ्या राहात्या घरीच मी भाषांतर लिहीत असतांना प. पू. श्रीशंकरस्वामी (श्री. दिक्षित महाराजांचे शिष्य) हे वाडीतच रहात असत. ते एकदां आमचे घरी भिक्षेस आले असता त्यांनी मला विचारले की, "तुम्ही हे काय लिहीतां ?" त्यांचे म्हणणे ऐकून मी म्हणालो, "मी दत्तपुराणाचे मराठीत भाषांतर लिहित आहे." माझे म्हणणे ऐकून श्रीशंकरस्वामींनी एक मोठा लांबलचक दीर्घ सुस्कारा सोडला. हे पाहून मी थोडा उदासीन झालो व म्हणालो की, "हा काय प्रकार आहे ?" तदनंतर श्रीशंकरस्वामी म्हणाले की, "अहो मी काय सांगतो ते नीट ऐका. एकदा मी द्विसाहस्री गुरुचरित्र वाचत श्रीनारायण-स्वामी महाराजांच्या धर्मशाळेत बसलो होतो. माझ्या वाचनांत, ज्या शंका आल्या त्या संबंधीत मी द्विसाहस्री पुस्तकांत ठिकठिकाणी तांबड्या खुणा केल्या होत्या. दुसरे दिवशीं पहाटे श्री वासुदेवानंद गुरुमहाराज माझ्या स्वप्नांत आले आणि मला दरडावून म्हणाले की, "काय रे माझ्यापेक्षा तू अधिक विद्वान व शहाणा आहेस काय ? तू माझ्या पुस्तकांत तांबड्या खुणा कशाला केल्या आहेस ! खरे सांग." त्यावर मी म्हणालो की, "नाही महाराज," असे म्हणून मी स्वामी महाराजांना साष्टांग प्रणिपात घातला आणि चुकलो म्हणून महाराजांची माफी मागितली व त्यानंतर द्विसाहस्री वाचन बंद केले. त्यानंतर श्रीशंकरस्वामी पुनः म्हणाले की, "तुम्हांस महाराजांचे काहींच सांगणे झाले नाही, करिता तुमच्यावर श्री स्वामी महाराजांचे पूर्ण कृपा असलेचे दिसते करितां तुम्ही भाषांतराचे काम खुशाल करा. त्यानंतर जोरांत काम चालू झाले. पुराणग्रंथ म्हटला की, त्यांत अनेक प्रकारचे शास्त्रीय विषय, वंशवर्णन वंशानुचरित्र, सर्ग, प्रतिसर्ग, मन्वंतरे, यांचा समावेश असतोच. ग्रंथाच्या विषयाचे स्पष्टीकरण करणेसाठी महाराजांनी सुबोध टीका लिहीली असून टीकेमध्ये वायुपुराण, नारदपुराण, स्कंदपुराण, मत्स्यपुराण, मार्कंडेयपुराण, भागवत गरुडपुराण, विष्णुपुराण, ब्रह्मवैवर्तपुराण,, ब्रह्मांडपुराण, देवीभागवत, दशो-पनिषदे, शारिरभाष्य, पातंजल महाभाष्य, पूर्वमीमांसा, उत्तरमीमांसा, योगशास्त्र, गौतम, कणादन्याय, कपिलगीता, भगवद् गीता, अवधूत गीता, धर्मशास्त्र, सांख्यशास्त्र, यांतील उत्तरे देऊन प्रतिपाद्य विषय सुस्पष्ट करणेचा महाराजांनी खूपच मोठा प्रयत्न केला आहे. शिवाय दुसरे असे एक वैशिष्ट्य

महाराजांच्या वाङ्मयांत असते ते म्हणजे विशेषे करून वैदिक वाङ्मयातील शब्दांचा भरणा मोठ्या प्रमाणांत केलेला असतो. अशा या महान ग्रंथ भाषांतराचे कामीं आमच्या सारख्या अल्प बुद्धींना अधिकच अडचणी येणार यांत शंकाच नाही. म्हणून आम्हांसही भाषांतराचे वेळी शब्दकोश, धर्मसिंधु, निर्णय-सिंधु, श्रीमद्‌भागवत, व्रतराज, योगशास्त्र, आसनांची माहिती, प्राणायाम प्रकाराची माहीती, त्या त्या ग्रंथावरून प्रथम आम्ही घेतली. माहिती घेतांना ज्या ज्या कठीण स्थळीं आम्हांस अडचण निर्माण झाली, त्या त्या स्थळांची माहीती आमच्या कांही पढिक विद्वान मित्रांकडून मिळवावी लागली. त्याप्रमाणे मी ज्यांचेकडे माहितीसाठी गेलो, त्या त्या वेळीं सदरची मित्रमंडळींनी मला माहिती चांगल्याप्रकारे पुरविली, अशा मंडळीपैकीं काहींचा येथे ऋणनिर्देश करुन त्यांच्या नावाचा उल्लेख करणे जरुरीचे वाटते. कोल्हापूरचे वयोवृद्ध पं. श्री. बाळशास्त्री उर्फ बाळाचार्य खुपेरकर तसेंच धर्मशास्त्रांत निष्णात असलेले वे. शा. सं. श्री. बंडोपंत धर्माधिकारी, आणि नरसोबावाडीचे वेदमूर्ती वैदिक वे. शा. सं. श्री. दिवंगत गोविंदभटजी बोरगांवकर यांनी भाषांतराचे कामांत जे अपूर्व व मौलिक सहाय्य केले त्याबद्दल मी त्यांचा सदैव ऋणी असून आभारी आहे. तसेंच सध्यां लोणावळ्यास राहात असलेले श्री. रा. रा. श्रीहरीभाऊ परांडे यांनी आपल्या संग्रहांतील सिद्धादिचक्र माहितीचे कागदपत्र आम्हांस देऊन ऋणी केले आहे, त्याबद्दल मी त्यांचेही आभार मानतो. तसेंच ज्या अनेक मित्रबंधुनी आमच्या शंका निरसन करुन आम्हास माहिती दिली त्याबद्दल त्यांचे ऋण कबूल करुन त्यांचेही मी मनःपूर्वक आभार मानतो. स्थळ संकोचास्तव सर्वांचाच नामनिर्देश करता येणे शक्य झाले नाही याबद्दल त्यांनी क्षमस्व ही विनंती मान्य करावी असे कळकळीचे माझे म्हणणे मान्य करावे. शेवटी ज्या दत्तप्रभूंनी व श्रीवासुदेवानंदसरस्वति महाराजांनी आम्हां सर्वांना प्रेरणा देऊन हे पवित्र व अवघड कार्य आमच्या-कडून करवून घेतले त्या जगत् सूत्रचालक श्रीदत्तप्रभूंच्या चरणी आमचे हे कार्य अखंडपणे रुजु होऊन राहावे हीच आमची अपेक्षा आहे. याशिवाय आम्ही तरी स्वतंत्रपणे काय करुं शकणार ? कविकुलगुरुंच्या चिरोक्ती प्रमाणे शेवटी

॥ गंगाजळैर्मुविभगीरथ यत्न लब्धैः ॥
॥ किंतर्पणं न विदधाति नरः पितृणाम् ॥

या उक्ती प्रमाणेच आमच्याकडून हे कार्य झाले आहे यांत शंकाच नाही. म्हणून जगन्नियंता भगवान श्रीदत्तप्रभु व श्री. प. पू. श्री. वासुदेवानंदसरस्वती स्वामी महाराजांचे चरणी हे प्रेमाचे निवेदन सादर समर्पण करून या ग्रंथाविषयी सहभागी झालेल्या सर्वांचे अखंडपणे परमैहिकामुष्मिक कल्याण करावे हीच प्रभुचरणी आमची सतत प्रार्थना आहे.

भाषांतरकर्ता
पं. वामनशास्त्री (जेरे)
पुजारी नरसोबावाडी



इंद्राला मिळणारे आनंद, ब्रह्मलोकांत ब्रह्मदेवाला मिळणारे आनंद, ते सर्वच्या सर्व म्हणजे ब्रह्मानंद, मोद, प्रमोद, आनंद, परमानंद आम्हास दे. आणि आम्हांस अमर कर.

अयं स इति विद्वान्त्सन्यमाय घृतवध्दविः ॥
कुतो जुहोम्यतोऽदेवा यमाय जुहुता हविः ॥५४॥

अर्थ : हे दत्तात्रेया, हा जो देहान्तर्यामी आत्मा आहे तोच तूं ईश्वर आहेस. व्यतीहार न्यायानें दोन्हीही अखंडैकरस असे एकरूपच आहेत. हे सर्व मी जाणतो. मग मी ज्याप्रमाणे अग्नीमध्ये घृताहुती घालावी त्याप्रमाणे माझा देह यमाला हविर्भागाप्रमाणे कां करे देईन ? देणार नाहीच. कारण ज्ञानोत्तर उत्क्रांति होत नाही, एतदर्थ देहांतर संबंध रहात नाही. केवळ ज्ञानविरहित लोकच आपल्या देहाची आहुति यमास देतात. " जायस्व म्रियस्व " असे श्रुतिवचन आहेच.

निर्दहध्वमितो देवा भद्रं नो अपि वातय ॥
मनो हरे मां पाह्यातें पिता पुत्रमिव प्रियम् ॥५५॥

अर्थ : हे देवांनो, म्हणून आमची ज्ञानकर्मेंद्रिये व मन, तुच्छ व अशुचि अशा विषयांपासून परावृत्त करा. हे हरे, तूं आमचे संसारदुःख नाहीसे कर. आमचे कल्याण व मंगल साधणाऱ्या मनास योग्य गति दे. मनाच्या गतीनें आमच्या शुभ कार्यात बाध नसावा. आम्हास तुझे स्तोत्रगायन करण्यास प्रेरणा दे. माझे कांही प्रारब्धभोग अद्याप शिल्लक आहेत. व मी तुझा बालक आहे. तू पिता आहेस. पुत्रवत्सलतेने माझे रक्षण कर व तुझे कृपाछत्र दे.

प्रमा प्रमाता प्रमेयं त्रिपुटीह न विद्यते ॥
रूपं तेऽविकृतं सत्वं मधुमन्मे परायणम् ॥५६॥

अर्थ : भो प्रभो, प्रत्यक्षादि दृश्य वस्तुजात, प्रमाता, जीवस्वरूप, प्रमेय, प्रत्यगात्मस्वरूप, अशा प्रकारची त्रिपुटी तुझ्या स्वरूपांत नाही. कारण तुझे रूप अखंड असेच आहे. अशा प्रकारचेच तुझे स्वरूप सर्व विकाररहित असते. कारण तूं परमात्मस्वरूप आहेस. ते स्वरूप सुंदर आहे. आणि तेच माझे परम वास्तव्यस्थान आहे. निरतिशयानंद स्वरूप आहे.

प्रहोतारोऽत्रैव मनोन्वाहुवामह इत्यतः ॥
गमादि मनसो नास्य यो यज्ञस्य प्रसाधनः ॥ ५७॥

अर्थ : हे देवा, ईशस्वरूप पूर्वश्लोकांतील वर्णनाप्रमाणेंच आहे. कशावरून ? अभिचारादिकांच्या योगाने आपल्या मृत सुबंधूचे मन इतर बंधु आप्त वगैरे जाणतात, कारण गमादि सर्व प्रकार मनाचेच आहेत. यज्ञाचे आत्यंतिक उपयुक्त साधनभूत असलेल्या आत्मस्वरूपाचें ठायी गमादि प्रकार नसतात असे आचार्यांनीं शतश्लोकी ग्रंथांत वर्णिलें आहे. "नायाति प्रत्यगात्मा", "आसीत्पूर्वं सुबंधुरिति", हेच ते दोन श्लोक.

ये यज्ञेनार्चन्त्यनेन सर्वे नन्दन्ति ते त्वया ॥
नान्येऽतस्त्वत्प्रिया एव विरूपासो दिवस्परि ॥५८॥

अर्थ : हे प्रभो, जे लोक अशा प्रकारच्या ज्ञानयज्ञानी तुझें अर्चन करतात, तेच लोक तुझ्या स्वरूपी एकरूप होऊन परमानंदांत निमग्न असतात. अर्थात् इतरांना तो आनंद मिळत नाही. याचे कारण ते बहिर्मुख असतात. म्हणूनच ज्ञानी तुला प्रिय होतात. कारण ते तुझ्या स्वयंप्रकाशरूपांत स्वतःचे नामरूप विसरून तन्मय झालेले असेच असतात.

देवानां नु वशे योऽस्यसुमङ्गलीरियं वधूः ॥
स्नेहेषु त्वच्च्युतो भोगी पतिर्बन्धेषु बध्यते ॥५९॥

अर्थ : हे ईश्वरा, जो देवांच्या विषयी बहिर्मुख झाला आणि इंद्रियांच्या पूर्ण स्वाधीन झाला तो, त्याची स्त्री अशुचि असली तरी तिला तो मंगलस्वरूपच समजतो. कारण भोगी मनुष्य स्वस्त्रीच्या ठायीं अत्यंत आसक्त असतो. म्हणूनच तो सच्चिदानंद अशा ईश रूपापासून भ्रष्ट होतो. कारण पतीरूपाने स्वस्त्रीचा भोग घेण्यास कांहीच प्रत्यवाय नाही असे तो समजतो. आणि तत्संबंधी अभिमानी बनतो. नंतर प्रेममय बंधनाने पूर्ण बद्ध होतो. अशा लोकांना मोक्ष मिळत नाही. कारण लाकूड व लोखंड यांच्या पाशाने बद्ध झालेला पुरुष केव्हां तरी अदृष्टवशात् मुक्त होण्याची शक्यता असते, परंतु प्रेमपाशांत सांपडलेला मात्र मुक्त होण्याची शक्यता नसते असे गरुडपुराणांत स्पष्ट म्हटले आहे.

विहितं सर्वमित्ते त्वमतो ज्यायांश्च पूरुषः ॥
पादोऽस्य विश्वा भूतानि त्रिपादस्यामृतं दिवी ॥६०॥

अर्थ : हे पुरुषस्वरुपी देवा, भूतकाळ, वर्तमानकाळ व भविष्यकाळ हे तुझ्याच एका अंशापासून उत्पन्न झालेले आहेत. जगत् हा तुझाच एक अंश आहे असें श्रुतिवचन आहे. अचर, चर व चराचर भूतें हे तीन पाय तुझेच आहेत. तूं त्रिपाद आहेस. प्रकाशमान अशा स्वरुपप्राप्तिने अमृत म्हणजे मोक्ष मिळतो. तूं जरी निरंश आहेस, तरीसुद्धां तुझ्या ठिकाणीं अंश कल्पना करतात हे सुप्रसिद्ध आहे. निरंश व पूर्णांशाचे ठायीं अंशकल्पना करूनच मानवाचे हित करणारी श्रुतिमाता द्वैतभाषेनेच उत्तर देते, अशा प्रकारचे विद्वानांचे मत आहे.

हृये जाये इति वदन्या सालावृकहृत्समा ॥
तन्मयो न स वेदामुमात्मानं तव पूरुषः॥ ६१॥

अर्थ : हे देवरूपी पुरुषा, स्त्रिया म्हटल्या म्हणजे त्या लांडग्याप्रमाणे निर्दयच असतात म्हणून स्त्रियांची मैत्री कोणाशीच नसते. अशा स्त्रियेला हे हृये, हे जाये असे संबोधणारा पुरुष स्त्रैण बनतो, स्त्रीपाशात अडकतो. त्यामुळे साक्षात् सन्निध असलेल्या अशा तुला तो ओळखत नाहीं व आत्मज्ञानापासून वंचित होऊन राहातो.

उभा उपाधितोऽत्रैकः पाकेन मनसान्वितः ॥
त्वां यदीक्षेत तं माता रेह्लि स उ रेह्लि मातरम् ॥६२॥

अर्थ : श्रीदत्ता, असे जर आहे तर मग तुझ्या स्वरूपास कोण जाणतो बरे ? ईश्वर एकच आहे, पण उपाधिमुळें तो भिन्न वाटतो. सद्गुरूंची उपासना करून ज्यांचे अंतःकरण परिपक्व बनले तेच अभयरूपानें तुला ओळखतात. नंतर त्यांची मायोपाधि नाश पावते. इतर लोक मात्र अविवेने गुरफटल्यामुळें तुझे अभेद स्वरूप ओळखीत नाहींत.

तदिदात्मन्हृदि वपुः पश्यन्तस्ते मनीषया ॥
मुनयो वातरशनाः पिशङ्गा वसते ऽमलाः ॥६३॥

अर्थ : हे आत्मरूप देवा, अशा प्रकारचे तुझें अभेदस्वरूप मनीषी लोक सात्विक अंतःकरणांत पहातात, साक्षात् अनुभवतात. असे साक्षात्कारी मुनी

दिगंबर असतात हे खरे आहे. ते स्नानादि नित्य विधीतून मुक्त झालेले असतात. अंगाला राख माखून राहातात. जरी ते मलिन असले तरीही इतरांचा मल नाहीसा करतात.

त्वं चिन्मयं बुधा रूपं संजानाना उपासते ॥
यो अस्य पारे रजसः स नः पर्षदति द्विषः ॥६४॥

अर्थ : हे चिन्मया देवा, ज्ञानी लोक चिदेकरस्वरूप अशा तुझ्या स्वरूपास वेदांताभ्यासाने जाणतात, वेदांतप्रतिपाद्य अशा तुझ्या अभिन्न स्वरूपाची ओळख ठेवून उपासना करतात. जो रज व तमोगुणातीत आहे अशा आत्मस्वरूपाचे हे रजतम वैरी आहेत. अशा शत्रूलाही ओलांडून ज्ञानी लोक जातात व अभिन्न अशा आत्मस्वरूपाशी तन्मय होऊन राहतात.

इषे त्वोर्जे चौदनेन नित्यहोमे ऽपि गव्यतः ॥
यजन्त्यहं त्वकामस्त्वां श्रेष्ठतमाय कर्मणे ॥६५॥

अर्थ : भो यज्ञदेवा, हवन करणाऱ्या यजमानास वृष्टि व अन्नादि यांची जरूरी असतेच. करतां वृष्टि व धान्योत्पादक अशा तुजकरतां यजमान गाईचे तुपानें तुझें हवन करतो. होम हा घृतानें, पयाने व यवागूनें करावा असें सांगितलें आहे. नित्यहोम सकाम कर्मासाठीं आहे. परंतु अजिबात कर्म न करण्यापेक्षां सकाम कर्म करणें श्रेष्ठ आहे. त्याहीपेक्षां निष्काम कर्म अधिक श्रेयस्कर आहेच. परंतु मी मात्र नैष्कर्म्यसिद्धीकरतां यजन करतो.

अग्न आयाहीति गातुं त्वाऽक्षमः स्तौमि केवलम् ॥
निषीद मे हृदि यथा निहोता सत्सि बर्हिषि ॥६६॥

अर्थ : हे अग्निरूप ईश्वरा, तूं माझ्यासमीप सत्वर यावेस. सामवेदानें तुझें गायन करणेस मी असमर्थ आहे. म्हणून केवळ लौकिक वाणीनेंच मी तुझी स्तुति करतो. ज्याप्रमाणें यज्ञात स्तुति केल्यावर तूं होतृरूप घेऊन उपविष्ट होऊन राहतोस, त्याचप्रमाणें सात्विक अशा माझ्या हृदयांत वास्तव्य करून रहा, हीच प्रार्थना.

शं नो देवीः प्रसादात्ते सन्तु धीवृत्तयोऽनिशम् ॥
आत्मप्रवाहाः स्वारस्याच्छंयोरभिस्रवंतु नः ॥६७॥

अर्थ : आत्मदेवा, अंतरात्मस्वरूप अशा तुझ्या प्रकाशमान बुद्धिवृत्ति आणि त्या वृत्तींचा प्रवाह माझ्या मनांत सतत निश्चल असावा. कारण त्या योगे दुःखाचे मिश्रण नसलेले असेच सुख मला मिळेल. रोगांचे शमन होईल. स्वात्मस्वरूपाविषयी आस्था निर्माण होईल. तुझ्या स्वरूपाचा निदिध्यास लागेल. अर्थात् विपरीत भावना लयही होईल.

ज्ञातेस्मिन्पाशमुक्तिः सकलविदिति तत्स्यादनिर्देश्यमेकं
सूक्ष्मं चातीन्द्रियं सत्तदयमिति गिरा शाद्वनिर्देश्यमेव ॥
वाक्यैस्तत्वंविरोधेऽपि सति सुमतिभिः सोऽयमित्यादिवत्तद्-
भागत्यागेन लक्ष्यं वर गुरुकृपया लभ्यमैक्यं हि तज्ज्ञैः ॥६८॥

अर्थ : हे श्रीसद्गुरो, स्वयंप्रकाश अशा आत्मस्वरूपाचे ज्ञान झाल्यावर यजन करणाऱ्यास अविच्छिन्नैकरस असा मीच आहे असे ज्ञान होऊन तो सर्वज्ञ होतो. सकल वेत्ता होतो. त्यावेळीं एकच आत्मरूप सजातीय भेदशून्य, सादृश्य व उत्पत्तिरहित, उपमानप्रमाणाचा अविषय, अतीन्द्रिय, शब्दानें अज्ञात, स्पर्शरहित, रूप नसलेला, सन्निकर्ष षट्कजन्य सहा प्रमाणांनी ज्ञात न होणारा, उत्पन्न होणाऱ्या अग्निरूपाप्रमाणें, अनुमानाने सिद्ध न होणारा (अर्थात्, प्रत्यक्ष,अनुमान, शब्दादि तीनही प्रमाणाचा विषय न होणारा) अशा आत्मस्वरूपाचे स्वचित्तांत स्फुरण होते. कारण तो कालत्रयातीत असाच आहे. कोणत्याही साधनाने आत्मरूपाचे ज्ञान करवून देता येत नाही, तर मग त्या स्वरूपाचे ज्ञान तरी कसे होणार? अशी शंका घेऊन ग्रंथकार उत्तर देतात, "तत्त्वमसि," "अयमात्मा परब्रह्म" इत्यादि वेदरूप वाणीच्या सहाय्यानें व तत्त्वंपदार्थाची इतर वाक्यें; आप्तवाक्यें, यांच्या मदतीनें एकात्मस्वरूप ईश्वराचा बोध होतो. जरी तत्त्वंपदार्थांत अपरोक्षत्व, परोक्षत्व असा विरोध असला तरीसुद्धां लक्षणाज्ञान असलेल्या बुद्धिवान् विद्वानांनी "सोऽयं देवदत्तः" या वाक्यांतील भागत्यागाप्रमाणें विरुद्ध वाच्यांशत्याग, अविरुद्ध वाच्यांशग्रहण करून व गुरुकृपेनें श्रवण मनन इत्यादींचा योग्य अभ्यास करून एकच अखंडैकरस असें ईश्वरस्वरूप समजून घ्यावें. तर्कज्ञानाचा येथें उपयोग होणार नाहीं. सद्गुरूपदेशानें व अभ्यासानें ईश्वरप्राप्ति असाध्य नाहीं.

इति श्रीमद्दत्तात्रेयपुराणे सार्धत्रिसाहस्र्यां त्रिकाण्डमण्डितायां संहितायां वासुदेव्यां प्रथमाष्टके ज्ञानकाण्डे वेदपादस्तुतिर्नाम प्रथमोऽध्यायः ॥

॥ अथ विरोधपरिहाराख्यः प्रथमाष्टके द्वितीयोऽध्यायः ॥

अयं देवायनस्त्रीशस्तत्वदीपोऽमलोऽस्य भूः ॥
साक्षी परः शिवोऽचिन्त्योऽव्यक्तोऽनन्तो जयत्यजः ॥१॥

अर्थ : न्याय, काणाद, मीमांसा, सांख्य, पातंजल योगशास्त्र इत्यादींच्या आधारानुसार गुरुपदेशाद्वारा होणाऱ्या ईश्वर प्राप्तीमध्ये येणारा विरोध निरसन करण्यासाठीं या अध्यायी प्रश्न निर्माण केला आहे. "अयं देवायनेति." शाकलशाखेतील अध्याय दोनचे प्रतीक आहे. याप्रमाणेच पुढील अध्याय प्रतिक समजावे. हा अपरोक्षशील आत्मा इंद्रियें व अंतःकरण यांना प्रकाशित करतो. म्हणूनच इंद्रियें व मन हें त्याचें स्थान आहे. अन्न, प्राण, मन, चक्षु, श्रोत्र, वाणी यांच्या द्वारा मिर्देशरूपाने ब्रह्मप्राप्ती होत नाही असें श्रुतिवचन आहे तें खरें आहे. तरीसुद्धां निषेधरूपानें अन्न, प्राण, यांच्या साह्यानें ब्रह्मप्राप्ति शक्य होते. असेंही श्रुतिवचन आहेच. देवायतन म्हणजे स्वतः निर्विकार राहून मन आदि इंद्रियांना प्रेरणा देतो. अभ्यासाने तोच प्रत्यगात्मा आहे असा अनुभव येतो. तोच स्त्रीश तत्वदीप, अमल, साक्षी, पर, शिव, अचिन्त्य, अव्यक्त, व अनंत आहे. तो जीव नाही. तोच विश्व, तैजस, प्राज्ञादिकांचा अंतर्यामी व प्रेरक आहे. तो आत्मा रागादि प्रतिबंधक पापनिवर्तक आहे. देश, काल, वस्तु, परिच्छेदरहित असा आत्मा म्हणजेच श्रीदत्तदेव. त्याचा जयजयकार असो व तो आमच्या हृदयी स्फुरो.

कश्चिद् द्विजवरो दैवात्सर्वसंस्कार संस्कृतः ॥
अधीतवेदवेदाङ्गश्चरिताश्रमसत्क्रियः ॥२॥

अर्थ : (सदृष्टांत कथासंदर्भ सांगतात) पुरातनकाळीं दैवयोगानें सोळा संस्कारांनी संस्कृत असा, वेदवेदांगाचे नियमपूर्वक अध्ययन केलेला, चारही आश्रमांची नित्यनैमित्तिक सत्कर्मे केलेला, निषिद्धकर्मे वर्ज्य करून सदाचणांत रत झालेला असा एक श्रेष्ठ द्विज राहात होता. आश्रमधर्माचे यथायोग्य काली पालन करून ज्योतिष, छंद, व्याकरण, यामध्यें तो चांगलाच पारंगत होता. म्हणजेच तो विद्वान् व सदाचारसंपन्न होता.

मातापितृगुरूद्युक्तऋणत्रयविवर्जितः ॥
सद्भक्त्योपास्तयोगीन्द्रः प्रायश्चित्यस्तकल्मषः ॥३॥

अर्थ : माता, पिता, ऋषि यांची सेवा म्हणजेच देव, पितर, आचार्य यांच्या ऋणांतून तो द्विज मुक्त झालेला असाच होता. तो योगींद्र श्रीदत्तगुरूंची सद्भक्तीनें उपासना करीत असे. ब्राह्मणाच्या जन्माबरोबरच ऋणत्रयांचा जन्म झालेला असतो. वेदाध्ययन, प्रजोत्पादन व यजन करून त्यांतून मुक्त होऊन, कृच्छ्रादि प्रायश्चित्तानें शरीर, मन, वाणी यांच्यापासून निर्माण झालेल्या अशा त्रिविध पातकांचा नाश करून तो आश्रमोक्त विधानानुसार सच्छिलपणें कालक्रमणा करीत असे.

विधिवत्कृतसंन्यासस्त्यक्तसर्वैषणो वशी ॥
चतुःसाधनसंपन्नो दैवीसंपत्समन्वितः ॥४॥

अर्थ : त्यानें योग्य विधिपूर्वक (प्रेषोच्चारणपूर्वक) संन्यासाश्रमाचा स्वीकार केला होता व सर्व एषणा म्हणजे वित्तेच्छा, पुत्रेच्छा, लोकेच्छा सोडल्या होत्या व तो जितेन्द्रिय बनला होता. चतुःसाधन म्हणजे (१) नित्यानित्यवस्तुविवेक, (२) इहामुत्रफलभोगविरक्ति, (३) शमदमादिषटक व (४) मुमुक्षुत्व यांनी तो संपन्न झाला होता व दैवी संपत्तीनें युक्त झाला होता. चतुःसाधन संपन्नतेचा विस्तार :– (१) म्हणजे ब्रह्मच सत्य आहे, त्याच्याहून निराळें मायामय जगत अनित्य आहे. कारण ते दृष्ट आहे. मातीच्या घड्याप्रमाणें हा नित्यानित्य विवेक. (२) या श्लोकात स्रक्, चंदन, वनितादि भोग, परलोकेप्सरसादिकांचे भोग, दोनही ठिकाणचे सुख परतंत्र, सोपाधिक, अनित्य, सातिशय असेच आहे. म्हणुन ते कुत्र्याच्या वमनाप्रमाणेच किळसवाणें आहे. यासच इहामुत्रफलभोग विराग म्हणतात. (३) शम म्हणजे मनाचा निग्रह. बाह्येंद्रियदमन म्हणजे दम उपरति म्हणजे संन्यास, तो शक्य नसल्यास निष्काम कर्मानुष्ठान आणि व्यवहारत्याग. तितिक्षा म्हणजे दैवगतीनें मिळालेली शीतोष्ण सुखदुःखें सहन करणे. श्रद्धा म्हणजे गुरु, वेदांतवाक्यांवर विश्वास ठेवणे. समाधान म्हणजे श्रवणादि अनुकूल विषयात मनाची समाधि (तल्लीनता). हे शमादि षट्क. (४) अविद्या, अध्यास, कल्पित देहेंद्रिय

प्राण मनोबुध्दि अहंकाररूप बंधापासून मला मोक्ष मिळाला पाहिजे अशी तीव्र इच्छा यालाच मुमुक्षुत्व म्हणतात.

दृढं निरुद्धसत्वान्यचित्तवृत्तिर्यतिर्हि सः ॥
एवं सन्नपि नो शान्तिं प्राप्तो नाना श्रुतभ्रमात् ॥५॥

अर्थ : याप्रमाणें सतत प्रयत्न करून त्यानें सत्वादि त्रिगुण व अन्य-चित्तवृत्ति यांवर जरी जय मिळविलेला होता तरीही अनेक शास्त्रांच्या भ्रमामुळें परमनिर्वाणरूप अशी आत्मविषयक परमशांति त्यास मिळालेली नव्हती. कारण तो विविध शास्त्र वचनांमुळे भ्रमांत पडलेला होता. त्याची योग्यता मात्र मोठी होती.

दृष्ट्वा तं खिन्नहृदयं विषीदन्तं शुचान्वितम् ॥
तत्पुण्येन्दूदयालोक हृद्यानुग्रहसागरः ॥६॥
सहसाऽऽविरभूच्छ्रीमान्दत्तात्रेयो दिगम्बरः ॥
अवतीर्णोऽत्र यो दीनानुध्दर्तुं भक्तवत्सलः ॥७॥

अर्थ : स्वभक्तांवर प्रेम करणाऱ्या, व दीनांचा उध्दार करण्यासाठींच ज्यांनी अवतार घेतलेला आहे अशा, दिगंबर श्रीदत्तात्रेयप्रभूंनीं त्या खिन्नहृदय, विगलित व शोकमग्न यतीस पाहिलें, आणि त्या यतीच्या पुण्यरूपी पूर्ण-चंद्राचाच जणूं उदय झाला, आणि त्याबरोबर श्रीदत्तप्रभूंच्या हृदयांतील कृपेचा सागर उचंबळून येऊन, ते तात्काल त्या यतीसमोर प्रकट झाले.

स्मर्तृगाम्यनसूयात्रितपः संतानसत्फलः ॥
सर्वाभासकतत्तेजोपिहिताक्षो महामतिः ॥८॥
यतिस्तस्मै नमश्चक्रे श्रद्धाभक्त्या महात्मने ॥
कस्मै वाङ्मनसातीतरूपायानन्तशक्तये ॥९॥
पूर्वेषामादि गुरवे सर्वज्ञानस्वरूपिणे ॥
सद्भक्तिज्ञानगम्याय निर्गुणाय गुणात्मने ॥१०॥

अर्थ : दत्तात्रेय हे स्मर्तृगामी—म्हणजे त्यांचे स्मरण करताच प्रकट होणारे, अनसूया माता व अत्रिऋषी या उभयतांच्या तपाचे फलच म्हणून त्यांच्या पोटी पुत्ररूपाने जन्म घेणारे, अनंत सूर्यांना प्रकाशित करणाऱ्या

तेजाने सुध्दा ज्या तेजापुढे डोळे झाकावेत असे अत्यंत तेजस्वी, व अत्यंत ग्रहणशील अशा बुध्दीने युक्त (होते.) महात्मा, ब्रह्मरूप, वाणी आणि मन यांना ज्यांचे रूप अगोचर आहे असा, अनन्त शक्तिमान, ब्रह्मादिकांचा आदिगुरु, महावाक्यें (तत्त्वमसि वगैरे) ज्यांचे स्वरूप आहे असा, सद्भक्ति आणि शुध्द ज्ञान यामुळेच आकलन होणारा, वस्तुतः निर्गुण असूनही स्वभक्तांच्या इच्छेकरतां सगुण रूप घेणारा, अशा त्या श्रीदत्तात्रेयास यतीनें श्रध्दा व भक्ति यांनी युक्त अशा अंतःकरणानें नमस्कार केला.

स तमाश्वास्य योगींद्रो दयालुर्भगवान्प्रभुः ॥
प्राह भिक्षो किमर्थं त्वं दुर्मना इव लक्ष्यसे ॥११॥
सर्वनाशकरत्वात्तन्मद्भक्ते नोपपद्यते ॥
वद तस्मान्ममाग्रे त्वं दौर्मनस्यस्य कारणम् ॥१२॥

अर्थ : तेव्हां योगीश्रेष्ठ आणि दयाळू अशा भगवान् दत्तप्रभूंनी त्यास अभयाश्वासन देऊन विचारले, "हे भिक्षु, तूं खिन्नचित्त का बरे दिसत आहेस ? विवेक आणि धैर्य यांचा नाश करणे या गुणद्वयांमुळें खिन्नचित्तता ही माझ्या भक्ताच्या ठिकाणी असणें योग्य नव्हे. तरी तुझ्या ह्या दौमनस्याचें कारण मला माझ्यापुढे सांग."

श्रुत्वा सहार्दं तद्वाक्यं ज्ञात्वा सर्वगुरुं यतिः ॥
तं प्रत्युवाच तद्भक्तियन्त्रितो नतकन्धरः ॥१३॥

अर्थ : तें प्रेमळ बोलणे ऐकून व त्याना सर्वांचे गुरु श्रीदत्तात्रेय असे जाणून भक्तिनें प्रेरित होऊन व नतमस्तक होऊन यति त्यांना उत्तर देते झाले.

विमुक्तो मुच्यतेऽनर्थादिति श्रुत्वा तदीहया ॥
प्रवृत्तस्य ममाज्ञस्य भ्रमदोऽभूच्छ्रुतार्णवः ॥१४॥

अर्थ : मुक्त असा मनुष्य अनर्थशाली संसारापासून मुक्त होतो हें ऐकून त्या इच्छेनें म्हणजे मुक्त होण्याच्या इच्छेनें प्रवृत्त झालेल्या अशा माझी बुद्धि अनेक शास्त्रांच्या श्रवणानें भ्रम पावली आहे.

प्रमाणानि प्रमेयानि संशयश्च प्रयोजनम् ॥
तथा दृष्टान्तसिद्धान्तावयवास्तर्कनिर्णयौ ॥१५॥
वादो जल्पो वितण्डाच हेत्वाभासाश्छलानिच ॥
जातिनिग्रहस्थानानि पदार्थानक्षपाज्जगौ ॥१६॥

अर्थ : भ्रम होण्याची कारणे काय, याबद्दल यति म्हणाले, ' प्रथमतः न्यायशास्त्र प्रणेता गौतम हा षोडशपदार्थवादी आहे. त्यांचा विस्तार असा— १) प्रमाणें, २) प्रमेयें, ३) संशय, ४) प्रयोजन, ५) दृष्टांत, ६) सिध्दांत, ७) अवयव, ८) तर्क, ९) निर्णय, १०) वाद, ११) जल्प, १२) वितंडा १३) हेतु, १४) आभास, १५) छल, १६) जातिनिग्रह स्थान. ही सर्व शास्त्रें तात्विक विचार करतात, परंतु त्यामुळे निरतिशयानंद प्राप्त होत नाही.

एतेषां तत्त्वज्ञानात्तुः श्रेयोऽकलयरूपकम् ॥
स्वदुःखजन्म प्रवृत्तिदोषमिथ्याविदां क्रमात् ॥१७॥
उत्तरोत्तरनाशे स्यात्तदनन्तरनाशतः ॥
देहिनां मुक्तिरित्येतत्स द्वितीयं प्रदश्यते ॥१८॥

अर्थ : वरील सर्व पदार्थांच्या सत्यस्वरूप ज्ञानानें पुरुषानें स्वरूप व मोक्ष समजून घ्यावा. त्यामुळे दुःखाचा, स्वजन्म कारणांचा क्रमाक्रमानें नाश होतो. म्हणजे, पदार्थाचे सत्यस्वरूप समजल्यावर मिथ्या ज्ञानाचा नाश होतो. नंतर रागादि दोष, अधर्म प्रवृत्ति, देहांतर संबंधरूप जन्म, संचितभोग यांचा नाश होतो. आणि अशा रीतीनें उत्तरोत्तर नाश झाल्याने देहधारकाची मुक्ति होते. ब्रह्म सद्वितीय आहे.

कणादाम्नायप्रामाण्यं मत्वा धर्मः स वै यतः ॥
नृणामभ्युदयश्रेयः सिध्दिरित्थं प्रविच्य च ॥१९॥

अर्थ : कणाद म्हणजे वैशेषिक हे तर्कानुकूल श्रुतिप्रामाण्य मानतात. अशा श्रुतिवचनांनी सांगितलेला तोच धर्म असे मानतात. त्याच्या आचरणानें इहामुत्रसिध्दि मिळते. म्हणून न्यायशास्त्राच्या विचाराने सुखलाभ होतो असे तात्पर्य आहे.

द्रव्याणि गुणकर्माणि सामान्यं च विशेषकः ॥
समवायः पदार्थाः षट् चैतेषां तत्त्वसंविदा ॥२०॥

अर्थ : द्रव्य, गुण, कर्म, सामान्य, विशेष, समवाय आणि चार प्रकारचा अभाव असे सात पदार्थ आहेत. यातच सर्व वस्तूंचा अंतर्भाव आहे. म्हणून यांच्या साधर्म्य, वैधर्म्य साकल्यानें विचार केल्यास तात्विक ज्ञानोत्तर मोक्ष होतो असें तर्कशास्त्रकारांचे मत आहे.

साधर्म्य वैधर्म्याभ्यां च स्वस्वोपाध्यनु शायिनाम् ॥
असज्जानां मुक्तिरिति प्राह सोपि विरुद्धवत् ॥२१॥

अर्थ : जे सत् नव्हे तें असत, तें पूर्वकालांत नव्हते. तेच अखिल विश्वाचें कारण आहे, हें वैशेषिकांचें मत बरोबर नाही. कारण असतापासून झालेल्या कार्याचा आपापल्या उपाधिभेदानुसार प्रत्येक शरीरांत भिन्नत्व, विभुत्व नित्यत्व मिळून ज्ञानाधिकरण जीवांना मोक्ष मिळतो, असा वैशेषिक सिद्धांत आहे. परंतु तो योग्य नाही.

आम्नायस्य क्रियार्थत्वाच्छास्त्रदृष्ट विरोधतः ॥
पुनस्तथा फलाभावान्नानर्थक्यं च जैमिनिः ॥२२॥
अवादीदतदर्थानां वेदवादरतोऽल्पदृक् ॥
कुर्वन्नेवेह कर्माणि जिजीविषेच्छतं समाः ॥२३॥

अर्थ : यति पुढें म्हणतात, " जैमिनीच्या सिद्धांतानुसार वेदवचनानीं कर्मकांडाचें वर्णन करून कर्मानेच सिद्धिलाभ होतो असें म्हटलें आहे. कर्मानें दृष्टफल मिळत नाहीं. तरीही फलाभावामुळे वेदवचनांना अनर्थक्य येत नाहीं. कारण विधिनिषेधरहित अशा वेदवचनांचा विधिवाक्याशी समन्वय करावा. सामान्य जनांनीं स्तावक वेदवाक्यांचा विधिवाक्याशी अनुसंधान करून वेदरत व्हावे, आणि कर्मे करावीत. शंभर वर्षे जगावें.

यावज्जीवं चाग्निहोत्रं जुहोति च दहन्ति च ॥
तं यज्ञपात्रैरित्यादिश्रुतेः सर्वायुषो नृणाम् ॥२४॥

अर्थ : मनुष्यानें यावज्जीव अग्निहोत्रादि अनुष्ठान केले पाहिजे. कर्ता मृत झाल्यावर यज्ञपात्रांच्या योगे त्याचे दहन श्रुतिप्रमाणें सांगितले आहे. सारांश सर्व आयुष्य विहितकर्मानें व्यापिले आहे.

व्याप्तत्वात्कर्मभिर्दोष श्रवणाच्चाप्यकर्मणः ॥
तच्चोदनालक्षणार्थधर्मानुष्ठानतो ध्रुवम् ॥२५॥

अर्थ : मनुष्याचे आयुष्य विधियुक्त कर्माने व्याप्त आहे. ते कर्म केले नाही तर दोष आहे. चोदनाधर्मानुष्ठानाने दोषपरिहार होतो. म्हणून आश्रमविहित नित्यकर्म करीत राहिलेंच पाहिजे.

अमृतत्वं भवेनृणामिति स प्राब्रवीदिह ॥
पुनःपातादिश्रवणाद्धातीदं जन्यमध्रुवम् ॥२६॥

अर्थ : कर्मानुष्ठानरूप धर्माचरणाने अमृतत्व मिळतें असें सांगितलें आहे. परंतु संसारादि सुखाचा लाभ झाला तरी अमृतत्व मिळणें अशक्य आहे असे भासतें.

उत्कर्षादपि मोक्षस्य सर्वोत्कर्षश्रुतेस्तथा ॥
अनावृत्तिश्रुतेर्बन्धाभावान्मुक्तस्य चान्यथा ॥२७॥

अर्थ : धर्मार्थ काममोक्ष या चतुर्विध पुरुषार्थांमध्यें मोक्ष श्रेष्ठ आहे. कारण त्याची प्राप्ति झाल्यावर जीव संसारांत पुन्हां येत नाहीं. मोक्ष साधकाला चोवीस तत्वांचें ज्ञान आवश्यक असल्याचें सांख्यशास्त्रकारांचें मत आहे.

पुंसोऽप्यपुरुषार्थत्वान्नानात्मत्वं विविच्य च ॥
पञ्चविंशकपुंज्ञानान्मुक्तिर्बन्धो विपर्ययात् ॥२८॥

अर्थ : पुरुष आणि प्रकृति यापैकी पुरुषाला अनात्मत्व नाही. कारण तो प्रत्येक शरीराहून भिन्न आहे. म्हणून पुरुषज्ञानार्थ पंचवीस तत्त्वांचे विवेचन समजून घेतल्यानें मनुष्य मुक्त होतो. तें ज्ञान नसतांना मनुष्य बंधनांत रहातो.

विरक्तस्यैव तत्सिध्देर्नतु श्रवणमात्रतः ॥
अनादि वासनादार्ढ्याच्छनैश्चित्तप्रसादनात् ॥२९॥

अर्थ : विरक्तालाच मोक्ष मिळतो. केवळ वेदांतश्रवणानें तो मिळत नाही. वैराग्याच्या योगे चित्तशुद्धी होते व मोक्षप्राप्ति होते.

वैराग्याभ्यासध्यानाद्यैरत्यन्तपुरुषार्थता ॥
आत्मज्ञानात्तत्वविदो दुःखात्यन्तनिवर्तनम् ॥३०॥
निवृत्तेऽप्यनुवृत्तिप्रदर्शनान्न तु दृष्टतः ॥
तच्छुद्धिः प्रत्याह्निकक्षुत्प्रतीकारवदत्र तु ॥३१॥

अर्थ : वैराग्य, अभ्यास आणि ध्यान यांच्या योगेच मोक्ष मिळतो. आत्मज्ञानाने तत्ववेत्यांच्या दुःखाचा नाश होतो. दुःख नाहीसें झाले असतांना सुद्धा किंचित काल अनुभवलेल्या समाधि सुखाचे योगानें मोक्ष प्राप्त होत नाही तर, ज्याप्रमाणे रोज भूक लागल्यावर तिचें निवारण करण्यासाठीं अन्न ग्रहण करावेच लागतें, त्याप्रमाणे सुखदुःख, काम, राग यांपासून सुटका होण्यासाठी पुनः पुनः वैराग्य, अभ्यास, चिंतन, ध्यान इत्यादींचा अभ्यास चालू ठेवावाच लागतो, असे सांख्यमत आहे.

न भवेत्पुरुषार्थत्वं तत्प्रतीकारचेष्टनात् ॥
इत्याह सांख्योप्येतन्मे नेष्टं दृष्टविरोधतः ॥३२॥
पुमर्थशून्यपुंसः स्याध्दर्ममेघसमाधिना ॥
क्लेशकर्मविमुक्तिर्वै तदाज्ञानं विमुक्तिदम् ॥३३॥

अर्थ : योगाभ्यासानें व क्षणिक समाधीनें संसारदुःखांचा निश्चितपणें कायमचा परिहार होतो हे मत बरोबर वाटत नाहीं. कारण समाधिनंतर दुःखमय संसारजीवनाचा अनुभव योग्यांनासुद्धां घ्यावा लागतोच. म्हणून सांख्यमत इष्ट वाटत नाहीं. तसेंच मोक्ष न मिळालेल्या साधकांनीं समाधीचा अभ्यास करून संसारक्लेश व त्रिविध कर्मे यांचा नाश करावा म्हणजे मुक्ति मिळेल असें कपिल मत आहे, परंतु तेंही इष्ट वाटत नाहीं. कारण अद्वैतात्मसिद्धी मूळचीच आहे. केवळ प्रतिबंध निरास झाला म्हणजे झालें.

सर्वावृत्तिमलास्तस्याकर्मास्य शुक्लकृष्णकम् ॥
इतरेषां तु त्रिविधं तद्विपाको द्वयात्मकः ॥३४॥
क्रियायोगौ तन्निवृत्त्यै तपोजपमुखा क्रिया ॥
संप्रज्ञातेतरौ योगौ धर्मौ चित्तस्य पञ्च च ॥ ३५ ॥

अर्थ : ज्याने चित्ताला मालिन्य आणणारे सर्व दोष टाकलेले आहेत त्या योग्याला शुभ व अशुभ असे कोणतेच कर्म नसते. इतरांना म्हणजे ज्यांनी हे दोष टाकलेले नसतात. त्यांना मात्र कर्माचे इष्टत्व, अनिष्टत्व व मिश्रत्व यामुळें सुखदुःखादि द्वंद्वें भोगावी लागतात. त्या द्वंद्वपरिहारासाठीं तप आदि क्रिया सांगितल्या आहेत. संप्रज्ञात व असंप्रज्ञात असे दोन योगचित्तधर्म आहेत. चित्ताच्या मूढादि पांच अवस्था वर्णिल्या आहेत. पैकी पहिल्या तीन अवस्थांत बंध असतो. उरलेल्या दोन अवस्था मुक्तीस कारणीभूत होतात.

भुवो मूढक्षिप्तविक्षिप्तैकाग्र्यविनिरुद्धकाः ॥
तिस्रो बन्धाय मुक्तै द्वे योगिनामीशसेविनाम् ॥३६॥

अर्थ : चित्ताच्या पांच अवस्था आहेत. त्या अशा– मूढ, क्षिप्त, विक्षिप्त, ऐकाग्र्य व विनिरुद्धक. यांपैकीं पहिल्या तीन बंधनास कारणीभूत होतात, व उरलेल्या दोन ईश्वराची सेवा करणाऱ्या योग्यांना मुक्तिस सहाय्यभूत होतात.

शान्तोग्रमूढवृत्त्यूने चित्ते नित्यैकरूपिणः
स्वरूपेऽवस्थितिर्द्रष्टुर्वृत्तिसारूप्यमन्यथा ॥३७॥

अर्थ : नित्य अभ्यासानें उग्र, मूढ इत्यादि अशुद्ध वृत्तींनी रहित, निर्मळ अशा चित्तांत नित्याद्वैतरूप ब्रह्मवृत्ति उत्पन्न होते, आणि द्रष्टा वृत्तीशीं तदाकार होतो. ब्रह्मरूपी त्याचें अवस्थान कायम राहते. अन्यथा ही स्थिती मिळणार नाही

तच्छुद्धिसाम्यं कैवल्यं सत्त्वपुंसोस्तु योगतः ॥
सर्वज्ञानं सर्वजयः प्रकाशावरणक्षयः ॥३८॥
सिद्धिलाभः कायसंपत्तद्धर्मानभिघातनम् ॥
दोषबीजक्षये योगात्कैवल्यस्यास्य का कथा ॥३९॥

इति चक्षुः श्रवाः प्राह नेदं दोषश्रुतेर्वरम् ॥
अथातो ब्रह्मजिज्ञासेत्युपक्रम्य यतोऽस्य च ॥४०॥

अर्थ : अभ्यास योगानें शुद्ध सत्वशील पुरुषाला शुद्धिसाम्य, कैवल्य मोक्ष, सर्वात्मक ज्ञान, सर्वत्र विजय, प्रकाशावरण क्षय, ही फळे मिळतात. तसेंच अणिमादि सिद्धींचा लाभ वज्राप्रमाणे बळकट शरीर संपत्ती, भूतभौतिक आघातांपासून संरक्षण, हा लाभ होतो. त्यामुळें दोष व त्यांची बीजे यांचा नाश होतो. या पुरुषाला मोक्ष मिळण्याबद्दल प्रश्नच नाही. असें चक्षुश्रवा यांचे मत आहे. परंतु सिद्धांन्ति असे मानतात कीं हें बरोबर नाही साधनसंपत्ति प्राप्त केल्यानंतरही ब्रह्मजिज्ञासा केलीच पाहिजे असे ते मानतात.

जन्माद्युपाधेरात्मानौ गुहाविष्टौ प्रदर्श्य च ॥
तदैक्यार्थं शमाद्युक्त्वा तत्सिद्ध्यर्थं क्रियादिकम् ॥४१॥
पुनः काम्यक्रियाकर्तुविफलं चार्चिरादिना ॥
प्रदर्श्यासकृदावृत्त्या श्रवणादेः परात्मनोः ॥४२॥
विज्ञानात्पुरुषार्थत्वं पूर्वोत्तरमलक्षयः ॥
इतरस्याप्यसंश्लेषो यावदारब्धमीक्षितुः ॥४३॥

अर्थ : ज्याच्यापासून जगताची उत्पत्ति, स्थिति व नाश होतो, परंतु तरीही जे तटस्थ आहे अशा ब्रह्मस्वरूपास अनुलक्षून अविद्या आणि माया अशा दोन उपाधिप्रविष्ट पिंडब्रह्म व ब्रह्मांडरूप अशा दोन्ही आत्मस्वरूपांचे ज्ञान करून घ्यावे. उभयविध सोपाधिक आत्मरूपे गुहाप्रविष्ट आहेत. त्यांचे ऐक्य साधण्यासाठीं शमदमादि साधनांचा अंगिकार आवश्यक आहे. शमादिकांच्या सिध्दीकरतां आणि वैराग्याकरतां बहिरंग क्रिया अंगभूत आहे. त्यादृष्टीने विचार केल्यास कर्त्याने काम्यक्रियांचे वैफल्य लक्षांत घेतले पाहिजे. पुन्हांपुन्हां चिंतन केल्याने प्रत्यङ्आत्मस्वरूपाचें ज्ञान होते व पूर्वोत्तर पापाचा क्षय होतो. साक्षीभूत ज्ञानी माणसाला प्रारब्धाशिवाय इतर कोणत्याच कर्माचा संबंध नंतर पोंचत नाही. अशा प्रकारच्या पारंपारिक, शास्त्रविहित, व योग्य अभ्यासाने परोक्षानुभूति होते. साधक मुक्त होतो.

शब्दादनावृत्तिरिति ब्राह्मणेनोपसंहृतम् ॥
प्रमाणयुक्तितस्त्वेतैः स्वस्वपक्षो दृढीकृतः ॥४४॥
इतरेऽप्यमृतत्वं च बहुधा दर्शयन्त्यहो ॥
ईशस्याभावमन्यत्वं सर्वज्ञत्वादि केचन ॥४५॥
केचित्प्रधानप्राधान्यं केचिदीशस्य चोभयोः ॥
अत्रेऽणून्सदसत्केचित्केचिदारम्भवादिनः ॥४६॥
परिणामपराः केचिद्विवर्तमतयोऽपरे ॥
एवं विप्रतिपत्तौ मे दौर्मनस्यमभूत्प्रभो ॥४७॥

अर्थ : शब्दप्रामाण्यावरून ज्ञानी पुनरावृत्त होत नाहीं. अर्थात जन्म-मरणादि संसार पुनः पुनः घडत नाहीं, असें सूत्रभाष्यकार व्यासांचे मत आहे. तात्पर्य प्रमाण आणि युक्ति यांच्या साहाय्यानेंच ज्यांनी त्यांनीं आपापल्या पक्षाचें दृढीकरण केलें आहे. इतर शून्यवादी ईश्वर नाहींच असें समजतात. शून्या-पासूनच नामरुपात्मक जगताचा प्रपंच झाला असें समजतात. कर्माप्रमाणें फल मिळतें असें त्यांचें मत आहे. इतर निरीश्वरवादी सांख्य पुरुष आणि प्रकृति हेच अखिल जगाच्या उत्पत्तीचें मूळ कारण आहे असें मानतात. चराचर जगताचे कारण ईश्वर आहे, असें पतंजलीचे मत आहे. दुसरे कित्येक परमाणूपासूनच जगाची उत्पत्ती झाली आहे असें मानतात. सद्असदापासूनच ब्रह्मांडाची उत्पत्ति झाली आहे असेंहि कित्येकांचे मत आहे. सद् हे विकारी आहे. अतएव त्याचाच परिणाम म्हणजे हे दृश्य जगत् आहे असें मानणारे कांहीं शास्त्रकार आहेत. जगत् म्हणजे विवर्त आहे अशा प्रकारचें कांहींचें म्हणणें आहे. अशा प्रकारची अनेक मतमतांतरें झाल्यानें माझ्या मनांत गोंधळ व खिन्नता निर्माण झाली आहे.

एतेषां कतमः श्रेयाञ्छिवः पन्थाऽभयप्रदः ॥
सुगमो मेऽद्य कृपया संप्रदर्शय सद्गुरो ॥४८॥

अर्थ : यावर उल्लेखलेल्या अनेक मार्गापैकी श्रेयस्कर व अभयप्रद आणि सुगम (सोपा) असा मार्ग कोणता तो, हे प्रभो, मला कृपा करून सांगावा.

भिक्षाचर्यं मे दयालो यदर्थं तप्तं यत्नात्सत्तपो मे यदर्थम् ॥
दैवादाप्तं प्रार्थये त्वां तदर्थं दुःखाढ्यं वीक्ष्यैहिकामुष्मिकार्थम् ॥४९॥

अर्थ : हे दयाळु परमेश्वरा, ज्या उद्देशाने मी संन्यास ग्रहण केला आहे, प्रयत्नपूर्वक अतिशय तप केले आहे, तो उद्देश पुरा व्हावा म्हणून मी आपल्याला प्रार्थना करीत आहे. ऐहिक आणि आमुष्मिक असे अनेक दुःखपूर्ण भोग मी पाहिले आहेत. आता मात्र माझ्या दैवयोगाने आपण प्राप्त झालेले आहांत. म्हणून माझी आपल्याला नम्र प्रार्थना आहे.

इन्द्रियोत्थं सुखं तुच्छमागमापायिधर्मकम् ॥
कोऽवशं क्षणिकं विद्वानिच्छेदिह परत्र च ॥५०॥

अर्थ : इन्द्रियजन्य सुख तुच्छ, उत्पत्तिविनाशांनी युक्त आणि पराधीन आहे. असे असतां कोणता विद्वान् त्या सुखाची इह व परत्र इच्छा करील बरें ? कोणीच नाहीं."

इति श्रीमद्दत्तपुराणे प्रथमाष्टके द्वितीयोऽध्यायः ॥२॥

॥ अथ ज्ञानकाण्डे प्रथमाष्टके तृतीयोऽध्यायः ॥

॥ॐ॥ एता याः सद्गिरः श्रुत्वा श्रीदत्तो भगवान्प्रभुः ॥
दयालुर्दयनीयं तमभिनन्द्याऽऽह सादरम् ॥१॥

अर्थ : यतींचें हें सद्भाषण ऐकून, दयाळु असे श्रीभगवान् दत्तप्रभु, दयापात्र अशा त्या यतींचे अभिनंदन करून त्यांना आदरानें म्हणाले,

सम्यग्व्यवसिता बुद्धिस्तत्त्वजिज्ञासया तव ॥
समीचीनः कृतोऽयं ते प्रश्नोऽतोऽवहितः शृणु ॥२॥

अर्थ : "तुम्हीं बुद्धिचा फार चांगल्या रीतीने उपयोग करीत आहांत. तसेच तत्त्व जाणून घेण्याच्या उद्देशानें तुम्ही जो प्रश्न केला आहे तो योग्यच आहे. तरी आतां अवधान ठेवून श्रवण करावें.

यावन्न जायते साक्षादीश्वरात्समनुग्रहः ॥
सच्छास्त्रं सद्‌गुरुश्चापि तावल्लभ्यः कुतो नृणाम् ॥३॥

अर्थ : जोपर्यंत प्रत्यक्ष ईश्वराकडून कृपा होत नाहीं, तोपर्यंत मनुष्याला सतशास्त्रें व सद्‌गुरु यांची प्राप्ति कशी होणार ? होणार नाहीं.

ईश्वराराधनधिया स्वधर्माचरणात्सताम् ॥
ईशप्रसादस्तद्रूपः सुलभश्चात्र सद्‌गुरुः ॥४॥
सद्‌गुरोः संप्रसादेऽस्य प्रतिबन्धक्षयस्ततः ॥
दुर्भावनातिरस्काराद्विज्ञानं मुक्तिदं क्षणात् ॥५॥

अर्थ : नित्यनैमित्तिक कर्में करीत असतांना, मी प्रत्येक कर्मद्वारा ईश्वराचें आराधन करीत आहे अशा भावनेनें जो वागतो त्या सज्जनास ईश्वराची कृपा व तद्रूप सद्‌गुरु या दोहोंची सुलभतेनें प्राप्ति होते. सद्‌गुरूंची कृपा झाल्यावर ज्ञानप्रतिबंधक पातकांचा क्षय होतो, आणि नंतर दुर्भावनांचा लोप होऊन तात्काल मुक्ति देणारे ज्ञान विज्ञान प्राप्त होते.

तस्मात्त्वमिह धन्योऽसि यतस्ते बुध्दिरीदृशी ॥
अतोऽप्यनपगामीह संप्राप्तोऽस्मि यदृच्छया ॥६॥

अर्थ : ज्याअर्थी तुमची बुद्धि अशा प्रकारची म्हणजे ईश्वरानुगामी आहे, त्याअर्थी तुम्ही धन्य आहांत. म्हणून सहजगत्या लाभदायक असा मी येथें तुम्हांस प्राप्त झालो आहे.

स्वात्मविज्ञानेन मुक्तिर्न पदार्थविवेकतः ॥
ब्रह्मवित्परमाप्नोति पदं तन्नैव कर्मठः ॥७॥
शोकं तरत्यात्मविन्नो क्षणिकाकनिवृत्तिमान् ॥
अद्वितीयात्मद्रष्टेहाभयं विन्दन्ति नेतरः ॥८॥

अर्थ : (न्यायकाणादमताचा निषेध करून श्री दत्तप्रभु सांगतात) स्वतःच्या ठिकाणीं असणाऱ्या आत्म्याच्या ज्ञानानेच मुक्ति मिळते, पदार्थाच्या विवेचनानें नाहीं. ब्रह्मवेत्ताच परमपद मिळवू शकतो. कर्मठ ब्राह्मणाला तें

शक्य नसतें. आत्मवेत्ताच शोकावर विजय मिळवूं शकतो. क्षणिक दुःखानें निवृत्त होणारा नाहीं. एकच आत्मा सर्व शरीरांना व्यापून राहिलेला आहे असे जाणणाराच अभय मिळवतो, इतर नाहींत. आत्म्याचें अभेद रुप जाणणाराच भीति व शोक यांवर विजय मिळवतो व मुक्त होतो हा भावार्थ.

रसलाभात्परानन्दी भवतीतरथा नतु ॥
कर्तृत्वादिविहीनस्य विभोर्नित्यैकरूपिणः ॥९॥
जगदारम्भकत्वं नो घटतेऽस्याक्रियस्य हि ॥
परिणामोऽपि न सतो निरंशस्याविकारिणः ॥१०॥

अर्थ : अखंडैकरसाच्या लाभामुळेच परमानन्दाचा लाभ होतो. इतर प्रकारांनी, योगाने, क्षणिक दुःखनिवृत्तीमुळे होत नाही. नित्य, एकरुपी, कर्तृत्वादिरहित, व्यापक आणि निर्बाध अशा प्रभूचे, कुंभाराप्रमाणें (म्हणजे कुंभाराकडे जसें घड्याचें आरंभकत्व व कर्तृत्व असते त्याप्रमाणें) आरंभकत्व व कर्तृत्व नसते. कारण तो अक्रिय आहे. तसेच तो निरंश, सत् व अविकारी असल्याने त्यास परिणामही नसतो.

नाणवोऽग्रेऽविद्यमानाः प्रभवो जगदुद्‌भवे ॥
तेषां सर्वात्मसंयोगे प्रथिमाऽनुपपत्तितः ॥११॥
नाप्यसत्कर्तृ तस्याग्रेऽप्रामाण्याच्चाप्य संभवात् ॥
जडं प्रधानमप्येकं न क्षमं जगदुम्द्वे ॥१२॥

अर्थ : परमाणु हे जगत्पूर्व कालात नसतात व ब्रह्मांडाच्या अंतानंतरही नसतात. म्हणून परमाणु हे जगत्कारण होऊं शकत नाहींत. म्हणून विरुद्ध धर्मीय अशा आत्मस्वरूपाशी त्यांचा संबंध होऊं शकत नाहीं. तसेंच शून्य हेहीं विश्वोत्पत्तीचे कारण होऊं शकत नाहीं असें छांदोग्य उपनिषदात सांगितले आहे. जड आणि प्रधान असे एकच एक जगताच्या उद्‌भवास समर्थ नाहीं.

सृजतीव तदात्मैकः स्वैकांशादूर्णनाभिवत् ॥
लीलाकैवल्यमस्येदं लोकवत्समदर्शिनः ॥१३॥

अर्थ : अखंडैकरस आत्मा मायेच्या सहाय्यानें आपल्या एका अंशापासून अखिल विश्व निर्माण करतो. जसें, कोळी स्वतःच्या पोटातूनच तंतू निर्माण करून त्या तंतूचे मोठे जाळे तयार करतो, त्याप्रमाणे ईश्वराला सृष्टीनिर्मितीसाठी वेगळे साहित्य लागत नाहीं. वैषम्य, नैर्घृण्य यांनी रहित आणि समदर्शी अशा ईश्वराचें हे लीलालाघवच आहे.

यथैकस्यापि पुंसोऽन्तः स्वप्नावेशात्क्षणान्तरे ॥
सत्यवद्भाति नानात्वं बोधे सर्वं विलीयते ॥१४॥

अर्थ : ज्याप्रमाणें एकच मनुष्य, परंतु स्वप्नांत क्षणांत स्वतःचा अंत झालेला पहातो व तो त्याला खरा भासतो, तसेच स्वप्नांत येणाऱ्या सर्व वस्तु त्याला सत्य भासतात, परंतु जागा झाल्यावर तें सर्व आभासात्मक होते हें पटतें व विलीन पावतें.

तथात्मनोऽनादिमायावेशादेकस्य चाप्ययम् ॥
मिथ्याभ्रमः प्रबोधेऽयमेकः स्वात्मैव शिष्यते ॥१५॥

अर्थ : त्याचप्रमाणें एकरस आत्म्याचें, अनादि मायेशीं संयोग झाल्यामुळें नानाप्रकारें मिथ्याभ्रमरूप भासतें. परंतु सद्‌गुरुंनीं बोध केल्यावर स्वात्मसाक्षात्कार होतांच मात्र स्वात्मरुपच शिल्लक उरतें.

भातीदं स्वान्तरादर्शे दृश्यवन्मायया बहिः ॥
स्वप्नवज्जातमिव तत्प्रबुद्धः स शिवोऽस्म्यहम् ॥१६॥

अर्थ : निरवयव नित्यभास्वर, अशा ब्रह्मस्वरूपांत सावयव अनित्य आणि जड अशा विरुद्ध धर्मी जगताचा आभास कसा संभवतो ? याचे उत्तर असे कीं नामरूपात्मक विश्व आत्मस्वरूपांतर्गत मायेनें, आरशांत दिसणाऱ्या नगरादि वस्तुजाताप्रमाणें स्वस्वरूपच आहे असेंच मिथ्याभ्रमानें भासतें. जसें, स्वप्नांतून जागा झालेला मनुष्य मिथ्याभ्यास सोडून, अद्वितीय असा मी एकच आहे असें मानतो, तसेंच मिथ्या नामरूपात्मक विश्वाचा आनंदरूप ब्रह्माचें ठिकाणीं केवळ क्षणिक आभास होतो, तो भ्रमच आहे, आणि मी सच्चिद्घन-शिवस्वरूपच आहे असेच समजतो.

एवं श्रद्धाभक्तियुक्तः संशयं यो विभावयेत् ॥
देवसद्‌गुरुभक्तोऽस्य कुतोऽयं शिष्यते भ्रमः ॥१७॥

अर्थ : अशा रीतीनें श्रद्धा व भक्तीनें युक्त होऊन जो संशयाचें निरसन करील, तो देवसद्‌गुरुभक्त असल्यानें त्याचा भ्रम कसा शिल्लक राहिल ?

अनादिस्वप्नभ्रमोऽयं न स्वयं विनिवर्तते ॥
किंतु स्वदैवयोगाप्तदेवाचार्यप्रसादतः ॥१८॥

अर्थ : स्वप्नानंतर जागृति व बोध आपोआप होतो, परंतु मायाभ्रम-निर्मिती जडसंसाराचा निरास आपोआप होत नाहीं. स्वतःच्या सुदैवानें देव व गुरु यांची कृपा झाल्यावरच तो बोध होतो, व जीवत्वलक्षणाविषयीचा भ्रम दूर होतो.

श्रुत्या युक्त्यानुभूत्या च यत्सत्यं तद्ब्रवीमि ते ॥
आत्मा वा इदमग्रेऽभून्नान्यत्किंचित्कथंचन ॥१९॥

अर्थ : श्रुतींनी प्रतिपादन केलेलें, तर्काला पटलेलें व अनुभवाने सिद्ध झालेलें असें सत्य जें आहे तें मी तुला सांगतो. या दृश्य जगताच्या उत्पत्ती-पूर्वी एक आत्माच होता. त्याशिवाय अन्य कांहींच नव्हते.

स ईक्षणादिना शुद्धसत्त्वमायामुपाश्रितः ॥
सर्वज्ञत्वादिलक्ष्माऽभून्निमित्तं व्यष्ट्यधीश्वरः ॥२०॥

अर्थ : ईक्षण वगैरेच्या योगानें तो आत्मा शुद्धसत्त्वप्रधान मायेचा आश्रय करतो. व्यष्टीचा अधीश्वर असा हा सर्वज्ञत्वादिलक्षणांनी युक्त असून जगताच्या निमित्ताचें कारण झाला आहे.

उपादानं तामसीं च दधानः पाञ्चभौतिकम् ॥
अयं तत्पदवाच्योऽभूत्परं ब्रह्मात्र लक्ष्यकम् ॥२१॥
धृत्वा मलिनसत्त्वां च जीवोऽज्ञत्वादिलक्षणः ॥
अभूत्त्वंपदवाच्योऽत्र कूटस्थब्रह्म लक्ष्यकम् ॥२२॥

अर्थ : तोच आत्मरूप ईश्वर तमःप्रधान मायेचा उपाधिरूपानें आश्रय करतो, आणि पाञ्चभौतिक सृष्टीचें उपादानकारण बनतो. हा तत्पदाचा वाच्यार्थ

आहे. मलिनसत्त्व आणि कामादि विकारांनी दूषित मायेचा आश्रय करून तोच जीवरूप होतो. हा त्वंपदाचा वाच्यार्थ समजावा. कूटस्थ ब्रह्मच सर्वत्र आहे.

शक्तिः परा स्वतन्त्राऽस्य जगदेवं ततोऽभवत् ॥
विवर्तन्यायत इदमवशं रज्जुसर्पवत् ॥२३॥
अत्र गुप्तैश्वरी शक्तिः सर्ववस्तुनियामिका ॥
अन्योन्यधर्मसांकर्याद्विप्लवोऽस्य न चेत्दिसा ॥२४॥

अर्थ : परमेश्वराची शक्ति फार मोठी व अनन्यसाधारण अशी आहे. ती स्वतंत्र आहे. सर्पाचे भासमानत्व ज्याप्रमाणें दोरीवर अवलंबून असते त्याप्रमाणेच विवर्तन्यायानें या शक्तिवर जगताचे अस्तित्व आहे. हे जगत् परतंत्र आहे. येथे गुप्त अशी ईश्वरी शक्ति सर्व वस्तुमात्राचें नियमन करते. अन्यथा अन्योन्य धर्मांच्या संक्रामुळें जगताचा संकरच होईल.

प्रकृत्यधीनचेष्टस्य जीवस्यापि पुमर्थता ॥
शास्त्रदृष्ट्येन्द्रियार्थोत्थरागद्वेषावशत्वतः ॥२५॥

अर्थ : प्रत्येक जीव हा प्रकृतीच्या अधीन असतो. अनुकूल विषयांच्या बद्दल प्रेम व प्रतिकूल विषयांविषयी द्वेष हा प्राचीन संस्कारांमुळें निर्माण झालेला असतो व अशा रीतीनें त्या प्राचीन संस्कारांच्या आधीन असणे म्हणजेच प्रकृति. ती प्रकृति विषय स्मरणाच्या योगें प्रेमद्वेशादिकांना निर्माण करते. आणि बेसावध जीवाला एखाद्या मोठ्या प्रवाहात खेचल्याप्रमाणें अनर्थाकडे ओढून नेते. परंतु शास्त्र त्यापूर्वींच ईश्वर भजनादिकडे जीवाला प्रवृत्त करून अनर्थपातापासून वाचविते. शास्त्रानुसार ईश्वरभक्ति करून रागद्वेषापासून सुटका करून घेणे यातच जीवाचा पुरुषार्थ आहे.

प्रपञ्चस्तदभावोऽस्मिन्नध्यारोपापवादतः ॥
प्रपञ्चोपशमे शान्ते शिवेऽद्वैते कथान्विमौ ॥२६॥
बन्धमोक्षौ तथा जीवसर्वेश्वरभिदावपि ॥
कोशोपाधिपरित्यागान्न जीवो नापि चेश्वरः ॥२७॥

अर्थ : आत्मस्वरूपाचें ठिकाणीं मुळींच प्रपञ्च नाहीं. जीवच त्याचे ठिकाणीं आरोप करतो. शान्त अशा शिवाचें ठिकाणीं बंध आणि मोक्ष, जीव व ईश्वर असे भेद कसे असतील ? कोशरूपी उपाधिच्या त्यागानें जीव आणि ईश्वर असा भेदच राहात नाहीं. जसें सूर्याचे ठिकाणीं दिवस व रात्र हे भेद नसतात त्याप्रमाणे—

स्वस्वरूपे परिज्ञाते न बन्धो नापि मोक्षणम् ॥
बन्धमोक्षप्रकारं ते वक्ष्ये संक्षेपतः श्रुणु ॥२८॥

अर्थ : आत्मस्वरूपाचा बोध झाल्यावर बन्ध आणि मोक्ष ह्या दोन्हींचा लोप होतो. या बन्ध आणि मोक्षांचे प्रकार थोडक्यांत सांगतो ते श्रवण कर.

सच्चित्सुखात्मकोऽप्यात्माऽद्वितीयोऽजोऽजरोऽमरः ॥
स्वाश्रया या स्वविषया स्वमायाऽसौ तया भृशम् ॥२९॥
स्वाभाविकस्वरूपात्स प्रच्युतोऽनात्मतां गतः ॥
देहाद्यनात्मनि प्राप्ताशेषानर्थः सुदुःखितः ॥३०॥

अर्थ : सच्चित्सुखरूप, अद्वितीय, अजन्मा, जराव्याधिरहित आणि अमर असा हा आत्मा स्वाश्रया, स्वविषया अशा स्वमायेकडून आपल्या स्वाभाविक स्वरूपापासून भ्रष्ट केला जाऊन अनात्मतेस प्राप्त झाला आणि देहादि उपसर्गांनी युक्त होऊन अनेक अनर्थांचे योगाने फार दुःखित झाला.

अविद्याकामकर्माद्यैरिष्टप्राप्तिं च साधनैः ॥
काङ्क्षन्नरिष्टनाशं चालभमानोऽमृतं भृशम् ॥३१॥
आकृष्यमाणो रागाद्यैर्म कराद्यैरिवार्णवे ॥
मोमुह्यमानो मर्त्यादिनानायोनिषु संसरन् ॥३२॥
कथंचिद्दैवयोगेन लब्ध्वा जन्मोत्तमं यदा ॥
नित्यनैमित्तिकश्रौतकर्मभिः स स्वनुष्ठितैः ॥३३॥

अर्थ : काम्यकर्मादि साधनांनीं इष्ट गोष्टींचा लाभ व अनिष्ट गोष्टींचा नाश इच्छिणारा परंतु दुःखनाशक अशा अमृताची प्राप्ति ज्यास झाली नाहीं

असा, सागरांत मगरींनीं ओढावे त्याप्रमाणें संसारांत प्रेम, द्वेष, इत्यादींच्याकडून सतत खेचला जाणारा, मर्त्य, जड अशा नाना योनींतून फिरत जाणारा, सुदैवानें जेव्हां उत्तम जन्माप्रत पोंचतो, म्हणजे ब्राह्मणजन्म प्राप्त करून घेतो, त्यावेळीं नित्य, नैमित्यिक, श्रुतींनी प्रतिपादन केलेली, अशी कर्में अभिमानरहित अंतःकरणानें व अनासक्त वृत्तीनें करतो.

ईश्वरार्थं व्यपगतरागाद्यन्तर्मलो यतिः ॥
दोषदृष्ट्यैहिकाद्यर्थविरक्तः साधनान्वितः ॥३४॥
ब्रह्मात्मभावं बुभुत्सुः श्रद्धाभक्त्यैव सद्गुरुम् ॥
उपेत्य विधिवत्तस्माद्वेदान्तश्रवणादिना ॥३५॥
तत्वमस्यादिवाक्यार्थमखण्डैकरसत्वतः ॥
विज्ञाय लक्षणावृत्त्या सोऽहमस्मीत्यभेदतः ॥३६॥

अर्थ : संन्यास ग्रहण करून, प्रेमद्वेषादि मलांनी रहित होऊन, दोष-दृष्टीनें ऐहिकादिकांचा त्याग करून, त्यांपासून विरक्त होऊन, साधनाचा स्वीकार करून, ब्रह्मात्मभाव जाणण्याच्या इच्छेने श्रद्धा व भक्ति या दोहोंनीं युक्त होऊन, सद्गुरूंच्या जवळ जाऊन त्यापासून विधिपूर्वक वेदान्तश्रवण करून "तत्वं असि" या वाक्याचा अर्थ अखंडैकरसत्वानें खरेपणानें जाणून घेऊन, आणि "सोऽहमस्मि" (मीच तो आहे) ह्याचाही एकरसत्वानें अनुभव घेऊन,

प्रतिबंधक्षयांते तु विमुक्तोऽज्ञानबंधनात् ॥
निवृत्ताज्ञानतत्कार्यो जीवन्मुक्तो भवेद्ध्रुवम् ॥३७॥

अर्थ : त्रिविध प्रतिबंधांच्या क्षयानंतर अज्ञानबंधनापासून व अज्ञान-बंधाच्या कार्यापासून मुक्त होतो व निश्चितपणें, कायमचा जीवन्मुक्त होतो.

कृतकृत्येन नाप्तव्यं श्रोतव्यं वाऽवशिष्यते ॥
व्यवहारेऽपि तद्दृष्टिः प्राप्ता चेत्सा चिदन्वयात् ॥३८॥
चेष्टते यावदारब्धं तद्देहः शुष्कपर्णवत् ॥
परमानन्दपूर्णोऽसौ धर्मकर्मविवर्जितः ॥३९॥

दक्षो ज्ञोऽप्यन्यदृष्ट्या तु बालोन्मत्तजडोपमः ॥
तिष्ठत्येव स्वरूपे स दिवि भिन्नघटाभ्रवत् ॥४०॥

अर्थ : कृतकृत्य अशा त्याला मिळवावयाचे अगर जाणावयाचे असें काहीही राहिलेले नसते. तथापि कदाचित व्यवहारात तो बाह्य दृष्टीने पाहूं लागला तरीही चित्स्वरूपाच्या अनुसंधानामुळे तो परमानंदपूर्ण असाच असतो. आरंभलेले कार्य त्याचा देह जरी करित राहिला तरी, वाऱ्याच्या योगें एखादे वाळलेले पान जसे सहज गळून पडते अगर वहात जाते त्याप्रमाणें त्याचे आचरण सहजपणाचे असते. तो धर्म व कर्म यांपासून मुक्त असतो. चतुर व ज्ञानी असा तो बाह्यतः बालोन्मत्तजडवत् दिसला तरी आकाशातील भिन्नघट ढगाप्रमाणे स्वस्वरूपात स्थिरच असतो.

त्रिधामस्वेक आत्मैवं ज्ञेयः स्मृत्यन्वयाच्छिवः ॥
गुणेशस्तद्व्यतीतस्य पुनर्जन्म न विद्यते ॥४१॥
आदेहपातमेवं चेत्स्वात्मरूपं न वेत्ति यः ॥
ततः सर्गेषु लोकेषु शरीरत्वाय कल्पते ॥४२॥

अर्थ : स्थूल, सूक्ष्म व कारण देहांचे ठिकाणीं एकचरक शिव, त्रिगुणेश असा आत्मा आहे असें याप्रमाणें स्मृतिच्या आधारें जाणून घ्यावें; त्या आत्म्याचें स्वरूप जाणावें. अशा ज्ञात्या पुरुषास पुनर्जन्म असत नाहीं. शरीराचा त्याग करण्यापूर्वी ज्यास आत्मरूपाचें ज्ञान होत नाहीं त्यास पुन्हां भूलोकीं शरीर धारण करावें लागतें.

नोत्क्रामन्त्यसवोऽज्ञस्य सुषुम्णामार्गतो ध्रुवम् ॥
समेति सोऽमृतत्वं हि तस्येन्द्रियमनांसि तु ॥४३॥
दिग्वातार्कप्रचेतोऽश्विवह्नीन्द्रोपेन्द्रमृत्युकान् ॥
ब्रह्मज्येशहरीन्यान्ति नान्येषां मृत्युगामिनाम् ॥४४॥

अर्थ : ब्रह्मज्ञानी मनुष्याचे प्राण इतर मर्त्यांप्रमाणें जात नाहींत, तर सुषुम्णामार्गानें जाऊन तो अमृतत्वाशीं एकरूप होतो. त्याची इंद्रियें आणि

मन दिशा, वायु, सूर्य, वरुण, अश्वि, अग्नि, इन्द्र, उपेन्द्र, मृत्यु, ब्रह्मा, शंकर व विष्णु यांच्याप्रत पोंचतात. इतर प्रकारें मृत्यु पावलेल्यांना अशी गति मिळत नाहीं.

कालचक्रमिदं सृष्टं तदर्थमजरं ध्रुवम् ॥
त्रिनेमि द्वादशारं च दांपत्येनार्कपुत्रकाः ॥४५॥
यत्र सप्तशतानीमे विंशतिश्चास्थिताः खलु ॥
बन्धमोक्षप्रकारोऽयं संक्षेपेणोदितो मया ॥४६॥

अर्थ : म्हणून तीन धावांनी युक्त (उन्हाळा, पावसाळा आणि हिंवाळा) बारा आरा असलेले बारा महिने असें हें नाश न पावणारे कालचक्र निर्माण केलेले आहे. दिवस व रात्री असे सातशेवीस भाग ह्या चक्रास आहेत. बन्ध आणि मोक्ष या बाबतींत संक्षेपाने हे वर्णन मी केलेले आहे.

मोक्षो ज्ञानं विना न स्यान्न ज्ञानं सद्‌गुरुं विना ॥
सद्‌गुरुं नेशकृपया विना कोपीह विन्दति ॥४७॥
ईशप्रसाद प्राप्त्यर्थं सत्त्वशुध्द्यर्थमेव च ॥
नित्यनैमित्तिकश्रौतस्वधर्मानुष्ठितिः स्मृता ॥४८॥

अर्थ : ज्ञानाशिवाय मोक्षप्राप्ति नाहीं. ज्ञान सद्‌गुरुशिवाय नाहीं. ईशकृपेशिवाय कोणासही सद्‌गुरुप्राप्ति होत नाहीं. तेव्हां ईशकृपेच्या प्राप्तिसाठीं व सत्त्वशुद्धीसाठीं नित्यनैमित्तिक श्रौतस्मार्त कर्मानुष्ठान आवश्यकच आहे.

द्विपैकदेशमालम्ब्य यथान्धा द्विपवेदिनः ॥
अन्योन्यं कलहायन्ते शास्त्रौघोऽयं तथाऽल्पदृक् ॥४९॥

अर्थ : अनेक आंधळी माणसें हत्तीच्या वेगवेगळ्या भागांना स्पर्श केल्यावर त्या हत्तीच्या स्वरूपाविषयीं एकमेकांत भांडतात, तद्वत्‌च अल्पदृष्टि माणसें शास्त्रसमुच्चयाबद्दल परस्परांत कलह करतात.

विज्ञाय तत्त्वं भवता मदुक्तेर्बुद्ध्वा सदैवोपनिषन्मतं सत् ॥
स्थेयं तदालोचन एव तेन मुक्तिः कृतार्थत्वमिहैव तेऽस्तु ॥५०॥

अर्थ : मी आतापर्यंत सांगितलेलें तत्त्व जाणून घेऊन, श्रुति, युक्ति आणि अनुभव यांनीं ग्राह्य असें उपनिषदाचें प्रतिपादन जाणून, त्याचाच तूं विचार व मनन करीत रहावेस; त्यायोगानेंच तुला या लोकीं कृतार्थत्व व मुक्ति प्राप्त होईल. तुला माझा पूर्ण आशीर्वाद आहे."

इति श्रीमद्दत्तपुराणे सार्धत्रिसाहस्र्यां संहितायां वासुदेव्यां ज्ञानकाण्डे-प्रथमाष्टके तृतीयोध्यायः ॥३॥

॥ अथ कर्मेश्वरविप्रतिपत्तिर्नाम प्रथमाष्टके चतुर्थोऽध्यायः ॥

अयं वाऽऽपीय भगवदुपदेशसुधारसम् ॥
श्रुतिद्वारा नातितृप्तः पप्रच्छ स यतिः पुनः ॥१॥
भगवन्कर्म किं कार्यमुपास्यश्च क ईश्वरः ॥
श्रुता हि बहवोऽत्रेशाः कर्माणि च तथा पुनः ॥२॥

अर्थ : भगवंताच्या उपदेशाचें अमृत श्रवणद्वारें भरपूर प्राशन करूनही पुरेसे समाधान न झालेल्या त्या यतीनी पुन्हा प्रश्न केला. "हे भगवन्, कर्म कोणते, कार्य काय, उपास्य कोण, ईश्वर कोण हे सविस्तर कृपा करून सांगावे. कारण मी असे ऐकलें आहे की अनेक देव आणि कर्मे आहेत.

पञ्चविंशतिसंस्काररूपं कर्मोदितं परैः ॥
अमृतत्वायाष्टचत्वारिंशत्संस्काररूपकम् ॥३॥
व्रततीर्थार्चनजपतपोदानादिरूपकम् ॥
सापेक्षमश्वयज्ञादिश्रुतेरिति केचन ॥४॥

अर्थ : पंचवीस संस्कार झालेले ब्राह्मण पवित्र असतात, व अठ्ठेचाळीस संस्कार झालेले ब्राह्मण सायुज्य व सरूपता मुक्ति मिळवितात असे कांहींचे मत आहे. व्रते, तीर्थाटण, जप, तप, दान आणि यज्ञ ही कर्मे श्रुतींनी सांगितली आहेत असे कांहीचे म्हणणे आहे.

निर्विघ्नार्थं हरीशाद्या देवा अपि भजन्तियम् ॥
मर्त्यैः स वक्रतुण्डोर्च्य इति गाणेशसंमतम् ॥५॥
जगत्स्रष्टादिहेतुः सा वरा श्रुत्युक्तदेवता ॥
गणानां त्वेति मन्त्रेण स्तुता गृत्समदर्षिणा ॥६॥
इत्युक्तं तत्पुराणेऽतो गणेशो ब्रह्मणस्पतिः ॥
महाकविर्ज्येष्ठराजः श्रूयते मन्त्रकृच्च सः ॥७॥

अर्थ : विघ्ननाशासाठीं हरी आणि शंकर आदि देवसुद्धां ज्याला भजतात, त्या वक्रतुण्डाचे (गणेशाचे) मानवांनी पूजन करावें असें गाणेशांचे मत आहे. श्रुतींनीं या देवतेला (गणेशाला) जगदुत्पत्तिचे मूलस्थान व आदि हेतु मानलें आहे व गृत्समद् ऋषींनी "गणानां त्वा" मन्त्रानें तिचें स्तवन केलें आहे. गणेशपुराणांत सांगितलेला गणेश म्हणजेच ब्रह्मणस्पति होय. यालाच महाकवि, ज्येष्ठराज आणि मन्त्रकृत् म्हणतात.

मन्त्रं वदत्युकथ्यमेष प्रनूनं ब्रह्मणस्पतिः ॥
यस्मिन्निन्द्रादयः सर्वे देवा ओकांसि चक्रिरे ॥८॥
स प्रभुः सर्वतः पाता यो रेवान्यो अमीवहा ॥
अतोऽर्च्योऽसौ यश्चतुरो वसुवित्पुष्टिवर्धनः ॥९॥

अर्थ : वेदमंत्रांनी हा खरोखर ब्रह्मणस्पति आहे अशी स्तुति केली आहे. त्यांमध्यें इंद्रादि देवांनी मंदिरें निर्माण केली आहेत. जो द्रव्यदाता, रोगनाशक, सर्व बाजूंनी स्वभक्ताचें रक्षण करणारा असा आहे, त्वरित फल देणारा, सर्व संपत्तिचा ज्ञाता आहे, आणि पुष्टि वाढविणारा आहे, त्या गजाननाचे सर्वांनी अर्चन करावें.

वक्रतुण्डोऽपि सुमुखः साधोगंतापि चोर्ध्वगः ॥
येऽमुं नार्चन्ति ते विघ्नैः पराभूता भवंति हि ॥१०॥
ये दूर्वाङ्कुरलाजाद्यैः पूजयंति शिवात्मजम् ॥
ऐहिकामुष्मिकान्भोगान्भुक्त्वा मुक्तिं व्रजंति ते ॥११॥

यस्योदयास्तसमये शिवाद्या अपि चाञ्जलिम् ॥
बध्नन्ति विश्वसाक्षी स प्रत्यक्षः श्रूयते रविः ॥१२॥

अर्थ : गणपति वक्रतुण्ड असूनही सुमुख आहे. मूषकावर बसून जाणारा (अधोगन्ता) असूनही त्याची गति ब्रम्ह्याकडे आहे. जे त्याचे पूजन करीत नाहींत ते विघ्नांनीं पराभूत होतात. जे दुर्वांकूर, लाजादिक यांनीं शिवपुत्राची म्हणजे गणेशाची पूजा करतात ते भूतलावरील व पारलौकिक भोग भोगून मुक्तीप्रत जातात.

ज्याच्या उदयाच्या व अस्ताच्या समयास शिव आदि देवगणसुद्धा हात जोडून रहातात तो सूर्यच प्रत्यक्ष विश्वसाक्षी भगवान् आहे असें म्हणतात.

यदधीना कालगतिर्यदधीनाः क्रियाः समाः ॥
यन्मन्त्रेण द्विजत्वाप्तिर्यन्मन्त्रेण कृतार्थता ॥१३॥
लौकिकाऽपि व्यवहृतिर्यत्प्रसादात्प्रवर्तते ॥
स्मर्यतेऽस्माद्विश्वसृष्टिः सवितुः श्रुयतेऽपिच ॥१४॥
जगतस्तथुषश्चात्मा सूर्यस्तं बहुधा जगुः ॥
मूर्तामूर्तं जगत्सर्वं प्राणापानात्मकं श्रुतम् ॥१५॥
प्राणः सूर्योऽपरश्चद्रस्तयोः सर्वं प्रतिष्ठितम् ॥
श्रीसूर्यकिरणावेशाच्चन्द्रस्यापि च चन्द्रता ॥१६॥
अतश्चन्द्रो न भिन्नोऽस्मात्स सूर्यः सकलात्मकः ॥
यं विना जगदान्ध्यं हि स देवः कैर्न पूज्यते ॥१७॥
तमोऽमुं ग्रसतीत्येष दृष्टवादो न तात्त्विकः ॥
तस्माद्भक्तेष्टदो देवो वरोकश्चापराजितः ॥१८॥

अर्थ: ज्याचे आधीन कालचक्राची गति, सर्व क्रिया आहेत, ज्या संबंधीच्या मन्त्रानेच द्विजत्वाची प्राप्ति होते व ज्याच्या मन्त्राने कृतार्थता प्राप्त होते, सर्व लौकिक व्यवहारहि ज्याच्या कृपेनेंच केवळ घडूं शकतात, अशा ह्या सूर्यापासूनच सर्व विश्वसृष्टि उत्पन्न होते असें स्मृतिश्रुतींनी वर्णिलें आहे.

निर्विघ्नार्थं हरीशाद्या देवा अपि भजन्तियम् ॥
मर्त्यैः स वक्रतुण्डोर्च्य इति गाणेशसंमतम् ॥५॥
जगत्स्रष्ट्रादिहेतुः सा वरा श्रुत्युक्तदेवता ॥
गणानां त्वेति मन्त्रेण स्तुता गृत्समदर्षिणा ॥६॥
इत्युक्तं तत्पुराणेऽतो गणेशो ब्रह्मणस्पतिः ॥
महाकविर्ज्येष्ठराजः श्रूयते मन्त्रकृच्च सः ॥७॥

अर्थ : विघ्ननाशासाठीं हरी आणि शंकर आदि देवसुद्धां ज्याला भजतात, त्या वक्रतुण्डाचे (गणेशाचे) मानवांनी पूजन करावें असें गाणेशांचे मत आहे. श्रुतींनीं या देवतेला (गणेशाला) जगदुत्पत्तिचे मूलस्थान व आदि हेतु मानलें आहे व गृत्समद् ऋषींनी "गणानां त्वा" मन्त्रानें तिचें स्तवन केलें आहे. गणेशपुराणांत सांगितलेला गणेश म्हणजेच ब्रह्मणस्पति होय. यालाच महाकवि, ज्येष्ठराज आणि मन्त्रकृत् म्हणतात.

मन्त्रं वदत्युक्थ्यमेष प्रनूनं ब्रह्मणस्पतिः ॥
यस्मिन्निन्द्रादयः सर्वे देवा ओकांसि चक्रिरे ॥८॥
स प्रभुः सर्वतः पाता यो रेवान्यो अमीवहा ॥
अतोऽर्च्योऽसौ यश्चतुरो वसुवित्पुष्टिवर्धनः ॥९॥

अर्थ : वेदमंत्रांनी हा खरोखर ब्रह्मणस्पति आहे अशी स्तुति केली आहे. त्यांमध्यें इंद्रादि देवांनी मंदिरें निर्माण केली आहेत. जो द्रव्यदाता, रोगनाशक, सर्व बाजूंनी स्वभक्ताचें रक्षण करणारा असा आहे, त्वरित फल देणारा, सर्व संपत्तिचा ज्ञाता आहे, आणि पुष्टि वाढविणारा आहे, त्या गजाननाचे सर्वांनी अर्चन करावे.

वक्रतुण्डोऽपि सुमुखः साधोगंतापि चोर्ध्वगः ॥
येऽमुं नार्चन्ति ते विघ्नैः पराभूता भवंति हि ॥१०॥
ये दूर्वाङ्कुरलाजाद्यैः पूजयंति शिवात्मजम् ॥
ऐहिकामुष्मिकान्भोगान्भुक्त्वा मुक्तिं व्रजंति ते ॥११॥

यस्योदयास्तसमये शिवाद्या अपि चाञ्जलिम् ॥
बध्नन्ति विश्वसाक्षी स प्रत्यक्षः श्रूयते रविः ॥१२॥

अर्थ : गणपति वक्रतुण्ड असूनही सुमुख आहे. मूषकावर बसून जाणारा (अधोगन्ता) असूनही त्याची गति ब्रम्ह्याकडे आहे. जे त्याचे पूजन करीत नाहींत ते विघ्नांनीं पराभूत होतात. जे दुर्वांकूर, लाजादिक यांनीं शिवपुत्राची म्हणजे गणेशाची पूजा करतात ते भूतलावरील व पारलौकिक भोग भोगून मुक्तीप्रत जातात.

ज्याच्या उदयाच्या व अस्ताच्या समयास शिव आदि देवगणसुद्धा हात जोडून रहातात तो सूर्यच प्रत्यक्ष विश्वसाक्षी भगवान् आहे असें म्हणतात.

यदधीना कालगतिर्यदधीनाः क्रियाः समाः ॥
यन्मन्त्रेण द्विजत्वाप्तिर्यन्मन्त्रेण कृतार्थता ॥१३॥
लौकिकोऽपि व्यवहृतिर्यत्प्रसादात्प्रवर्तते ॥
स्मर्यतेऽस्माद्विश्वसृष्टिः सवितुः श्रुयतेऽपिच ॥१४॥
जगतस्तथुषश्चात्मा सूर्यस्तं बहुधा जगुः ॥
मूर्तामूर्तं जगत्सर्वं प्राणापानात्मकं श्रुतम् ॥१५॥
प्राणः सूर्योऽपरश्चद्रस्तयोः सर्वं प्रतिष्ठितम् ॥
श्रीसूर्यकिरणावेशाच्चन्द्रस्यापि च चन्द्रता ॥१६॥
अतश्चन्द्रो न भिन्नोऽस्मात्स सूर्यः सकलात्मकः ॥
यं विना जगदान्ध्यं हि स देवः कैर्न पूज्यते ॥१७॥
तमोऽमुं ग्रसतीत्येष दृष्टवादो न तात्विकः ॥
तस्माद्भक्तेष्टदो देवो वरोकश्चापराजितः ॥१८॥

अर्थ : ज्याचे आधीन कालचक्राची गति, सर्व क्रिया आहेत, ज्या संबंधीच्या मन्त्रानेच द्विजत्वाची प्राप्ति होते व ज्याच्या मन्त्राने कृतार्थता प्राप्त होते, सर्व लौकिक व्यवहारहि ज्याच्या कृपेनेंच केवळ घडूं शकतात, अशा ह्या सूर्यापासूनच सर्व विश्वसृष्टि उत्पन्न होते असें स्मृतिश्रुतींनी वर्णिलें आहे.

जंगमाचा आणि स्थावराचा आत्मा एकमेव सूर्यच आहे असें श्रुतींनी वर्णन केले आहे. मूर्त आणि अमूर्त असें हें सर्व जगत् प्राण आणि अपान या वायूंनीं युक्त आहे असें वर्णिलें आहे. सूर्य हा प्राणवायु आहे व चन्द्र हा अपानवायु आहे. या दोहोंमध्यें सर्व जगत् अधिष्ठित आहे. चन्द्राचे चन्द्रत्व सुद्धां श्रीसूर्याच्या किरणावेशावरच अवलंबून आहे. सूर्यकिरण चंद्राचे पृष्ठ भागावर पडून परावर्तित होतात. त्यामुळेच चंद्रास चंद्रत्व म्हणजे शीतलत्वादि गुण प्राप्त होतात. म्हणून चन्द्र हा सूर्यापासून भिन्न नाहीं. सूर्यच सकलात्मक आहे. तेव्हां ज्याच्या अस्तित्वाशिवाय अखिल जगताला अन्धत्व येईल असा हा सूर्यदेव कां बरें पूजूं नये ? त्याची कोण बरें पूजा करणार नाहीं ? त्याला अंधःकार ग्रासतो हा दृष्टवाद आहे. तो खरा नाहीं. तेव्हां भक्तांना इष्टप्राप्ति करून देणारा असा हा श्रेष्ठस्थानचा सूर्य केवळ अपराजित, अजिंक्य आहे.

ईशावास्यमिदं सर्वं चक्षो सूर्यो अजायत ॥
इति श्रुतिरुवाचातो महादेवः परावरः ॥१९॥
अष्टमूर्तेरसौ सूर्यो मूर्तित्वे परिकल्पितः ॥
नेत्रं त्रिलोचनस्यैकमसौ सूर्यस्तदाश्रितः ॥२०॥
यस्य भासा सर्वमिदं विभातीति श्रुतेरिमे ॥
तमेव भांतमीशानमनु भांति खगादयः ॥२१॥

अर्थ : हे सर्व शंकराने आच्छादून टाकावे, म्हणजे शंकरच सर्वश्रेष्ठ आहे असे श्रुति सांगते. शंकराच्या नेत्रापासून सूर्य झाला. म्हणून महादेव हाच सर्वश्रेष्ठ देव होय. भू, जल, अग्नि, वायु, आकाश, सूर्य, हिमांशु व पुरुष या महादेवाच्या आठ मूर्तीप्रकारांत सूर्याचा अंतर्भाव आहे. त्रिनेत्र अशा या शंकराचा एक नेत्रच सूर्य आहे. ज्याच्या दिव्य तेजामुळें हे सर्व जगत् प्रकाशते, त्या शंकराच्या तेजाविष्कारानंतरच सर्व खगण म्हणजे सूर्य चन्द्र आदि प्रकाशित होतात.

ईशानः सर्वविद्यानां भूतानां चेति च श्रुतेः ॥
वेदादीनामप्यधीशः स ब्रह्मा कैर्न पूज्यते ॥२२॥

यस्य संहारकाले तु न किंचिदवशिष्यते ॥
सृष्टिकाले पुनः सर्वं स एकः सृजति प्रभुः ॥२३॥
सूर्या चद्रमसौ धाता यथापूर्वमकल्पयत् ॥
इति श्रुतेर्महादेवः श्रेष्ठोऽर्च्यः सकलार्चितः ॥२४॥

अर्थ : जो प्राणिमात्रांचा व विद्यांचा अधिपति आहे असें श्रुति सांगतात तसेंच जो वेदादिकांचाही अधीश आहे, त्या ब्रह्मदेवाची कोण बरें पूजा करीत नाही? ज्याच्या संहारकाली कांहीही शिल्लक रहात नाही, आणि उत्पत्तिचें वेळी पुन्हां तोच एकटा सर्वांची उत्पत्ति करतो, असा हा ब्रम्हा आहे. "सूर्याचन्द्रमसौ धाता यथापूर्वमकल्पयत्" असें श्रुतींनी श्रीमहादेवाचें वर्णन केले आहे तो महादेव सकलांकडून पूजला जातो, श्रेष्ठ आहे आणि पूजनीय आहे.

विश्वं भूतं भवद्भव्यं सर्वं रुद्रात्मकं श्रुतम् ॥
मृत्युंजयस्तारकोऽतः स यज्ञस्य प्रसाधनः ॥२५॥
विषमाक्षोऽपि समदृक्साशिवोऽपि शिवः स च ॥
वृषसंस्थोऽप्यतिवृषो गुणात्माप्यगुणोऽमलः ॥२६॥
यदाज्ञामुद्वहन्त्यत्र शिरसा सासुराः सुराः ॥
अन्नं वातो वर्ष इतीषवो यस्यास्य विश्वपाः ॥२७॥

अर्थ : भूत, वर्तमान व होणारे सर्व विश्व रुद्रात्मकच, रुद्रस्वरूपच आहे. तोच मृत्युंजय रुद्र सर्वांचा तारक व यज्ञाचे प्रमुख साधन आहे. दक्षाचे यज्ञप्रसंगी महादेव नसल्याने तो यज्ञ सफल झाला नाही. शिवाला तीन नेत्र असूनही तो सर्वांकडे समभावाने पहातो; हा ग्राह्य, तो ताज्य असा भेद त्याचे जवळ नाही. स्मशानक्रीडा आदि अशुभ गोष्टी करीत असूनही तो शुभंकर आहे, बैलावर बसणारा असूनही विधिनिषेधातीत आहे आणि गुणरहित असूनही, भक्तांवर अनुग्रह करण्यासाठी गुणात्मा झाला आहे. तो मलनिवर्तकही आहे. ज्याची आज्ञा सुर व असुर शिरसावंद्य करतात व अन्न, वायु आणि पर्जन्य हे ज्याचे तीन बाण आहेत असा तो विश्वाचा पालनकर्ता आहे.

भिषक्तमं त्वा भिषजां श्रुणोमीति श्रुतेरयम् ॥
स्वभक्तसंसारमहारोगहर्ताऽपि शंकरः ॥२८॥
शिवोऽपि शक्तियुक्तश्चेत्प्रभुः कार्यायनान्यथा ॥
स्वमायया विनेशस्य परस्यानुभवात्मनः ॥२९॥
न घटेतार्थसंबंधस्ततो माया परावरा ॥
यस्याः प्रभावं प्रवक्तुं शिवाद्या अप्यलं बलम् ॥३०॥

अर्थ : शंकर हा महावैद्य आहे असें श्रुतिवचनांवरून ऐकलें आहे. तो स्वतःच्या भक्तांच्या संसाररूपी महारोगाचेही हरण करतो. शिव हा शक्तियुक्त झाल्यावरच कार्य करू शकतो. स्वमायेच्या आश्रयाविना परावर अशा शंकराचा अनुभव येत नाहीं. तसेंच क्रियारूप अर्थसंबंधही घडत नाहीं. जिचा प्रभाव वर्णन करण्यास शिवादि देवसुद्धां असमर्थ आहेत ती माया अतिशय सामर्थ्यवान्, परावर अशी आहे.

वैष्णवीयं महामाया सुरासुरमुनिस्तुता ॥
शय्यां देवमयीं कृत्वा शेतेऽसाविति गीयते ॥३१॥
सर्वे देवाश्च मुनयो विषमे यां स्तुवन्ति हि ॥
सृष्टिस्थितिविनाशानां हेतुरेका सनातनी ॥३२॥
विदुषोऽपि हठाच्चेतो महामोहाय यच्छति ॥
अभक्तानां बन्धहेतुर्भक्तानां मुक्तिदा च सा ॥३३॥

अर्थ : या वैष्णवी महामायेची सुर, असुर व मुनि स्तुति करतात. ती देवमयी शय्या तयार करून शयन करते असे म्हणतात. सर्व देव आणि मुनी जिचे संकटकालीं स्तवन करतात ती सनातन व उत्पत्ति, स्थिति आणि संहार यांची कारणरूप आहे. ती (माया) विद्वान् लोकांचे चित्तसुद्धां बलानें मोहाकडे आकृष्ट करते. तीच अभक्तांना बंधनकारक व भक्तांना मोक्षदायक आहे.

सर्वेष्वपि हि भूतेषु चेतनेत्युच्यते ततः ॥
स्वात्मारामः शिवोऽप्येतां रत्यर्थमनुधावति ॥३४॥
माया चतुष्कपर्दाऽसौ युवतिर्नित्यनूतना ॥
सुपेशाश्च घृतास्याऽऽद्यौ वस्तेऽस्य वयुनान्यपि ॥३५॥
भक्तिःश्रद्धा धृतिर्ह्री श्री धी मेधाद्यैश्च सत्सु या ॥
तृष्णाऽलक्ष्म्यार्ति भीनिद्रातन्द्रारूपैरसत्सु च ॥३६॥

अर्थ : सर्व प्राणिमात्रात वास करणाऱ्या ह्या महामायेलाच चेतना म्हणतात. स्वात्मस्वरूपांत रंगलेला शिवसुद्धां तिच्यामागे प्रेमाने धावतो. ही माया अतिशय उत्कृष्ट, सुंदर, तरुण, नित्यनूतन, मोहक आहे. घृतभक्षणानें जसे मुख मधुर होते त्याप्रमाणे ती मोहक आहे. ती ज्ञानी लोकांचे ज्ञान आच्छादून टाकते. भक्ति, श्रद्धा, धृति, ह्री, श्री, बुद्धि, मेधा इत्यादि गुणांचे रूपाने ती सज्जनांचे ठिकाणी व लोभ, दारिद्र्य, दुःख, भीति, निद्रा, तन्द्रा या रूपांनीं ती असाधु लोकांचे ठिकाणीं वास करून राहते.

क्षणे क्षणे विमुह्यन्ति वशिनोऽप्यत्र योगिनः ॥
सैषाऽनिर्वचनीयार्च्या या ह्यनादिरजा श्रुता ॥३७॥
विष्णोर्हास्यमसौ माया तदाधारा जडाऽधमा ॥
प्रध्वंसोऽस्या अनादेश्च विष्णोः पदविलोचनात् ॥३८॥
देवानां परमो विष्णुरवमोऽग्निरिति श्रुतेः ॥
अयं विष्णुरजोऽनादिरनन्तो विश्वकारणः ॥३९॥

अर्थ : इंद्रियांना स्वाधीन करून राहिलेले योगी सुद्धां या मायेच्या प्रभावाने क्षणोक्षणी मोहित होतात. ती ही माया अनादि, न जन्मलेली, वर्णनाच्या पलिकडील व पूजनीय आहे. ही माया म्हणजे विष्णूचें हास्य आहे, विष्णूचा आधार घेऊन राहिलेली आहे, जड व अधम आहे. परंतु विष्णूच्या पवित्र पदांचे दर्शन घेतल्यानें ह्या अनादि मायेचा नाश होतो. सर्व देवांत विष्णु श्रेष्ठ आहे. अग्नि त्यापेक्षां कनिष्ठ आहे असें श्रुति सांगतात. हा विष्णु अजन्मा, अनादि आणि अनन्त असून विश्वाचे कारण आहे.

सूरयस्तत्पदं श्रेष्ठं सदा पश्यन्ति नेतरे ॥
वीर्याणि तस्य कोऽप्यत्र न वेदोरुक्रमस्य च ॥४०॥
प्रागुत्पाद्य विधिं नाभेर्वेदान्दत्त्वा ततो जगत् ॥
उत्पादयत्यसावेव बुद्धिदीपो मुमुक्षुराट् ॥४१॥
भीत्याप्यधिकृता अस्मा उद्वहन्ति बलिं सुराः ॥
माययाश्नन्त्यन्यदत्तं सम्राज इव भूमिपाः ॥४२॥
यस्य भ्रूभङ्गमात्रेण त्रिलोकी नश्यति क्षणात् ॥
इच्छामात्रे पुनर्जाते सेश्वरोत्पद्यते च सा ॥४३॥
य आत्मभूतत्तच्छत्रुः स क्रूरो यात्यधोगतिम् ॥
दुरत्ययामपि घ्नन्ति मायां यद्रूपचिन्तकाः ॥४४॥

अर्थ : ज्ञानी लोकच त्या महाविष्णूचें श्रेष्ठपद नेहमीं पहातात, इतरांना ते दिसत नाहीं. ज्याच्या पावलानीं अखिल ब्रह्मांड व्यापिलें, त्याचा पराक्रम कोणालाही समजलेला नाहीं. प्रथम नाभिपासून ब्रह्मदेवाला उत्पन्न करून, त्याला वेदप्रदान करुन, हाच बुद्धिचेतक व मुमुक्षूंचा राजा नंतर जगत् उत्पन्न करतो. अधिकारावर स्थापित केलेले देवसुद्धां भीतीनें या महाविष्णुला आज्ञा-पालनरूप बलिदान करतात, आणि ज्याप्रमाणें भूमीचे पालन करणारे सम्राट अन्यानीं दिलेल्या करभारांचा उपभोग घेतात त्याप्रमाणें ते देव मायेच्या योगानें उपभोग घेतात. त्याच्या भ्रुकुटीभंगानेंच केवळ तिन्ही लोकांचा नाश होतो आणि केवळ इच्छावशेंकरून क्षणांत ईश्वरासहित सर्व सृष्टि उत्पन्न होते. आत्मस्वरूप अशा विष्णुचा जो शत्रु आहे तो अधम मनुष्य अधोगतीस जातो. त्याच्या म्हणजे विष्णुच्या रूपाचें चिन्तन करणारे भक्त मात्र तरण्यास कठीण अशा महामायेचा नाश करतात.

अर्वाचीनाः सुराः केऽपि न विदुर्यं तदुद्भवाः ॥
स सर्वज्ञोऽपि चात्मानं कात्स्न्येनो वेद वेद वा ॥४५॥
यस्यैकपादियं माया त्रिपादस्यामृतं दिवि ॥
स देवदेवदेवेशः कथं नार्च्यस्त्रिविक्रमः ॥४६॥

इतरेऽप्यग्निवाय्विन्द्रमुखान्देवान्वदन्ति हि ॥
श्रौतीकुर्वन्ति ते स्वस्वपक्षं सर्वेऽपि यत्नतः ॥४७॥

अर्थ : त्याच्यापासून उत्पन्न झालेले, नंतर जन्मलेले असे देवसुद्धां त्याला जाणूं शकले नाहींत. इतकेच नव्हे तर सर्वज्ञ असा तोसुद्धां स्वस्वरू-पाला पूर्णपणें जाणू शकत नाहीं. पण त्यामुळें त्याच्या सर्वज्ञत्वास बाध येत नाहीं. कारण ईश्वराचें मूळ तात्विक रुप अनंत व अगम्य असेंच आहे. ही माया म्हणजे ईश्वराचा एक अल्प भाग आहे. ज्याची त्रिपादव्याप्ति अखिल ब्रह्मांडभर आहे त्या देवांच्याही देवाच्या ईशाचे म्हणजे त्रिविक्रमाचें अर्चन कां बरें करूं नये? इतरही लोक अग्नि, वायु, इन्द्र इत्यादींना देव म्हणतात आणि प्रयत्नपूर्वक स्वतःच्या पक्षाचे समर्थन श्रुतींच्या आधारें करूं पहातात.

विराडादिस्थावरान्ता ईश्वरा बहवः श्रुताः ॥
एतेषु कतमोऽर्च्योऽत्र मोक्षसिद्धिप्रदश्च कः ॥४८॥
प्रतिमा पट्टयन्त्रेषु जलाग्न्यादिषु वा पुनः ॥
एतेषु कथमीशानो देवः सांनिध्यमृच्छति ॥४९॥
एह्येहीत्यस्य चाह्वानं गच्छेति च विसर्जनम् ॥
प्रतिमादौ स भगवान्कथमायाति गच्छति ॥५०॥

अर्थ : विराटापासून स्थावरापर्यंत अनेक ईश्वर आहेत असें ऐकलें जातें. ईश्वराच्या अनेक प्रकारच्या प्रतिमा करतात. तेव्हां त्यापैकीं येथें कोणत्या पूजनीय व कोणत्या मोक्षसिद्धीदायक आहेत? तसेंच प्रतिमा, पट्टयंत्र, जल, अग्नि आदिमध्यें देव कशाप्रकारें वास्तव्य ठेवतो? प्रतिमादींमध्यें भगवंताचें 'यावें' म्हणून आव्हान केलें म्हणजे येणें व 'जावें' म्हणून विसर्जन केलें म्हणजे जाणें हें कसें? तो येतो कसा व जातो कसा?

इति श्रीमद्दत्तात्रेयपुराणे सार्धत्रिसाहस्त्र्यां त्रिकाण्डमण्डितायां संहितायां वासुदेव्यां ज्ञानकाण्डे प्रथमाष्टके कर्मेश्वरविप्रतिपत्तिर्नाम चतुर्थोऽध्यायः ॥

॥ अथेश्वरोपासनाख्यः प्रथमाष्टके पञ्चमोऽध्यायः ।

प्रमन्महेऽनुगृह्णातु भवानित्यर्थितः प्रभुः ॥
प्रत्युवाचाप्यशेषज्ञ आत्मतत्त्वप्रसिध्दये ॥१॥
यथा कालत्रये नास्ति गुणे सर्पस्तथाप्यहेः ॥
गुण एवास्त्यधिष्ठानं तथाऽहं जगतः खलु ॥२॥
रूपं रूपं बभूवायं प्रतिरूपः स्वमायया ॥
उपमा सूर्यकेत्यादि यं सूत्रकृदवर्णयत् ॥३॥

(श्रुतींनीं प्रतिपादन केलेलें कर्मतत्व व ईश्वरोपासना मोक्षसिद्धीसाठीं भगवान् श्रीदत्तप्रभु पांचव्या अध्यायांत सांगतात)

अर्थ : "आम्ही आपली याचना करतो. आपण कृपा करावी" अशा रीतीने प्रार्थना केली असतां सर्वज्ञ असे श्रीदत्तप्रभु आत्मतत्त्वाच्या प्रसिद्धीसाठीं उत्तर देते झाले. "ज्याप्रमाणें दोरीचें ठिकाणीं सर्प कालत्रयी नसतो, तरीही सर्पाचें भ्रममुलक अधिष्ठान मात्र दोरीचे ठिकाणीं भासतें, त्याप्रमाणें या जगाचे अधिष्ठान मी आहे. ईश्वर हा स्वमायेच्या योगानें प्रत्येक रुपामध्यें प्रतिरुप होऊन राहिला आहे. ज्याप्रमाणें सूर्याच्या तेजोमंडलवलयाच्या आधारानेंच आकाशस्थ खगणांना तेजस्विता प्राप्त होते, त्याप्रमाणें हीच उपमा प्रतिरुपक ईश्वरासही लागू होते. सूत्रकारांनी याचें सविस्तर वर्णन सूत्रांत केलें आहे.

एकं सद्विप्रा बहुधा वदन्तीति श्रुतिः पुनः ॥
इन्द्रो मायाभिः पुरुरूपश्चेति प्राह सोऽस्म्यहम् ॥४॥
सृष्ट्वोर्णनाभिवदिदं तदनुप्रविशाम्यहम् ॥
स एव मायया भ्रान्तो जीवः संसरतीह हि ॥५॥
तत्संसारार्तिनाशार्थं धर्मसेतून्बिभर्म्यहम् ॥
भूतेश्वरोऽव्ययात्मापि निर्मलोऽजोऽपि सन्नहम् ॥६॥

अर्थ : चिद्घन स्वरुप एकच आहे. परंतु मायायोगानें तें अनेकविध भासतें. म्हणून सत् नानारुपात्मक आहे असें विप्रानीं वर्णिलें आहे. "इंद्रो

मायाभिः पुरुरुप ईयते" असें ज्याबद्दल वर्णिलें आहे तो मीच. ज्याप्रमाणें कोळी स्वतःच्या नाभींतून तंतू निर्माण करुन त्या तंतूंचे जाळें तयार करतो आणि त्यांत रहातो, त्याप्रमाणें मी हें जग स्वतःतून निर्माण करतो आणि त्यांत वास करुन रहातो. मायेच्या योगानें भ्रान्त झालेला तोच जीव म्हणुन येथें संसार करतो. जीवाच्या संसाररुपी दुःखाचा नाश व्हावा या हेतूनें मी धर्माचरणरुपी सेतु निर्माण करतो, त्यांची जोपासना करतो. सर्व भूतांचा ईश्वर, अव्ययात्मा, निर्मल, जन्मरहित असा असूनही मी हें कार्य करतो. आरसा आणि पाणी यांत पडलेल्या प्रतिबिंबास आरसा किंवा पाणी यांचे दोष लागत नाहींत त्याप्रमाणें छायारूप अशा मला जगताचे दोष लागत नाहींत.

धर्मग्लान्योदितेऽधर्मे तन्निवृत्त्यै सतामपि ॥
गुप्त्यै स्वप्रकृतिं स्थित्वा संभवाम्यात्ममायया ॥७॥

अर्थ : धर्मग्लानीच्यामुळें अधर्माचा प्रादुर्भाव झाला असतां त्या अधर्माच्या नाशासाठीं व सज्जनांच्या रक्षणासाठीं, स्वप्रकृतीला वश करून घेऊन, ज्ञान, ऐश्वर्य, शक्ति, बल, वीर्य व तेज यांनीं नित्य संपन्न असूनही, आणि नित्य शुद्ध, बुद्ध, मुक्त स्वभावाचा असूनही, त्रिगुणात्मक मायेचा आश्रय करून मी देहधारी मानवाप्रमाणें जन्म घेतो.

विरजो विशदोऽशोको विशुध्दः सर्वकारणः ॥
अव्यक्तोऽहमचिन्त्योऽहमनन्तोऽहं शिवोऽमलः ॥८॥
आदिमध्यान्तहीनोऽहं विभुः साक्षी तमः परः ॥
परमात्माहमेवेयं माया ब्रह्मादयोऽमराः ॥९॥
भूतं भव्यं भवच्चापि मत्तोऽन्यन्नेह किंचन ॥
पूज्योऽस्म्युत्तमदेहस्थः पूजकोऽधमदेहगः ॥१०॥
कार्यकारणतापूज्यपूजकत्वादि मायया ॥
मयीदं तात्त्विकं नैव केवलानुभवात्मनि ॥११॥

अर्थ : मी वासनारहित, प्रकाशमान, शोकरहित, अत्यंत शुद्ध, सर्वकारण, अव्यक्त, अचिन्त्य, अनंत, मंगल स्वरूप, अमल, आदिमध्य

अंतरहित, सर्वव्यापि, सर्वसाक्षी, अंधःकाराच्या पलिकडचा, असा परमात्मा आहे. ही माया, ब्रह्मादिक सर्व देव, भूत, असणारे व भविष्यांत उत्पन्न होणारे सर्व कांहीं माझ्यापासून भिन्न नाहीं. उत्तम देहांतील पूज्यही मीच आहे व अधम देहांतील पूजकही मीच आहे. कार्यकारणता, पूज्यपूजकत्व आदि भाव सर्व मायेच्या योगानें भासतात. केवलानुभवात्मा अशा ज्ञानस्वरूप माझे ठिकाणीं हे तात्त्विक भेदच नाहींत.

निर्मलोऽजोऽप्यसङ्गोऽयं मायया परिमोहितः ॥
स्वयंप्रकाशो भूमाऽपि देहाद्यास्थाय तन्मयः ॥१२॥

अर्थ : निर्मल, जन्मरहित, आणि असङ्ग असूनही हा आत्मा मायेच्या योगानें मोहित होतो आणि स्वयंप्रकाश, विराट असूनही देहादिकांचा आश्रय करून तन्मय होतो.

स्वात्मन्यनात्मधर्मान्स्वज्ञानावृत्त्या वहत्यतः ॥
कर्तृत्वादि बिभर्तीच्छत्यत्र भोगान्परत्र च ॥१३॥

अर्थ : आत्मज्ञानाला आवरणभूत झालेल्या अविद्येच्या योगानें तो आत्म्याचें ठिकाणी देहादि अनात्मधर्म (विजातीय धर्म) वहातो, तसेंच कर्तृत्वादिकांना धारण करतो, आणि इह व परत्र भोगांची इच्छा करतो.

जागरे परितृप्तोऽयं स्वप्नं तद्वासनार्दितः ॥
स्वापे तमोऽभिभूतश्च प्रलये वासनामयः ॥१४॥
कदाचिद्दैवयोगेन व्यतिरिक्तं पुरत्रयात् ॥
अखण्डं सच्चिदानंदमात्मानं तमसः परम् ॥१५॥
अहंकारादिदेहान्तसाक्षिणं संस्मरत्ययम् ॥
परित्यक्ताखिलानर्थो भूमा स्वस्थो भवेत्ततः ॥१६॥

अर्थ : जागृतावस्थेंत तृप्त असलेल्या स्वप्नामध्ये तदंतर्गत गोष्टींनी पीडिलेल्या, निद्रितावस्थेंत तमोगुणानें वेढलेल्या आणि प्रलयकालीं वासनामय सूक्ष्मरूप होऊन राहिलेल्या ह्याला कदाचित् दैवयोगानें तिन्ही देहांपलिकडील तमोगुणाच्या आवाक्याबाहेरील, देशादिकांनी अनवच्छिन्न आणि

अहंकारादि देहान्तसाक्षी अशा सच्चिदानंद स्वरूप आत्म्याचे स्मरण झालें, तर कर्तृत्वादि सर्व अनर्थांचा त्याग करुन तो अखण्डस्वरुपाचा ज्ञानी होऊन आत्मतृप्त होतो.

एवं मायावशादेतौ बन्धमोक्षावतात्त्विकौ ॥
बन्धोऽपि कल्पितो बध्ददशायां भाति सत्यवत् ॥१७॥
विज्ञानेनैव तन्नाशश्चित्तस्थैर्याच्च तद्भवेत् ॥
तदप्युपासनायोगात्सोऽपि सत्कर्मभिर्भवेत् ॥१८॥
कर्मावश्यकमत्रैव ग्राह्यं काम्यादि नैव च ॥
पुनः पातश्रुतेश्चित्तशुध्द्यभावाच्च नेतरत् ॥१९॥

अर्थ : याप्रमाणे मायाधीनतेमुळें हे बंध व मोक्ष तात्त्विक असत नाहीत. बंध हा कल्पित असतो. तो बध्ददशेंत खरा भासतो. विज्ञानानेंच बन्धाचा नाश होतो, आणि चित्तस्थैर्यानें विज्ञान प्राप्त होतें. त्याचप्रमाणे उपासना, योग व सत्कर्म यांनीही बंधनाश होतो. येथे आवश्यक म्हणजे नित्यकर्मच ग्राह्य आहे, काम्य कर्म नाही. कारण काम्यकर्मांनी चित्तशुध्दी होत नाही. चित्तशुध्दि नसेल तर पुण्यक्षयानंतर अधःपात होतो. म्हणून काम्यकर्माचा निषेध केला आहे.

होमावुभौ पार्वणेष्टी पञ्चयज्ञा यथाविधि ॥
चातुर्मास्यं चाग्रयणं दैवं पित्र्यंच कर्म यत् ॥२०॥
पोष्याणां पोषणं जातेष्ट्यादि नैमित्तिकं तथा ॥
स्नानसंध्यावंदनाद्य आचरेत् गृहवान्द्विजः ॥२१॥

अर्थ : सायंप्रातर्होम, पार्वणेष्टि, विधियुक्त पञ्चयज्ञ, चातुर्मास्य, अग्रयण इष्टि, देवताकृत्य, पितृकर्म, अवलंबून असणाऱ्यांचें पोषण, जातेष्ट्यादि नैमित्तिक कर्मे ही सर्व कर्मे स्नानसंध्या करणाऱ्या गृहस्थ ब्राह्मणांनी करावीत.

स्वव्रताचरणागन्तुसाधनं च वनी पुनः ॥
वर्णी तु गुर्वग्निसेवा वेदाभ्यासादिकं स्वकं ॥२२॥

शौचं भिक्षां जपं दण्डी नित्यमेकान्तसेवनं ॥
पातिव्रत्यं चिरण्टी तु भर्तृचित्तानुसारिणी ॥२३॥

अर्थ : वानप्रस्थांनीं ग्राम्यधर्मत्यागादि स्वव्रताचरण करुन इतर नियमादि आगंतुक अभ्यास करावा. ब्रह्मचाऱ्यांनीं गुरु आणि अग्नि यांची सेवा करावी आणि स्वतःचे वेदाभ्यासादि अध्ययन करावें. भिक्षुनें शुद्धपणा, भिक्षा, जप आणि एकांतवास यांचे पालन करावें. सुवासिनीनें पतीच्या चित्ताप्रमाणें वागून पातिव्रत्याचे पालन करावें.

विधवा पालयेच्छीलं ब्रह्मचर्यं व्यवस्थिता ॥
सर्वाश्रमाधिकारस्य ब्राह्मणस्य शमादिकम् ॥२४॥

अर्थ : विधवा स्त्रियेनें व्यवस्थितपणें राहून शील व ब्रह्मचर्य यांचे रक्षण करावें. सर्वाश्रमांचा अधिकार असलेल्या ब्राह्मणांनीं शमदमादि धर्मपालन करावें.

त्र्याश्रमाधिककृतस्योक्तं शौर्यादि क्षत्रियस्य च ॥
कृष्यादि व्याश्रमविशः कर्मान्यस्य तु सेवनम् ॥२५॥
कार्यं वर्णैः स्वकर्मैं वं स्ववर्णाश्रमचोदितम् ॥
केवलं सत्वशुद्ध्यर्थमीशप्रीत्यै महाव्रतैः ॥२६॥
यस्याग्निहोत्रादि लुप्त विधिहीनमथापि वा ॥
आसप्तमांस्तस्य लोकान्हिनस्तीतीरितं यतः ॥२७॥

अर्थ : क्षत्रियांनीं शौर्यादि कर्मे करावीत, वैश्यांनीं क्षेत्रादि कामें करावीत, शूद्रांनीं त्रैवार्णिकांची सेवा करावी. प्रत्येक वर्णीयांनी आपापल्या वर्णाश्रमाला विहित असें कर्म करावें. तें कर्म केवल ईशप्रीतिनें सत्त्वशुद्धीकरतां करावें. ज्याचें अग्निहोत्रादि कर्म लुप्त झालें आहे अथवा विधीहीन झाले आहे त्याच्या सात पिढ्यांचा नाश होतो.

कर्मवैगुण्यादिदोषे लोपादौ विधिवच्च तत् ॥
प्रायश्चित्तं चरेद्विद्वान्यथावन्नान्यथा शुचिः ॥२८॥

प्रायो विनष्टिः संधानं चित्तिर्विध्यपराधके ॥
प्रोक्ता विनष्टिसंधानं प्रायश्चित्तिरितीह हि ॥२९॥
कर्मप्लवो दृढो यस्तन्मन्यते श्रेय उत्तमः ॥
पर्येति स पुनर्मृत्युमित्युक्तिं संस्मरेद्बुधः ॥३०॥

अर्थ : नित्यकर्मांचे अंगवैकल्य झाल्यास अथवा कर्मांचे आचरण विधिवत न झाल्यास विद्वान मनुष्यानें योग्य प्रकारे प्रायश्चित्त घेतलें पाहिजे त्यावांचून शुद्धि होत नाही. विधियुक्त कर्मांत न्यूनता झाली तर कर्ता पापी होतो. तो दारुण नरकांत जातो. कर्म न्यूनतेबद्दल कर्त्यांत अनुताप झाला पाहिजे. म्हणून विधि अपराधासाठीं प्रायश्चित्त केले पाहिजे, न केल्यास नाश होईल. योग्य कर्मानुष्ठान वेळच्यावेळीं केले असतां तो निरयातून तरतो. "प्लवा ह्येते" या श्रुतिवचनाचा अनुवाद करून वरील विवेचन केलें आहे. विधियुक्त कर्मानुष्ठान करणारा मृत्यूतून तरुन जातो, आणि उत्तम लोकाप्रत जातो.

अग्निहोत्रादि हृच्छुध्दिव्दारा मुक्त्यै प्रचोदितम् ॥
शमादीन्साधयेद्विद्वांस्तदनुष्ठानपूर्वकम् ॥३१॥
साधनावधि तत्कार्यमुपात्तपरसाधनः ॥
ततः संन्यस्य शमवान्भवेन्नैष्कर्म्यसिध्दिभाक् ॥३२॥
उपात्तसाधनो भक्त्या समासादितशुध्दधीः ॥
देवो भूत्वा यजेद्देवं मां प्रत्यग्ज्योतिपरास्थितम् ॥३३॥

अर्थ : मुमुक्षूंना चित्तशुद्धिद्वारा मुक्ति प्राप्त होण्यासाठीं अग्निहोमादि कर्में सांगितलेली आहेत. तेव्हां विद्वानानें त्या कर्मांचे अनुष्ठान करून शमादींचे साधन करावें. चित्तशुद्धीसाठीं प्रथम कर्मनिष्ठेचाच पुरस्कार केला आहे. कर्मनिष्ठेनंतर चित्तशुद्धि झाली तरच ज्ञानोत्पत्ति होते. चित्तशुद्धीनंतर शमादि-साधनांसह स्वाश्रमोचित कर्में केली असतां ज्ञानोत्पत्ति होते. साधनसंपत्ति मिळण्यापूर्वी कर्माचा त्याग केल्यास चित्तशुद्धि व ज्ञानोत्पत्ति होत नाहीं. चित्तशुद्धिविना आणि ज्ञानशून्यत्व असतां संन्यास घेतल्यास मोक्षसिद्धि होत नाही. साधनसंपत्ति मिळविलेल्या आणि भक्तिचे योगानें शुद्ध बुद्धि झालेल्या

पुरुषाने दैवी संपत्तीच्या योगानें देव होऊन अंतःप्रकाशरूप अशा माझें ध्यान करावें, यजन करावें.

सकामाय गणेशाद्याः पृथग्दृष्ट्या च भाविताः ॥
ददात्यशाश्वतान्कामान्संसरन्तः क्षुदादिना ॥३४॥
अर्चकस्य तपोयोगादर्चनस्यातिशायनात् ॥
आभिरुप्याच्च बिम्बानां सान्निध्यं कल्पयन्ति ते ॥३५॥
मच्चिदंशयुतास्ते तु फलदाः स्वाधिकारतः ॥
त आयान्ति परिच्छिन्ना गच्छन्ति च तथा पुनः ॥३६॥

अर्थ : सकाम अर्चन पूजन करणाऱ्या करतां गणेश आदि वेगवेगळ्या देवता कल्पिलेल्या आहेत. त्यांची आराधना केली असतां त्या संसारी जीवांना अशाश्वत भोग प्राप्त करून देतात. अर्चकाच्या तपोयोगानें आणि अर्चनाच्या आधिक्यानें तसेच प्रतिमेच्या सौंदर्यामुळें अर्चक देवतांचे सान्निध्य कल्पितात. ह्या देवता माझ्याच चिदंशानें युक्त असल्यानें स्वतःच्या सामर्थ्यावर आगमन करतात व परत जातात. हे आव्हान वगैरे मंत्रप्रभावामुळें घडते.

गतिस्थित्यासनस्वप्नवर्जितोऽहं न तादृशः ॥
आत्माऽजः सर्वसंसारधर्मकर्मविवर्जितः ॥३७॥
प्रपञ्चोपशमः शान्तः शिवोऽद्वैतोऽजरोऽमरः ॥
सर्वं संन्यस्य निःसङ्गैरुपास्योऽहं महार्थदः ॥३८॥

अर्थ : गति, स्थिति, आसन, स्वप्न यांनी वियुक्त असा मी आत्मा, जन्मरहित आणि सर्व संसारधर्म, कर्म यांनी विवर्जित आहे. अन्य देवतांसारखा मी नाहीं. माझे ठिकाणी प्रपंच विराम पावतो. मी शान्त, मंगल, अद्वैत, अजर व अमर आहे. अहंतादिरहित होऊन, सर्वस्वाचा त्याग करून, मनुष्यानें मोक्षप्रद अशा माझी उपासना करावी.

विमुखाय क्रिया प्रोक्ताऽचरायेश्वरपूजनम् ॥
मुमुक्षवे केवलं मदुपास्तिस्तूत्तमोत्तमा ॥३९॥

अनुष्ठानप्रकारोऽस्याः श्रवणादिविधानतः ॥
बाह्योपचारैरन्यस्याः क्रियायाः कारकादिभिः ॥४०॥

अर्थ : संसारादि बाह्य व्यवहारांकडे कल असणाऱ्यांनीं कर्मानुष्ठान करावें. चित्त स्थिर असलेल्यांनीं ईश्वरपूजा करावी. मुमुक्षूंचे करतां मात्र माझी उपासना हीच सर्वांत उत्तम आहे. माझी उपासना श्रवणादि नऊ प्रकारांनीं करतां येते. ईश्वरपूजन बाह्य उपचारांनीं, व इतर कर्मानुष्ठान देशकाल मंत्रतंत्र-पूर्वक याजनानें होतें.

किंचित्पक्वकषायाणां हठयोगादियोजना ॥
तदभावेऽपि परया मद्भक्त्या सद्गतिर्नृणाम् ॥४१॥
एवं कर्माणि चोपास्तिः संक्षेपेण प्रदर्शिता ॥
निर्गुणोपास्तितः सर्वान्कामानाप्त्वाऽमृतो भवेत् ॥४२॥

अर्थ : ज्यांच्या रागादि विकारांचा कांही उपशम झाला आहे त्यांचे करतां हठयोगाची योजना केली आहे. परंतु तसे नसले तरी माझ्यावर अनन्य भक्ति केल्याने मनुष्याला सद्गति प्राप्त होते. अशा प्रकारे थोडक्यांत कर्मांचे व उपासनेचे विवेचन केले आहे. निर्गुण उपासनेनें सर्व कामांची प्राप्ति होऊन अमृतत्व मिळवावे.

मय्यासक्तमना नित्ययुक्तो मां य उपास्त इत् ॥
श्रध्दावान्सोऽपि मामेति पुनरावर्तते न सः ॥४३॥
स्थूलाक्षरालिपिज्ञानं शिशोरिव परात्मनः ॥
गुरूक्तार्चाकल्पनया हृत्स्थैर्याद्बोध उद्भवेत् ॥४४॥

अर्थ : सर्वज्ञत्वादि विशिष्ट अशा माझ्या ठिकाणीं चित्त एकाग्र करून जो उपासना करतो तो श्रद्धावान मनुष्य माझेकडेंच येतो. त्याला पुनर्जन्म नाही. ज्याप्रमाणे मोठ्या अक्षरांच्या योगाने लहान मुलांस लिपिज्ञान होते, त्याप्रमाणें गुरुंनी सांगितलेल्या प्रतिमेच्या कल्पनेने अंतःकरण स्थिर होते व ज्ञानबोध होतो.

सतोम्ब्वाद्येऽपि बिम्बस्य प्रतीतिर्न मलान्विते ॥
तथात्मनो न मलिने प्रतीतिः सा तु निर्मले ॥४५॥
अतो मद्भजनात्कामक्रोधाद्यन्तर्मलक्षतिः ॥
मत्प्रसादात्ततश्चान्तस्तमोनाशस्ततोऽमृतम् ॥४६॥
प्रतिष्ठां विन्दते योऽस्मिन्सोऽभयो योन्तरं मयि ॥
करोति तस्य भीः पूर्वे देवा अपि भयं ययुः ॥४७॥

अर्थ : ज्याप्रमाणे स्वच्छ पाण्यांत मुखादींचे प्रतिबिम्ब उत्तम पडते, तसें तें मलिन पाण्यात दिसत नाहीं, त्याप्रमाणे आत्मस्वरुपाचे प्रतिबिम्ब रागादिकांनी मलिन झालेल्या चित्तांत पडत नाही. म्हणून माझ्या भजनाचे योगें कामक्रोधादि अंतर्मलाचा नाश होतो आणि नंतर माझ्या कृपेने अंतस्तमाचा (चित्तातील अंधःकाराचा) नाश होऊन मोक्ष प्राप्त होतो. स्वयंप्रकाश आत्मा व आपण यांत जो अभेद पाहतो तो प्रतिष्ठा मिळवितो, अभय मिळवितो. परंतु जो माझे ठिकाणी भिन्नत्व पाहतो तो भय पावतो. असे भय देवांनासुद्धां झाले होते.

तस्मात्यक्त्वाखिलान्धर्मान्मामेहि शरणं यते ॥
मत्प्रसादाद्विशुद्धोऽतो मोक्ष्यसे शान्तिमृच्छसि ॥४८॥
स्वस्त्यस्तु ते मदुक्तेस्त्वं सारमाधत्स्व शोधितम् ॥
मद्भक्तेष्वपि योगोऽयं प्रकाश्यो यत्नतस्त्वया ॥४९॥
इत्युक्त्वा भगवान्दत्तो लीलया द्राक् तिरोदधे ॥
स यतिः कृतकृत्योऽभूत्तदुक्त्यर्थविलोचनात् ॥५०॥

अर्थ : तेव्हां हे यते, सर्व धर्मांचा त्याग करून तूं मलाच शरण ये. माझ्या कृपेनें तुझें अंतःकरण विशुद्ध होऊन तुला मोक्ष प्राप्त होईल व शांति मिळेल. तुझे कल्याण होवो. मी उपदेश केलेल्या वरील गोष्टीचें सार काढून तें स्वीकारावेस, आणि हा योग प्रयत्नपूर्वक माझ्या भक्तांमध्यें प्रसृत करावास." असें सांगून भगवान् श्रीदत्तप्रभु लीलेनें अदृश्य झाले, अंतर्धान पावले. त्यांच्या उपदेशाच्या अर्थाचें श्रद्धापूर्वक आलोचन करून तो यति कृतकृत्य झाला, धन्यतेस पोंचला.

॥ इति श्रीदत्तपुराणे ईश्वरोपासनाख्यः प्रथमाष्टके पञ्चमोऽध्यायः ॥

॥ अथ शाण्डिल्याथर्वसंवादो नाम प्रथमाष्टके षष्ठोऽध्यायः ॥

ॐ इन्द्रोऽमदाय गुर्वीशवेदान्तभजने स्थितः ॥
स्वर्गेऽद्यापीतरेषां तु कथा का दभ्रवेदिनां ॥१॥
आजीवितं त्रयः सेव्या वेदान्तो गुरुरीश्वरः ॥
पूर्वं ज्ञानाप्तये पश्चात्तत्कृतघ्नत्वनिवृत्तये ॥२॥

अर्थ : देवराज इन्द्र मदमोहांच्या निवृत्तीसाठीं गुरू, ईश आणि वेदान्त यांच्या भजनात स्वर्गात मग्न राहिलेला आहे. तर मग इतर अल्पज्ञांची काय कथा? वेदान्त, गुरु आणि ईश्वर यांचे (या तिघांचे) आमरण सेवन केले पाहिजे. प्रथम ज्ञानप्राप्तीसाठी आणि नंतर कृतघ्नपणाचा दोष लागू नये म्हणून.

महानुशासनं चेत्थं मनस्यानीय तत्त्रयम् ॥
सिध्येदनेनेति मत्वा सन्माहात्म्यं यतिर्जगौ ॥३॥
सृष्ट्वेदं माययास्यान्तर्बहिःस्थोऽभवदत्रिजः ॥
गूढः साक्षी ज्ञानगम्यः सोऽव्यात्सच्चित्सुखात्मकः ॥४॥
लीलात्मना योऽत्रिगृहेऽवतीर्णो दत्ताख्य उन्मत्तपिशाचवद्यः ॥
बालो युवा क्वापि जरन् जटाभृत्क्वचिदृषिर्व्यक्तपरीक्षितश्च ॥५॥

अर्थ : अशाप्रकारे महानुशासन मनांत आणून त्या तिन्हींची सिद्धी ह्या योगानेंच होईल असें जाणून श्रीदत्तात्रेयांचे माहात्म्य त्या यतीनीं गाईलें. हे जगत् मायेच्या योगाने निर्माण करून त्यांत अंतस्वरूपाने व बाह्यरूपाने भगवान श्रीदत्त राहिले. तो अत्रिनंदन गूढ, सर्व साक्षी, ज्ञानाचे योगे ज्ञात होणारा आणि सच्चित्सुखात्मक असा आमचें अविद्यादिपासून आमचें रक्षण करो. लीलेने जो अत्रिऋषींच्या घरी अवतीर्ण झाला, ज्याला दत्त म्हणतात, जो उन्मत्त पिशाचाप्रमाणे आहे, जो कधीं बाल, युवा, वृद्ध जटाधारी, ऋषि, व्यक्तपरीक्षित दिसतो.

त्यागी सुभोगी क्वचिदस्ति सङ्गी
योगी सुवासाः क्वचिदस्ति नग्नः ॥

तुष्टः कृशः पुष्ट इह क्वाचिद्यो
दण्डी च भिक्षुः क्वचिदस्ति वर्णी ॥६॥
गृही वनी वर्णविरुद्धचेष्टः क्वचिच्च वर्णाश्रमधर्मयुक्तः ॥
इत्यादयो यस्य विचित्रचेष्टा देवर्षिहृद्गायनं व्यतीताः ॥७॥
यो भक्तरक्षा क्षणं एव यस्य वै सेवा स्मृतिर्भोज्यनिवेदनं धिया ॥
पूजा फलं योऽर्पयतीह दुर्लभं भक्तस्मृतौ सन्निधिकृत्क्षणे क्षणे ॥८॥

अर्थ : जो कधीं त्यागी, भोगी, सङ्गी, योगी, उत्तमवस्त्रपरिधानी, नग्न, तुष्ट, कृश, पुष्ट, दंडी, भिक्षु आणि वर्णाश्रमचारी, गृहांत राहणारा, वर्णाश्रमाचाराविरुद्ध वर्तन करणारा, इत्यादींप्रमाणें ज्याच्या वर्तनाचें वर्णन देव आणि ऋषींनी केले आहे, भक्तांचे रक्षण करण्यांत ज्यांस आनंद वाटतो, ज्यांचे अंतःकरणापासून स्मरण व भोज्य पदार्थांचा नैवेद्य ही सेवा, पूजा व फल अर्पण केले असतां जो प्रत्येक क्षणीं भक्ताच्या स्मृतींत रहातो,

यस्यास्ति माहुरे निद्रा निवासः सह्य पर्वते ॥
भागीरथ्यां सदा स्नानं ध्यानं गंधर्व पत्तने ॥९॥
कुरुक्षेत्रे चाचमनं धूतपापेश्वरे तथा ॥
विभूतिधारणं संध्या करहाटे श्रियः पुरे ॥१०॥
भिक्षा विठ्ठलपुर्यस्य सुगन्धिद्रव्यधारणम् ॥
भुक्तिः सारपुरे सायंसंध्या पश्चिमसागरे ॥११॥
स एष भगवान्दत्तः सदा वसतु मे हृदी ॥
हृद्बीन्द्रियादिव्यापारे सदा तत्स्मृतिरस्तु मे ॥१२॥

अर्थ : जो माहुरी निद्रा घेतो, सह्याद्रीवर रहातो, भागीरथीत नित्य स्नान करतो, गाणगापुरांत ध्यानधारणा करतो, कुरुक्षेत्रावर आचमन, धूतपापेश्वरी विभूतिधारण, कऱ्हाडक्षेत्री संध्या, कोल्हापुरीं भिक्षा, पंढरपुरांत सुगन्धिद्रव्यधारणा, सारपुरांत भोजन आणि पश्चिम सागरावर सायंसंध्या करतो, तो भगवान श्रीदत्त सतत माझ्या हृदयांत वास करो. हृदय, बुद्धि, आणि इंद्रियादींच्या व्यापारांमध्यें व्यवहारामध्ये, श्रीदत्तप्रभूंचे स्मरण मला सतत असावे.

विजय तेऽज यते जयते यतेरिह तमो हतमोहतमो नमः ॥
हृदि कदाय पदाय सदा यदा तदुदयो नदयो न वियोनयः ॥१३॥
उदयतेऽनयतेर्न यतेर्यदा मनसि कामनिकामगतिस्तदा ॥
पदुदयो हृदयोकसि ते सिते भवति योवति योगिवराऽवरान् ॥१४॥
भवति भावभवोवभवो यदा भवति कामनिकामहतिस्तदा ॥
भवति मानवमानवदुत्तमे भवतिरोधिरतो विरतोत्तमे ॥१५॥

अर्थ : हे सत्यज्ञानस्वरूप दत्तदेवा, स्वेच्छोपात्तसंन्यासिरूपा, भक्ताज्ञानमोहनाशका, निर्विकारा, तुझा विजय असो. स्वस्वरूपसुख देणाऱ्या अशा तुझ्या पदांस आमचा नमस्कार असो. हे देवा, तूं आमच्या प्रमाणें कर्मोपात्तपारतंत्र्य देहवान नाहीस. हृदयांत असणाऱ्या तमाचा ज्यामुळें नाश होतो त्या तुझ्या पदांस आमचा नमस्कार असो. प्राक्पुण्यवशतेनुसार 'ब्रह्मस्मीति' अपरोक्षानुभव मिळतो. नंतर सर्व हृदयग्रंथींचा नाश होतो. नंतर जन्मप्रद कर्माच्या अभावामुळें दुःखद आसुरी योनीचा नाश होतो. जननमरण टळून मोक्ष मिळतो.

हे दत्तात्रेया, भक्तांच्या हृदयांत तुझ्या चरण कमलाचा उदय झाला असता कामनिरास होतो. दृढाभ्यासी यतीच्या मनांत जेव्हां अहंकार आणि चिदात्मा यांचे एकीकरण होते त्यावेळीं अविवेकानें "हे मला पाहिजे, ते मला पाहिजे" अशा प्रकारच्या वासनांची उत्पत्ती होत नाही. कारण भक्त हृदयांत तुझी चरणकमलें स्थिर झाल्याने तें सत्वप्रधान झालेले असते. जेव्हा सर्व कामना नष्ट होतात तेव्हा मंदबुद्धि मनुष्याचेहि अविद्या, कर्म, काम, इत्यादींकापासून रक्षण होते. त्यांच्यावर ईशकृपा होते

साधूच्या मनांत जेव्हां सात्विक अष्टभावलक्षण भक्तीचा उदय होतो तेव्हा भवनिवर्तक असा तो उदय, कामनिकामहती म्हणजे हृदयग्रंथीभेद करतो असे झाल्यानंतर ब्रह्मलोकसुद्धां ज्यांनी तृणवत मानला अशा भगवद् भक्तोत्तमांचा जन्ममरणरूप संसार नाहीसा होतो. मिथ्याभूत 'अहं, मम इत्यादि लक्षणप्रपंच शिल्लक रहात नाही. कारण भगवान् वासुदेवांची कृपा झालेली असते.

तव सतां वसतां मनसाऽनसा प्रपदयोः पद्यो रजसाञ्जसा ॥
सुसहितः स हितस्तत्र तावता यदवतारवता जनतावता ।१६॥

अर्थ : अशा प्रकारची ईशभक्ती सत्संगानेच होते. अतिशय वेगवान शकटरूपमनाने अभ्यास करुन ईशचरण कमलांना वश करून घेतां येते. अशा ईशपदावरील रजःकणांनी जो युक्त झाला तोच भक्तोत्तम ईशप्रिय होतो. नंतर जगत्रक्षक असा तूं त्याचे रक्षण करतोस. जनता रक्षणार्थ मत्स्यादि अवतार धारणकर्त्या तुझ्याकडून भक्तोत्तमांचे जन्मादिभयापासून रक्षण केले जाते.

कृतफलं तु विहाय विहायसा समभजं भजतामज तामसात् ॥
मिलति तारकमत्र कमत्रसत्पदरजो भ्रमहारि महारिसत् ॥१७॥

अर्थ : सत्संग हा निष्काम कर्मानुष्ठानानेच घडतो. नित्यनैमित्यिक कर्मफलांचा त्याग करावा. चित्तशुद्धि होईपर्यंत कर्मानुष्ठान करीत राहिले पाहिजे. नित्य कर्मानुष्ठान केलें नाहीं तर उपात्तदुरितक्षय होणार नाहीं. अशा स्थितीत केलेल्या कर्मानुष्ठानानें बंध होत नाहीं. आकाशाप्रमाणें व्यापक असलेल्या देवा, तुझें भजन करणारे भक्त स्थितप्रज्ञ होतात आणि संसारतारक अशा ईशपदरजांस मिळवितात. त्यामुळे देहात्मभ्रम दूर होतो.

तदजरामर कोशविलक्षणं सदज धीगुणवेत्तृ कलक्षणम् ॥
भुवनहेत्वघहृत्त्रिपुराधिकं तव नु जातु पदं कुपुराधिकम् ॥१८॥

अर्थ : हे दत्तदेवा, तुझे पदकमल अजरामर, निर्विकार, अन्नमयादि कोश विलक्षण, सत्, त्रिकालाबाधीत, धीगुणजाणते, अवस्थात्रय साक्षीभूत, आनंदरुप, भुवनहेतु जगत्कारण, भक्तांचे पापनाशक, देहत्रयातीत असेच आहेत. तसेच, असत आणि जड नाहीत. स्थूल, सूक्ष्म व कारण अशा शरीरसंबंधामुळे त्यांस त्रिविधतापाचा संबंध नाही. (यानंतर गायत्री मंत्रार्थ प्रदर्शित करतांना सांगतात)—कोशविलक्षण निरुपाधिक असे सत् आहे. (१) सर्गाद्युपलक्षणक, सर्व प्रपंचोत्पादकत्वलक्षणाशेषद्वैत भ्रमनिरात्मक ज्ञानदायक असा सवितृपदाचा अर्थ आहे. (२) बुद्धिग्राह्य निरतिशय सुखात्मक

असा वरेण्य पदाचा अर्थ आहे. (३) अविद्यादिदोषभर्जक व त्यक्ताशेष अनर्थात्मक असा भर्गपदाचा अर्थ आहे. (४) व्यापकपणानें अखंडचिदैकस्वरूप असा देवपदाचा अर्थ आहे. (५) देहत्रयदोषाचा स्पर्श नसून निर्गुणचिंतन-ध्यानस्वरूप असा ध्यानक्रियेचा अर्थ आहे. (६) पद म्हणजे यदर्थ (७) अज म्हणजे जीव अर्थात् तोच वासुदेव असा अस्मदृशब्दाचा अर्थ आहे. (८) धीगुण असा धीशब्दार्थ आहे. (९) तद्देत्रिति चोदनक्रिया असा त्याचा अर्थ आहे. (१०) तात्पर्य रज्जुसर्पन्यायानें अध्यारोपापवादानीं समानाधिकरणरूप एकत्व सांगितलेले आहे.

विविधभेदपरं सम दृश्यते विविधवेदपरं कमदस्य ते ॥
पदमिदं सदु चिद्घनमुद्धियाऽसदनिदं प्रजहात्यघनुद्धि या ॥१९॥

अर्थ : हे समा, म्हणजे वैषम्य, नैघृण्य आदि दोषरहिता, हे अदृश्य अतीन्द्रिय व सजातीय भेदशून्या, तुझें स्वप्रकाशापरोक्ष आत्मस्वरूप आहे. तेंच ब्रह्म आहे. अशा तुझें चरणकमळ आनंदरूप, सत्स्वरूप, कालत्रयाबाध, चिदेकरस असेंच आहे. पापविनाशक आहे. आणि उत्कृष्ट बुद्धि मिळवून देऊन अपरोक्षानुभव देणारे आहे.

अज नमोऽजनमोहनमोह नः प्रिय नियोजय तेन यतेन ते ॥
य इह वेदनिवेदनि वेद वेत्यजपदं जपदन्तपदं पदम् ॥२०॥

अर्थ : हे अज म्हणजे मोहरहित, हे प्रिय म्हणजे नियतेन्द्रिय चालका. हे प्रभो, पूर्ववर्णित अशा तुझ्या पदकमलाशी आमचा योग घडवून आण. म्हणजे आम्हास सहजच विदेहकैवल्य मिळेल. त्रिकांडात्मक वेदनिवेदक, अशा प्रकारचे तुझें जें हे स्तोत्र जाणतात तेच जपात्मक चिंतनाच्या शेवटी आपल्या हृदयात तुझ्या पदाला स्थान करून देतात. तेच पद ब्रह्मरूप असें जाणतात.

एवं स्तुत्वा निजप्रज्ञापरिणामावधीश्वरम् ॥
माहात्म्यं वक्तुमाजह्रे श्रीदत्तस्य तदीरितः ॥२१॥

अर्थ : याप्रमाणे सामान्यपणे बुद्धीस अगम्य अशा ईश्वररूप श्रीदत्तात्रेयाचे महात्म्यवर्णनपर स्तोत्र करण्यास म्हणजे वाणीनें वर्णन करण्यास श्रीदत्तदेवांच्या

प्रेरणेनेच मी प्रवृत्त झालो आहे. सर्वत्र प्रेरक शक्तिसामर्थ्य श्रीदत्तकृपेनेंच येते.

अथ शाण्डिल्यनामासीद्ब्रह्मर्षिर्वै महामुनिः ॥
वेदवेदाङ्गशास्त्रज्ञः स्वाश्रमोचितकर्मकृत् ॥२२॥
भक्त्या परमयोपास्तश्रीदत्तपदपङ्कजः ॥
सज्ञानगर्भवैराग्योपरत्याढ्योऽपि दैवतः ॥२३॥

अर्थ : पूर्वी शाण्डिल्य नांवाचा एक मंत्रद्रष्टा महर्षि होऊन गेला. तो वेदवेदाङ्ग आणि शास्त्रें यामध्ये पारंगत होता. तसेच स्वाश्रमास उचित अशी कर्मे करीत असे. तो उत्कट भक्तीने श्रीदत्तात्रेयांच्या पदकमलांची उपासना करीत असे. ज्ञानगर्भ वैराग्यानें त्याला उपरति झालेली होती.

विद्यामलभमानोऽसौ चतुर्वेदेषु तर्कतः ॥
भूत्वा भिन्नमतिः स्मृत्वा गुरुद्वारा श्रुतीरिताम् ॥२४॥
विद्याप्राप्तिमथर्वाणमुपसन्नो महामतिम् ॥
सोऽभिवाद्याह भगवन्ब्रह्मविद्यामधीहि मे ॥२५॥

अर्थ : परंतु श्रेष्ठ असूनही दैवयोगाने त्याला अपरोक्ष साक्षात्काररूप विद्या त्याला मिळाली नाही. चारी वेदांत तर्कादिकानीं त्याचीं बुद्धि अस्थिर झालीं. नंतर त्याच्या लक्षांत आले की गुरूंच्याद्वारेच विद्यालाभ असतो. तेव्हां तो महाबुद्धिमान अशा अथर्वऋषीकडे गेला व त्यांना नम्रतापूर्वक अभिवादन करूनम्हणाला, 'हे भगवन्, मला आपण ब्रह्म विद्या शिकवा.'

वरां निगूढां सत्सेव्यां श्रेयोऽवाप्स्याम्यहं यथा ॥
शास्ति स्निग्धं विनीतं हि श्रीगुरुर्गुह्यमप्युत ॥२६॥

अर्थ : अत्यंत श्रेष्ठ, निगूढ, मुमुक्षुंनीच सेवन करण्यास योग्य, अशी तीं ब्रह्मविद्या मिळाल्याने मला परमपदाचा लाभ होईल. प्रेमळ व लीन अशा शिष्यालाच गुरु गुह्य गोष्ट सांगतात.

इति शिष्येण सोऽथर्वा संपृष्टः प्राह सोम्य ताम् ॥
श्रद्धाभक्तिध्यानयोगादवेहि त्यागपूर्वकम् ॥२७॥

त्रिकालं बाधराहित्यं जगद्वाधैकसाक्षिकम् ॥
सत्यत्वमस्य विज्ञेयं ब्रह्मणोऽविक्रियस्य हि ॥२८॥

अर्थ : अशा रीतीनें शिष्यानें विचारलें असता अथर्वा ऋषि म्हणाले, "हे सोम्य, ती, ती (ब्रह्मविद्या) श्रद्धा, भक्ति, ध्यान या योगें व त्यागपूर्वक म्हणजे कर्मफलाचा त्याग करून, संन्यस्त वृत्तीने समजून घे. ब्रह्माचें निकालत्व, बाधराहित्य, जगाच्या नाशाविषयीं साक्षित्व, आविकारित्व आणि सत्यत्व जाणून ध्यावे.

विदिताविदितान्यत्वं त्रिपुटीपरिवर्जितम् ॥
स्वयंप्रकाशरूपं तज्ज्ञानलक्ष्मास्य केवलम् ॥२९॥
देशतः कालवस्तुभ्यां परिच्छेदो यतोऽस्य नो ॥
विभोरेकस्य चानन्तलक्ष्म सर्वात्मकस्य च ॥३०॥
सत्यं ज्ञानमनन्तं चेत्युक्तं तद्ब्रह्मलक्षणम् ॥
इदमेकं चाद्वितीयं यत्सदा भेदवर्जितम् ॥३१॥

अर्थ : इंद्रियान्तःकरणानी जाग्रत स्वप्नादि अवस्थेत शुद्धात्मरुपाचें ज्ञान असतें, सुषुप्तावस्थेत ज्ञान नसते असें गृहीत आहे. म्हणून केवळ शुद्धात्मा, ज्ञाता, ज्ञान, ज्ञेय याहून निराळा आहे. आत्मा स्वयंप्रकाश आहे. ज्ञान हेंच त्याचें स्वरूपलक्षण आहे. आत्मा जर ज्ञानस्वरूप नाहीं असें म्हटलें तर चालणार नाहीं. तसें म्हटल्यास अपरोक्ष साक्षात्कार होणार नाही असें अनुमानावरूनसुद्धां सिद्ध झाले आहे, असें न्यायशास्त्राचें मत आहे. ज्ञानाचा अज्ञानादिकांनी प्रत्यय येत नाही. सत् हे सत् व चित् असेंच आहे. तें व्यापक असल्यानें देशतः परिच्छिन्न नाहीं. ते एकच असल्याने कालपरिच्छिन्न नाहीं. सर्वात्मरूप असल्यानें वस्तु परिच्छिन्न नाहीं. त्रिविध परिमाणातीत आहे. अनन्त म्हणजे आनन्द-लक्षणात्मक असेंच त्याचें स्वरूप आहे. सत्य, ज्ञान, अनंत, आनंद असेच ब्रह्माचे लक्षण आहे. (अधिक खुलाशाकरतां अध्याय ३, श्लोक १९ पहावा.)

तच्छब्दलक्ष्येऽस्मिन्नोतं प्रोतं चैतत्तदाश्रयम् ॥
यस्मिञ्ज्ञाते सर्वमिदं विज्ञातं भवति ध्रुवम् ॥३२॥

अस्याभिन्ननिमित्तोपादानत्वं चैक्यसिद्धये ।।
प्रकृत्यधिष्ठात्रैक्यं च प्रतिज्ञातमनेन हि ।।३३।।
अन्यथा सर्वविज्ञानमेकविज्ञानतः कथम् ।।
सूत्रे प्रतिज्ञादृष्टान्तानुपरोधादितीरितम् ।।३४।।
सच्चिदानन्दैकरसं परं ब्रह्मामृतं तु तत् ।।
आत्मशक्तिप्रधानः सन्सर्वज्ञो निखिलेश्वरः ।।३५।।

अर्थ : ब्रह्म जर अशा प्रकारचे आहे, तर मग उपनिषदांना कांही विषयच शिल्लक राहात नाही. त्याकरतां सांगतात—"तत्त्वमसीति" या वाक्यांत प्रत्यगात्म्याचें अभेदप्रचीति होणेसाठीं अपरोक्ष द्योतक इदमची सप्तमी योजली आहे. व समानाधिकरण साधले आहे. अशा ब्रह्मस्वरूपामध्यें जगत्, पटांतील तंतूप्रमाणें ओतप्रोत भरलेले आहे. म्हणूनच एका आत्मज्ञानानेंच अखिल वस्तुजाताचे ज्ञान होते ही गोष्ट निश्चित. ह्या ब्रह्माच्या एकत्वसिध्दी करतां अभिन्ननिमित्तोपादानत्व, स्वोपाधिप्राधान्यामुळेंच आहे; म्हणून निमित्तोपादान असा त्वं पदार्थ महावाक्यांत दिला आहे. प्रकृत्यधिष्ठात्र्यैक्याचे त्यामुळे ज्ञान होईल. असे जर मानले नाही तर एका आत्मरूपाचें ज्ञान झाल्या-नंतर अखिल वस्तुजाताचें ज्ञान कसें होईल? अर्थात् आत्मज्ञानोत्तर वस्तुजात ज्ञानमात्र होतेच. गजपदन्यायानें. ब्रह्म हे आकाशाप्रमाणे सर्वव्यापी आहे. दोन्ही उपाधीपासून प्रत्यक्परपररूपावस्थित असूनसुद्धां लक्ष्यदृष्टीने अद्वितीय आहे. म्हणूनच निरंजन (मायावरणशून्य) सत्तानुस्यूत, प्राणादिकलारहित, सच्चिदानंदैकरस, परं, अमृतं, ब्रह्म असें म्हटलें आहे. आत्मशक्तिप्रधान, सर्वज्ञ, असा तोच निखिलेश्वर आहे. सूत्रांतील प्रतिज्ञादृष्टांतानुपरोधासाठीं वरील प्रकारचें सर्व विवेचन केलें आहे. तोच ईश्वर प्रत्यक्षादि प्रमाणांनीं कळणे शक्य नाहीं. कारण तो जन्मादि विकारानी शून्य आहे.

देवः सर्वान्तरात्मैको भूतावासो निगूढकः ।।
योगैकगम्यो यो विश्वं सृजत्यवति हन्ति च ।।३६।।
अंन्तर्यामी च मायावी सतु तच्छब्दवाचकः ।।
योऽस्मत्प्रत्ययशब्दाभ्यालम्बः कामादिदूषकः ।।३७।।

तद्व्योमवत्सर्वगतमद्वितीयं निरंजनम् ।।
सन्मात्रं निष्कलं शान्तमप्रमेयमजं शिवम् ।।३८।।

अर्थ : तो प्रकाशमान देव, जीवरूपाने प्रवेश करतो म्हणून सर्वान्त-रात्मा, आत्मशक्तिप्रधानत्वामुळे ईश्वर विद्योपाधिमुळे सर्वज्ञ, नियंतृत्वामुळें सर्वेश्वर, सर्वाश्रयामुळें भूतावास आणि निगूढ असा आहे. योगैकगम्य असा तोच विश्व उत्पन्न करतो. त्याचा पालनकर्ता व संहारकर्ता तोच आहे. अंतर्यामी मायावी असा ईश्वरच तच्छब्दवाचक आहे. जो अस्मत्प्रत्यय व शब्दाने गोचर होतो, तोच कामादिदूषक आहे. म्हणजे मलिनसत्त्वोपाधिमुळें कामादि-कांनी दूषित होतो तो गूढ असूनहीं ध्यानयोगाने गम्य होतो. याप्रमाणे ईश्वर स्वरूपाचे तटस्थ लक्षण तीन अर्थवादानी वर्णिले आहे. श्लोकातील 'च' या शब्दाने चार व पांच अर्थवाद यांचाही संग्रह केला आहे. तोच ईश्वर आकाशाप्रमाणें सर्वगामी, अद्वितीय, निरंजन, सन्मात्र, निष्कल, शांत अप्रमेय, अज, शिव, इत्यादि प्रकारचा आहे. तर्कानुमानाने अशा प्रकारचे ईश्वर स्वरुप कथन मान्य केले आहे. याप्रमाणें तत्पदवाच्य वर्णन आहे.

अयं त्वंपदवाच्योऽन्तःकरणच्छिन्नबोधकः ।।
देहेन्द्रियमनःप्राणाहंकारेभ्यो विलक्षणः ।।३९।।
साक्षी विशुध्दः कूटस्थः प्रत्यक्त्वंपदलक्ष्यकः ।।
धीदीपो निर्विकारो धीवृत्तिव्याप्योऽपि केवलः ।।४०।।
प्रत्यक्परोक्षादिवैरं तयोर्हित्वा चिदात्मताम् ।।
गृहीत्वा लक्षितां शुद्धां भूमैक्यज्ञानतो भवेत् ।।४१।।

अर्थ : हा आत्मा त्वंपद वाच्य आहे. किंचितज्ञत्वादि अंतःकरणच्छिन्न-बोध असा तोच त्वंपदवाच्यार्थ आहे. तो देह, इंद्रिये, मन, प्राण आणि अहंकार यापेक्षां विलक्षण आहे. आत्म्याचा विकारादिकांशी संबंध नाहीं. म्हणून तो बुध्यादिकांचा प्रकाशक आहे. साक्षी, विशुद्ध, कूटस्थ, प्रत्यग् व त्वंपदलक्ष्य बुद्धिदीपक, निर्विकार, केवळ बुद्धिवृत्तिव्याप्य, फलव्याप्य नसलेला असा हा आहे. तत्पदार्थ आणि त्वंपदार्थ यांचा विलक्षण विरोध आहे. त्यामुळे दोहोंचें ऐक्य कसें शक्य आहे अशी शंका घेऊन उत्तर सांगतात कीं लक्षणार्थाने

प्रत्यक्ष व परोक्ष अशा दोन्ही विरुध्द धर्मांचा त्याग करावा. आणि लक्षित अशी चिदात्मता स्वीकारावी. अखंड, शुध्द, अपरिच्छिन्नता याचे ज्ञान लक्षणेनें जाणून घ्यावे.

वाग्धी निवृत्त्यानाप्त्या च फलव्याप्तिर्निवारिता ॥
एवमात्मस्थमात्मानं योगेन श्रवणादिना ॥४२॥
जानात्यैक्यं स मुक्तः सन्कृतकृत्यो भवेद्ध्रुवम् ॥
आत्मविज्ञानेन सोम्य शोकस्यान्तं गमिष्यसि ॥४३॥
इदं श्रध्दत्स्व माशोचीः शोकस्यान्तं गमिष्यसि ॥
अत्र योगं प्रवक्ष्यामि येनात्माऽऽशु प्रसीदति ॥४४॥

अर्थ : वाणी व धीवृत्ति यांनी आत्मस्वरूपाची प्राप्ति होणार नाहीं. बुद्धि गोचर नाहीं. वृत्ति गोचर आहे. याप्रमाणें स्वतःचेच ठिकाणीं असलेले शुद्धात्म-स्वरूप श्रवणादियोगानें म्हणजे चित्तैकाग्र्यानें संपादन करावे असे तात्पर्य आहे. नंतर तो जीव शिवात्मैक्य साधतो, मुक्त होतो, कृतकृत्य होतो आणि आत्मविज्ञानानें निश्चितपणें निष्काम होतो. हे सोम्या, आत्मवेत्ता शोकसागर तरून जातो. यावर श्रद्धा ठेव. शोक करूं नको. आतां मी तुला योग सांगतो, कीं ज्यामुळें तुझें मन तात्काल शांति मिळवील.

योगः स्यात्प्रत्यगात्मैक्यमष्टावङ्गानि तस्य तु ॥
देहेन्द्रियादौ विरक्तिर्यमो मिथ्यात्ववीक्षणात् ॥४५॥
स्वात्मतत्त्वेऽनुरक्तिर्नियमः सत्यत्वनिश्चयात् ॥
बाह्यार्थौदासीन्यतोऽन्तर्दृष्टिस्थापनमानसम् ॥४६॥
पूरश्चिदन्वयादानं कुम्भकस्तत्स्थिरीकृतिः ॥
रेचको मायिकत्यागः प्राणायामस्त्रिधोदितः ॥४७॥

अर्थ : प्रत्यगात्मा आणि परब्रह्म यांचे ऐक्य यासच योग (योगशास्त्र) असें म्हणतात. त्याची आठ अंगें आहेत. ती क्रमशः अशी आहेत. (१) देहेंद्रियादिकांवर मिथ्यात्वदर्शनपूर्वक जी विरक्ति होते, तिला 'यम' म्हणतात.

(२) स्वात्मतत्वाचें ठिकाणी अनुरक्ति असणें व सत्यत्वनिश्चय असणें याला 'नियम' म्हणतात. (४) बाह्यार्थांवर औदासिन्य स्थापन करणें, अंतर्दृष्टि ठेवणें यास 'आसन' म्हणतात. (४) आत्मतत्वाचे ग्रहण यास 'पूरक' म्हणतात. घेतलेल्या तत्वाचें स्थिरीकरण यास 'कुंभक' म्हणतात. योगाप्रमाणें वायुरोध येथें अभिप्रेत नाहीं. मायिक नामरूपात्मकाचा त्याग म्हणजे 'रेचक'. वायुत्याग येथें संमत नाहीं. येणेप्रमाणें तीन प्रकारचा प्राणायाम करावा. क्रमशः अभ्यासाची वाढ करावी.

प्रत्याहारो गोस्वभावदृष्ट्यार्थासक्त्यभावदृक् ॥
धारणा स्वात्मनिष्ठा स्याद्धीतदुर्भावनं दृढा ॥४८॥
ध्यानं ब्रह्माहमस्मीति दृक्प्रवाहोऽन्यवर्जनात् ॥
देहात्मवत्परात्मत्वदृक् समाधिर्हि सुस्थिरा ॥४९॥
परिपक्वकषायाणां योगोऽयं शीघ्रमुक्तिदः ॥
किंचित्पक्वकषायाणां योगोऽयं शीघ्रमुक्तिदः ॥५०॥

अर्थ : (५) इंद्रिय विषयांचें पर्यालोचन करून विषयासंबंधी अनासक्ति, यालाच प्रत्याहार समजावे (६) विगत असंभावनादि जेणेकरून दृढ होईल तेणेकरून धारणा बळकट करावी. हीच धारणा येथें इष्ट आहे. नाभि आदि-देशांत चित्त दृढ करणे ही धारणा येथे नको. दुर्भावनांचा निश्चयाने त्याग केला पाहिजे. (७) मायिक विकारवर्जनपूर्वक 'ब्रह्माहमस्मि' अशा अंतर्दृष्टि-प्रवाहाचें सातत्य ठेवणें यासच ध्यान म्हटले आहे. येथें मूर्तिचें ध्यान अभिप्रेत नाहीं. (८) देहात्माप्रमाणें परात्म्याचें ज्ञान असणें यासच समाधि म्हटलें आहे. परिपक्व कषायांचा म्हणजे रागादिरहितांचा शीघ्रमुक्तिद असा योग येथे सांगितला आहे. रागादियुक्तांनीही या योगाचे आचरण केल्यास त्यांनाही तो योग लवकरच मुक्तिदायक होईल.

इति श्रीदत्तपुराणे सम्यगात्मयाथात्म्यो नाम प्रथमाष्टके षष्ठोऽध्यायः ॥

अथ हठयोगकथनं नाम प्रथमाष्टके सप्तमोऽध्यायः ॥

द्वे विरूपे विभोरत्राक्लेशोत्पादनमात्मना ॥
अहिंसा सत्यं यथार्थसद्वागन्यार्थनिस्पृहा ॥१॥
अस्तेयं ब्रह्मचर्यं स्यात्सदा मैथुनवर्जनम् ॥
दया भूतानुग्रहोऽत्रैकरूपत्वं सदार्जवम् ॥२॥
क्षमाऽप्रियादिसहनं धृतिर्नाशेऽप्यविक्रिया ॥
मिताहारो हितस्निग्धचतुर्थांशोनभोजनम् ॥३॥

अर्थ : व्यापक अशा आत्म्याचीं विसदृश स्थावर, जंगमात्मक रूपें आहेत. तेथे ईश्वर बुद्धीने, देहानें, वाणीनें, मनानें, सुद्धां कोणालाही क्लेश न देणे म्हणजे अहिंसा, यथार्थ आणि मृदु बोलणे म्हणजे सत्य, दुसऱ्याच्या तृणाचीं देखील इच्छा न करणे म्हणजे अस्तेय, अष्टांगमैथुनाचा त्याग यास ब्रह्मचर्य समजावे. भूतमात्रावर प्रेम हीच दया, सन्मार्गानें वागून एकरूपत्व संपादन करणे म्हणजे आर्जव, सुखदुःखाचा दाता कोणीही नाहीं या भावनेने, दुसऱ्याकडून प्राप्त झालेल्या अप्रियाचें, अन्यायाचें सहन करणें, (जसें आपली जीभ आपल्या दातांनी चावल्यास सहन करतो तसे) म्हणजे क्षमा, स्त्रीपुत्रादिकांचा वियोग, द्रव्यहानि, अशा प्रसंगी अविकारी व अविचल राहाणे ही धृति, हितकर, स्निग्ध व तीन चतुर्थांश आहार करणे हा मिताहार समजावा.

मृज्जलाभ्यां बहिःशौचं ध्यानमन्तर्यमा इमे ॥
तपः कृच्छ्रैर्देहशुद्धिस्तोषो दैवाप्ततोषणम् ॥४॥
आस्तिक्यं वेदविश्वासो विचारः श्रवणं श्रुतेः ॥
दानं स्वार्थार्पणं पात्रे पूजा विष्णौ कृतार्पणम् ॥५॥
कुकर्मलज्जा ह्रीर्बुद्धिः श्रद्धा वेदोक्तकर्मसु ॥
विधिवद्विष्णुपर्वैकादश्युपोषणकं व्रतम् ॥६॥

अर्थ : माती आणि पाणी यांच्या योगें बाह्यशुद्धि करावी. श्रीदत्तदेवाचे ध्यान करणें यास अंतर्यम म्हणतात. तप आणि कृच्छ्रादिकांनीं देहशुद्धि

करावी. दैवयोगानें मिळेल त्यांत संतोष मानावा. आस्तिक्यबुध्दि ठेवावी. वेदांवर विश्वास ठेवावा. उपनिषद् भागवर्णनपर श्रुतिविचार श्रवण करावा. न्याय्यमार्गानें स्वतः मिळविलेल्या धनाचा दानधर्म अशा ब्राह्मणास करावा कीं ज्यायोगें दानकर्त्याचें कल्याण होईल. श्रीमहाविष्णूस सर्व कर्म अर्पण करावें. कुकर्माबद्दल लाज वाटावी. वेदोक्तकर्मांबद्दल श्रद्धा असावी. विष्णु आदिकरून देवांच्या जयन्त्यांचीं उपोषणें, एकादशीचे उपवास विधिपूर्वक करीत जावेत.

वेदाविरुद्धगुर्वाप्तमन्त्राभ्यासो जपस्त्रिधा ॥
वाचिकोऽसन्मानसः सन् रहस्यो मध्यमो जपः ॥७॥
दशैते नियमा अष्टासनानि स्वस्तिकं त्विदम् ॥
जानूर्वन्तः पदौ कृत्वा समाङ्गेनोपवेशनम् ॥८॥
गोमुखं दक्षगुल्फोऽन्यपृष्ठपार्श्वे परोऽन्यथा ॥
स्वान्योरुपादविन्यासाद्वीराख्यं चाथ पद्मकम् ॥९॥

अर्थ : वेदांच्या विरुद्ध नसलेला व गुरुकृपेनें मिळालेला असा मन्त्र पुरुश्चर्यापूर्वक जपावा. जप तीन प्रकारचा आहे. (१) वाचिक–हा दुसऱ्याना ऐकू जातो व कमी फल देतो. (२) दुसऱ्यांना ऐकू न जाणारा परंतु ओठ हलवून केलेला जप मध्यम फल देतो आणि मनांत केलेला ओष्ठचलनादिरहित जप अनन्त फल देतो – हे दहा नियम. आतां आठ प्रकारचीं आसने अशी — (१) गुढगे आणि मांड्या यामध्यें पायाची टोकें धारण करून समशरीर धारण करून ताठ बसणे यास स्वस्तिकासन म्हणतात. (२) उजव्या पायाचा घोटा पाठीच्या डाव्या बाजूस आणि डाव्या पायाचा घोटा पाठीच्या उजव्या बाजूस ठेवून बसणे. यास गोमुखासन म्हणतात. (३) उजव्या किंवा डाव्या मांडीजवळ डावा किंवा उजवा पाय ठेवून बसावें म्हणजे वीरासन झालें.

पृष्ठतो व्यस्तपाणिभ्यां व्यस्तोरुस्थाङ्घ्रिधारणम् ॥
अन्योन्यगुल्फयोगेन जानुस्थकरपल्लवैः ॥१०॥
सिंहासनं व्यात्तवक्त्रं पूज्यं नासाग्रदृष्टिकम् ॥
योनिमेढ्रोर्ध्वस्थगुल्फं सिध्दं भ्रूमध्यदृग्वरम् ॥११॥

मायूरं दण्डवद्व्योम्नि भूहस्तं नाभिकूर्परम् ॥
भद्रं स्यात्सीवनीपार्श्वयुक्करात्ताङ्घ्रिगुल्फकम् ॥१२॥
स्यादासनजयात्सर्वजयोऽशक्तौ शवासनम् ॥
सार्धत्रिहस्तो देहोऽयं गुदमेढ्रान्तमध्यकः ॥१३॥

अर्थ : (४) डाव्या मांडीवर उजव्यापायाचे टोक व उजव्या मांडीवर डाव्या पायाचे टोक ठेवून बसावे, आणि उजव्या व डाव्या हाताने अनुक्रमे उजव्या व डाव्या पायाचे टोक धरावे, यास पद्मासन म्हणतात. (५) नासाग्र दृष्टि ठेवून जीभ बाहेर काढून तोंड जास्तीत जास्त पसरावे, यास सिंहासन म्हणतात. (६) लिंगाचे खालचे बाजूच्या दोन बोटांचे जागेंत एका पायाचा घोटा व लिंगाच्या वरील बाजूस दुसऱ्या पायाचा घोटा ठेवून बसावे व भ्रूमध्यावर दृष्टि ठेवावी यास सिध्दासन म्हणतात. (७) दोन्ही हातांचे तळवे जमिनीवर टेकून, हातांच्या कोपरावर नाभिप्रदेश टेवून, काठीप्रमाणे अधांतरी आडवे व्हावे, यास मयूरासन म्हणतात. (८) दोन हात शिवणीच्या मागे आणावेत आणि मागील बाजूनें मांड्यावरून घोट्यांपर्यंत आणावेत. यास भद्रासन म्हणतात. आसन जयामुळेंच सर्व गोष्टींवर जय मिळविता येतो. अशक्तांनी शवासन करावे. हा देह साडेतीन हात लांब असून गुद आणि लिंग हे त्याचे मध्य आहेत.

ततो नवाङ्गुलं कन्द आनाभेरुद्गता अतः ॥
द्वासप्ततिसहस्राणि मुख्या नाड्यश्चतुर्दश ॥१४॥
एतासामुत्तमास्तिस्र आसामेकाप्यनुत्तमा ॥
पिङ्गला दक्षनासान्ता सूर्येशा दिनसंज्ञिता ॥१५॥
इडापि वामनासान्ता निट्संज्ञा चन्द्रपा सुखा ॥
सुषुम्णा ब्रह्मरन्ध्रान्ता कालभोक्त्र्यमृतत्वदा ॥१६॥
तन्मूले कुटिला शक्तिर्मोक्षविघ्नप्रदाऽसताम् ॥
नाभ्यूर्ध्वं प्राणोऽधोऽपानः समानो नाभिमण्डले ॥१७॥

अर्थ : त्यानंतर म्हणजे मध्यापासून नव अंगुलीपर्यंत, नाभिप्रदेशापर्यंत कंद आहे. त्यापासून बहात्तर हजार नाड्यांचा उगम होतो. पैकी मुख्य चौदा

नाड्या आहेत. त्यापैकी तीनच उत्तम आहेत. त्यांची नांवे (१) इडा (२) पिंगला व (३) सुषुम्णा. पिंगलेचा ईश सूर्य आहे. ती दक्षिण नासिकापुटांत शेवट पावते. तिलाच दिन अशी संज्ञा आहे. इडा ही डाव्या नासिकापुटांत संपते. तिचा स्वामी चंद्र असून ती सुखदायी आहे. तिलाच निशा अशी संज्ञा आहे. सुषुम्णा ही ब्रह्मरंध्रांत शेवट पावते. ती कालभोक्ती व अमृतत्व देणारी आहे. तिच्याच मुळाशी कुण्डलिनी शक्ति आहे. तिनें आपल्या मुखानें सुषुम्णेचें मुख आच्छादन केलें आहे व अभ्यासरहित अशा लोकांच्या मोक्षसिध्दीचे आड ती येते. नाभीच्या वरच्या बाजूस प्राण व खालचे बाजूस अपान वायु वास करतो. नाभिमण्डलांत समान वायु रहातो.

चरत्युदानः कण्ठे च व्यानः सर्वशरीरगः ॥
त्वगादिषु च नागाद्यास्त्र्यस्रोऽग्निर्नाभिमध्यगः ॥१८॥
नृणां वृत्तो विहङ्गानां चतुरस्रचतुष्पदाम् ॥
कृत्वाग्नेरूर्ध्वमम्भोऽन्नं प्राणोऽधस्थो धमत्यमुम् ॥१९॥
स दीप्तोऽन्नं पचेदङ्गे व्यानं सारोऽस्य यच्छति ॥
निश्वासोच्छ्वासकृत्प्राणोऽपानो विण्मूत्रहापकः ॥२०॥

अर्थ : उदान वायु कंठात वास करतो. व्यान सर्व शरीरात असतो. त्वचा, रस, मांस, अस्थि, शिरा यांचे ठिकाणी नाग, कूर्म, कृकर, देवदत्त, धनंजय आदि वायु वास करतात. माणसांच्या नाभिप्रदेशांत त्रिकोणाग्नि असतो. हा अग्नि चतुष्पाद व पक्षी यांचे ठिकाणीही असतो. खाल्लेले व प्यालेले अन्नपानादिक पदार्थांचे पचन त्या अन्नाशयाचे खाली असलेल्या अग्निवर चालते. व्याननामक वायु अन्नाचें सार देहांत सगळीकडे पोंचवितो. प्राणवायूचे योगें उच्छ्वास व श्वास चालतात. अपानवायू विष्ठा व मूत्र यांचे विसर्जन करवितो.

उदानोऽङ्गोन्नयनकृत्समानः शोषणादिकृत् ॥
तथोद्गारोन्मीलनक्षुत्तन्द्राव्याप्तिकराः परे ॥२१॥
चले प्राणे चलं चित्तं निश्चले निश्चलं तयोः ॥
नष्ट एकतरे नाशो द्वयोरपि स योगतः ॥२२॥

न ज्ञानं जीवति प्राणे मनस्यपि लयं नयेत् ॥
द्वयं गच्छति मोक्षं स योगी नान्यः कथंचन ॥२३॥

अर्थ : उदान नामक प्राण अंगांचे उन्नयन करतो. म्हणजे वाण्यादिकांच्या प्रबोधनकाली उन्नयन आणि मरणोत्तर लिंगदेहाचे उन्नयन करतो. समान नामक प्राण शोषणादि कार्ये करतो. तसेच नाग, वायु उद्गार, कूर्म वायु नेत्रोन्मीलन, कृकर वायु क्षुधा, देवदत्त वायु तन्द्रा वगैरे आणि धनंजय वायु उष्णतेनें शरीरव्याप्ती करतो. प्राण चंचल झाला असता चित्त चंचल होतें. तो निश्चल झाला म्हणजे चित्तही निश्चल होते. दोहोंपैकी एकाचा नाश झाला असतां दुसरेही नाश पावते. योगाने दोहोंचाहि नाश होतो. प्राण व मन दोन्हीही प्रखरपणे जागृत असतां ज्ञानहोणे शक्य नाही. म्हणून दोहींचाहि लय करावा. ह्यानेंच योगी मोक्षाप्रत पोंचतो. अन्यथा नाही.

नात्यश्नतोऽनश्नतोऽपि सुप्तस्यैष न जाग्रतः ॥
युक्तचेष्टाहारनिद्रागतेर्योगो भवेत्सुखः ॥२४॥
क्षाराम्लतिक्तकटुरूक्षकदन्नशाक —
स्त्र्यग्न्यध्वभाङ् न लभतेऽकुशलोऽस्य सिद्धिम् ॥
शुण्ठीसितासुमनशालिसदन्नमुद्ग —
चक्षुष्यशाकघृतदुग्धसदम्बु पथ्यम् ॥२५॥

अर्थ : हा योग अति खाणाऱ्यास, अजिबात न खाणाऱ्यास, अतिनिद्रा घेणाऱ्यास, तसेंच निद्रा अजिबात न घेणाऱ्यासही, साध्य होत नाहीं. योग्यरीतीने आचार करणाऱ्यास, योग्य आहार व निद्रा घेणाऱ्यासच योग सुखानें प्राप्त होतो. खारट, आंबट पदार्थ, कारली वगैरे कडू पदार्थ, मिरे वगैरे तिखट पदार्थ, दूध दही लोणी तूप रहित अस्निग्ध पदार्थ, यावनाळ वगैरे कदन्न, सत्व व रस नसलेल्या भाज्या, या सर्व पदार्थांचे सेवन करणारा, मैथुन करणारा, अग्निनें अंग शेकणारा, नेहमीं हिंडणारा, अभ्यास कसा करावा हें न जाणणारा, या सर्वांना योगाची सिध्दि प्राप्त होत नाहीं. योगाभ्यासास हितकर पदार्थ म्हणजे सुंठ, साखर, गहूं, तांदूळ, मूग, सदन्न, जवस, नाचणे, राळे, सत्वयुक्त व रसाळ भाज्या, तूप, दूध व स्वच्छ पाणी. हा आहार योगसाधकांनी ठेवावा.

दैवी संपत्स्वधर्मस्थो निश्चिन्तो गुरुसेवकः ॥
सद्देशे मठिकामध्ये रक्षिते निरुपद्रवे ॥२६॥
भक्त्येष्टदेवं नत्वाऽऽदौ सूपविष्टः सुदिङ्मुखः ॥
कुशाजिनांशुकेष्वेव प्राणायामान्समभ्यसेत् ॥२७॥
चंद्रेणापूर्य वायुं षट् दशमात्रं हनुं हृदि ॥
कृत्वा चतुःषष्टिमात्रं कुंभयित्वा विरेचयेत् ॥२८॥
शनैः कुम्भार्धकालेन पश्चादाकर्षितोदरः ॥
त्यजेत्सूर्येणाथ तेन पीत्वान्येन तथा पुनः ॥२९॥
पञ्चवृध्यान्विह्यशीत्यन्तैस्त्रिसंध्यमसुयामकैः ॥
त्रिमासोर्ध्वं प्राणजयः सिध्येत्केवलकुम्भकः ॥३०॥

अर्थ : दैवी संपत्तीने युक्त, स्वधर्माचारी, चिंतारहित, गुरुसेवक अशा साधकाने पवित्र ठिकाणीं मठी करावी. ती सुरक्षित, निरुपद्रवी, लहान दाराची, छिद्ररहित असावी. प्रथम इष्टदेवतावंदन भक्तीने करून, दर्भ, मृगासन यावर शुभ दिशेकडे तोंड करून बसावें आणि प्राणायामाचा उत्तम प्रकारे अभ्यास करावा. प्रथम डाव्या नाकपुडीने सोळा मात्राकालपर्यंत वायु आंत ओढून घ्यावा, त्यावेळीं छाती ताठ करून हनुवटी छातीशी रुतलेली ठेवावी. गृहीत वायु चौसष्ट मात्राकालपर्यंत आंत ठेवावा. नंतर बत्तीस मात्राकालांत उजव्या नाकपुडीने वायूचे विसर्जन करावे. त्यावेळी पोट आंत ओढून घ्यावे. नंतर उजव्या नाकपुडीने वायु आंत घेऊन वरीलप्रकारे करावे. रोज त्रिकाल प्राणायाम करून, दर दिवसास पांच मात्रा याप्रमाणें कालवाढ करून कुंभकाची कालमर्यादा ऐंशी मात्रापर्यंत नेल्यानें तीन महिन्यांच्या कालावधीनें केवल कुंभक साध्य होऊन प्राणजय होतो.

ध्येयोऽत्र तारो हृदीक्ष्यं भ्रूमध्ये चेन्दुमण्डलम् ॥
दार्ढ्याय लाघवायाङ्गमुत्थस्वेदेन मर्दयेत् ॥३१॥
शुद्ध्यै क्रियाश्चित्रकुम्भाः सिद्ध्यै मुद्राश्च कीर्तिताः ॥
प्राणायामैरुभे तेपि साध्य आरोग्यमप्युत ॥३२॥

समासीनो यतास्योऽन्तः प्राणं दक्षिणया त्यजेत् ॥
सारं लगति हृत्कंठकपोलावध्यसौ यथा ॥३३॥

अर्थ : कुंभक चालू असतां हृदयांत ओंकाराचे ध्यान करावें. भ्रूमध्य-भागी चन्द्रमंडळ पहावे. दृढत्व आणि लाघव (हलकेपणा) त्यासाठी अंगोत्पन्न स्वेदाने मर्दन करावे. कफ, वात, पित्त यांच्या शुद्धिसाठी धौतीक्रिया कराव्यात. सिध्दीसाठी आठ प्रकारचें कुंभक व दहा मुद्रा कराव्यात. प्राणायामाने शुध्दि व सिध्दी दोन्ही साध्य होतात. आरोग्य प्राप्तीही होते. तोंड मिटवून बसावें. आंतील प्राणवायू दक्षिण नासापुटाने असा सोडावा की सशब्द असा तो वायू हृदय, कंठ, गाल यापर्यंत पोंचेल.

लोहकारस्य भस्त्रावच्छक्त्याऽऽश्वापूर्य रेचयेत् ॥
वामां मध्यानामिकाभ्यां धृत्वा जाते श्रमे विधेः ॥३४॥
पीत्वा प्राणं कुंभयित्वा धृत्वाङ्गुष्ठेन दक्षिणाम् ॥
वामया रेचयेन्मन्दं तथाऽथ प्राग्वदाचरेत् ॥३५॥
द्विनाड्यभ्यासाद्यामार्धं शक्तिर्मार्गं ददात्यरम् ॥
भस्त्रेयं सर्वदोषघ्नी रुक्पापघ्न्यपि सिद्धदा ॥३६॥
शिस्ननाभ्यन्तस्थकन्दं सति वज्रासने पदौ ॥
धृत्वा दृढं प्रपीड्यारं भस्त्रां सिद्धासनस्थितः ॥३७॥

अर्थ : लोहाराच्या भात्याप्रमाणें श्वास शक्तिपूर्वक सत्वर घ्यावा. त्यावेळी डावी नाकपुडी मधलें बोट व अनामिका यांनी धरावी. श्रम झाले असतां अंगठ्याने दक्षिण नाकपुडी धरावी व डाव्या नाकपुडीने हळूहळू सोडावा. असेच पहिल्याप्रमाणें करावें. याप्रमाणें दोन्ही नाड्यांचा अभ्यास अर्धयाम (दीड तास) झाला असतां शक्ति (कुंडलिनी) मार्ग देते. ही भस्त्रा सर्वदोषहर, पापांचा त्वरित नाश करणारी व सिध्दिदात्री आहे. वज्रासन घालून पाय धरून शिश्न आणि नाभि यांच्या दरम्यान असलेला कंद जोराने ताडण करावा.

समाकुञ्चितनाभिर्द्राक्कुर्याच्छक्तिश्चलत्यतः ॥
यामार्धाभ्यासतो धैर्यान्मध्यनाड्यां समुद्गता ॥३८॥
ऊर्ध्वाकृष्टा भवेत्किंचिच्छक्तिर्नाडिमुखं त्यजेत् ॥
ततःस्वतो व्रजत्यूर्ध्वं प्राणोऽतस्तां विचालयेत् ॥३९॥
चालनात्सर्वसिद्ध्याप्तिर्मण्डलाद्योगिनो न तु ॥
रुग्भ्योऽभयं यमाच्चापि नेतोऽन्यन्नाडिशोधनम् ॥४०॥
चालितायामपि प्राणो बद्धा चेद्रसना सुखम् ॥
व्रजत्यूर्ध्वं सिद्धिपूर्वं राजयोगपदप्रदः ॥४१॥

अर्थ : सिद्धासनावर बसून नाभिप्रदेश आंत ओढून घेऊन जलद गतीनें भस्त्रा करावी. म्हणजे शक्तिचालन होतें. धैर्यानें असा अभ्यास दीड तास केला म्हणजे शक्ति मध्य नाडीमध्यें जाते आणि किंचित् वरच्या बाजूस आकृष्ट होऊन नाडीमुखाचा त्याग करते. नंतर प्राण स्वतः होऊन वरच्या दिशेला जातो. म्हणून शक्तिला चाळवावें. शक्तिचालनानें व चाळीस दिवसांच्या त्याच्या अभ्यासानें योग्यांना सर्व सिद्धिंची प्राप्ति होतेच, पण रोगापासून व यमापासूनही अभय प्राप्त होते. या वेगळें निराळें नाडीशोधन नाहीं. रसना (जीभ) बद्ध असली तरीही, कुंडलिनीचें चालन झालें असतां प्राण ऊर्ध्व दिशेस गमन करतो. हा सिद्धियोग राजयोग प्राप्त करून देतो.

जिव्हामूलशिरां छित्वा रोममात्रं प्रवर्धयेत् ॥
पथ्यासैंधवचूर्णैर्गां चालयेद्दोहयेत्पुनः ॥४२॥
दिने दिने छेदनाद्यैस्त्र्यध्वगा वर्धते कला ॥
षण्मासादिति जिह्वाधः शिराबन्धो विनश्यति ॥४३॥
मुद्रा स्यात्खेचरी त्र्यध्वे योजितावाङ्मुखी कला ॥
रसस्वादोऽमृतप्राप्तिस्ततः प्राणमनोजयः ॥४४॥
सहृज्जिह्वा चरत्यस्य खे कदापि स्पृशन्ति नो ॥
विषार्तिरुग्जराक्षुत्तृण्निद्रातन्द्रामृतिक्रियाः ॥४५॥

अर्थ : जिभेच्या मुळाशी असलेली शीर तोडून एक एक केसभर वाढवावी. हिरडा, सैन्धव यांच्या चूर्णानें जिभेची चाळवाचाळव व ढवळणें करावे. छेदनादि क्रिया रोजरोज केल्यानें भ्रूमध्याचे दिशेनें जीभ वाढते. असे सहा महिने केल्यानें जिभेच्या खालचा शिराबन्ध नाश पावतो. भ्रूमध्याचे ठिकाणीं खेचरी मुद्रा योजावी आणि जीभ अधोमुख ठेवावी. त्याने रसस्वाद, अमृतप्राप्ति व प्राणमनोजय होतो. ज्याची जिव्हा आज्ञाचक्रांत प्रवेश करते त्यास विषबाधा, रोग, वार्धक्य, तृष्णा, भूक, निद्रा, तन्द्रा, मृत्यु यांची बाधा होणार नाहीं.

बिन्दुः स्त्र्याश्लेषितस्यापि न क्षरत्यूर्ध्वमेति सः ॥
चालितश्चेद्योनिमुद्राबद्धो मुक्तः स भोग्यपि ॥४६॥
सुधान्तः स्रवतीन्दोस्तां ग्रसत्यर्कस्ततो जरा ॥
अधःशीर्षोर्ध्वपात्तिष्ठेद्बहाहारः शनैः शनैः ॥४७॥
याममात्रं ततः सिद्धिर्व्यस्तेयं करणीष्टदा ॥
वलीपलितवेपघ्नी मृत्युहन्त्री सुधाप्रदा ॥४८॥
योनिस्थवामगुल्फो ना करात्तप्रसृतान्यपात् ॥
कुम्भं कुर्यात्पुनर्व्यस्तं क्षयगुल्मादिरुग्लयः ॥४९॥

अर्थ : अशा योग्याने स्त्री आलिंगन केले तरीही त्यांचा रेतुबिंदू ढळत नाहीं. आणि जरी ढळला तरीही तो ब्रह्मरंध्राप्रत पोचतो. असा तो भोगी असूनही मुक्त असतो. टाळूंतून अंमृत स्रवत असते. ते अग्नि खातो त्यामुळे वार्धक्य प्राप्त होते. खाली डोके व वर पाय करून शीर्षासन केल्याने व ते हळूंहळूं दीडतासपर्यंत केल्याने शरीरास वळ्या पडत नाहींत, केस पांढरे होत नाहीत आणि अमृतप्राप्ती होते. यासच विपरीत करणी म्हणतात. पुरुषाने डावी खोट लिंगस्थानी ठेऊन दुसरा पाय लांब करावा व त्याची बोटें (पाय न वाकवितां) घट्ट धरावीत. असेच उलट पायाचे करावे, त्यावेळीं कुंभक करावा. त्यामुळें क्षय, गुल्म वगैरे रोगांचा नाश होतो.

पूर्ववत्प्रसृतं पादं कृत्वोरौ कृतकुम्भकः ॥
क्लेशहीनो ज्ञानवांश्च नाभौ प्राणधृतेररुक् ॥५०॥
मनोजयश्च नासाग्रे पादाङ्गुष्ठेऽङ्गलाघवम् ॥
भ्रूमध्ये चामृतप्राप्तिरारोग्यं तुन्दपार्श्वयो : ॥५१॥
विषज्वरान्तस्तु दन्ते वायुपानाच्च जिह्वया ॥
श्रमतृड्व्याधिदाहान्ताः कल्याणी वाक् सुधाशनम् ॥५२॥
स्वास्येग्रौ दीप्तेऽङ्गसादे नाडीशुद्धावनामये ॥
नादः स्फुटत्वे सुदृष्टयोः सिद्धिबिन्दौ जिते सति ॥५३॥

अर्थ : पूर्वी पसरलेले पाय मांड्यांवर घ्यावेत आणि कुंभक करावा. नाभीमध्यें प्राणधारणा केल्याने मनुष्य ज्ञानवान्, निरोगी होतो. नासाग्रांत केल्याने मनोजय प्राप्त होतो. पायाच्या अंगठ्यावर मन एकाग्र केल्यानें अंगलाघव येतें. भ्रूमध्यांत केल्यानें अमृतप्राप्ति होतें. उदर आणि पार्श्व यावर केल्याने आरोग्य प्राप्त होते. दातांवर एकाग्र केल्यास विषज्वराचा नाश होतो. जिह्वे वायुपान केल्यास श्रम, तृषा, व्याधि आणि दाह यांचा नाश होतो, वाणी शुभ होते आणि सुधापान मिळते. रेचक मुखाने करूं नये. अमृतबिंदूचा जय झाला असतां मुख सुंदर होते, अंगकांती तेजस्वी बनते. नाडीशुध्दी होऊन आरोग्यप्राप्ति होते. आवाज स्पष्ट व गोड होतो. दृष्टि निर्मळ व तीक्ष्ण होते.

इति श्रीमद्दत्तात्रेयपुराणे सार्धत्रिसाहस्र्यां त्रिकाण्डमण्डितायां संहितायां वासुदेव्यां प्रथमाष्टके ज्ञानकाण्डे साङ्गोपाङ्ग हठयोग–कथनं नाम सप्तमोऽध्यायः ॥

॥ अथ योगकथनं नाम प्रथमाष्टकेऽष्टमोऽध्यायः ॥

इदं श्रेष्ठं भजेत्तस्य सिध्येत्केवलकुम्भकः ॥
न तस्य दुर्लभं किंचित्सोऽजेयः कैरपीह हि ॥१॥
देहे पादादिमूर्धान्ते स्थिता लोकाश्चतुर्दश ॥
हृत्संयमात्तत्र तत्र तत्तल्लोकविदीरिता ॥२॥

अर्थज्ञानं तारकायां नासाग्रे चेन्द्रलोकवित् ॥
तद्धो वह्निलोकस्य चक्षुषोः सर्वलोकवित् ॥३॥
श्रोत्रे च यमलोकस्य तत्पार्श्वे नैर्ऋतस्य वित् ॥
पृष्ठे वरुणलोकस्य वायुलोकस्य च श्रुतौ ॥४॥

अर्थ : या श्रेष्ठ अशा श्रीदत्तात्रेयाची उपासना करणाऱ्यास केवल कुम्भक साध्य होईल. त्यास या जगांत कांहीही दुर्लभ असणार नाहीं, आणि तो सर्वांना अजेय राहील. या पायाच्या टोकापासून डोक्याच्या अग्रापर्यंत चौदा लोक स्थिर झालेले आहेत. अंतःकरणाचा संयम केल्याने त्या त्या लोकाचे ज्ञान त्या त्या ठिकाणी होते. डोळ्यातील बाहुल्यांचे ठिकाणी अर्थज्ञान होते. नाकांच्या शेंड्यावर चंद्रलोकाचे, त्याचे मागे नैर्ऋत (राक्षस) लोकाचे, पाठीवर वरुण लोक व वाणीमध्यें वायुलोकाचे ज्ञान होते.

कण्ठे कुबेरलोकस्य वामेक्षिण शिवलोकवित् ॥
दक्षे परमलोकस्य ब्रह्मलोकस्य मूर्ध्नि वित् ॥५॥
तत्तज्जन्तुध्वनौ तत्तद्भूतज्ञानं च कर्मणि ॥
प्राग्जातिविच्चान्यचित्ते स्फुटं तच्चित्तवृत्तिवित् ॥६॥
सूर्येन्द्वोर्लोकमज्ञानं ध्रुवे तद्गतिदर्शनम् ॥
स्वार्थे पुरुषविद्वीर्ये मारुत्यादिबलस्य वित् ॥७॥
कायरूपेऽप्यदृश्यस्य कायव्यूहस्य नाभितः ॥
अतीतानागतज्ञानं स्याद्धर्माधर्मयोर्गले ॥८॥

अर्थ : कण्ठस्थानी कुबेरलोक आहे. डाव्या डोळ्यांत शिवलोक आहे. उजव्यांत विष्णु–लोक आहे. त्या त्या प्राण्याच्या आवाजावरून व कर्मावरून त्याचे त्याचे भूत, पूर्वजन्म, चित्तवृत्ति यांचे ज्ञान, साधकास होते. सूर्यलोक, चंद्रलोक, नक्षत्रगण, ध्रुव यांचे ज्ञान, त्यांच्या गतीचे ज्ञान होते आणि पुरुषार्थ आणि बलप्राप्ति होऊन, वायु आदिंचे बल ज्ञात होते. शरीरांतर्गत नाभीपासून सर्व ज्ञान होते. तसेच भूत, वर्तमान व भविष्यकालाचे ज्ञान स्पष्ट होते.

क्षुत्तृण्नाशः कूर्मनाड्यां स्थैर्यं तारे च सिद्धदृक् ॥
कायरवे खगतिस्तत्तत्सिद्धयस्तत्र तत्र च ॥९॥
प्रत्याहारस्त्वा हरणमर्थचारी गवां बलात् ॥
आत्मान्वयेन दृष्टिश्च फलत्यागश्च कर्मणः ॥१०॥
वैरस्थं चेन्द्रियार्थेषु प्रतिमर्म च हृत्स्थितिः ॥
प्रत्याहारः पञ्चधैवं धारणापि च पञ्चधा ॥११॥
हृत्प्राणधारणा हृद्धिधारणाऽध्यात्मधारणा ॥
तन्मूर्तिधारणा क्ष्मादौ हार्दखेऽन्यखधारणा ॥१२॥

अर्थ ? भूक व तहान यांचा नाश होतो. कूर्मनाडीत स्थिरता येते. ओंकारांत दृष्टि स्थिर होते. शरिरांतर्गत पन्च सूक्ष्म ज्ञानेद्रियांचे ठिकाणी इंद्रियांची गति असंर्मूख होते. आणि अणिमादि अष्ट सिध्दी प्राप्त होतात. (आता प्रत्यादाराचे वर्णन करतात.) विषयांकडे आकृष्ट झालेल्या इंद्रियाचे निग्रह-पूर्वक संयमन करणे, सर्व वस्तुजातामध्यें आत्मरूप म्हणजे ईश्वर पहाणे, कर्म-फलाचा त्यागइंद्रियविषयांविषयीं वैरस्य आणि मनाचा कटाक्ष मर्मस्थानाप्रत ठेवणे, यास प्रत्याहार म्हणतात. हृदयांत प्राण धारणा, बुध्दी धारणा अधात्म-धारणा इश्वर मूर्तिधारणा सगुणरूप चिंतन, पन्चभूतांचें ठिकाणी क्षमारूपाने पहाणे, आणि हृदयाकाशात अन्य आकाशाची धारणा करणे, ह्या पंचधारणा होत.

वज्राङ्कुशध्वजाब्जाङ्कयुग्रक्ताब्जाभपत्तलम् ॥
नखमाणिक्यभाध्वस्तभक्तहार्दतमस्ततिम् ॥१३॥
गूढगुल्फं कूर्मपृष्ठोल्लसत्पादोपरिस्थलम् ॥
परिपुष्टसुजङ्घोरुं विशालजघनस्थलम् ॥१४॥
पृथुश्रोणिं च काकुत्स्थं चारुनाभिं दलोदरम् ॥
कपाटवक्षसं दीर्घमांसलोरगवद्भुजम् ॥१५॥
सुचिह्नचिह्नितकरं कंबुकंठं स्मिताननम् ॥
स्नैग्ध्यधावल्ययुक्ताक्षं चलत्पिंगजटाधरम् ॥१६॥

चन्द्रकान्तं प्रभुं कृष्णभ्रूश्मश्रुकनीनिकम् ॥
भावशुद्धद्विजाकीर्णं प्रसन्नमुखपङ्कजम् ॥१७॥

सिद्धासनसमासीनं वराभयदसत्करम् ॥
क्षणेक्षणेऽपि स्वभक्तस्मृतिगामिनमीश्वरम् ॥१८॥

अर्थ : ज्याच्या चारी हातांत वज्र, अंकुश, ध्वज आणि कमल धारण केलेली आहेत, ज्याचे पायाचे तळवे तांबड्या कमलपत्राप्रमाणें आरक्त आहेत, ज्याच्या माणकाप्रमाणें तेजस्वी नखांच्या कांतीने भक्ताच्या मनांतील तम म्हणजे अज्ञान नाश पावते, ज्याचे घोटे अस्पष्ट आहेत, ज्याच्या पावलांचा वरचा भाग कासवाच्या पाठीप्रमाणें पुष्ट आहे, ज्याच्या पोटऱ्या आणि मांड्या पुष्ट आहेत, ज्याचा कटिपश्चाद्भाग विशाल आहे, काकुत्स्थ, सुरेख नाभी असलेला, विशाल उदराचा, विशाल वक्षःस्थलाचा, लांब व मांसल असे सर्पवत् बाहू असलेला हातांत सुचिन्हें धारण करणारा, शंखाप्रमाणे कंठ असलेला, स्मितवदनी, नेत्रांत स्नेह व वात्सल्य ओतप्रोत भरले आहे असा, किंचित् पिंगट जटा धारण करणारा, चंद्राप्रमाणे कांती असणारा, काळ्याभोर भुंवया असलेला, मिशारहित, भाविक अशा शुद्ध द्विजांनी वेढलेला, मुखकमल प्रसन्न आहे असा, सिद्धासनस्थ, वरद आणि अभयद हस्त असणारा, वारंवार भक्तांनी स्मरण केले असतां त्यांचेकडे त्वरित जाणारा.

अनुग्रहाख्यहृत्स्थेन्दुज्ञापितस्मितचन्द्रिकम् ॥
सदाखण्ड समाधिस्थं दत्तात्रेयं दिगंबरम् ॥१९॥

आसेचनकमूर्तिं तं सदापादादधृदामुखम् ॥
ध्यायेत्समाहितो योगी निवृत्ताखिलवृत्तिकः ॥२०॥

अर्थ : ज्याच्या हृदयांतील प्रेमरूपी चंद्रानें त्याच्या मुखावर स्मितरूपी चंद्रिका प्रकाशमान केली आहे असा, नेहमी अखंड समाधीस्थ, अशा दिगम्बर श्रीदत्तात्रेयांचे ध्यान योग्यानें करावें. तें करीत असतांना वृत्ति अन्य ठिकाणांहून निवृत्त करावी आणि चित्त एकाग्र करावें. आपादमस्तकपर्यंत असें श्रीदत्तात्रेयांचे ध्यान निरतिशय आनंद देणारे आहे.

इदं तु सगुणध्यानं स्वेच्छोपात्त चिदात्मन :
निर्गुणं केवलं हास्यं सच्चित्सुखमयं परम् ॥२१॥

ध्यातृध्यानध्येयरूपः समाधिः सविकल्पकः ॥
जीवात्मपरमात्मैकयावस्था त्रिपुटिवर्जिता ॥२२॥

परिपूर्णानन्दरूपा शुद्धचिद्रूपिका परः ॥
पश्चात्स्मृत्यनुमेयात्मार्थवृत्तय इहानुगाः ॥२३॥

अन्तर्लीनसहृत्प्राणो ऽ पश्यन्नचलदृग्बहिः ॥
मुद्रेयं वैष्णवी शून्या शून्यलक्ष्मपदप्रदा ॥२४॥

अर्थ : स्वेच्छेने स्वतःचे दान करणाऱ्या चिदात्म्याचे हे सगुण ध्यान आहे. हे हास्यरूप निर्गुण ध्यान परम सच्चित्सुखमय आहे, ध्याता, ध्यान व ध्येय यांनी एकरूप असणारा समाधि. सविकल्पक असा हा दत्तात्रेय आहे. जीवात्मा व परमात्मा यांची ऐक्यावस्था त्रिपुटी वर्जित म्हणजे ध्यातृध्यान ध्येयवर्जित आहें. निर्विकल्पकसमाधि परिपूर्णानंदरूप आणि चिद्रूपिकापर अशी आहे. काही पूर्व स्मृति, अनुभव हे समाधि प्राप्तीनंतर शिल्लक रहातात. परंतु तदाकार अशा त्या सर्व चित्तवृत्ती मन व प्राण यांसह अंतर्लिन होतात. त्यामुळे साधकयोगी बाहेर पहात नाही. ही मुद्रा वैष्णवी, शून्य व शून्यलक्ष-पददायिनी आहे.

तद्वान्दृढासनो दक्षकर्णे रूद्धबिलो ध्वनिम् ॥
त्रिग्रन्थिभेदं श्रुणुयात्सुसूक्ष्मं स समाधिभाक् ॥२५॥

अर्धोन्मीलितदृक्स्वस्थो नासाग्राक्षो वशी भजेत् ॥
लीनार्केन्दुः परं तत्त्वं तद्बाह्यान्तरवर्जितम् ॥२६॥

एवमभ्यासयोगेन खेचरीमुद्रयापि च ॥
मनः स्थिरीभावरूपाऽवस्था सिद्ध्येन्मनोन्मनी ॥२७॥

शक्तिमध्ये मनः कृत्वा शक्तिं चापि मनोगताम् ॥
मनसामन आलोक्य योगी नित्यं सुखी भवेत् ॥२८॥

अर्थ : वैष्णवीमुद्रायुक्त, अशा समाधिकारक योग्याने तिन्हीं ग्रंथीचा भेद करणारा सूक्ष्मध्वनि दक्षिण कानांत ऐकावा. अर्धोन्मीलितदृष्टी ठेवून स्वस्थ चित्ताने, नासाग्रदृष्टीने इंद्रियनिग्रह करून, श्वासोच्छवास रहित अवस्थेत त्या परम तत्त्वाचे चिंतन करावे, उपासना करावी. त्या परम तत्त्वाला बाह्य आणि अभ्यंतर, दोन्हीही नसते. या प्रकारच्या अभ्यासाने आणि खेचरी मुद्रेने मनोन्मनी मनःस्थिरी भावरूपा अवस्था सिध्द होते. मनास शक्तीमध्ये लीन करून व शक्तीला मनात स्थिर करून मनानेच मनाला पाहण्यानें योग्याने नित्य सुखी व्हावें.

आकाशमध्य आत्मानमात्मन्याकाशमेव च ॥
कृत्वाकाशमयं सर्वं चिन्तयेन्न किमप्यतः ॥२९॥
बाह्यचिन्ता न कर्तव्या तथैवान्तरचिन्तनम् ॥
परित्यज्याखिलां चिन्तां चिन्मयं भावयेत्परम् ॥३०॥
योगेनेत्थं लीयमानं मनो ब्रह्मणी लीयते ॥
कर्पूरोऽग्नाविवाब्धौ च लवणं ख इवान्यखे ॥३१॥
ज्ञेयं सर्वप्रतीतं च तज्ज्ञानं मन उच्यते ॥
मनोलयो ज्ञानवस्तुपरित्यागात्ततोऽमृतम् ॥३२॥

अर्थ : आकाशामध्ये आत्मा आणि आत्म्यामध्ये आकाश असे करून योग्याने सर्वच आकाशमय करावे आणि त्याव्यतिरिक्त कांहीच पाहू नये. बाह्य गोष्टींची चिंता करू नये, त्याच प्रमाणे आंतर चिंतनही. सर्वच चिंता सोडून देऊन श्रेष्ठ अशा चिन्मयाचेच ध्यान करावे. अशा रितीने योगाने लीन केलें जाणारे मन ब्रह्मामध्ये लय पावते. उदा. ज्याप्रमाणे ज्ञेय आणि सर्वांना प्रतित होणारे जे ज्ञान त्यासच मन म्हणतात. ज्ञानवस्तुच्या परित्यागाने मनोलय होतो व त्यानंतर अमृतत्व प्राप्त होते (येथे चिन्मय या शब्दातील चित शब्दाचें आनंदब्रह्म, विज्ञानब्रह्म, नित्य, शुद्ध, बुद्ध, सत्य, मुक्त, निरंज, विभु, चित्प्रत्यय, एकरस हे विधेय गुण व अशब्द, अस्पर्श इत्यादि निषेध्य गुण समजावेत.)

योगो ज्ञानं च मनसो नाशस्य द्वौ क्रमौ परौ ॥
योगो हृद्वृत्तिरोधोऽत्र ज्ञानं सम्यगवेक्षणम् ॥३३॥
चित्तवृत्तिनिरोधस्तु मनःस्पन्दोपशान्तिदः ॥
मनःस्पन्दोपशान्त्यायं संसारः प्रविलीयते ॥३४॥
शास्त्रसज्जनसंपर्कवैराग्याभ्यासयोगतः ॥
धैर्येण चास्यया पूर्ववासनातानवाध्दठात् ॥३५॥
सद्भक्त्या भगवद्ध्यानाच्चिरमेकान्तमोदितात् ॥
अखेदमनिलाभ्यासात्परतत्त्वैकचिन्तनात् ॥३६॥
ॐकारोच्चारणाद्दीर्घं घण्टिकांक्रमणाद्वा ॥
शक्तिसंचालनात्प्राणमनःस्पन्दो निरुध्यते ॥३७॥

अर्थ : मनाच्या नाशाचे दोनच उपाय क्रमाने श्रेष्ठ सांगितले आहेत. एक ' योग ' व दुसरा ' ज्ञान '. योग म्हणजे मनोवृत्तीचा रोध आणि ज्ञान म्हणजे उत्तम प्रकारचे अवलोकन. चित्तवृत्तीनिरोधाने मनात उत्पन्न होणाऱ्या स्पंदनांचा लय होतो, आणि मनःस्पंदांच्या शांतीमुळे हा संसार नाहींसा होतो. शास्त्र आणि सज्जन यांच्या सान्निध्याने व वैराग्याच्या अभ्यासाने, तसेच आसनस्थितीच्या योगाने धैर्य, आणि निग्रहपूर्वक पूर्ववासनांचा क्षय करण्याने, सद्भक्तीने भगवद्ध्यान करण्याने, बराच वेळ एकांतात आनंद उपभोगण्याने, खेदरहित व आनंदी राहण्याने, परतत्त्वाचे चिंतन करण्याने, दीर्घप्रणवोच्चाराने, जिभेने घण्टिकाक्रमण केल्याने आणि शक्तीसंचालनाने प्राणमनांचे स्पंदन थांबते, निरोध होतो.

इतरत्र न कर्तव्या मनोवृत्तिर्मनीषिणा ॥
उक्ताभ्यासेन विज्ञेयं तद्विष्णोः परमं पदम् ॥३८॥
द्वादशाङ्गुलपर्यन्तं नासाग्रे विमलाम्बरे ॥
संविद्दृशि प्रशाम्यन्त्यां हृत्प्राणस्पन्दरोधनम् ॥३९॥
भ्रूमध्ये तारकालोकनाशादन्त उपागते ॥
केतने चेतने बद्धे हृत्प्राणस्पन्दरोधनम् ॥४०॥

ओमित्येव यदुन्दूतं ज्ञानज्ञेयात्मकं शिवम् ॥
विभावयेन्निर्विकल्पस्तेन प्राणो निरुध्यते ॥४१॥

अर्थ : बुद्धीवान् व अभ्यासू साधकाने इतरत्र मनोवृत्ती जाऊ देऊ नये. वर सांगितलेल्या अभ्यासाने श्रीविष्णूचे परमपद जाणून घ्यावे. नासाग्राचे ठिकाणी बारा अंगुळेपर्यंत शुद्धाकाशामध्ये ज्ञानदृष्टि प्रशमपावती झाल्यानंतर मन आणि प्राण यांचे स्पंदन बंद होते. भ्रूमध्यभागी तारकालोकनामुळे अशांतपणा आल्यावर, तेथेच चेतनाला म्हणजे प्राणाला बद्ध केले असता हृदय व प्राण यांच्या स्पंदांचे रोधन होते. ज्ञानज्ञेयात्मक परम शिव जे ओम् त्याची निर्विकल्पतेने भावना करावी, त्यामुळे प्राणरोध होतो.

चिरकालं धियैकान्तं व्योमसंवेदनाद्दृढम् ॥
निर्वासनमनोधृत्या सुखात्प्राणो निरुध्यते ॥४२॥
इत्यथर्वोदितो योगः संक्षेपेणात्र दर्शितः ॥
विशेषाभ्यासापेक्षायां मूले सम्यग्विलोक्यताम् ॥४३॥
लीनः सपञ्चविपलद्विपलं ब्रह्मरन्ध्रगः ॥
प्राणः प्राणायाम एष वर्धमानस्ततः परः ॥४४॥
प्रत्याहारःपलैः पञ्चविंश्यत्यानिन्द्रियार्थवित् ॥
धारणा पञ्चनाडीभिर्ध्यानं षष्टिघटीमितम् ॥४५॥

अर्थ : बुद्धीसामर्थ्याने चिरकाल व्योमसंवेदना दृढ करावी, मन निर्वासन करावे, आणि धीर धरून प्राणायाम केल्याने सुखाने प्राणनिरोधन होते. हा अथर्व ऋषींनी सांगितलेला योगाभ्यास येथे संक्षेपाने कथन केला आहे. ज्यांना विशेष अभ्यास करावयाचा आहे त्यांनी तो मूळ योगशास्त्राचे ठिकाणी पहावा. या अभ्यासाने प्राण दोन पळे व पांच विपळे ब्रह्मरंध्राचे ठिकाणी लीन होतो. हाच प्राणायाम. तो वाढवावा. हा प्राणायाम पंचवीस पळे झाला म्हणजे प्रत्याहार होतो. त्यावेळी योगी इंद्रियविषय जाणत नाही. पञ्चनाड्यांनी धारणा होते. आणि ध्यान साठ घटीकालावधि असते.

समाधिर्द्वादशदिनसाध्यः परमदुर्लभः ॥
वासनाजालहा धर्ममेघः सर्वकृतान्तकृत् ॥४६॥
यमेन दशधा नूनं दशधा नियमेन च ॥
आसनाद्येन षट्केन योगोऽष्टाङ्गोऽ यमुच्यते ॥४७॥
एतेनाष्टाङ्गयोगेन मनोनाशेन योगिराट् ॥
वासना तानवेनाशु तत्त्वज्ञानेन मुच्यते ॥४८॥
योगो हृद्वृत्तिरोधो हीत्युक्तमत्र महर्षिणा ॥
पातञ्जलाभिधो योगः सुखस्तेनात्र सूचितः ॥४९॥
स हृद्वृत्तिनिरोधाख्यः सुखोपि बहुसंमतः ॥
प्रसंगेनेह संक्षेपाज्ज्ञानसिद्ध्यर्थमुच्यते ॥५०॥

अर्थ : बारा दिवसांनी दुर्लभ अशी समाधि साध्य होते. तिच्यायोगे वासनाजाल नाश पावते, योगवेत्ते अशा समाधिलाच धर्ममेघ म्हणतात, कारण तो मेघ हजारो अमृतधारांचा वर्षाव करतो. त्यामुळे सर्व पापपुण्यसंचयाचा नाश होतो दहा प्रकारचा यम, दहा प्रकारचा नियम, आणि आसनादि सहांमुळे हा अष्टांगयोग झाला आहे. ह्या अष्टांगयोगाच्या अभ्यासाने, मनोनाशाने, वासनांच्या क्षयाने आणि तत्त्वमसिच्या ज्ञानाने योग्याचा तात्काळ मोक्ष होतो. हृद्वृत्ति निरोध म्हणजे योग असे महर्षींनी म्हटले आहे. पातञ्जली ऋषींनी सांगितलेला पातञ्जल योग हा सर्वांत सुखाचा, तो येथे सूचित केला आहे. तो हृद्वृत्तिनिरोध नांवाचा योग, सुखाचा, बहुमान्य असा ज्ञानसिद्धींसाठी येथे संक्षेपाने प्रसंगानुसार कथन केला आहे.

इति श्रीमद्दत्तात्रेयपुराणे त्रिकाण्डमण्डितायां संहितायां वासुदेव्यां प्रथमाष्टके ज्ञानकाण्डेऽष्टमोध्यायः ॥

॥ इति श्रीदत्तपुराणे प्रथमाष्टकः समाप्त ॥

श्री दत्तपुराण

अष्टक २ –

अध्याय १

ॐ प्रवरेतरहृद्वृत्तिनिरोधो योग उच्यते ।
संप्रज्ञातेतरौ योगौ धर्मौ चित्तस्य पञ्च च ॥१॥

अर्थ : यानंतर अष्टक (२) अध्याय (१) पासून योगशास्त्राचे विवरण करतात. (स्थिरेंद्रिय धारणा) यालाच योग समजतात. इंद्रियांची (स्थिर) धारणा योगानेच होते. म्हणून योगशास्त्राचें (श्रवण) (मनन) (अभ्यास) करावा. असे (श्वेताश्वतर) उपनिषदांत म्हटले आहे. या अध्यायात (५५) श्लोकांनी योगाचे वर्णन केले आहे. (प्रवर) म्हणजे क्षांती, वैराग्य इ. श्रेष्ठवृत्ति सोडून ह्याखेरीज इतर कनिष्ठ वृत्ति, त्याचा निरोध करणे यालाच (योग) असे समजतात. (संप्रज्ञात) आणि (असंप्रज्ञात) असे योगाचे दोन प्रकार आहेत. प्रथमतः (दोन) चित्तधर्म आणि (पांच) (चित्तभूमिका) म्हणजेच मनाच्या पांच अवस्था, समजावून घेतल्या पाहिजेत.

भुवो मूढक्षिप्तविक्षिप्तैकाग्रयविनिरुद्धकाः ।
तिस्रो बन्धाय मुक्त्यै द्वे योगिनामीशसेविनाम् ॥२॥

अर्थ : (योगार्थ) योगसाधनाकरता चित्ताच्या भूमिका सांगतात (१) (मूढा) निद्रालस्य प्रमादमयी, (आसुरी), (२) (क्षिप्ता) विषयेंद्रिय-जन्य सुखवती, (दैवी) , (३) (विक्षिप्ता) एखादे वेळी वैराग्यादि उपरति होणे, किंवा एखादे वेळी विषयासक्त असणे, यासच (विक्षिप्त) भूमिका म्हणावे. (४) (ऐकाग्रय) चिदात्मरुपवृत्ति सदैव असणे, अर्थात् इतर वृत्ति नसणे. (५) (विनिरुद्धा) सर्व वृत्तिशून्यता, म्हणजे कोणत्याच प्रकारची वृत्ति नसणे. (१) मूढा, (२) क्षिप्ता, (३) विक्षिप्ता, (४) एकाग्रय, (५) विनिरुद्धक या पाचांपैकी पहिल्या तीन ई॰ सेवक योग्यांना बंधनकारक होतात. आणि उरलेल्या दोन मोक्षकारक होतात. थोडक्यात तात्पर्य– पहिल्या दोन अवस्थेत योगाभ्यास वाहींच होणार नाही, यात शंका नाही. अवस्था (३) मध्ये अंतर्मुख

(योगी) कदाचित (मुक्त) होतील व बर्हिमुख (योगी) होणार नाहीत. (४) व (५) मध्ये (यम), (नियम), (प्रणवजन), (प्रत्यकदृष्टी) यांच्या योगाने ईश्वरसेवानिष्ठांना निर्विघ्नपणे मोक्ष मिळतो.

शान्तोग्रमूढवृत्त्यूने चित्ते नित्यैकरुपिणः ॥
स्वरुपेऽवस्थितिर्द्रष्टुर्वृत्तिसारुप्यमन्यतः ॥३॥

क्लिष्टाक्लिष्टभिदा पञ्च वृत्तयोऽत्र प्रमाणकाः ॥
वेदानुमानप्रत्यक्षरुपाद्याथ विपर्ययः ॥४॥

मिथ्याज्ञानमतद्रूपप्रातिष्ठं क्लेशयुक्तथा ॥
शब्दज्ञानानुपाती तु वस्तुशून्यो विकल्पकः ॥५॥

अभावप्रत्ययालम्बा निद्रा सा तु तमोमयी ॥
अनुभूताऽसंप्रमोषः स्मृतिस्तासां निरोधनम् ॥६॥

वैराग्याभ्यासतस्तत्र विरजोवृत्तिहृत्स्थितौ ॥
यमाद्यनुष्ठानरुपो यत्नोऽभ्यासश्चिरं स तु ॥७॥

अर्थ : (वैराग्य, क्षांती, औदार्य वगैरे शांतवृत्ति,) (काम, क्रोध, लोभ यत्न, वगैरे उग्रवृत्ति) (आलस्य, भ्राति, तंद्रा वगैरे मूढवृत्ति) ह्या आणि इतर सत्वादि वृत्तिशून्य अशा प्रकारचे व सद्रूप असे चित्त ज्या स्वरुपाचें असतें त्यांसच स्वरुपाव स्थिति मिळते. अन्यत्र वृत्ति असणाऱ्याना मिळणार नाहीं. क्लिष्टाक्लिष्ट भेदाने वृत्तिंचे प्रकार पांच आहेत. [१] शब्द, अनुमान, प्रत्यक्ष प्रमाणरुपावृत्ति, [२] रज्जुसर्पाप्रमाणे मिथ्याज्ञानरुप क्लेशदायक वृत्ति, [३] शशशृंगाप्रमाणे वस्तुशून्या, [४] अभावप्रत्ययालंबनरुपा तमा प्रचुरा, [५] अनुभूत विषया, अस्तेयरुपास्मृतिः या पांच वृत्तींचे निरोधन करणे, म्हणजेच (योग) समजावा. हे निरोधन वैराग्याभासाने होते. रजोगुणवृत्ति आणि तामसवृत्ति यांनी विरहित चित्त असणे यालाच (वैराग्य) असें म्हणतात. यमादि अष्टांग योगाचा प्रयत्न सतत करणे, यालाच (अभ्यास) असे म्हणतात.

सत्कारसेवितो नित्यं दृढः स्याच्चापराजितः ॥
सत्कारांः स्युर्ब्रम्हचर्य श्रद्धाविद्यातपोमुखाः ॥८॥
यतमानं ह्रन्मलान्तो गतैष्यमलनिश्चयः ॥
व्यतिरेको हृदि लयोत्कण्ठैकेन्द्रियसंज्ञकम् ॥९॥
वशीकारो दृष्टादृष्टार्थवैतृष्यं चतुर्विधम् ॥
वैराग्यमाद्यं पुंज्ञप्तेर्गुणवैतृष्यमुत्तमम् ॥१०॥
स्थूलस्यैकाग्रयं वितर्को विचारोऽल्पस्य चिन्तनम् ॥
आनन्दः स्थूलविषयी सत्वप्रत्यक्षविन्मतेः ॥११॥

अर्थ : आता अभ्यासाचा विस्तार व विचार सांगतात. सत्कारांचे नित्य सेवन केले असतां, विघ्नादिकाकडून पराजय न होता दृढाभ्यास होतो. सत्कार म्हणजे काय ? त्याची व्याख्या, (ब्रह्मचर्य) म्हणजे अष्टांग मैथुन वर्ज्य करणे, (श्रद्धा) आस्तिक्य बुद्धी, (विद्या) औपनिषज्ञान, (तप) कृच्छ्रादिकांचे अवलोकन करणें, यांनाच सत्कार असे म्हणतात. यानंतर वराग्याचा दुसरा प्रकार सांगतात. ते वैराग्य दोन प्रकारचे आहे. पैकी प्रकार एक मध्ये चार भेद आहेत. त्यापैकी [१] रागद्वेषादि चित्तमलाचा नाश करणे [२] गतैष्यमलाची निश्चयात्मक अवधारणा करणे, म्हणजेच व्यतिरेक समजावा, [३] हृदयात लयाची उत्कंठा असणे, [४] ऐहिकामुष्मिक विषयाची इच्छा नसणे, वैराग्यांतर्गत प्रकार दोन सांगतात. वितर्कादिकांनी अनुगृहीत पुरुषाचे ज्ञप्तिगुणाविषयी निरपेक्ष रहाणे. याला उत्तम वैराग्य म्हणावे. स्थूलाचे ऐकाग्र्य संपादणे, याला वितर्क म्हणतात. आत्म्याचे चिंतन करणे, याला विचार म्हणतात, स्थूलविषयी सत्वाचे प्रत्यक्ष विज्ञान होणे याला आनंद म्हणतात.

पुंस्त्वैक्यादास्मितायोगात्साक्षात्तद्‌ध्यानजं त्विति ॥
परिपक्वास्त्रिपुट्यैते संप्रज्ञातस्तदन्वयात् ॥१२॥
वृत्यभावे विरामस्तत्प्रत्ययो विरतिः पर ॥
तदभ्यासादिः संस्कारविशेषः सात्विकोऽपरः ॥१३॥

अयं विदेहप्रकृतिलयानां भवहेतुकः ॥
गोभूताहंकृतिमहत्प्रकृत्यात्मात्माचिन्तकः ॥१४॥
मन्वन्तराणां दशकमारभ्यात्र विलीयते ॥
दशोत्तरे गुणं नैति लीनो यो निर्गुणे पुनः ॥१५॥

अर्थ : बुद्धी आणि पुरुष या दोघांच्या ऐक्याने निर्माण झालेला जो योग त्यांच्या ध्यानापासून उत्पन्न झालेला (अस्मितनामक) योग समजावा. त्यामुळें हे वितर्कादि, जर परिपक्व झालें तर त्रिपुटीशी त्यांचा अन्वय होऊन (संयोज्ञान सिद्धि होते) वृत्यभाव झाल्यानंतर विराम प्रत्ययाभ्यास होतो. त्यासच (असंप्रज्ञात संस्कार) समजतात. त्याच्या अभ्यासाने जो (अन्य– सात्विक संसार विशेष) निर्माण होतो, तोच (विदेह प्रकृतिलयानें) पुनर्जन्माला कारण होतो. म्हणजे इंद्रियादिकांच्या चिंतनानें मन्वंतर दशका– पासून उत्तरोत्तर दशगुण, इंद्रियादि मध्ये लीन होतात. असे झालें तर मग (पुनर्जन्म होणार नाही) अशी मुक्ति कशी होईल ? अशी शंका घेऊन निराकरण करतात. जो (गो) म्हणजे इंद्रिये, अहंकार, महत्, प्रकृति, विरहित केवळ निर्गुण आत्मचिन्तन करतो. त्याचा पुनर्जन्म होत नाही.

श्रद्धायत्नक्रमध्यानसमाधिप्रज्ञकादिकः ॥
उपायप्रत्ययोऽसंप्रज्ञातोऽन्येषां तु योगिनाम् ॥१६॥
मृदुमध्याध्युपायास्ते नव तत्सिद्धयेऽपि च ॥
आसन्नस्तीव्रविरतेस्तारतम्यात्तथान्यतः ॥१७॥
ईश्वरप्रणिधानाद्वा पुंविशेषः स ईश्वरः ॥
अविद्यादिक्लेशकर्मफलाशयविवर्जितः ॥१८॥
सर्वज्ञबीजं निःशेषमनवच्छिन्नसद्‌गुरौ ॥
प्रणवस्तद्वाचकस्तज्जपस्तदर्थस्य भावनम् ॥१९॥

अर्थ : जेथे श्रद्धा, ध्यान, (संप्रज्ञात) समाधि असतात तेथे इतर योग्यांना श्रद्धादि उपाय प्रत्यक्ष होतो. मृदु, मध्यादि असे ते उपाय नऊ आहेत. त्यांच्या सारासार अभ्यासानें नऊ सिध्दी देखील होतात. यानंतर

साधक तीव्रतर वैराग्याच्या जवळ पोचतो. वैराग्यानुरोधानें तारतम्य जाणावे. ईश्वर सान्निध्याने पुरुष विशेष, म्हणजेच (ईश्वर) समजावे. कृतकर्म ईश्वरार्पण करावे. त्यामुळे ईश्वर सानिध्य विशेष मिळेल. अविद्या, क्लेश, कर्मफलाशय, इत्यादि वर्जित, असाच पुरुषविशेष तोच ईश्वर संपूर्णपणे अपरिछिन्न अशा सद्गुरुंचे ठिकाणी सर्वज्ञबीजवाचक ओंकार असतो. त्याचा जप ईश्वर भावनेने करावा. यामुळे ईश्वर कोण ? या शंकेचे निरसन होईल.

ततः प्रत्यक्त्वचैतन्यज्ञानं विघ्नात्ययस्ततः ॥
व्याधिस्त्यानभ्रान्तिदृष्टिप्रमादालस्यसंशयाः ॥२०॥
भूम्यलाभमनोस्थैर्ये विरतिर्योगघातकाः ॥
तन्मूलाश्चित्तविक्षेपदौर्मनस्यव्यथादयः ॥२१॥
तन्नाश ईशभक्त्यैव सुख्यकिक्षेमिपापिषु ॥
मैत्रीदयाप्रीत्युपेक्षाभावनाध्दत्प्रसादनम् ॥२२॥
प्राणरेचनधृत्या वा प्रवृत्तिर्वाऽर्थवत्यपि ॥
यद्यशोका वा हृत्पद्मे ज्योतिष्मत्यथवा हृदि ॥२३॥
वीतरागिस्थिते निद्रास्वप्नज्ञानावलम्बिते ॥
बाढं ध्यायत्यभीष्टं वा स्थूलाद्यण्वन्तवस्तु वा ॥२४॥

अर्थ : त्यानंतर (प्रत्यग्रूप) जे चैतन्य, त्यांचें विज्ञान होईल. त्यामुळे विघ्नांचा नाश होतो. ती विघ्ने कोणती ? ते सांगतात [१] व्याधि, [२] स्त्यान, [३] भ्रांति, [४] दृष्टिप्रमाद, [५] आलस्य आणि [६] संशय. हे योग घातक आहेत. आणि त्यांच्यामुळेच चित्तविक्षेप, दौर्मनस्य, व्यथा होतात. ईश्वर भक्तीनेच त्यांचा नाश होतो. मन सुप्रसन्न रहाण्याकरता पुढील गोष्टी आवश्यक आहेत. [१] सुखी माणसांशी मैत्री, [२] दुःखी माणसांवर दया, [३] क्षेमकारक माणसांवर प्रेम, [४] पापी माणसांची उपेक्षा, अशा भावनेने चित्ताची प्रसन्नता होते. तसेंच प्राणायाम, सगुणविषयक वृत्ति, धृति, अर्थवतीप्रवृत्ति, अशोका, ज्योतिष्मती इत्यादिकांनी म्हणजे विरक्त अशा प्रकारच्या चित्तामध्ये स्थापन केलेली अभीष्ट देवता मूर्ती तिचें ध्यान करावे, स्थूलापासून सुरवात

करून अणु वस्तुपर्यंत सर्वांचे ध्यान करावे, म्हणजे अनायासेन चित्ताची प्रसन्नता होत राहील. मात्र यावेळी निद्रास्वप्नसाक्षित्व ज्ञान मनांत असणे आवश्यक आहे.

मणिवद्ग्राह्यग्रहणग्रहीतृस्थाविवृत्तिहृत् ॥
या तदञ्जनता प्रोक्ता समापत्तिश्चतुर्विधा ॥२५॥
सवितर्कात्र शब्दार्थविद्विकल्पैर्विमिश्रिता ॥
स्मृतिशुद्धौ विरुपे वार्थैकभासापरानया ॥२६॥
सविचारान्या च सूक्ष्मार्थोक्तास्याः सूक्ष्मकार्थता ॥
आप्रधानं तु ता एव समाधिः स्यात्सबीजकः ॥२७॥
निरुहस्वास्थ्ये त्वध्यात्मप्रसादोऽत्र ऋतंभरा ॥
प्रज्ञा श्रुतानुमानान्यार्थशेषार्थत्वतो भृशम् ॥२८॥
संस्कारस्तद्भवो ह्यन्यबाधकस्तन्निरोधने ॥
सर्वप्रज्ञानिरोधाध्दि स्यान्निर्बीजः समाधिरुत् ॥२९॥

अर्थ : बिंबग्राही मण्याप्रमाणे ग्राह्य वस्तूचे ग्रहण करणारा, त्यांचे वृत्तिरहीत असे चित्त, त्यांस व्यापून रहाणाऱ्यास बीज समाधीचे आवरण प्रकार चार आहेत. [१] शब्दार्थज्ञान मिश्रिता, (सवितर्का), [२] स्मृति शुद्धास्थितींत अर्थपूर्ण विकल्पमिश्रित, म्हणजे स्वरुप शून्य अर्थमात्र भासमाना, [३] निर्वितर्का, विचारयुक्त सूक्ष्मविषया, [४] विचाररहीत म्हणजे सूक्ष्मार्थक, अलिंग पर्यवसान सूक्ष्मविषयकत्वं, अशा प्रकारच्या चार आवरण शक्ती अप्रधान सबीज समाधि आहेत. निर्विचारामुळे स्वास्थ्य संपन्नचित्तांत अध्यात्मप्रसाद होतो. ऋतंभराप्रज्ञा म्हणजे ब्रह्मैकाकारा, निर्बाधा, वृत्ति होते. श्रुत, अनुमान, अन्यार्थ, शेषार्थ, यामुळे अतिसंस्कार घडतात. त्यामुळे अन्यबाधकाचे निरोधन होते. नंतर सर्व प्रज्ञानिरोध झाल्याने नीर्बीज समाधि होऊ शकते.

क्रियातपोजपेशार्चाः सिध्दयै क्लेशहराश्च ते ॥
पञ्चाविद्यास्मिता राग द्वेषश्चाभिनिवेशकः ॥३०॥

आद्यान्यहेतुर्विच्छिन्नसुप्तोदारकृशाः परे ॥
अनित्याशुचिदुःखानात्मस्वविद्यान्यभावना ॥३१॥
यद्दृग्दर्शनशक्त्योस्तु तादात्म्यमिव साऽस्मिता ॥
स्यात्सुखानुयशी रागो द्वेषो दुःखानुशय्यथ ॥३२॥
स्वारस्यवाही ज्ञस्यापि तथारूढस्तु पश्चिमः ॥
प्रतिप्रसवहेयास्ते सूक्ष्मास्तद्वृत्तयः पुनः ॥३३॥
ध्यानहेया मलसमाः क्लेशमूलः क्रियाशयः ॥
स्वदृष्टादृष्टजननवेदनीयो यथायथम् ॥३४॥

अर्थ : समाधि सिद्ध होण्यासाठी क्रिया, तप, जप व परमेश्वराची पूजा त्या गोष्टी नेमलेल्या आहेत. त्या क्लेशहरण करणाऱ्याही आहेत. अहंकार, प्रेम द्वेष व अभिमान आदि पांच अविद्या आहेत. अस्मिता वगैरे त्याज्य असून त्या कधी सुप्त, प्रकट तर कधी क्षीण असतात. अनित्य आणि अपवित्र अशा ठिकाणी नित्यत्वाची भावना ठेवणे ही अविद्या होय. दृग् आणि दर्शनशक्ति यांविषयीं तादात्म्य असणे यांस अस्मिता म्हणतात. ज्यापासून सुख होते याविषयी प्रेम व दुःख होते त्याविषयी द्वेष वाटतो. बुद्धिवंतालासुद्धा संस्कार–जन्यत्वाने त्रासणारा अभिमान हा पांचवा क्लेश आहे. प्रतिलोमपरिणामामुळे ते सर्व त्याज्यच आहेत कारण त्यांच्या वृत्ति सूक्ष्म आहेत. पुनः ते मळाप्रमाणे त्याज्य आहेत. त्यासंबंधाने होणाऱ्या क्रिया नेहमीच क्लेशमूल असतात. ऐहिक व पूर्वजन्माच्या योगे धर्माधर्मादि क्लेश समजावून घ्यावेत.

सति मूले तद्विपाको जात्यायुर्भोगजोऽत्र सः ॥
पुण्यापुण्यनिदानत्वाद्धर्षतापफलः स्मृतः ॥३५॥
परिणामतापसंस्कृतिदुःखैर्गुणदोषवैराच्च ॥
सर्वं विवेकिनामकमेव हि हेयं त्वनागतं दुःखम् ॥३६॥
द्रष्टृवदृश्योर्हेयहेतुः संयोगो दृश्यमत्र तु ॥
क्रियाप्रकाशसंबन्धशीलं भूतेन्द्रियात्मकम् ॥३७॥

क्रमाद्भोगापवर्गार्थं गुणपर्वचतुष्टयम् ॥
विशेषसामान्यलिङ्गमात्रालिङ्गानि चेति हि ॥३८॥

अर्थ : अविद्या आणि तदुत्पन्न रागद्वेषादि विकार यांचे मूळ कायम राहिलें असलें तर त्याचा परिणाम म्हणून जाती, आयुष्य व भोगरुपी फल भोगावेच लागते. पुण्य व पाप यामुळे अनुक्रमे हर्ष व ताप हीं फले प्राप्त होतात. परिणाम ताप दुःखांनी व गुणवृत्तिविरोधामुळें विवेकी माणसास सुद्धा विषयसुख हे दुःखरुप वाटते. द्रष्टा आणि दृश्य यांचे त्याज्य असे कारण म्हणजे संयोग. दृश्य हे क्रियाप्रकाशसंबंधशील व भूतेन्द्रियात्मक आहे. क्रमाने भोगाचा अपवर्ग होण्यासाठी गुणपर्वचतुष्टय म्हणजे शब्दादि पञ्चतन्मात्रा, सत्वादि सामान्यावस्था, आकाशादि विशेषावस्था, महत्तत्वादि लिङ्गमात्रावस्था आणि लिङ्गमात्रा हे आहेत.

द्रष्टा चिन्मात्रः शुद्धोपि प्रत्ययेनानुपश्यवत् ॥
दृश्यं तु द्रष्टृभोगार्थं कृतार्थस्याप्यदृश्यकम् ॥३९॥
दृश्यं तदन्यसामान्यात्तत्प्रत्येकेमृतं स्वतः ॥
संयोगः स्वस्वामिशक्तिस्वरुपप्राप्तिहेतुकः ॥४०॥
अविद्या संयोगहेतुस्तदभावे न संयुजिः ॥
ततो मुक्तदृशेर्मोक्ष उपचारोऽयमात्मनि ॥४१॥
हानोपायोऽविप्लवा या विवेकख्यातिरुत्तमा ॥
योगिनस्तस्य तु प्रज्ञा सप्तधा प्रान्तभूमिका ॥४२॥

अर्थ : द्रष्टा पुरुष चिन्मात्र, शुद्ध असून सुद्धां बुद्धिवृत्तिनुसार जपा–कुसुमसन्निध असणाऱ्या स्फटिक मण्याप्रमाणे केवळ द्रव्यप्रतिबिंबी अनुदर्शक असतो. खरें पाहिले असतां तो अलिप्तच असतो. कर्तृत्वाभिमान वासनेमुळे परिच्छिन्न द्रष्टृ भोगाकरताच हे सर्व दृश्य जगत् आहे. खरे आहे परंतु अभ्यासादिकांनी कृतार्थ झालेल्यांना जगदाभास अदृश्य (विफल) असाच वाटतो. म्हणून पुरुष अलिप्त असतो. असा अनुभव ज्यांना आला तेच मुक्त होतात. जगताचे भासमान दृश्य स्वरुप अतार्थत आहे असे जाणून काही

योगाभ्यासी अमृतत्वाप्रत जातात. भोक्तृभोग्यसंयोग पुरुष हा भोक्ता आहे, प्रधान हे भोग्य आहे, अशा प्रकारच्या विचारपरंपरेने आत्मस्वामी, त्याची शक्ति, त्याचे स्वरुप इत्यादींची प्राप्ती होते. हा विचारच मुक्तीचे कारण आहे. पुरुष व प्रधान यांच्या संयोगास मूळ कारण अविद्या आहे. अविद्या सोडून दिल्यास पुरुषप्रधान संयोग घडत नाही. संयोग न झाल्याने मोक्ष होतो. मोक्ष हा नित्य असल्याने मोक्षदृष्टीचा आत्मान्वय औपचारिक आहे. व्यावहारिक भाषा द्वैतप्रचुर असते. अविप्लवा, अविच्छिन्ना अशी जी विवेकख्याति आहे तीच अविद्यानाशक आहे. तशा प्रकारच्या अभ्यासशील योग्यांच्या सात भूमिका आहेत. पैकी पहिल्या तीन कार्यविमुक्तीकारक व उरलेल्या चार चित्तविमुक्तीकारक आहेत.

अविवेकाज्ज्ञानदीप्तिर्योगाङगैरशुचिक्षये ॥
यमा अहिंसासद्ब्रह्मचर्यास्तेयापरिग्रहाः ॥४३॥
ते देशकालसमयजात्यच्छिन्ना महाव्रताः ॥
लोभक्रुण्मोहजास्ते तु कृतानुमतमोदिताः ॥४४॥
दुःखज्ञानानन्तफला मृदुमध्यादिमात्रकाः ॥
नियमाः शौचसंतोषदेवभक्तितपांसि तु ॥४५॥
वितर्कभावने चिन्त्यं प्रतिपक्षविभावनम् ॥
स्वाग्रेऽवैरं त्वहिंसायां सत्ये सिद्धे फलागमः ॥४६

अर्थ : योगभूमीचा विचार योगवासिष्ठांत सविस्तर सांगितलेला आहे. यमादि योगांगांनी अशुचिक्षय झाल्यानंतर विवेक होताक्षणीच ज्ञानदीप प्रकाशित होतो. यम पांच आहेत, (१) अहिंसा, (२) सत्य, (३) ब्रह्मचर्य (४) अस्तेय आणि (५) अपरिग्रह. ते देश, काल समय व जाति यांनी छिन्न आहेत. गाईची हिंसा केली तर ती हिंसा होतें, बोकड यांना मारले तर ती हिंसा नाही, असे मानणे ही जात्यवच्छिन्न हिंसा, तीर्थाचे ठिकाणी हिंसा करू नये, इतर ठिकाणी केल्यास चालते, यास देशावच्छिन्न हिंसा, असे हिंसेंचे बाबतीत भेद आहेत. अहिंसादि व्रते देशकालजाति यांनी अनवच्छिन्न अशी केली म्हणजे महाव्रते होतात. दुःखज्ञानानंत फल देणारे मृदु, मध्य, अधि–

मात्रकस्वरूप असें पांच नियम आहेत. ते असे– (१) शौच, (२) संतोष, (३) देवभक्ति, (४) तप, (५) अंतःशौच. हिंसादि भावनेविषयी प्रतिपक्ष विभावन म्हणजे अहिंसास्वरूप विचारात घ्यावे. अहिंसापालनाने शाश्वतिक वैरही नाश पावते. सत्य सिद्ध झाले असतां क्रियाफल प्राप्त होते.

वीर्यं वर्णित्वेऽस्तेयेऽर्थागमोऽन्त्ये जन्मवेदनम् ॥
शौचात्स्वाङ्गजुगुप्सान्यासंसर्गस्त्वान्तरालघु ॥४७॥
सौमनस्येन्द्रियजयहृत्स्थैर्यात्मदृगर्हता ॥
संतोषाद्वरसौख्याप्तिस्तपसोऽङ्गाङ्गिसिद्धिरुत् ॥४८॥
स्वाध्यायादिष्टदेवाप्तिः समाधिर्देवभक्तितः ॥
आस्यास्थिरसुखं यत्नविरामाच्छेषचिन्तया ॥४९॥
द्वन्द्वाभावस्ततोऽथास्वायामो वायुगतिक्षतिः ॥
रेचकैः पूरकैः कुम्भैर्देशकालप्रमाणतः ॥५०॥

अर्थ : ब्रह्मचर्य पालनानें वीर्यलाभ, अस्तेयानें सर्व धनलाभ, अपरिग्रह-स्थैर्यानें जन्मकारणाचा बोध, बाह्यशौचामुळे स्वदेहाचा वीट येंणे, व दुसऱ्यांशी संसर्ग करण्याविषयी अनिच्छा, आंतरशौचामुळे त्वरीत सौमनस्यप्राप्ति व इंद्रियजय हृत्स्थैर्य व आत्मदर्शनयोग्यता मिळते. संतोषामुळे उत्तम सुखलाभ होतो. तपःसिद्धीमुळे शरीरेंद्रियसिद्धि प्राप्त होते. स्वाध्यायामुळें इष्टदेवताप्राप्ति आणि ईश्वरभक्तीनें समाधिस्थिती प्राप्त होते. यत्न विरामानंतर शेषध्यानाने आसनस्थैर्या-नुसार जे चिरसुख मिळते, त्यास आसन म्हणतात. आसनस्थिरतेच्या योगानें सुखदुःखादि द्वंद्वांचे आघात देहावर होत नाहीत. त्यानंतर वायुगतिक्षय होतो. रेचक पूरक कुंभकात्मक प्राणायाम होतो.

दीर्घः परिवृढः सूक्ष्मस्त्रय एते चतुर्थकः ॥
बाह्यान्तर्विषयाक्षेपी ततः सत्त्वावृतिक्षतिः ॥५१॥
ततो हृद्धारणायोग्यं चित्तवृत्तानुकारवत् ॥
प्रत्याहारस्वार्थायोगे तत इन्द्रियवश्यता ॥५२॥

नाभ्यादिदेशे हृत्स्थैर्यं धारणाभीष्टचिन्तया ॥
प्रत्ययैकाग्रता तत्र ध्यानं ज्ञेयं तदेव तु ॥५३॥
रूपशून्यमिवार्थैकभासमङ्गसमाधिकः ॥
संयमस्त्रयमेकत्र प्रज्ञालोकस्तु तज्जयात् ॥५४॥
विनियोगस्तस्य भूमिष्वन्तरङ्गमिदं त्रयम् ॥
बहिरङ्गं त्वबीजस्य सिद्धिदः क्लेशहृत्स च ॥५५॥

अर्थ : दीर्घ, परिदृढ, सूक्ष्म आणि बाह्यान्तर्विषयाक्षेपक अशा चार प्रका-रच्या प्राणरोधन प्रकारांनी सत्वावरणाचा क्षय होतो. त्यानंतर हृदय धारणाक्षम होते. स्वविषयांच्या विरहाचे बाबतीत इन्द्रियवश्यता असणें यास प्रत्याहार म्हणतात. नाभ्यादि प्रदेशांत मन स्थिर करून अभीष्ट देवतेचे चिंतन करणे यास धारणा म्हणतात, व अशी धारणा एकाग्रतेने रहाणे यासच ध्यान म्हणतात. तेच ज्ञेय होय. अंगसमाधि हे योगाचे आठवे अंग आहे. ते रूपशून्य व अर्थैकभास आहे. धारणामय म्हणजेच संयम. येथे प्रज्ञालोक म्हणजेच त्याचा जय, यमादि चतुष्ट्य निर्बीज समाधीचे अंतरंग आहे. यमादि चतुष्ट्य निर्बी-जाचे बहिरंग त्याहे आणि संयम अंतरंग आहे. तो निर्बीज आहे.

इति श्रीदत्तपुराणे योगप्रकरणं नाम द्वितीयाष्टके प्रथमोऽध्यायः ॥

योग फलक्रममुक्त्यादिकथनं नाम द्वितीयाष्टके द्वितीयोऽध्यायः ॥

सुषुम्णाज्ञो नरः स्त्री वा युवा बालो जरन्नपि ॥
योगाभ्यासेऽधिकारी स्यादभ्यासात्सिद्धिभागपि ॥१॥
सर्वेऽप्याश्रमिणो वर्णा योगाभ्यासेऽधिकारिणः ॥
भिक्षुर्विशेषान्नियतं ब्रह्मचर्यादि तस्य यत् ॥२॥
यतेर्यस्योदरे भिक्षोर्योगाभ्यासेन जीर्यते ॥
गृहिणा दत्तमन्नं स तं तारयति नेतरः ॥३॥

योगी यस्य गृहे भिक्षुर्याति धन्यस्तदाश्रमः ॥
स भिक्षुर्यद्गृहे भुंक्ते तत्र भुंक्ते हरिः स्वयम् ॥४॥
यतः पराङ्मुखो भिक्षुस्ततो देवाः पराङ्मुखाः ॥
तस्माद्देयं किमप्यस्मै देवर्षिपितृतृप्तिदम् ॥५॥
यतयेऽन्नं ग्रासमात्रमाद्यन्तजलदानयुक् ॥
दत्तं चेन्मेरुजलधितुल्यं तदिति हि स्मृतम् ॥६॥

अर्थ : सुषुम्णाज्ञाता, मग तो पुरुष, स्त्री, तरुण, बाल व वृद्ध असो, योगाभ्यासाचा अधिकारी आहे. तो अभ्यासाने सिध्दीसुध्दा प्राप्त करून घेतो. सर्व आश्रमाच्या व वर्णाच्या व्यक्ति योगाभ्यासास अधिकारी आहेत. ब्रह्मचर्यादि नियमांचे ज्यानें पालन केले आहे असा भिक्षु विशेषेकरून योगाभ्यासास योग्य असतो. अशा यतिभिक्षुच्या उदरांत ज्या गृहस्थाने दिलेले अन्न योगा-भ्यासाचे योगे पचन होते. त्या गृहस्थास तो योगी तारतो अन्य कोणी तारत नाही. योगाभ्यास करणारा भिक्षु ज्याच्या घरी जातो त्याचा गृहस्थाश्रम धन्य होय. तो भिक्षु ज्याचे घरी भोजन करतो त्याचे घरी साक्षात् विष्णु भोजन करतो. ज्याच्या घरापासून विन्मुख होऊन भिक्षु जातो त्याचेपासून देवही पराङ्मुख होतात. तेव्हा पितर व देव यांना तृप्ति देणारे अन्न कोणास तरी द्यावे. एक घासभर अन्न, त्या अन्नदानाचे पूर्वी व नंतर जलदानाने युक्त असे यतीला दिल्यास, मेरु पर्वताएवढे अन्नदान व सागराएवढे जलदान केल्या-प्रमाणे फलप्रद आहे.

वासोऽन्नं च मितं देयं यतये सोऽधिकं यदि ॥
आदत्ते स्तेन एव स्यात्पापोऽन्नरसलोलुपः ॥७॥
धूर्तः शठो यतिर्भोगी शौचं ध्यानं विहाय यः ॥
व्रात्यवद्वर्तते सोऽज्ञो दुःखभागुभयत्र हि ॥८॥
संन्यासित्वं लोके सुदुर्लभं प्राप्य तद्योऽत्र ॥
तस्मात्प्रच्यवते चेद्याति चिरं दुर्गतिं स चान्यत्र ॥९॥

विशेषाद्यतिना तस्माद्योगाभ्यासेन चात्मनः ॥
प्राक्सिध्दरूपमाप्तव्यमधः पातोऽन्यथाऽस्य हि ॥१०॥

अर्थ : संन्याशास जरूर तेवढेच अन्न वस्त्र द्यावे. जर तो अधिक घेईल तर तो चोर, पापी आणि अन्नरसलोलुप समजावा. जो धूर्त, कपटी, व भोगी असा संन्यासी शौच व ध्यान सोडून व्रात्यपणे वागतो तो अज्ञ असतो. त्यास या लोकीं लोकनिंदा व परलोकीं यमदंड सोसावा लागतो. या लोकीं संन्यासित्व आधींच दुर्लभ आहे. असा दुर्लभ आश्रम मिळूनही जो त्यापासून भ्रष्ट होतो तो चिरकाल दुर्गतीस जातो. म्हणून विशेषेंकरून संन्याशाने योगाभ्यासाचे योगाने आपले स्वतः सिद्ध असे रूप प्राप्त करून घ्यावे. तसे न केल्यास अधःपातच होतो.

सत्योऽद्वैतोऽपि जीवोऽयमात्मांशोऽजोप्यविक्रियः ॥
अप्रमेयोऽव्ययोऽच्छेद्योऽदाह्योऽक्लेद्यो ह्यशोषकः ॥११॥

स्वात्मावबोधः स्वारामो ध्रुवोऽसंगोऽपि केवलः ॥
मलिनोऽभूदविद्यांशैर्मलच्छन्नसुवर्णवत् ॥१२॥

योगोज्ज्वालितविद्वन्हौ दग्ध्वाऽऽत्मानं स पूर्ववत् ॥
स्वरूपं शुद्धमाप्नोति हेमाग्नाविव लोहवत् ॥१३॥

आत्मास्मीत्युपगन्तव्यं न प्रतीकं यतो न सः ॥
कार्योत्कर्षादात्मदृष्टिः प्रतीकेऽङ्गे तु तन्मतिः ॥१४॥

इत्यात्माधिगमाभ्यासात्सर्वकर्म विदो बुधः ॥
आदेहपातमारब्धभोग एवाधिकारिणः ॥१५॥

अर्थ : आत्मा हा निर्बाध, द्वैतसम्बन्धशून्य, स्वयंप्रकाश, परोक्षरूप, जन्मादिविक्रियारहित, शब्दातिरिक्त प्रमाणागम्य, ज्याचे कार्य कर्दलीफलाप्रमाणे स्वनाशक नसतें असा, अमूर्तत्वामुळे अच्छेद्य, अदाह्य, न भिजणारा आणि न वाळणारा आहे अशा आत्म्याचा अंश हे जीवाचे स्वरूप आहे. स्वतःचे ठिकाणी ज्याला बोध आहे, जो स्वतःचेच ठिकाणी क्रिडा करतो, जो शाश्वत

व असंङ्ग आहे, तो सर्व संबन्धशून्य असूनही कामादि अविद्येच्या योगे मलिन झालेल्या सुवर्णाप्रमाणे झाला. ध्यानयोगाने ज्ञानरूपी अग्नि चेतवून त्यांत त्यास शुद्ध केले म्हणजे हिण नाहीसे झालेल्या सोन्याप्रमाणे तो शुद्धस्वरूपवत् होतो. मी आत्मा आहे असा बोध करवून घ्यावा. प्रतीकांची उपासना करू नये. कारण तो त्यामुळे लब्ध होत नाही. तथापि सूर्यादि प्रतीकांवर ब्रह्मदृष्टी ठेऊन उपासना करण्यास हरकत नाही. याप्रमाणे आत्मरूपाधिगम लाभ श्रवणादि अभ्यासाने होतो. पुण्यपापक्षय होतो. देहपातापर्यंत प्रारब्धभोग घ्यावाच लागतो. इंद्रादिकांचाही अधिकार प्रारब्धाप्रमाणेच चालतो.

चित्ते गोवृत्तिविलयस्तस्य प्राणेऽस्य चात्मनि ॥
विद्याप्रकाशितहृदा स यात्याद्यं सुषुम्णया ॥१६॥

न शुक्लगत्यपेक्षाऽस्य विदो रश्म्यनुसारिणः ॥
नेदं लभ्यं संसरतोऽज्ञस्य कर्मानुयायिनः ॥१७॥

कृतिनो यान्त्यर्चिराद्यैरस्वतन्त्राः परे त्वधः ॥
तद्भ्रमो मायिके पादे दत्तलोके विदो गतिः ॥१८॥

पूर्वसिद्धं चिदानन्दैकरसं भूम निष्कलम् ॥
स्वरुपं ज्ञानयोगेन गतो नावर्तते पुनः ॥१९॥

अर्थ : साधकाने चित्तामध्ये इंद्रियवृत्तींचा विलय करावा, चित्ताचा प्राणामध्ये करावा व प्राणाचा लय आत्मस्वरूपात करावा. नंतर विद्यासामर्थ्याने प्रकाशित झालेल्या हृदयाने तो सुषुम्णेचा मार्ग धरून तो, सर्वकारणाचें कारण ज्याला म्हणतात अशा दत्तलोक नावाच्या ब्रह्माप्रत पोचतो. अशा विद्वान पुरुषास मरणकाली शुक्ल आदि कालाची अपेक्षा नसते. परंतु ज्यांना ब्रह्मज्ञान नाही, इष्टानिष्ट कर्माप्रमाणें ज्यांना गति मिळते, अशा संसारी जीवांना मात्र दत्तलोकनामक ब्रह्मरूप मिळत नाहीं. समुच्चयोपासक अर्चिरादिकांनी क्रममुक्त्यर्थ ब्रह्मलोकास जातात. कर्माचरणी लोक ब्रह्मलोकाचें खाली व त्याचेही खाली नरकलोकात पापी व पशुपक्षादि तिर्यग्योनि जातात. कर्मपरतन्त्रांना पुनः पुनः जन्ममरणरूपी भ्रम होता. मुक्ती मिळत नाही. विद्वान लोक दत्तलोकाप्रत

जातात. पूर्वसिद्ध, चिदानन्दैकरस, अपरिच्छिन्न, षोडशकलारहित, अशा स्वरूपाला ज्ञानयोगाचें योगें जो जातो तो पुनः फेऱ्यात सापडत नाही.

सत्यवैकुंठकैलासलोकानामप्युपर्ययम् ॥
दत्तात्रेयाख्यलोकोऽस्ति प्रसिद्धोऽमृतसंज्ञितः ॥२०॥

न यत्र शुग्जरा मृत्युः क्रियाभोगोपि यत्र नो ॥
मोहोऽवस्था न च द्वैतंमगम्योऽयं सुरैरपि ॥२१॥

अध्यात्मयोगमार्गेण लभ्योयं ब्राह्मणेन हि ॥
श्रुत्यामृतं दिवीत्युक्तो दत्तलोकोऽयमेव सः ॥२२॥

तल्लोकप्राप्तयेऽथर्वा कृपया दीनवत्सलः ॥
शाण्डिल्याय जगौ ज्ञानं पूर्वोक्तं सुगमं स्फुटम् ॥२३॥

पुनः पप्रच्छ शाण्डिल्यो भगवान्नक्षरं त्विदम् ॥
अविक्रियं परं ब्रह्म सन्मात्रं निष्कलं शिवम् ॥२४॥

जायतेऽस्मात्कथमिदं रक्ष्यते लीयते च तत् ॥
सोब्रवीच्छृणु शाण्डिल्यारूपस्य ब्रह्मणोऽस्य तु ॥२५॥

अर्थ : हा दत्तात्रेय नांवाचा लोक, सत्य, वैकुंठ, कैलास यांचेही वर आहे. तो प्रसिद्ध असून त्यास अमृत म्हणतात. जेथे शोक, वार्धक्य, मृत्यु किंबहुना क्रियाभोगही नाहीत, तसेंच मोहावस्था, द्वैतही नाहीत तो हा दत्त-लोक देवांनाही अगम्य आहे. अध्यात्मयोगमार्गानें ब्राह्मणासच हा मिळतो. श्रुतीने ज्याचे वर्णन " अमृतं दिवि " असे केले आहे, तोच हा दत्तलोक. दीनवत्सल अशा अथर्व ऋषींनीं त्या लोकप्राप्तीसाठी पूर्वोक्त, सुगम व स्पष्ट असे ज्ञान कृपेने शाण्डिल्यास सांगितलें. पुनः शाण्डिल्याने विचारले, " हे भगवन्, ब्रह्म हे अक्षर, अविक्रिय, सन्मात्र, निष्कल व शिव आहे, त्या-पासून हे सर्व कसे उत्पन्न होते, त्याचे रक्षण कसे होते व त्याचा लय कसा होतो ते सांगावे " तेव्हां अथर्व ऋषी म्हणाले, " हे शाण्डिल्या, ह्या अरूप ब्रह्माविषयी ऐक. "

निष्कलं सकलं मिश्रं त्रीणि रूपाण्युपाधितः ॥
अखण्डं सच्चिदानन्दं निष्कलं यन्निरञ्जनम् ॥२६॥

शिवं सूक्ष्मं सर्वगतमनन्तं विश्वतोमुखम् ॥
अनिर्देश्यं निष्कलाख्यं रूपमस्योत्तमोत्तमम् ॥२७॥

त्रिगुणा मूलप्रकृतिर्मायाविद्येति चोच्यते ॥
शक्तिः सहोत्था तद्युक्तो देवोऽसौ कृष्णपिङ्गलः ॥२८॥

महेश्वरो य ईष्टे तन्मिश्ररूपं प्रकीर्तितम् ॥
स तु ज्ञानेन तपसा तप्यमानो ह्यकामयत् ॥२९॥

अर्थ : या ब्रह्मस्वरूपांची उपाधिभेदाने निष्कल, सकल, मिश्र अशी तीन प्रकारे रूपे आहेत. पैकी प्रथम ' निष्कल ' चे वर्णन. अखंड, सच्चि-दानंद, कलारहित, प्रकाशमय, कल्याणप्रद, अणु, सर्वानुस्यूत, अंतरहित, विश्वव्यापक, असे निष्कल नामक ब्रह्मरूप, उत्तमोत्तम आहे. त्रिगुण मूल प्रकृतिलाच माया, अविद्या असे म्हणतात. त्यांच्या बरोबर उत्पन्न झालेली शक्ति, म्हणजेच देव, तोच देव, म्हणजेच मायोपाधि शबलब्रह्म, मायाधीन असे सकल-रूप समजावे. महेश्वर, जो मायेवर सत्ता चालवितो, त्यालाच मिश्ररूप सम-जावे. त्यानेच स्वतःच्या तपाने व ज्ञानाने एकदां अशा प्रकारची इच्छा केली.

बहु स्यां च प्रजायेयमित्यस्मात्तपसोऽभवत् ॥
ॐकारोऽस्य तिस्रो मात्रा ऋषिछन्दांसि देवताः ॥३०॥

बीजानि शक्तयो वर्णावस्थास्थानानि च स्वराः ॥
गुणाग्निवेदसवनतत्त्वात्मानस्त्रयस्त्रयः ॥३१॥

तदाढ्योऽयं जगद्बीजं यत्परापरसंज्ञकम् ॥
तद्वाचकोसौ भगवान्मायावी व्यापकः परः ॥३२॥

सर्वभूतहृदाविष्टो मायया क्रीडतीह सः ॥
सृजत्यवति हन्तीशः स ब्रह्मा स हरिः शिवः ॥३३॥

अर्थ : माझी पुष्कळ रूपे व्हावीत, माझा प्रजाविस्तार व्हावा, अशा विचाररूप तपापासून ओंकार झाला. त्यापासून तीन मात्रा ऋषि, छंद, देवता निर्माण झाल्या. ' श्रीं, ह्रीं, क्लीं, ' ही बीजे, द्रव्य, ज्ञान व क्रिया या शक्ति, रक्त, कृष्ण, श्वेतवर्ण, जागृत्स्वप्न, निद्रावस्था, नेत्र, कंठ व हृदय ही स्थाने, उदात्त, अनुदात्त व स्वरित हे स्वर, सत्व, रज व तम हे गुण, दक्षिणाग्नि, गार्हपत्य व आहवनीय हे अग्नि, प्रातर्माध्यदिनसायं हे सवन, भूः भुर्वः स्वः ही तत्त्वे, विश्व, तेजस् व प्राज्ञ हे आत्मे यांची उत्पत्ती झाली. या सर्वांचें बीज, ज्याला परापर म्हणतात, ओंकार ज्याचा वाचक आहे, तोच भगवान या जगतात मायेनें क्रिडा करतो. तो सर्व भूतांच्या हृदयांत वास करतो, जगत् उत्पन्न करतो, पाळतो व त्याचा नाश करतो. तोच ब्रह्मा, तोच हरि व तोच शिव आहे.

देवा इन्द्रादयो भावाः सर्वभूतानि पश्च च ॥
स्थूलान्यपि च सूक्ष्माणि भौतिकानि स एव हि ॥३४॥
तत्त्वानि जन्तवः सर्वे पुरस्तादच्युतः स च ॥
पश्चाद्दक्षिणतश्चापि स एवोत्तरतो विभुः ॥३५॥
उपरिष्टादधस्ताच्च स एव किल सर्वतः ॥
भूतं भव्यं भवच्चापि स एवेदं न चेतरत् ॥३६॥
देवस्यास्यात्मक्रीडस्य विभोर्भक्तानुकंपिनः ॥
दत्तात्रेयाभिधा मूर्तिः सुरुपा या दिगंबरा ॥३७॥

अर्थ : इंद्रादि देव, सर्व भूते (पृथिव्यादी पंचीकृत व सूक्ष्म अपचींकृत) सर्व शरीरे हे सर्व त्यापासूनच झाले आहेत. पंचवीस तत्त्वे चतुर्विध शरीरधारी जीव, सर्व तोच आहे पुढून, मागून, उजवीकडून, डावीकडून, वर, खाली सर्वत्र तोच अच्युत विभु आहे. त्याचप्रमाणे भूत होणारे व असणारे सर्व कांही तोच आहे. इतर कांहीच नाही. सर्वांचें ठिकाणी वास करणाऱ्या स्वयंप्रकाश आणि स्वरूपामध्येच ज्याची नित्य क्रीडा चाललेली असते अशा भक्तवत्सल विष्णूची दत्तात्रेय नामक दिगंबरस्वरूपी सुन्दर मूर्ती आहे.

इन्दीवरदलप्रख्या चतुर्बाहूरघापहा ॥
सैषाऽस्य सकलं रूपमासेचनकगात्रयुक् ॥३८॥
शाण्डिल्यः प्राह भगवन्सन्मात्रमिदमुत्तमम् ॥
परं ब्रह्मात्मा महेशो दत्तात्रेय इति प्रभो ॥३९॥
कस्मादुच्यत आख्याहि कृपया दीनवत्सल ॥
अथर्वोवाच सौम्येदं बृहत्सर्वं चराचरम् ॥४०॥
बृंहयत्युत्तमं तस्मात्परं ब्रह्मेति गीयते ॥
यच्चाप्नोति यदादत्ते यच्चात्ति विषयानिह ॥४१॥
यच्चास्य संततो भावस्तेनात्मेति च गीयते ॥
मह्यते चेशशब्देन शक्त्येष्टेऽखिलमेव यत् ॥४२॥
सर्वाधीशोऽखिलात्मा च महेश इति गीयते ॥
मयाऽहं तेऽत्रये दत्त इत्युक्तेः स तथोच्यते ॥४३॥

अर्थ : कमलपत्राप्रमाणे अंगकांती असणारी, चतुर्हस्त, पापनाशक अशी ही मूर्ती आहे. हे रूप व अवयव मेघाप्रमाणे कांतियुक्त आहेत. शाण्डिल्य म्हणाला, "भगवन्; हे सर्व जगत् जर सन्मात्र आहे तर ब्रह्मयात्म्याला "महेश दत्तात्रेय " असे कां म्हणतात? ते कृपा करून सांगावे." अथर्व ऋषी सांगतात, " हे सौम्या, प्रसृत पावलेले हे सर्व चराचर जगत् देवदत्ताच्या पुत्रपौत्रादि उपाधिप्रमाणे तद्रूप आहे. ब्रह्मस्वरूपाची निरतिशय वृद्धि होते. वाढत रहाणारे म्हणून त्यास ब्रह्म म्हणतात. जीव सुषुप्तिकाली परब्रह्मांत असतो. स्वप्नांत तो जागेपणींच्या वासना विश्वात रमतो, व जागृतावस्थेत इंद्रियभोग घेतो. हा जो त्यांचा संततभाव, त्यामुळेच त्यांस आत्मा म्हणतात. सर्वजण त्याचीं पूजा करतात म्हणून त्यास महेश म्हणतात. सर्वाधीश व अखिलात्मा असल्यानेहि त्यास महेश म्हणतात. " मी स्वतःचे दान तुला (अत्रीला) दिले आहे " या वचनावरून त्यास दत्तात्रेय असे नाव प्राप्त झालें.

॥ इति श्रीदत्तपुराणे द्वितीयाष्टके द्वितियोध्यायः ॥

अथ भूतभौतिकसर्गो नाम द्वितीयाष्टके तृतीयोऽध्यायः ॥

ॐ वसूत्सुकेन मुनिना सामान्येनोदितोऽप्ययम् ॥
दत्तात्रेयावतारोऽत्र विशेषाद्वर्ण्यते स्मृतः ॥१॥
सच्चिदानन्दरूपो यः पराशक्तिः स सर्ववित् ॥
मायाऽभूत्तस्मादेतस्मादात्मनोऽस्या महांस्ततः ॥२॥
अहंकारोऽस्मात्तन्मात्राण्यतोऽ भूद्भूतपञ्चकम् ॥
आकाशवातदहनपानीयवसुधाभिधम् ॥३॥

अर्थ : जगन्निवासभूत भगवत्तत्पर अशा अथर्व मुनींनी आठवून सांगितलेला दत्तात्रेय अवतार येथे विशेष रीतीने वर्णन केला आहे. जो सच्चिदानंदरूप आहे, ज्याची पराशक्ति विविध प्रकारची आहे, त्याच्यापासून जगताचे मूळ असणारी माया उत्पन्न झाली. त्या मायेच्या योगाने ज्ञानक्रियाशक्त्यात्मक महत्तत्व उत्पन्न झाले. त्यापासून अहंकार; त्यापासून तन्मात्रा, त्यापासून भूत-पञ्चक, आकाश, वायु, तेज, पाणि व पृथ्वि उत्पन्न झाली.

एकोत्तरर्द्धि शब्दादिगुणाढ्यं च पृथक् पृथक् ॥
तेषां सत्त्वगुणांशेभ्यः पञ्च ज्ञानेन्द्रियाणि च ॥४॥
श्रोत्रत्वङ्नेत्ररसनघ्राणाख्यान्यभवन्क्रमात् ॥
मनोधीचित्ताहंकारास्तत्सत्त्वगुणसंहतेः ॥५॥
मनो विमर्शरूपं धीर्निश्चयात्माभिमानकः ॥
अहंकारोऽनुसंधायि चित्तमन्तःकृतिस्त्वियम् ॥६॥
वाक्पाणिपत्पायुलिङ्गाख्यं क्रियेन्द्रियपञ्चकम् ॥
तेषां रजोगुणांशेभ्यःक्रमात्तेषां तथा पुनः ॥७॥

अर्थ : स्थूल पञ्चभूतांपासून १) शब्दगुणक आकाश२) शब्दस्पर्शगुणक वायु ३) शब्दस्पर्शरूपगुण तेज, ४) शब्दस्पर्शरूपरस गुण आप, व ५)

शब्दस्पर्शरूपरसगंध गुणयुक्त पृथ्वी झाली. त्या प्रत्येकाच्या सत्वगुणापासून अनुक्रमे कर्ण, त्वचा, नेत्र, रसना व नाक उत्पन्न झालें. हीच ज्ञानेंद्रियें. त्यां पंच आकाशादि भूतांच्या एकत्रिक सत्वगुणापासून मन, बुद्धि, चित्त, अहंकार यांचा संघातरूप अंतःकरण उत्पन्न झाले. अंतःकरण समूहापासून विचाररूप मन, निश्चयात्मक बुद्धि, अहंकार, अनुसंधानरूप चित्त अशी सृष्टि झाली. आकाशादिकांच्या पृथक् पृथक् रजोगुणापासून पांच कर्मेन्द्रिये (वाणी, पाणि पाद, पायु व लिंग) उत्पन्न झाली.

संहत्या चाभवत्प्राणो वृत्तिभेदात्स पञ्चधा ॥
प्राणोऽपानः समानश्चोदानो व्यानः क्रियात्मकः ॥८॥
कर्मज्ञानेन्द्रियप्राणपञ्चकैर्मनसा धिया ॥
देहो लिङ्गाभिधोऽ ज्ञानवृत्तिकारणकार्यकः ॥९॥
द्विधा कृत्वैकैकभूतं चतुर्धैकार्धमस्य च ॥
स्वस्वेतरार्धसंयोगात्पञ्चीकरणमुच्यते ॥१०॥
तद्भोगायतनं स्थूलं शरीरं गुणतस्त्रिधा ॥
दैवं सत्त्वाधिकं मर्त्यं राजसं तिर्यगन्यकम् ॥११॥
रोमत्वङ्मांसनाड्यस्थि भुवोऽद्भ्यो मूत्ररेतसी ॥
स्वेदोऽस्रलालेऽग्नेः क्षुत्तृण् निद्रा तन्द्रा रतिर्गतिः ॥१२॥

अर्थ : आकाशादि पंचभूतांच्या एकत्रित केलेल्या रजोगुणापासून प्राण झाला. वृत्तिभेदानुसार प्राणाचे पांच प्रकार आहेत ते असे १) प्राण २) अपान ३) समान ४) उदान व ५) व्यान. प्राण क्रियात्मक असतो. पांच कर्मेन्द्रिये पांच ज्ञानेंद्रिये, पंचप्राण, मन, बुद्धि या सतरांच्या समूहासच लिंगदेह समजावे. (यानंतर पंचकिरण म्हणजे काय ते सांगतात) प्रथम प्रत्येक भूताचे दोन भाग करावेत. नंतर प्रत्येक भूताचा अर्धा अर्धा भाग घेऊन त्याचे पुनः चार चार भाग करावेत. नंतर उरलेल्या अर्ध्या भागात स्वस्वेतर (म्हणजे उदा. आकाशाचा संबंध अर्धा भाग घ्यावा, आणि नंतर आकाशाच्या अर्ध्या

भागाचे चार भाग सोडून इतर चार भूतांच्या भागापैकी एक एक भाग आकाशार्ध भागास जोडावा) भाग जोडावा. यास पंचीकरण म्हणतात. पंचीकृत भूतापासून स्थूलशरीर निर्माण होते. गुणतः शरीर प्रकार तीन आहेत. १) सत्त्वाधिक देवयोनि २) रजःप्रधान मर्त्ययोनि व ३) तमःप्रधान पश्वादि तिर्यग्योनि. रोम, त्वचा, मांस, नाडी, अस्थि यांची उत्पत्ति भूमीपासून झाली. मूत्र, रेत, स्वेद, अस्र व लाळ जलापासून, व क्षुधा, तृषा, निद्रा, तन्द्रा, रति आणि गति अग्निपासून झाली.

लौल्यं निरोधः प्रसाराकुञ्चने मरुतोऽथ खात् ॥
कामक्रुड्लोभमोहा भीस्तदाढ्येयं जडा तनुः ॥१३॥
सूक्ष्मा सप्तदशाङ्गापि सुखदुःखगमादियुक् ॥
तथाऽज्ञानं कारणाख्यं शरीरत्रयमस्य पूः ॥१४॥
शुद्धसत्त्वप्रकृत्यां यो बिम्बितः स महेश्वरः ॥
जीवो मलिनसत्त्वायां तामस्यां भूतपञ्चकम् ॥१५॥
सर्वज्ञ ईशः समष्टिर्जीवोऽज्ञो व्यष्टिसंज्ञितः ॥
एवं विक्षेपकार्याख्या सृष्टिर्जातेश्वराज्ञया ॥१६॥

अर्थ : चांचल्य, निरोधन, प्रसार, आकुंचन या क्रिया वायुपासून झाल्या- काम क्रोध लोभ मोह भय हे विकार आकाशापासून झाले. सतरा अंगांनी युक्त असे सूक्ष्म शरीर आहे. त्यालाच सुखदुःखादि अनुभव येतात. स्थूल शरीर भोगायतन आहे खरे, परंतु तेथे भोगसाक्षात्कारानुभव कमी. मृतशरीर भोगायतन नाहीं. अज्ञान म्हणजेच कारणशरीर स्थूल, सूक्ष्म, कारण, शरीरमय हेंच संसारी जीवांचे पुर आहे. शरीरत्रयांत जो क्रीडा करतो तो जीव. शुद्धसत्त्वप्रकृतीत जो प्रतिबिंबित असतो तोच महेश्वर, व मलिसत्त्व प्रकृतींत जो प्रतिबिंबित होतो तो जीव. तमःप्रधान प्रकृतिपासून पंचभूते झाली. ईश्वर सर्वज्ञ आहे. कारण तो समष्टि उपाधींत आहे. जीव अज्ञ आहे, कारण तो व्यष्टिरूप उपाधीत आहे. याप्रमाणे विक्षेपशक्ति कार्य नामक सृष्टि ईश्वराज्ञेने उत्पन्न झाली.

ब्रह्मांडं पञ्चभूतेभ्यस्तत्र लोकाश्चतुर्दश ॥
यथास्वं प्राणिनोऽत्रायं स्थूलदेहो विराड्विभोः ॥१७॥
पादाधोऽतलमस्योर्ध्वं वितलं सुतलं तथा ॥
गुल्फे महातलं जङ्घादेशे जान्वोस्तलातलम् ॥१८॥
ऊर्वो रसातलं कट्यां पातालं भूश्च नाभिगा ॥
कुक्षौ भुवोहृदूर्ध्वं स्वर्महः कण्ठे जनो मुखे ॥१९॥
भ्रुवोस्तपो मूर्ध्नि सत्यं प्राणो वायुस्तनुर्मही ॥
लोकाङ्गस्य रदास्तारा माया हास्यं निशादिने ॥२०॥
निमेषोन्मेषौ कटाक्षः सृष्टिः कुक्षिरपां पतिः ॥
नाड्यो नद्यो द्रुमाः केशा वृष्टी रेतोऽस्थि पर्वतः ॥२१॥

अर्थ : पंचभूतांपासून ब्रह्मांड निर्माण झाले. त्यांत चौदा लोक आहेत. स्वर्गांत देव, आकाशांत पक्षि, भूमीवर मानव, पशुपक्षी, जलांत मासे वगैरे. पाताळांत असुर, राक्षस, साप, इत्यादि. विराट् नांवाचा ईश्वराचा स्थूल देह आहे. याच्या पायाखाली अतल, त्यावर वितल, घोट्याचे ठिकाणी सुतल, जङघेचे ठिकाणी महातल, गुडघ्याचे ठिकाणी तलातल, मांड्यांचे ठिकाणी रसातल, कमरेचे ठिकाणी पाताल, नाभिस्थानी भूलोक, कुशीचे ठिकाणी भुवर्लोक, हृदयाचेवर स्वर्लोक, कंठाचे ठिकाणी महर्लोक, मुखाचे ठिकाणी जनलोक, भुवयांचे ठिकाणी तपोलोक, मस्तकाचे ठिकाणी सत्यलोक, वायु हा त्याचा प्राण, लोक हे इतर अंगे, नक्षत्रें हे दांत, माया हे हास्य, रात्रंदिवस हे निमिशोन्मेष, सृष्टि हाच कटाक्ष, सागर हीच कुक्षि, नद्या ह्याच नाड्या, वृक्ष हेच केस, पर्जन्य हेच वीर्य, आणि पर्वत हेच त्याच्या अस्थि.

विराजः स्थूलदेहोऽयं चराचरजगन्मयः ॥
दिग्वातार्कप्रचेतोश्विवह्नीन्द्रोपेन्द्रमृत्युकाः ॥२२॥
ज्ञानकर्मेन्द्रियाण्यन्तःकरणानि शशी गुरुः ॥
हरोऽजश्चेति लिङ्गात्माऽव्याकृतं कारणं च तत् ॥२३॥

यद्यदङ्गाभिधा येऽत्र व्यष्टौ ते तत्तदङ्गपाः ।
दृष्ट्वोभयत्राप्याविष्टेष्वेषु कार्याक्षमावुभौ ॥२४॥
स्वांशेनेविशदात्मातो जातौ कार्यक्षमावुभौ ॥
मायावशात्स सर्वज्ञोजीवोऽविद्यावशात्स च ॥२५॥
सृष्ट्वैवं कर्मणोऽज्ञानां भोगार्थं शश्वदीश्वरः ॥
स्रष्टृविष्णुहरात्मा स सृष्टिस्थित्यन्तकारणः ॥२६॥

अर्थ : चराचर, जगन्मय असा विराटरुपी ईश्वराचा स्थूल देह आहे. दहा दिशा, वायु, सूर्य, चंद्र, वरुण, अश्विनौ, अग्नि, इंद्र, उपेन्द्र, मृत्यु, पांच ज्ञानेंद्रिये, कर्मेंद्रिये, अंतःकरणे, प्रजापति, रुद्रोऽहंकार, नारायणः चित्तं इत्यादि विराट पुरुषांचे लिंगशरीर आहे. ज्या ज्या अंगाच्या ज्या ज्या देवता सांगितल्या आहेत, त्या देवता त्या त्या अंगाच्या रक्षक आहेत. अव्याकृत हे विराटाचे कारणशरीर आहे, व्यष्टि, समष्टि अशा उभय ठिकाणी देवता प्रविष्ट होऊन रहातात. त्यांच्या आवेशाने दोन्ही शरीरात अंशतः आत्मप्रवेश होतो. आत्मप्रवेशानुसार जीवेश्वर दोघे कार्यक्षम होतात. ईश्वर मायेला वश करून रहातो. म्हणून तो सर्वज्ञ आहे. जीव अविद्यापरतंत्र असतो म्हणून अज्ञानी आहे. अशा प्रकारच्या कर्माने हा सर्व ब्रह्मांडविस्तार निर्माण करून त्यांत ईश्वर प्रविष्ट रहातो. ब्रह्मांड हे अज्ञानी, संसारी अशा जीवांच्या भोगासाठीच आहे. ब्रह्मा, विष्णु व हर हे सृष्टिचे उत्पन्नकर्ते, पालनकर्ते व संहारकर्ते आहेत.

विश्वोऽध्यात्मं विराट् चाधिभूतं कृष्णोऽधिदैवतम् ॥
जाग्रदध्यात्मं रक्षाधिदैवं सत्त्वं च भूतकम् ॥२७॥
हिरण्यगर्भोऽधिभूतं को दैवं तेजसोऽपरम् ॥
रजोऽधिभूतं चाध्यात्मं स्वप्नः सर्गोऽधिदैवतम् ॥२८॥
प्राज्ञोऽध्यात्मं दैवमीशो व्याकृतं चाधिभूतकम् ॥
निद्राध्यात्मं क्षयो दैवमधिभूतं तमोगुणः ॥२९॥

अधिदैवतमध्यात्ममधिभूतमिति त्रिधा ॥
भ्रमाद् भात्येकमेवेदमित्यूह्यं श्रवणादिषु ॥३०॥
ताराङ्गानीमान्येतेषां व्यस्तोपास्त्या पृथग्गतिः ॥
समस्तोपास्तितो दत्तलोकप्राप्तिर्हि सुस्थिरा ॥३१॥
सुमङ्गलं विराड्रूपं चराचरजगन्मयम् ॥
योगिनो यदुपास्त्या तु कैवल्यं धाम यान्ति तत् ॥३२॥

अर्थ : परमेश्वराने अज्ञ जीवांच्या कर्मभोगासाठी विविध प्रकारची स्थूल शरीरे निर्माण केली, ईश्वर मायापरतंत्र नसल्याने तो समष्टिरूपांत स्वतंत्र व निर्लेप राहिला. आणि जीव कर्मादिकांनी लिप्त झाला. तोच परमात्मा ब्रह्माविष्णुमहेश्वररूपाने ब्रह्मांडरूपी सृष्टिचे सृजन पालन व नाश करतो. तोच प्राज्ञ, तैजस, विश्व अशा त्रिविध रूपांनी जागृति, स्वप्न, सुषुप्ति या अवस्थात्रयीचा स्वामी होतो आणि नामरूपाने रहातो. तेच वर्णन विषद करून ग्रंथकार सांगतात– विश्व हे अध्यात्म समजावे. विराट् हे अधिभूत आणि तमोगुणात्मक अधिदैवत कृष्ण समजावे. जागृत हे अध्यात्म होय. रक्षणास योग्य ते अधिदैवत होय. आणि सत्त्वगुणात्मक ते अधिभूत जाणावे. हिरण्यगर्भ हा अधिभूत, ब्रह्मा हा अधिदैव, आणि तैजस हा अध्यात्म होय. रजोगुणात्मक हे अधिभूत, स्वप्न हे अध्यात्म, आणि सृष्टि हे अधिदैवत होय. प्राज्ञ हे अध्यात्म, ईश अधिदैवत, आणि व्याकृत अधिभूत जाणावे. निद्रा ही अध्यात्म, प्रलय अधिदैवत आणि तमोगुणात्मक ते अभिभूत समजावे. अधिदैवत, अध्यात्म आणि अधिभूत अशा तीन प्रकाराने भासमान होणारे खरे तत्त्व एकच आहे. परंतु भ्रमाने व प्रमादाने तेच तत्त्व त्रिविधरूप व भिन्नभिन्न, विभक्त आहे असे वाटते. तत्त्व एकच आहे हे श्रुतिवचनांच्या श्रवणाने व शास्त्रीय अनुमानाने ओळखावे. हे तीन्ही प्रकार जरी श्रुतिवाक्यांतून वर्णिलेले असले तरी निर्गुण व निराकार परब्रह्माचे ठिकाणी भ्रममूलकच आहेत असे श्रुतीचे तात्पर्य आहे. ही गोष्ट अनुमानादि प्रमाणांनी समजून घेतली पाहिजे. हे जे अधिभूतादि तीन प्रकार ॐकार स्वरूपाचे तीन अवयव आहेत, त्यांच्या पृथक्-पृथक् उपासनेने निरनिराळी फळे मिळतात. त्यांची समष्टि रूपाने उपासना केली असता

अत्यंत स्थिर अशा दत्तलोकाची प्राप्ती होते. हे विराट्रूप अत्यंत मंगलमय आहे. तसेच जडाजड जगद्रूपही आहे. ॐकार उपासनेनें योगी व मुमुक्षु साधक परमपवित्र अशा कैवल्याप्रत जातात असा अनुभव आहे.

सदरचे वर्णन कठोपनिषदांत शैव्यप्रश्नामध्ये आणि मांडूक्यांत विस्ताराने दिले आहे. त्याचा वाचकांनी विचार करावा. वाचकांच्या सोईसाठी सुरेश्वराचार्यकृत पंचीकरणवार्तिकाची माहिती खाली दिली आहे.

पंचीकृतानि भूतानि तत्कार्यं च विराट् भवेत् ॥
स्थूलं शरीरमेतस्यादशरीरस्य चात्मनः ॥१॥

अधिदैवतमध्यात्ममधिभूतमिति त्रिधा ॥
एकं ब्रह्म विभागेन भ्रमाद् भाति न तत्वतः ॥२॥

इंद्रियैरर्थविज्ञानं देवतानुग्रहान्वितैः ॥
शब्दब्रह्मादि विषयं तज्जागरितमुच्यते ॥३॥

श्रोत्रमध्यात्ममित्युक्तं श्रोतव्यं शब्दलक्षणं ॥
अधिभूतं तदित्युक्तं दिशस्तत्राधिदैवतम् ॥४॥

त्वमध्यात्ममिति प्रोक्तं स्प्रष्टव्यं स्पर्शलक्षणम् ॥
अधिभूतं तदित्युक्तं वायुस्तत्राधिदैवतम् ॥५॥

चक्षुरध्यात्ममित्युक्तं द्रष्टव्यं रूपलक्षणम ॥
अधिभूतं तदित्युक्तं आदित्योऽत्राधिदैवतम् ॥६॥

जिह्वाध्यात्मं तया खाद्यं अधिभूतं रसात्मकम् ॥
वरुणो देवता तत्र जिह्वायामधिदैवतम् ॥७॥

घ्राणमध्यात्ममित्युक्तं घ्रातव्यं गंधलक्षणम् ॥
अधिभूतं तदित्युक्तं पथिव्यामाधिदैवतम् ॥८॥

वागध्यात्ममिति प्रोक्तं वक्तव्यं शब्दलक्षणम् ॥
अधिभूतं तदित्युक्तं अग्निरत्राधिदैवतम् ॥९॥

हस्तावध्यात्ममित्युक्तं आदातव्यं च यद्भवेत् ॥
अधिभूतं तदित्युक्तं इंद्रस्तत्राधिदैवतम् ॥१०॥

पादावध्यात्ममित्युक्तं गंतव्यं तत्र यद्भवेत् ॥
अधिभूतं तदित्युक्तं विष्णुस्तत्राधिदैवतम् ॥११॥

पायुरध्यात्ममित्युक्तं निसर्गस्तत्र यो भवेत् ॥
अधिभूतं तदित्युक्तं मृत्युस्तत्राधिदैवतम् ॥१२॥

उपस्थेंद्रियमध्यात्मं स्त्रियाद्यानंदकारकम् ॥
अधिभूतं तदित्युक्तं अधिदैवं प्रजापतिः ॥१३॥

मनोध्यात्ममिति प्रोक्तं गन्तव्यं तत्र यद्भवेत् ॥
अधिभूतं तदित्युक्तं चंद्रस्तत्राधिदैवतम् ॥१४॥

बुद्धिरध्यात्ममित्युक्तं बोद्धव्यं तत्र यद्भवेत् ॥
अधिभूतं तदित्युक्तं अधिदैवं बृहस्पतिः ॥१५॥

अहंकारस्तथाध्यात्मं अहंकर्तव्यमेवच ॥
अधिभूतं तदित्युक्तं रुद्रस्तत्राधिदैवतम् ॥१६॥

चित्तमध्यात्ममित्युक्तं चेतव्यं तत्र यद्भवेत् ॥
अधिभूतं तदित्युक्तं क्षेत्रं क्षेत्राधिदैवतम् ॥१७॥

तमोध्यात्ममिति प्रोक्तं विकारस्तत्र यो भवेत् ॥
अधिभूतं तदित्युक्तं ईश्वरोऽत्राधिदैवतम् ॥१८॥

बाह्यांतःकरणैरेवं देवतानुग्रहान्वितैः ॥
स्वं स्वं च विषयज्ञानं तज्जागरितमुच्यते ॥१९॥

येयं जागरितावस्था शरीरं करणाश्रयं ॥
यस्तयोरभिमानी स्याद् विश्वमित्याभिधीयते ॥२०॥

विश्ववैराजरूपेण पश्येद्भेदनिवृत्तये ॥
ज्ञानेंद्रियाणि पंचैव पंच कर्मेन्द्रियाणि च ॥२१॥
श्रोत्रंत्वङ्नयनघ्राणजिह्वाधींद्रियपंचकम् ॥
वाक्पाणिपादपायूपस्थाः कर्मेन्द्रियपंचकम् ॥२२॥
मनोबुद्धिरहंकारश्चित्तं चेति चतुष्टयम् ॥
संकल्पारन्थमनोरूपबुद्धि निश्चयरूपिणी ॥२३॥

सदरचे वर्णन जागृतावस्थेचें आहे. पंचीकृत भूतांचे कार्य म्हणजे विराट् देह होय. अशरीरी आत्म्याचेच हे स्थूल शरीर समजावे. अधिदैवत, अध्यात्म आणि अधिभूत असे तीन प्रकार एकाच ब्रह्मस्वरूपाचे भासतात परंतु ते खरे नाहीत व भ्रममूलक आहेत. तत्वतः ब्रह्म निराकार व निरवयव आहे. म्हणून त्याविषयी विविधपणा, सावयवपणा इत्यादि कल्पना चुकीच्या ठरतात. देवतांच्या अनुग्रहाने आणि इंद्रियादिकांच्या द्वारा शब्द, ब्रह्मादि पदार्थविज्ञान होते त्या अवस्थेस जागृतावस्था असे म्हणतात. अशा अवस्थेचें वर्णन शास्त्रकार सविस्तरपणे करतात. श्रोत्र हे अध्यात्म शब्दादि श्रोतव्य हे अधिभूत आणि दिशा हे अधिदैवत समजावे. त्वचा हे अध्यात्म, स्पर्शलक्षण स्प्रष्टव्य हे अधिभूत आणि वायु हे अधिदैवत समजावयाचे आहे. चक्षु हे अध्यात्म, द्रष्टव्य पदार्थ जात हे अधिभूत आणि आदित्यदेवता हे अधिदैवत जाणावे. जिह्वा हे अध्यात्म, रसात्मक खाद्यपदार्थ हे अधिभूत आणि वरुणदेवता हे अधिदैवत समजावे. घ्राण हे अध्यात्म, गंधादि हे अधिभूत आणि पृथिवीरूप हे अधिदैवत समजावे. वाणी हे अध्यात्म, शब्दादि वक्तव्य हे अधिभूत आणि अग्नि हे अधिदैवत होय. हस्तादि अध्यात्म, आदातव्य हे अधिभूत आणि इंद्र अधिदैवत जाणावे. पादादि अध्यात्म, गंतव्य हे अधिभूत, आणि विष्णु हे अधिदैवत जाणावे. पायू हे अध्यात्म, निसर्ग अधिभूत आणि मृत्युदेवता हे अधिदैवत जाणावे. उपस्थेंद्रिय हे अध्यात्म, स्त्रियादि आनंदकारणे हे अधिभूत व प्रजापति हे अधिदैवत जाणावे. मन हे अध्यात्म, मंतव्य हे अधिभूत आणि चंद्रदेवता हे अधिदैवत जाणावे. बुद्धि हे अध्यात्म, बोद्धव्य हे अधिभूत आणि बृहस्पति हे अधिदैवत जाणावे. अहंकार अध्यात्म, अहंकर्तव्य अधिभूत आणि रुद्रदेवता हे अधिदैवत होय. चित्त अध्यात्म, चेतव्य अधिभूत, क्षेत्रज्ञाधि-

दैवत हे अधिदैवत होय. तमोगुण अध्यात्म, विकार अधिभूत आणि ईश्वर अधिदैवत. बाह्य साधने आणि अंतःसाधने यांच्या मदतीनुसार व ईश्वराच्या कृपेने स्वस्त विषयांचे ज्ञान जेव्हा होत असते त्या अवस्थेस जागरितावस्था असे म्हणतात. हीच जागृतावस्था शरीररूपी साधनांचा आश्रय करून राहिलेली आहे. या जागृत अवस्थेचा जो अभिमानी आहे त्यालाच विश्व असे म्हणतात. विश्वालाच विराट् रूपाने सतत पहावे म्हणजे भेदबुद्धीचा निरास होतो, व भ्रमादि दोष नाहीसे होतात. पंचज्ञानेंद्रिये आणि पंचकर्मेंद्रिये श्रोत्र, त्वचा, नयन, घ्राण, जिह्वा, आणि वाणि, पाणीपाद, पायूपस्थ ही कर्मेंद्रिये होत. मन, बुद्धि, अहंकार अणि चित्त हे अंतःकरणाचे चार प्रकार आहेत. मन संकल्पविकल्पात्मक व बुद्धि निश्चयात्मक असते. अभिमानस्वरूप अहंकार असतो. चित्त हे अनुसंधानस्वरूप असते. याप्रमाणे इतरहीं अवस्थांचें वर्णन जुन्या ग्रंथातून मिळते.

जागृताभिमानी विश्व, स्वप्नाभिमानी तैजस आणि सुषुप्तीचा अभिमानी प्राज्ञ हे व्यष्टीचे अभिमानी होत. जागृताभिमानी विराट्, स्वप्नाभिमानी हिरण्यगर्भ आणि सुषुप्त्यभिमानी ईश्वर हे समष्टीचे अभिमानी होत. जागृत अवस्थेचे कार्य, रक्षण, सत्वगुण आणि देवता विष्णु, स्वप्नावस्थेचा रजोगुण, कार्यसर्ग देवता ब्रह्मा, सुषुप्ती अवस्थेचा तमोगुण, कार्यप्रलय, देवताईश्वर, जागृत, स्वप्न, सुषुप्ति, यांना अध्यात्म म्हणावे. विश्व, तैजस, प्राज्ञ यांना अधिभूत समजावे. आणि विराट्, हिरण्यगर्भ, ईश्वर, यांना अधिदैवत समजावे. पंच-ज्ञानेंद्रिये व पंचकर्मेंद्रिये यांचे ठिकाणीही अध्यात्म, अधिभूत व अधिदैव हे प्रकार उपनिषदांत दिले आहेत. त्यांचा प्रकार येणेप्रमाणे सर्वत्र समजावयाचा आहे. तो असा—अध्यात्म श्रोत्र, अधिदैव दिशा, अधिभूत शब्द, अध्यात्म जिह्वा, अधिदैव आप, अधिभूत रस, अध्यात्म घ्राण, अधिदैव पृथ्वी, अधिभूत गंध, अध्यात्म नेत्र, अधिदैव तेज, अधिभूत रूप, अध्यात्म त्वचा, अधिदैव वायु, अधिभूत स्पर्श, येणेप्रमाणे दिलेला मोठा विस्तार वाचकांच्या सोईकरताच करावा असें वाटल्यावरून ग्रंथ संदर्भानुसार येथे दिला आहे.

ब्रह्माऽऽस्यं बाहुतः क्षत्रमूर्वोर्विड् वृषलः पदः ॥
विष्णोर्जज्ञे निजगुणकर्मवृत्तिविभागशः ॥३३ ॥
उद्भित्सर्गः पुरा षोढा चाष्टाविंशतिधा परः ॥
तिर्यक्सर्गो नृसर्गोऽथ दैवसर्गस्ततोऽष्टधा ॥३४॥
विराड्रूपस्य नाभ्यब्जाद्विष्णोरास विधिः स च ॥
पुत्रान्लब्धश्रुतिः सृष्ट्यै मानसांश्चतुरोऽसृजत् ॥३५॥

अर्थ : विराट्‌रूपी ब्रह्माच्या मुखापासून ब्राह्मण, बाहूपासून क्षत्रिय, मांडीपासून वैश्य, आणि पायापासून शूद्र जन्मले. ब्राह्मणास भोजन दिले असता यज्ञसिद्धि होते. कारण ब्रह्मरूप विराट् मुखांत आहुति होते. हे सर्व वर्ण विष्णु-रूपापासून स्वतःच्या गुण, कर्म, वृत्ति विभागानुसार निर्माण झालें आहेत. सत्वगुणापासून विप्र, रजोगुणापासून क्षत्रिय, रजतमापासून वैश्य, तमोगुणापासून शूद्र, त्याचप्रमाणे सत्वापासून शम, रजापासून दम, रजतमापासून तप, आणि तमापासून शौच, इत्यादि कर्मे झाली व वर्ण झाले. उद्‌भिजांची उत्पत्ति, प्रथम सहा प्रकारची झाली, नंतर पुनः त्या उत्पत्तीचे अठ्ठावीस प्रकार झाले. त्यानंतर तिर्यक्सर्ग, नृसर्ग, दैवसर्ग झाले. त्याचे प्रकार आठ आहेत. सहा प्रकारांचा पहिला सर्ग १) वनस्पति २) औषधि ३) लता ४) त्वक्सार म्हणजे ज्यांची साल (त्वचा) दृढतर आहे असे ५) वीरुध ६) वृक्ष नंतरचे २८ प्रकार १) गोरज २) महिष ३) कृष्ण ४) सूकर ५) गवय ६) रूरू ७) अवि ८) उष्ट्र, हे द्विशफ प्राणी ९) खर १०) अश्व ११) अश्वतर १२) गौर १३) शरभ १४) चमरी, हे एकशफ प्राणी १५) शृगाल १६) वृक १७) व्याघ्र १८) मार्जार १९) शश २०) शल्लक २१) सिंह २२) कपि २३) गज २४) कूर्म २५) गोधा २६) मर्कट २७) जलचर २८) खग, पँकी १५ ते २६ पंचनख आहेत. त्यानंतर देवतांचा आठ प्रकारचा सर्ग झाला तो असा— १) पितर २) सुर ३) गंधर्व ४) देव ५) सिद्ध ६) यक्ष ७) राक्षस ८) चारण. विराटाच्या नाभिकमलापासून ब्रह्मदेव निर्माण झाला. भगवान श्री महाविष्णूच्या कृपेने चतुराननास वेद मिळाले. श्रुति वचनाधारे सृष्टि निर्माण करण्यासाठी ब्रह्मदेवाने सनकादिक चार मानसपुत्र उत्पन्न केले.

सनत्कुमारसनकसनन्दनसनातनाः ॥
कुमारा ब्रह्मनिष्ठाः स्युस्तेऽतोऽभूत्कुपितो विधिः ॥३६॥
कुपितस्याभवद्रुद्रो ललाटादुग्रसृष्टिकृत् ॥
तस्मै दत्वा वरं धात्रा तपसेऽथ स योजितः ॥३७॥
शान्तस्वान्तस्य कस्याथो मनसो देहतोऽप्यमी ॥
पुत्राः सुतपसो जाता मरीच्यत्र्यङ्गिरः क्रतुः ॥३८॥
भृगुः पुलस्त्यः पुलहो रुचिर्दक्षो वसिष्ठकः ॥
नारदश्चोरसो धर्मः पृष्ठतोऽन्यो हृदो भ्रुवोः ॥३९॥

अर्थ : सनत्कुमार, सनक, सनन्दन व सनातन हे चार पुत्र ब्रह्मनिष्ठ झाले. सृष्टि निर्मितीसाठी त्यांचा कांहीच उपयोग झाला नाही. म्हणून ब्रह्मदेवास राग आला. संतप्त झालेल्या ब्रह्मदेवाच्या ललाटापासून उग्रसृष्टिकर्ता रुद्र निर्माण झाला. त्यास वर देऊन ब्रह्मदेवाने तपकर्मांत गुंतवून ठेवले. नंतर ब्रह्मदेव शांत झाल्यावर त्याच्या मनापासून व शरीरापासून मरीचि, अत्रि, अंगिरस, क्रतु, भृगु, पुलस्त्य, पुलह, रुचि, दक्ष, वसिष्ठ, नारद हे पुत्र उत्पन्न झाले. तसेच हृदयापासून धर्म, पाठीपासून अधर्म उत्पन्न झाले.

कामः क्रोधोऽधरात्लोभश्छायायाः कर्दमो मुखात् ॥
वाग्वेदाश्चतुरास्येभ्यः साङ्गोपाङ्गाः सविद्यकाः ॥४०॥
सर्गर्द्धिः ध्यायतो युग्मं कस्याङ्गादभवत्स्वराट् ॥
आद्यो मनुः स महिषी शतरूपेति दंपती ॥४१॥
जनयामासतुः पुत्रौ पुत्रीश्च ग्राम्यधर्मतः ॥
प्रियव्रतोत्तानपादौ भूपो तावासतुः सुतौ ॥४२॥
आकूतिर्देवहूतिश्च प्रसूतिश्चेति कन्यकाः ॥
धीरूपशीललक्ष्म्याढ्याः सर्गोऽयं ववृधे ततः ॥४३॥

अर्थ : ब्रह्मदेवाच्या भुवयांपासून काम, क्रोध, ओठापासून लोभ, छायेपासून कर्दम, मुखापासून वाग्वेद, चारी तोंडातून सांगोपांग चारी वेद इत्यादि

उत्पन्न झाले. सर्गवृद्धिचा विचार करत असता स्त्रीपुरुषांचा विचार केला आणि त्यावेळीं आद्य स्वयंभू असा मनु उत्पन्न झाला. त्याची महिषी शतरुपा स्त्री ही उत्पन्न झाली. या दंपतीपासून ग्राम्यधर्माने (मैथुनाने) प्रियव्रत व उत्तानपाद हे दोन पुत्र व आकूति, देवहूति व प्रसूति अशा तीन कन्या, ज्या बुद्धिरूपशीललक्ष्मी यांनी युक्त होत्या, उत्पन्न झाल्या. त्यानंतर ह्या सृष्टिची वाढ मोठ्या प्रमाणांत झाली.

इति श्रीदत्तपुराणे सार्धत्रिसाहस्र्यां संहितायां द्वितीयाष्टके तृतीयोऽध्यायः ॥

अथ मनुपुत्र्युद्वाहानसूयात्रिमहात्म्यं नाम द्वितीयाष्टके चतुर्थोऽध्यायः ॥

तं नु प्राप्य रुचिं सोदादाकूतिं कर्दमाय च ॥
देवहूतिं प्रसूतिं च मनुर्दक्षाय कर्मिणे ॥१॥
आकूत्यां दक्षिणायज्ञौ श्र्यजांशौ दंपती रुचेः ॥
दक्षात्प्रसूत्यां पुत्र्योदात्कश्यपाय त्रयोदश ॥२॥
धर्माय चाग्नये स्वाहां तारेशे सप्तविंशतिम् ॥
स्वधां पितृभ्यः स सतीं शंकराय विधीरितः ॥३॥
स्वरूपानंदसंतुष्टादपि भोगपराङ्मुखात् ॥
अलब्धकामया पत्न्या स्वव्रतक्षामयार्थितात् ॥४॥
योगाश्रितमहैश्वर्यात्कृतलीलाच्च कर्दमात् ॥
नव कन्या देवहूत्यां कपिलाख्योऽभवत्सुतः ॥५॥

अर्थ : या अध्यायांत मनुच्या मुलींच्या विवाहांचे, त्यांच्या वंशाचे वर्णन, अनसूया आणि अत्रि यांचे महात्म्य, व अवतारप्रयोजन सांगितले आहे. सिद्ध क्षेत्रांत स्त्री प्रित्यर्थ तप करीत असलेल्या कर्दमाकडे स्वायंभुव मनु गेला आणि आपली कन्या देवहूति त्यास दिली. रुचि नामक ऋषीला आकूति ही

कन्या दिली, आणि कर्मठ दक्षास प्रसूति नांवाची कन्या दिली. रुचिपासून आकूतिचे ठिकाणी दक्षिणा नांवाची कन्या, यज्ञ नामक पुत्र, असे सोदर असू–नही दंपती झाले. कारण ते लक्ष्मी व विष्णू यांच्या कलाभूत अंशांनी जन्मलें होते. दक्षास प्रसूतीपासून अनेक मुली झाल्या, त्यापैकी कश्यपाला एक, धर्माला तेरा, अग्निस स्वाहा नांवाची एक कन्या, चन्द्राला सत्तावीस, पितरांना स्वधा नांवाची एक, व शंकरास सति नांवाची कन्या या प्रमाणें ब्रह्मदेवाच्या आज्ञे–नुसार दान केले. स्वरूपानंदांत संतुष्ट व निमग्न, भोगनिरपेक्ष अशा कर्दमा–पासून संतति होण्याच्या इच्छेने, पातिव्रत्याने कृश झालेल्या देवहूतीने त्याचीं प्रार्थना केली. तेव्हा कर्दमाने योगसामर्थ्यानें सर्व प्रकारचे ऐश्वर्य प्राप्त करून घेऊन भोग घेतला. तेव्हा देवहूतीला नऊ कन्या व कपिल नांवाचा सुत झाला.

मरीचये कर्दमोऽदात्कलाख्यां कश्यपो यतः ॥
अत्रये चानसूयां यत्पुत्राः श्रीभगवन्मुखाः ॥६॥
श्रद्धां चाङ्गिरसे यस्या जीवौतथ्यमुखाः प्रजाः ॥
हविर्भुवं पुलस्त्याय ह्यगस्त्याद्याश्च यत्प्रजाः ॥७॥
पुलहाय गतिं चास्याः कर्मश्रेष्ठादयः प्रजाः ॥
क्रियां च क्रतवे यस्या वालखिल्याभिधाः प्रजाः ॥८॥
वसिष्ठायोर्जां च चित्रकेत्वाद्या यत्प्रजास्तथा ॥
चितिं चाथर्वणे सोदाद्यस्या दध्यङ्मुखाः प्रजाः ॥९॥
ख्यातिं च भृगवे यस्याः प्रजा धातृमुखा इति ॥
पुत्रीर्विधीरितोऽदात्स ब्रह्मर्षिभ्यो विधानतः ॥१०॥
कर्दमः कृतकृत्योऽथ प्राप्य वीतैषणो द्रुतम् ॥
सलिङ्गं वैष्णवं स्वस्थो विजहार परात्मदृक् ॥११॥

अर्थ : त्यानंतर कर्दमाने मरीचीला कला नामक कन्या दिली. तिचे ठिकाणी कश्यप पुत्र झाला. अत्रिला अनसूया दिली, जिच्यापासून श्रीदत्ता–

त्रेयादि पुत्र झाले. अंगीरसाला श्रद्धा ही कन्या दिली, जिला जीव, औतथ्य ही प्रजा झाली. पुलस्त्यास हविर्भू दिली. तिच्यापासून अगस्ति आदि प्रजा झाली. पुलहास गति ही कन्या दिली. तिच्यापासून कर्मश्रेष्ठ आदि प्रजा झाली. ऋतु मुनीला क्रिया ही कन्या दिली. तिच्यापासून वालखिल्याभिध प्रजा झाली. वसिष्टास उर्जा दिली, तिच्यापासून चक्रकेतु आदि प्रजा झाली. अथर्वणाला चिती दिली, तिला दध्यङमुख प्रजा झाली. भृगुला ख्याति दिली. तिला धातृमुख प्रजा झाली. ब्रह्मदेवाच्या सांगण्यावरून त्याने ब्रह्मर्षींना विधिपूर्वक कन्यादान केले. याप्रमाणे सर्व एषणा पूर्ण करून, संन्यासाश्रम ग्रहण करून, आत्मनिष्ठरूपाने कर्दम विहार करूं लागला.

तद्वियोगातुरामम्बामृषिसेवाहताशुभाम् ॥
सर्वसाधनसंपन्नां सांख्याचार्य उपादिशत् ॥१२॥
विष्णवंशः कपिलस्तत्त्वज्ञानं यन्मुक्तिदं लघु ॥
येनात्मा पञ्चविंशाख्यो गम्यते पुरुषः परः ॥१३॥
नित्यमुक्तोऽपि सिद्धेशस्त्रैलोक्येऽन्तर्बहिर्मुनिः ॥
अव्याहतगतैश्वर्यश्चरत्यद्यापि सूरतः ॥१४॥
देवहूतिस्तदादेशाद्गता ब्राह्मीं स्थितिं ध्रुवाम् ॥
तत्पुत्र्योऽपि महाभागा ऋषिपत्न्योऽभवन्हि याः ॥१५॥
जायायुता मरीच्याद्याः पितृशासनतत्पराः ॥
सृष्टिप्रवर्तका आसन्सर्वे सुतपसोऽमलाः ॥१६॥

अर्थ : त्यानंतर कर्दमाच्या विरहामुळे आतुर झालेल्या, पतीच्या सेवे-मुळे जिचे अमंगल नष्ट झाले आहे अशा, सर्व साधनांनी संपन्न अशा देवहूतीस सांख्याचार्य कपिल महामुनींनी उपदेश केला. ह्रिष्णवंश कपिल मुनीने मुक्तिदायक असे तत्वज्ञान थोडक्यांत समजावून सांगितले. ज्यामुळें पंचविसावे तत्व, नामक, पर, पुरुष, असे आत्मरूप जाणतां येते. नित्यमुक्त, सिध्देश, अव्याहतगति, अमर्यादैश्वर्य असा तो महामुनी कपिल अद्यापि अवतार समाप्ति न करतां राहिला आहे. कपिलाच्या आदेशानुसार देवहूति माता विदेहमुक्तीप्रत पोचली.

तिच्या कन्यासुद्धा महान ऐश्वर्यवान ऋषिपत्न्या झाल्या. मरीचि आदि सर्व ऋषि पित्राज्ञातत्पर राहून स्वस्वजायायुक्त होऊन सृष्टिप्रवर्तक, मोठे तपस्वी व निर्मल अंतः करणयुक्त होऊन राहिले.

एतेभ्य एव सर्गोऽत्र विस्तृतोऽयं सनातनः ॥
धर्मोऽपि यदनुष्ठानात्प्रीणाति पुरुषं परम् ॥१७॥
अज्ञानेनावृतज्ञाना मोहात्संभोगतत्पराः ॥
धर्मतत्त्वमविज्ञाय शश्वद्यान्ति गतागतम् ॥१८॥
असत्त्वाभानरूपस्य द्विविधावरणस्य च ॥
नाश आत्मैक्यबोधेन विक्षेपान्तस्ततोऽमृतम् ॥१९॥
इति निश्चित्योपदेष्टुमजोऽद्वैतोऽप्यवातरत् ॥
योगपूर्वात्मविज्ञानं कृपणेभ्यो दयालुराट् ॥२०॥
अन्वर्थकोऽत्रिर्भगवान्द्वितीयो विधेः सुतो ब्रह्मविदस्य पत्नी ॥
पुत्री द्वितीया खलु कर्दमस्य पुत्रस्तयोर्दत्त इहाद्वितीयः ॥२१॥

अर्थ : या सर्व दांपत्यांपासून हा सर्ग अव्याधितपणे विस्तार पावला. ज्या धर्मानुष्ठानाने परम पुरुष संतुष्ट होतो तो सनातन धर्मही त्यांच्या करवी विस्तार पावला. ज्यांचे ज्ञान अज्ञानाने झांकले गेले आहे, मोहादि विकारांमुळे जे संभोगतत्पर झाले आहेत, ते धर्मतत्त्व न जाणल्यामुळे पुनः पुनः जन्म-मरणाच्या फेऱ्यांत सांपडतात. आत्मा भासत नाही व आत्मा नाहीच, अशा प्रकारच्या द्विविध आवरणांचा नाश आत्मैक्य बोधाने केल्याने विक्षेपाचा अंत होतो आणि त्यानंतर अमृतत्व लाभते. असा निश्चय करून जन्मादिविकारशून्य अद्वितीय, दयालुश्रेष्ठ असा आत्मेश्वर, योगपूर्वक आत्मज्ञानाचा उपदेश अज्ञ जीवांना करण्यासाठी या भूतलावर अवतीर्ण झाला. ब्रह्मदेवाचा द्वितीय पुत्र भगवान ब्रह्मर्षि अत्रि हा नांवाप्रमाणे अन्वर्थक असाच आहे. त्याची पत्नी ब्रह्मवेत्ती आणि कर्दमाची द्वितीय कन्या अनसूया होय. त्यांचा पुत्र दत्तात्रेय हा अद्वि-तीय असा आत्माच आहे.

निष्कल्मषं चित्तगतं तपस्तदत्र्याह्वयं मूर्तमिवास्य धातुः ॥
अविर्बभूवोत्तममीक्षणाद्यं ज्ञानीश्वरं चेति जगाद वेदः ॥२२॥
यदासुरः सूर्यमपि प्रकाशमाविध्यदेतं तमसात्मशक्त्या ॥
ब्रह्मेव माया तमविन्ददत्रिर्नान्ये समर्था इति विश्रुतं हि ॥२३॥
श्रीशाकलाम्नायऋचो महर्षिर्यः पञ्चमं मण्डलमभ्यपश्यत् ॥
यत्रात्मभूताग्निमुखामरेन्द्राः प्रशंसिता ये ह्युभयार्द्धिमूलाः ॥२४॥
रुग्णान्विलोक्याद्ययुगेऽत्र जन्तूं स्तप्त्वा तपो यस्त्वृच आयुराख्यम् ॥
लब्ध्वोपवेदं समगाद्भिषग्रा ऽत्रिः कृते वैद्य इति प्रसिद्धिम् ॥२५॥
यो मन्दबोधाय मनुप्रणीतां ज्ञात्वा स्मृतिं वेदमतां निगूढाम् ॥
चक्रे परां स्पष्टतरां सुधर्मा त्रयीरितार्थानुसृतां दयालुः ॥२६॥
स्वयं निरीहोपि मुदोपयेमे विधीरितो ब्रह्मविदां वरीयान् ॥
बुधोऽनुसूयां सुधिय सुशीलां सुलक्षणां भ्रातृमतीं सुरूपाम् ॥२७॥

अर्थ : ह्या ब्रह्मदेवाचे चित्तांतील सात्विक तपच जणू काय अत्यंत सुंदर आणि श्रेष्ठ ज्ञानाच्या स्वरूपांता अत्रिऋषिंचे रूपाने अवतीर्ण झाले असे वेद म्हणतात. मायेच्या योगाने ज्याप्रमाणे ब्रह्म आच्छादून टाकले जाते त्या प्रमाणे भूपृष्ठगत राहू स्वतःच्या तमोशक्तीने सूर्याला झाकून टाकतो ही गोष्ट फक्त अत्रिऋषीच प्रकट करू शकले. इतरांना ते शक्य झाले नाही, हे श्रुति-प्रसिद्धच आहे. शाकलशाखीय ऋग्वेदांतर्गत पांचव्या मंडलातील सर्व मंत्रांचा द्रष्टा अत्रिऋषींच आहे. ऐहिक आणि आमुष्मिक फल देणाऱ्या अग्नि प्रमुख देवांची स्तुति त्या मंडलातील मंत्रांमध्यें आहे. कृतयुगांमध्यें सर्व प्राणी रोग-ग्रस्त झालेले पाहून ज्याने तप केले व आयु नांवाचा उपवेद मिळविला आणि त्यामुळे ज्यांची वैद्यराज म्हणून सर्वत्र ख्याति झाली, अज्ञ लोकांकरतां सुलभ व्हावे म्हणून वेदसंमत, गुढार्थ, मनुप्रणीत, स्मृतीचें दुर्बोधत्व जाणून ज्यांनी मनुस्मृतीचे सुबोध रुपांतर करून वेदत्रयींनी कथिलेल्या सर्व गोष्टींचा खुलासा केला, स्वतः निरिच्छ असूनही ब्रह्मदेवाच्या इच्छेप्रमाणे बुद्धिमान, सुशील, सुलक्षण, भ्रातृमती, सुरुप अशा अनसूयेशी विवाह केला, तो अत्रिऋषि ब्रह्म-वेत्यांत श्रेष्ठ व ज्ञानी आहे.

श्रीकर्दमाख्येन महर्षिणेदं साध्व्यां स्वपत्न्यां खलु देवहूत्याम् ॥
उत्पादितं सत्तपसोऽतिधन्यं कन्यास्वरूपेण महाफलं सत् ॥२८॥
यां वै विधेः सूनुरयं महर्षिर्निष्कल्मषस्वीयतपः प्रभावात् ॥
अत्रिस्तपोर्थः खलु वेदवेत्ता समुद्वहे ब्रह्मपरो महात्मा ॥२९॥
पराङ्मुखत्वं न कदापि यस्याः स्वप्नेपि कश्चिन्न गतोऽतिथिर्हि ॥
भूत्वापि नग्नान्नमदात्सुरेभ्यः -
आतिथ्यमस्याः किमु वाच्यमग्रयम् ॥३०॥
देवीभिरुत्कर्षभियातिसाध्व्या यस्याः सुरेन्द्रा विधिविष्णुशर्वाः ॥
व्रतस्य भङ्गाय समीरितास्ते पुत्रीकृता धर्मबलाद्ययाऽमी ॥३१॥

पतिव्रताधर्मपरा वयं स्म
एवं सगर्वाः सुखर्यनार्थः ॥
सावित्र्युमामाः स्वसमीपमाप्ता
यया स्वदीप्त्या कलुषीकृताः स्युः ॥३२॥

पतिव्रतायाः खलु विप्रपत्न्याः शापेन नष्टं बहुकालमर्कम् ॥
देवेडितायाः खलु जीवगुप्त्यै समुद्गतिं प्रापयदेव भूयः ॥३३॥

अर्थ : श्रीकर्दम नांवाच्या महर्षिने देवहूति नांवाच्या साध्वी अशा स्वपत्नीच्या ठिकाणी आपल्या तपाने अतिधन्य असे जे फल कन्या रूपाने निर्माण केले, आणि जिला ब्रह्मदेवाचा महर्षि पुत्र अत्रि, की जो तप हेच कर्तव्य मानत असे, जो ब्रह्मपर, महात्मा, वेदवेत्ता होता, त्याने स्वतःच्या तप प्रभावाने लग्नांत वरले, जिच्या स्वप्नातहि कधी अतिथी विमुख होऊन गेला नाही, जिने ब्रह्मा, विष्णू आणि शिव यांना नग्न अन्नदान केले, तिच्या बद्दल आणखी काय सांगावे ? ह्या अनसूयेच्या अतिउत्कर्षाच्या भीतीने साध्वी श्रेष्ठ अशा तिच्या व्रतभङ्गासाठी ब्रह्मा, विष्णू व शिव यांच्या पत्न्यांनी आपल्या पतींना पाठविलें, आणि अनसूयेनें आपल्या धर्मबलाने त्यांना पुत्र बनविले. ते कोणाचेही पुत्र नव्हते पण पातिव्रत्यप्रभावामुळे त्यांना

अनसूया मातेचे पुत्र होणे भाग पडले. हे सर्व पुढे स्पष्ट होईलच. आम्हीच तेवढ्या पतिव्रता धर्मपरायण आहोत असा गर्व सावित्री, उमा व रमा यांना झाला, परंतु अनसूयेनें स्वतःच्या तपतेजाने त्यांना अवमानित केले आणि स्वतःचे जवळ येण्यास भाग पाडले. पतिव्रता अशा विप्रपत्नीच्या शापाने सूर्य बराच काळ नष्ट झाला (उदय पावला नाही) परंतु देवांनी स्तुती केल्या-नंतर जीवमात्रांच्या रक्षणासाठी पुन्हां तिने सूर्याचा उदय घडविला.

माण्डव्यशपेन मृतं रुजार्तं या कौशिकं त त्सहधर्मिणीड्या ॥
पश्यत्सु देवेष्वखिलेषु भूयो द्विजं सजीवं व्यकृणोत्सुसत्वा ॥३४॥

यदीहितालोचहृष्टचित्ताः
काजेश्वरास्ते तनया भवन्तु ॥
साध्वीति चाशीर्भिरनुत्तमाभि-
रिन्द्रादयो यां युयुजुः सुराग्रयाः ॥३५॥

जातालं मृदुला यदर्थमचला लीलाविलोलोऽचलो
भीत्यास्यां अनिलोऽनलोपि विमलोऽर्कश्चाभवच्छीतलः ॥
कालः कालयितुं स्वकालमबलं लोकं न चालं बलं
कः साध्व्या अमलं विशालमचलं ज्ञातुं प्रभुर्मङ्गलम् ॥३६॥

यत्सौन्दर्यं चन्द्रतुल्यं मतं चे-
द्धानन्तं संततं भासमानम् ॥
यत्पुत्रोऽपीन्दुस्तु वृद्धिक्षयार्तः
सौन्दर्याद्येऽपि त्रियामाप्रदीपः ॥३७॥

अर्थ : कौशिक नांवाचा रोगपिडित ब्राह्मण माण्डव्य ऋषींच्या शापानें मरण पावला. त्याच्या पत्नीने अनसूया मातेची प्रार्थना केली, तेव्हा सर्व देवांच्या समोर तिने स्वतःच्या पातिव्रत्यप्रभावाने त्याला सजीव केला. जिच्या आकांक्षित अशा दृष्टिपाताने इन्द्रादि देव हृष्टचित्त झाले आणि त्यांनी ' ब्रह्मा विष्णु व शिव हे तुझे पुत्र होवोत ' असा आशिर्वाद दिला. सती अनसूयेच्या

पायास खडे टोचू नयेत, काटे रुतूं नयेत म्हणून पृथ्वी मृदु झाली, पर्वत सुस्थिर झाले, भीतीनें वायु, अग्नि, व सूर्य शीतल झाले. काल हा अवसर पाहून मर्त्यलोकात राहिला. तो बलवान असूनही, व मर्त्य अबल आहेत हे माहित असूनही त्याने लोकांवर स्वतःची सत्ता चालविली नाही. त्या साध्वीचे विशाल आणि शुद्ध यश जाणण्यास कोण बरे समर्थ आहे? तिचे सौन्दर्य चन्द्रतुल्य म्हणावे तर ते कायमस्वरूप व निर्मल आहे. तिचा पुत्र चंद्र असूनही त्याचा प्रकाश मात्र रात्री तीन प्रहरच असतो. नित्य नसतो. म्हणूनच चन्द्राशी सौन्दर्याचे बाबतीत तुलना योग्य नाही हा भावार्थ.

दयाक्षमाशान्तिसुखैर्गुणैर्यो
युक्तोपि विष्णुर्भगवान्परेशः ॥
ययानुजत्वं खलु पुत्रतां च
संप्रापितोऽतः किमु वाच्यमन्यत् ॥३८॥

तेजस्वितार्कस्य च वर्ण्यते चेत्
सा कौशिकस्त्रीरितिशापकाले ॥
याता कुतोऽस्तोदयसंयुतस्य
तेजस्वितास्या अनिशं ततोऽर्च्या ॥३९॥

मन्ये धन्येयं न योषा विशेषा
मूर्ता जाता केवला चित्कलाऽत्र ॥
सौन्दर्याद्यं सद्गुणाश्चान्यथा तु
प्राप्याप्राप्ताः सर्वतोऽस्याः कुतोऽमी ॥४०॥

स्वभक्तिवृद्ध्या अगुणोपि विष्णुः
समीहितुं वै सगुणं पुरस्तात् ॥
स्वात्मानमेतामजडां स्वयोनि-
मकल्पयन्मामिव पूर्वमात्मा ॥४१॥

स्वरूपसाम्राज्यविधातुरत्रे
रेषानसूया महिषी सुपूज्या ॥
यथार्थतो वर्णयितुं न कोऽपि
समर्थ एतामतुलां त्रिलोक्याम् ॥४२॥
ब्रह्माजेशानां या जाता माता महाभागा ॥
मन्ये मान्येयं सा प्रत्यक्षा चित्कला साङ्गा ॥४३॥

अर्थ : दया क्षमा, शान्ति आदि गुणांनी युक्त असा भगवान विष्णु जिचा कपिलाच्या रुपाने धाकटा भाऊ व श्रीदत्तरूपानें पुत्र झाला तिचे महात्म्य काय वर्णावे ? सूर्याच्या तेजस्वितेची उपमा अनसूयेच्या तेजास द्यावी तर कौशिक पत्नीने शाप दिला त्यावेळी सूर्याची तेजस्विता नाहीशी झाली. शिवाय सूर्याच्या मागे अस्तोदय लागले आहेत. अनसूयेची तेजस्विता रात्रं-दिवस सारखीच असते, म्हणून ती श्रेष्ठ व पूजनीय आहे. ही केवळ श्रेष्ठ व धन्य स्त्री आहे एवढेच मी मानत नाही तर ती मूर्तिमती चित्कलाच आहे असे समजतो अन्यथा, प्राण्यांना एकत्रित रितीने अप्राप्य असे सौन्दर्यादि सर्व सद्गुण तिचे ठिकाणी कसे दिसलें असते ? विष्णुने स्वतः निर्गुण असूनही स्वभक्तीच्या प्रसारासाठी सगुणत्व प्राप्त करून घेण्याच्या इच्छेनें अनसूया मातेस जन्मस्थल निश्चित केले. वास्तविक माया जडस्वरूप आहे. अनसूया जडस्वरूप आहे. स्वरूपसाम्राज्य निर्माण करणाऱ्या अत्रिची ही पत्नी अनसूया अतिशय पूज्य आहे. हिचे महत्व यथार्थपणे वर्णन करण्यास तिन्हीलोकांत कोणीही समर्थ नाही. ब्रह्मा, विष्णु आणि महेश यांची जी माता झाली ती महाभाग्यवती, श्रेष्ठ अनसूया प्रत्यक्ष साकार झालेली चित्कलाच होय असे मी समजतो.

इति श्रीमद्दत्तात्रेयपुराणे मनुपुत्र्युद्वाहानुसूयात्रिमाहात्म्यदत्तावतार कथनं नाम चतुर्थोऽध्यायः ॥ २ । ४ ॥

अथ श्रीदत्तात्रेयाद्यवतारो नाम द्वितीयाष्टके पञ्चमोऽध्यायः ॥

तावालोक्यादिशद्ब्रह्मा द्वितीयं पुत्रमन्वितम् ॥
द्वितीयया मौनिपुत्र्या विनीतमनसूयया ॥१॥
कुलाद्रिमृक्षं ब्रह्मज्ञवरीयांश्च विधीरितः ॥
पत्नीयुतोऽत्रिः पुत्रार्थं त्र्यधीशोपास्तये ययौ ॥२॥
निर्वैरे शान्तबाधेऽद्रौ सर्वकालसुखावहे ॥
नानासत्फलपुष्पाद्रौ स्वमृते स तपोऽतपत् ॥३॥
तार्क्ष्यासनस्थोऽब्दशतं संयतात्माऽनिलाशनः ॥
निर्द्वन्द्वःसुतरां दध्यावेकं तादृक् प्रजासये ॥४॥

अर्थ : नम्र अशा त्या दोघांना (अत्रि व अनसूया यांना) सर्व देवांनी पाहिलें; आणि कर्दमाची द्वितीय कन्या अनसूया इच्यासहित असलेल्या ब्रह्म-देवाच्या द्वितीय पुत्राला म्हणजे अत्रिऋषींना तप करण्याची आज्ञा केली. नंतर ब्रह्मज्ञवरीयान् अत्रिऋषि पत्नीसहित ऋक्ष नांवाच्या पर्वतावर पुत्रप्राप्तीसाठी तप करण्याच्या उद्देशाने जाता झाला. निर्वैर, शान्त, दावाग्निआदि संकटा-पासून मुक्त, सर्व ऋतूंत सुखावह विविध फुले फळें यांनीं युक्त, गोड, रुचकर व हितकर अशा पाण्यानें युक्त अशा पर्वतावर अत्रिऋषींनीं तप केलें. गरुडा-सनावर राहून, इंद्रियदमन करून, वायु भक्षण करून, सुखदुःख व शीतो-ष्णाचा विचार न करतां, शंभर वर्षे श्रीविष्णूचें ध्यान केलें. हेतु हा कीं विष्णुप्रमाणे पुत्र व्हावा.

प्राणायामैधःसमिद्धतपोग्न्युत्तापिताखिलम् ॥
प्रापुरत्रिं कविष्ण्वीशाः स्वस्वचिह्नान्विताः शिवाः ॥५॥
तत्प्रभावहृतध्यानः स बहिर्गतदृक् शनैः ॥
हंसतार्क्ष्यवृषस्थांस्तान्दृष्ट्वा प्रीतोऽस्तुवन्नतः ॥६॥

अव्यक्तमाचिन्त्यं त्वां नौम्यविकार्यम् ॥
अग्राह्यमतर्क्यं नित्यं विभुमेकम् ॥७॥
देवं वरधीरं त्वानन्यमपारम् ॥
सर्गाब्धिसुतीरं धीलभ्यमदूरम् ॥८॥

अर्थ : अत्रींच्या प्राणायामरुपी काष्ठांनीं भडकलेल्या तपाग्नीनें अखिल ब्रह्मांड तापून गेलें, तेंव्हा आनन्दरुप असे ब्रह्मा, विष्णु व महेश हे तिन्ही देव श्रीवत्सादिक स्वचिन्हें धारण करून अत्रिपुढें आलें. त्यांच्या प्रभावानें अत्रि ऋषींचे ध्यान आकृष्ट झालें व त्यांची वृत्ती हळूहळू बाहेर आली. हंस, गरुड व नंदी यांवर आरूढ झालेल्या त्या तिघांना पाहून आनंदित होऊन अत्रींने त्यांची स्तुती केली. कोणत्याच प्रमाणांनी व्यक्त होणार नाहीं (अव्यक्त), सूक्ष्म देहसुद्धां नसल्यानें ज्याचें चिंतन करता येणार नाहीं (अचिन्त्य), स्थूलदेहाभावामुळें अविकार्य बुद्धींद्रियाना अग्राह्य, अतर्क्य, सत्य व्यापक, अखंडचिदेकरस, अशा तुला मी नमस्कार करतो. हे इंद्रियांतःकरणप्रकाशका (देवा), श्रेष्ठबुद्धिप्रेरका, अनन्या, अपारा, सृष्टीरुपी सागराच्या काठा, बुद्धिगम्या, नित्यसन्निधा (अदूरा) तुला माझा नमस्कार असो.

श्रीविष्णुमनादिं त्रीशं जगदादिम् ॥
विश्वभ्रमसंधिं नष्टासजनाधिम् ॥९॥
कूटस्थनिजैकांशोद्भावितविश्वम् ॥
कर्षन्तमनेकां मायामिह विश्वम् ॥१०॥
सर्वज्ञमनन्तं व्यस्तं च समस्तम् ॥
सर्वं गुणवन्तं सत्यं भगवन्तम् ॥११॥
संस्ते गुणभेदात्कायात्मविभेदाः ॥
सृष्ट्यादिनिदानस्त्वं चानभिमानः ॥१२॥
लीलातनुसेवाशीलानुयुगं वा ॥
पातापि न लिप्तो ज्ञातास्य न लिप्तः ॥१३॥

अर्थ : तूंच अनादि, विष्णु, त्रिगुणमायेचा स्वामी, जगताचें आदिकारण, विविध सृष्टीभ्रमांचे अधिष्ठान, आणि स्वभक्तांची पीडा नाहीशी करणारा आहेस. तूं कूटस्थ आहेस. अविकृत अशा तुझ्या एकांशानें हें विश्व भासमान झालें आहे. तूंच जीवरूपानें विश्वांत प्रवेश करतोस. तू अखिल मायेचा आकर्षक आहेस. तूं सर्वज्ञ, अनन्त, व्यस्त, समस्त, सर्व, गुणवन्त, सत्य आणि भगवंत आहेस. हे सन् (सत्यरूपा) ब्रह्मादिक तुझेच आत्मभेद आहेत. तूंच सृष्ट्यादिकांचे मूळ कारण असून निरभिमानी आहेस. तूं प्रत्येक युगांत योग्य असे शरीर धारण करतोस तसेच तूं विश्वरक्षक, ज्ञाता असूनही निर्लिप्त आहेस.

वाक्चित्तपरैको ध्यातोऽत्र मयैकः ॥
यूयं त्रय आप्ताः को वोऽत्र स आप्तः ॥१४॥
ऊचुस्त ऋषे सत्संकल्प न तेऽसत् ॥
ह्यं हि य एको ध्यातः स इतः कः ॥१५॥
मादृक्सुतलब्ध्यै वृत्तश्रमसिद्ध्यै ॥
दत्तोऽद्य मयात्माऽयं ते सकलात्मा ॥१६॥
एवं दत्वा वरं सद्यो देवा अन्तर्हितास्त्रयः ॥
अथावतरदग्रेऽत्रेर्दत्तात्रेयश्चतुर्भुजः ॥१७॥
आद्योऽवतारोऽजस्यायं विभोर्लीलाविहारिणः ॥
यद्ध्यानात्पापमुक्तः सन् याति श्रेय इति श्रुतम् ॥१८॥

अर्थ : वाणी आणि चित्त यांना अगोचर असणाऱ्या हे देवा, मी तर एकाचेच ध्यान केले आहे असे असतां तुम्ही तिघेजण प्रकट झालेले आहात. तर मी ज्याचे ध्यान केले आहे असा माझा हितकर्ता तुम्हापैकी कोण आहे ? तें मला कृपा करून सांगा याप्रमाणे अत्रिऋषींचे भाषण ऐकून ते देव म्हणाले, हे सत्यसंकल्प ऋषे, तुझें संकल्पित असत्य होणार नाही. तूं ज्याचें ध्यान केले आहेस तो आमच्याहून निराळा कोण असेल बरे ? अर्थात् कोणीच नाहीं. आम्ही एकरूपच आहोत. माझ्यासारखा पुत्र व्हावा म्हणून केलेल्या तपा-

नुष्ठानाचें फल म्हणून आज मी तुला माझें आत्मस्वरुप दिलें आहे. " याप्रमाणे वर देऊन ते तिघे देव अंतर्धान पावले. त्यानंतर चतुर्भुज श्रीदत्तात्रेय अत्रि-मुनींपुढे अवतीर्ण झाले. लीलाविहारी आणि अजन्म अशा प्रभूंचा दत्तात्रेय हा प्रथम अवतार आहे, कीं ज्याच्या ध्यानाने प्राणि पापमुक्त होऊन कल्याण-प्रद मोक्षास पोचतो, असे सर्वश्रुत आहे.

दृष्ट्वा स्वं चारुसर्वाङ्गं प्रतीतावपि दंपती ॥
आशङ्कितान्तरौ ज्ञात्वा त्र्यधीशः प्राह सर्ववित् ॥१९॥
आदितोऽर्भसुखाशीच्छा विद्यते वां हि तद्द्रुतम् ॥
प्रभवन्तु मदंशोत्थाः सुपुत्राः सुयशस्कराः ॥२०॥
एवं लब्धवरः सोऽत्रिस्तं नत्वा जायया सह ॥
स्वाश्रमं तदनुज्ञातो ययौ तद्गतमानसः ॥२१॥
चतुर्भुजावतारोऽयं शाण्डिल्याद्याः यदर्चकाः ॥
निःश्रेयसं गताश्चाथावतारोऽस्यान्य उच्यते ॥२२॥
नारदस्त्वेकदाऽऽतिथ्यं पातिव्रत्यं च वीक्ष्य सत् ॥
अत्रिप्रियायाः सावित्रीश्रीशाभ्यः प्रशशंस तत् ॥२३॥
तदा रुष्टाः प्रैरयंस्ताः पतीन्स्वाधीनभर्तृकाः ॥
अनसूयासत्त्वहृत्यै सासूया देवता अपि ॥२४॥

अर्थ : मी तुम्हास सर्वस्वाचें (स्वात्म्याचे) दान केले आहे हें ऐकून तसेच सर्वाङ्ग सुंदर अशा स्वतःला (दत्तात्रेयास) पाहून आनंदित झालेल्या त्या दंपत्याच्या मनांत लालनपालनाची इच्छा शिल्लक आहे हे जाणून सर्वज्ञ श्रीदत्तात्रेय त्यांना म्हणाले, " अर्भकाची आरंभापासून प्राप्ती व्हावी अशी तुमची इच्छा आहे, तर माझ्या अंशापासून सुयशस्कर असे सुपुत्र तुम्हास होवोत " अशा प्रमाणे वर मिळाल्यांवर श्रीदत्तात्रेयांना नमस्कार करून, श्रीदत्तात्रेयांचे चिंतन करत अत्रिमुनी प्रभुंच्या परवानगीने स्वतःच्या आश्रमांत परत आले. ज्याचे शाण्डिल्यादि अर्चक होते तो दत्तात्रेयांचा पहिला अवतार-

शाण्डिल्यादि मुनींनी मोक्ष प्राप्त करून घेतला. आता दुसऱ्या अवताराचें वर्णन करतात. अत्रिऋषींची भार्या अनसूया हिचे पातिव्रत्य व आतिथ्य पाहून एकदां नारदमुनींनी लक्ष्मी, सावित्री व पार्वती यांच्या समोर त्यांची स्तुती केली. तेव्हां त्या तिघी रुष्ट झाल्या व पती त्यांचे स्वाधीन असल्यानें अनसूयेचे सत्त्व हरण करण्याविषयीं आपापल्या पतींना त्यांनी उद्युक्त केले. देवतांनाही असूया असते.

भूत्वाऽतिथयोऽत्रेर्वेश्मैत्य दिनान्ते ॥
ईशाः सति नोऽन्नं देहीत्यवदंस्ते ॥२५॥
नग्ना यदि भूत्वाऽन्नं दास्यसि हृष्टा ॥
गृह्णीम उ नो चेद्यामस्त्वयि रुष्टाः ॥२६॥
साऽश्रुत्य तदर्थ्यं मत्वाऽर्भवदेतान् ॥
नग्नाऽभवदैक्षत्तानेव नु पोतान् ॥२७॥
दैवात्स्नुतदुग्धं दत्वेष्टमथो तान् ॥
प्रास्वापयदुच्चैः सुश्रावितगीतान् ॥२८॥
अत्रिः कृतकृत्योऽप्येत्यापि वनात्तत् ॥
श्रुत्वाऽखिलमीशान् ज्ञात्वाऽस्तुवदेतान् ॥२९॥

अर्थ : स्वपत्नीच्या आग्रहानुसार तिघा देवांनीं अतिथींचे वेष घेतले, आणि मध्याह्नसमयीं अत्रीऋषींच्या आश्रमांत आले, आणि म्हणाले, " हे सति अनसूये, आम्हास अन्न दे. तूं नग्न होऊन आनंदाने अन्न देशील तर आम्ही तें घेऊ, अन्यथा रुष्ट होऊन आम्ही परत जाऊं " [येथे " नग्न होऊन " याचा गर्भितार्थ असा कीं, " माथावरण रहित होऊन "] ती अर्थपूर्ण याचना ऐकून अनसूयेने विचार केला कीं हे अतिथि माझी बाळेंच आहेत. आणि नग्न होऊन त्यांचेकडे पाहू लागतांच आपल्या इच्छेप्रमाणें ती खरोखर अर्भकें झाल्याचें दिसलें. नंतर दैवयोगानें तात्काळ स्त्रवलेल्या पान्ह्यानें त्यांना तृप्त करून, मधुर गाणी म्हणून त्यांना झोपविलें. नंतर स्वतःची नित्यकर्में आटोपून

अत्रिऋषी आश्रमांत परत आले. आणि अनसूयेकडून सर्व हकीगत ऐकली. तेव्हां त्यांना (बालकांना) साक्षात् देव आहेत हे जाणून त्यांची स्तुति केली.

देव्योऽप्यृषिवाक्यादाप्ताः पतिकामाः ॥
स्वस्वेऽनभिज्ञा ह्रीता हतकामा : ॥३०॥
साऽथाऽस्तुवदीशानासन्निजरूपैः ॥
व्यक्ताः खलु तल्पे तेऽप्यर्भकरूपैः ॥३१॥
स्त्रीभिः सह ताभ्यां दत्वेष्टवरं ते ॥
स्वं स्वं पदमीयुस्तस्थुस्तु सुतास्ते ॥३२॥
सैष द्विभुजोऽन्योऽजस्याप्यवतारः ॥
योऽत्रास्ति दलादालर्कादिसुतारः ॥३३॥
अन्योऽप्यवतारः षड्बाहुरुदारः ॥
वच्म्यार्थिविदूरं सद्योगविदूरम् ॥३४॥
भर्तृनाशमिनोद्गत्या श्रु (ज्ञा) त्वा माण्डव्यशापतः ॥
कौशिकस्त्री शशापार्कं तदान्ध्यात्पीडितं जगत् ॥३५॥
अत्र्याश्रमं कादिदेवा गत्वा नत्वा सभार्यकम् ॥
आनिन्युः कौशिकगृहं सतीबोधाय कातराः ॥३६॥

अर्थ : तिन्ही देवांच्या पत्न्यांना ही हकीगत ब्रह्मर्षि नारदांकडून सविस्तर समजली, तेव्हां त्या अनसूयेच्या आश्रमांत आल्या. आपल्या पतींना पुन्हां प्राप्त करून घेण्यासाठीं त्या आल्या, परंतु बाल्यावस्था प्राप्त झाल्यामुळे त्या पतींना ओळखू शकल्या नाहीत. स्वतःचा मोठेपणा मिरविण्याची त्यांची आकांक्षा नाहींशी झाली आणि त्या लज्जित झाल्या. नंतर अनसूयेनें त्या तिघा देवांची स्तुति केली. तिला जरी ते निजरुपांत दिसत होते तर व्यक्तपणें मात्र शय्येवर बालस्वरुपातच दिसले. नंतर अत्रि आणि अनसूया यांना इष्ट वर देऊन ते तिन्ही देव स्वपत्नीसह स्वतःच्या स्थानीं गमन करते झाले. आणि पुत्ररूपानेही अत्रिदंपतीचे सुत म्हणून राहिले. हाच श्रीदत्तात्रेयांचा दुसरा अवतार, की जो दलादन आणि अलर्क आदि अनेकांचा उद्धार केला, आणि

अजून ह्या भूतलावर आहे. आणखीही एक श्री दत्तावतार षड्भुज आहे त्याने दयावंत होऊन जनोद्धारासाठी गर्भवासादिकांचाही स्वीकार केला आहे. बहिर्मुख जनांना तो फार दूर असतो, पण आत्मभूतत्वामुळे तो सज्जन आणि योगी यांना फार जवळचा असतो. त्याचे आता वर्णन करतो. माण्डव्य-ऋषींच्या शापानें, सूर्योदयाबरोबर स्वपतीचा प्राणनाश होणार हें जाणून [ऐकून] कौशिक पत्नीनें सूर्यास शाप दिला. सूर्याच्या अभावानें अंधःकार पसरला व जग पीडित झालें. तेव्हां ब्रह्मा, विष्णु, महेशादि सर्व देव घाबरले व स्वस्वभार्यांसह अत्रिऋषींच्या आश्रमांत आले, लीन होऊन नमस्कार केला. आणि अनसूयेला कौशिकाच्या घरी घेऊन आले उद्देश असा कीं, अनसूयेने कौशिक पत्नीला उपदेश करावा व सूर्याला दिलेला शाप तिनें मागे घ्यावा.

अनसूयोवाच साध्वि त्वच्छापान्नोदितोऽप्यसौ ॥
तत्कल्पोऽत्रास्य मा भीस्ते सूर्यमाश्वानयोद्गतिम् ॥३७॥
तदाऽप्युदयमेहीना ३ इत्युक्तोऽसौ तदोदितः ॥
कौशिकस्तु मृतो द्राक् तमनसूयाप्यजीवयत् ॥३८॥
तदा हृष्टः सुराः साध्वि कुक्षौ तेऽवतरन्त्वजाः ॥
कविष्णवीशा इति वरं दत्वा ते त्रिदिवं ययुः ॥३९॥
स्वधामैत्यात्रिणाऽप्यूर्ध्वरेतसा मूर्तिमद्धृदा ॥
ध्यात्वाऽकर्माशया ईशा न्यस्ता जायान्तरे परे ॥४०॥
वरप्रभावाद्धृत्वाऽपि गर्भवत्तानसूत सा ॥
मार्गे प्रदोषे पूर्णायां बुधेऽजोऽवातरन्मृगे ॥४१॥

अर्थ : अनसूया कौशिक पत्नीला म्हणाली, "हे साध्वी, तुझ्या शापामुळे सूर्योदय झाला नाही. त्यामुळें प्रलयकाल येईल. तेव्हा तू भिऊं नकोस, सूर्यास उदयास आण. तेव्हां "हे सूर्या, तू उदयास ये" असे उच्च स्वरानें कौशिकपत्नीनें म्हटल्यावर सूर्य उगवला. ताबडतोब कौशिक मृत झाला, परंतु अनसूयेनें त्याला त्वरित जीवंत केलें. तेव्हां सर्व देव आनंदित झाले व " हे साध्वि अनसूये, तुझ्या पोटी ब्रह्मा, विष्णु व महेश हे जन्म घेतील. ते जन्मा-

तीत असूनही तुझ्या तपःप्रभावामुळे ते तुझें पुत्र होतील." असा वर देऊन ते स्वर्गी गेले. नंतर अत्रिऋषी स्वाश्रमांत परत आले. ऊर्ध्वरेत अशा त्या महर्षीनें मूर्तिमान अशा तीन देवांचें ध्यान केलें, आणि प्रसन्न मनानें स्वजायेच्या ठिकाणीं त्यांची स्थापना केली. देव हे कर्माशयरहित असल्यानें त्यांची ग्राम्यधर्मानें स्त्रियांचे उदरांत स्थापना करतां येत नाहीं. वरदानाच्या प्रभावानें अनसूयेनें स्वतःचे उदरांत त्रिमूर्तींची धारणा केली, आणि मार्गशीर्ष पौर्णिमा, बुधवार, प्रदोषकाल या शुभ मुहूर्तावर अजन्मा अशा त्रिमूर्तींना जन्म दिला.

ज्योतिर्मय आत्मा योऽजो भगवान्सः ।।
स्वं दर्शयितुं प्रागुक्तैक्यमुभाभ्याम् ।।४२।।
स्रग्भाजनवाद्योच्छूलाब्जसुचक्रैः ।।
युक् षड्भुज आस प्रादुः स्मितवक्त्रः ।।४३।।
ज्ञात्वा तदभीष्टं भूयोऽर्भकरूपैः ।।
तस्थावथ हृष्टौ तौ तैश्च सुरूपैः ।।४४।।
दत्ताख्योऽग्रजः स्वयं विष्णुः कांशश्चन्द्रोऽन्वयर्धिकृत् ।।
चण्डोऽप्यनुग्रहपरो दुर्वासाश्च हरांशजः ।।४५।।

अर्थ : जो ज्योतिर्मय, आत्मा, व जन्मादिरहित आहे तो भगवान श्री दत्तात्रेय पूर्वी कबूल केलेले, सांगितलेले तिन्ही देवांचे ऐक्य [श्लोक १५ पहावा] उभयतांना दाखविण्यासाठीं, रुद्राक्षमाला, कमंडलू, डमरू, उत्कृष्ट शूल, कमलपुष्प व सुदर्शन चक्र यांनी युक्त अशा षड्भुज स्वरूपांत नितांतमनोहर स्मितहास्य करीत प्रकट झाला. अत्रिदंपत्तीचे अभीष्ट जाणून पुन्हां अर्भक-रूपांनीं श्रीदत्तप्रभु आश्रमांत राहिले. तीं सुंदर रूपें पाहून उभयतांना फार आनंद झाला. विष्णु दत्तरूपानें ज्येष्ठ पुत्र, ब्रह्मदेव चंद्ररूपाने द्वितीय पुत्र, [हाच वंशवृध्दिकर होय] आणि शंकराचा अंश दुर्वास रूपानें तृतीय पुत्र झाला. दुर्वास अत्यंत कोपिष्ठ असूनही भक्तानुग्रह करणारा होता.

इति श्रीदत्तपुराणे सार्धत्रिसाहस्र्यां संहितायां द्वितीयाष्टके पञ्चमोऽध्यायः ।।

अथ दशावतारचरितं नाम द्वितीयाष्टके षष्ठोऽध्यायः ।।

निहोता यः स्वभक्तेभ्यो दत्त आन्वीक्षिकीं प्रभुः ।।
को जानातीह तत्कर्मप्रयोजनगुणादिकम् ।।१।।
योगीन्द्रवदान्यः साक्षाद्भगवान्यः ।।
श्रीदत्त इहान्यः कस्तत्सममान्यः ।।२।।
सोमो द्रुहिणांशो वंशर्द्धिकृदेषः ।।
भूत्वाऽत्र रसात्मा सर्वौषधिपोषः ।।३।।
मत्स्याद्यवतारा विष्णोर्जनताराः ।।
जाता य इहैशस्तत्कारणमंशः ।।४।।
राजर्षिरम्बरीषाख्यः सौरिर्भागवतोत्तमः ।।
एकादशीव्रतपरः सर्वदा विष्णुचिंतकः ।।५।।
तद्गृहं दाक्षिणे देशे दुर्वासा द्वादशीदिने ।।
प्रातरेत्यार्पयाऽलं मे भोजनं चेत्युवाच तम् ।।६।।

अर्थ : जो अग्निरूपानें देवांना हविर्भक्षणासाठी आवाहन करतो. आणि स्वभक्तांना आत्मविद्या देतो, त्या श्रीदत्तात्रेयाच्या कर्माचे, अवताराचें प्रयोजन व गुणादिक जाणण्यास कोण बरे समर्थ आहे ? जो योगीन्द्रश्रेष्ठ, साक्षात् भगवान तो श्रीदत्तात्रेयच आहे. या जगांत त्याच्या बरोबरीस येईल अशा श्रेष्ठतेचा कोण दुसरा आहे ! ब्रह्मदेवाचा अंश घेऊन चंद्ररूपाने हा वंश-वृद्धि करतो आणि रसात्मा होऊन सर्वौषधींचे पोषण करतो. मत्स्यादि अवतार विष्णूचे झाले ते सर्व लोकांना तारकच झाले. परंतु शापरूपाने शंकराच्या अंशापासून दुर्वास झाला. पूर्वी सूर्यवंशात अंबरीष नांवाचा भगवद्भक्त असा श्रेष्ठ राजा होऊन गेला. तो एकादशीचे व्रत करणारा व सर्वदा विष्णुचे चिंतन करीत असे. तो दक्षिण देशांत रहात असे. एकदां द्वादशीचे दिवशी प्रातःकाळी दुर्वास ऋषि त्याचे वाड्यात गेले व मला पुरेसें भोजन दे असे राजास म्हणाले.

राजर्षिः प्राह तं सिद्धमन्नमाश्वद्य पारणा ॥
अतः कृत्वाऽऽह्निकं शीघ्रमेहि मे त्वं प्रियोऽतिथिः ॥७॥
तथेऽत्युक्त्वाऽपि दुर्वासा नदीं गत्वा परिक्षितुम् ॥
चिरं तदाऽऽतिथेयत्वं चक्रे कर्म समाहितः ॥८॥
नैतावन्तं कालमागः स यायात्पारणाक्षणः ॥
व्रतभङ्गस्तेन शस्ता भुक्तिर्हित्वा मुनिं न मे ॥९॥
काऽपि हानिर्नांबुपानादिति मत्वा पपौ जलम् ॥
तदैत्य पीतं दुर्वासा दृष्ट्वा तं कुपितोऽब्रवीत् ॥१०॥
हित्वा क्षुधितं मां राजर्ष्यधम त्वम् ॥
पीतं तत एहि श्रेष्ठोऽप्यधमत्वम् ॥११॥
रे त्वं नु कुवृत्तः प्रेष्ठव्रतमत्तः ॥
पापोऽसि हि वृत्तः शापं वह मत्तः ॥१२॥

अर्थ : राजर्षि अंबरीष दुर्वास ऋषींना म्हणाला, " अन्न लवकरच सिद्ध होत आहे. आज पारणे आहे. तरी सर्व आन्हिक आटोपून आपण ताबडतोब यावें. आपण माझे प्रिय व सन्माननीय अतिथि आहात " दुर्वासांनी 'ठीक आहे' असे उत्तर दिले व नदीवर जाऊन, राजाची परीक्षा घेण्यासाठी बराच वेळ शांतचित्ताने आन्हिक कर्मांत घालविला. बराच वेळ झाला तरी दुर्वासमुनी आले नाहींत तेव्हां पारण्याचा क्षण निघून जाईल व व्रतभंग होईल आणि मुनींना सोडून मी भोजन करणे हेही योग्य नव्हे, असा विचार करून राजाने तीर्थजल पानानें पारणें करण्याचे ठरविले व तीर्थजल प्राशन केले. कारण तीर्थजलपानानें कोणतीच हानी होणार नाही हा त्याचा विचार. तात्काळ दुर्वास तेथे आले व राजाने पाणी प्याल्याचे पाहून क्रुद्ध होऊन म्हणाले, " हे राजा, तूं अधम आहेस. क्षुधित अशा मला सोडून तूं पाणी प्यालास, तेव्हा श्रेष्ठ असूनसुद्धां तूं अधमत्वाला जा. अरे तूं दुष्टाचरणी आहेस, तरी मी देतो तो शाप घे."

मत्स्यादिवियोनीर्याहीति तदुक्तिम् ॥
श्रुत्वाऽपि स दध्यौ विष्णुं कृतमुक्तिम् ॥१३॥
तर्ह्येत्य नु विष्णुः प्राहाप्यभविष्णुः ॥
तं मेऽर्पय शापं भक्ते न च तापम् ॥१४॥
प्रेष्ठा मम भक्ता ये मद्व्रतसक्ताः ॥
नार्हा इह युक्ता जन्यै य उ मुक्ताः ॥१५॥
ब्रह्मण्य उताहं युष्मद्व्रतवाहम् ॥
मां योजय शक्तं शापेन न भक्तम् ॥१६॥
श्रुत्वेति तदुक्तं ज्ञात्वाऽपि स युक्तम् ॥
शापं हरयेऽदात्तं सोऽप्यज आदात् ॥१७॥

अर्थ : " मत्स्यादि विविध अधम योनींना तू जा " असे त्यांचे भाषण ऐकूनसुद्धां राजा स्वभक्तांची मुक्ती करणाऱ्या विष्णूचे ध्यान करत बसला. ध्यानसमयींच श्रीविष्णू तात्काल प्रकट झाले व म्हणाले, " हे दुर्वासमुने, मी जरी अभविष्णू (अजन्मा) आहे तरी तुझा शाप मला देऊन टाक. माझ्या भक्ताला ताप देऊं नकोस. माझ्या व्रतांतच जे आसक्त असतात असे माझे भक्त मला फार प्रिय असतात. जे भक्त मुक्त झालेले असतात ते पुन्हां जन्ममरणांत जाण्यास योग्य नाहीं. हे ब्रह्मण्या, तुमचे व्रत जो धारण करतो त्या मलाच शाप द्या. मी समर्थ आहे. भक्तास शाप देऊं नका." श्री विष्णूचे हें भाषण ऐकून, व तें योग्यच असे जाणून दुर्वासांनी विष्णूला तो शाप दिला व त्या अजन्म्यानेही तो आनंदानें स्वीकार केला.

मत्स्योऽब्धिविहारः पूर्वो ह्यवतारः ॥
जातः श्रुतिहारः पूज्यो मनुतारः ॥१८॥
नष्टामरबाधः कूर्मोऽथ धराधः ॥
गत्वा वहतीशः क्ष्मां योऽप्यमृतेशः ॥१९॥
भूभृत्स हिरण्याक्ष घ्नोऽत्र तृतीयः ॥
भूदार उदारो यज्ञो भजनीयः ॥२०॥

भृत्योक्त्यनुसारी पूर्वासुरवैरी ॥
नाम्नाऽपि नृसिंहः साक्षाच्च नृसिंहः ॥२१॥
यो वामनवेषः सन् पञ्चम एषः ॥
याञ्चोपधिबध्दस्तेनो बलिरध्दा ॥२२॥
दूराद्क्षयकामः स्याम्दार्गवरामः ॥
क्ष्मादो गुरुदासः षष्ठोऽब्धिनिवासः ॥२३॥
राट् सप्तम आसीद्रामो वनवासी ॥
पित्रुक्त्यनुसारी रक्षोलयकारी ॥२४॥
वर्ण्योऽष्टम इष्टः कृष्णो हतदुष्टः ॥
यः षोडशनारी साहस्रविहारी ॥२५॥

अर्थ : नंतर पहिला मत्स्यावतार झाला. वेदांचा शोध लावण्यासाठी समुद्र संचार केला. वैवस्वत मनूचे रक्षण केले. दुसऱ्या अवतारांत श्रीमहाविष्णूंनी कूर्मरूप घेतले. व सागरांत बुडालेल्या पृथ्वीच्या खालीं जाऊन पृथ्वी स्थिर केली. तो ईश्वर मोक्ष व अमृत यांचा स्वामी आहे. तिसरा अवतार वराहाचा. ह्या अवतारांत हिरण्याक्षाचा वध करुन पृथ्वीला स्थिर केली. यज्ञाचा आधार असा हा अवतार उदार व भजनीय आहे. भूमी ज्याची पत्नी आहे अशा विष्णूचा हा अवतार आहे. चौथा नृसिंहावतार. असुरांचा वैरी आपल्या भक्तांचे वचन पुरे करणारा, नांवाने व खरोखरच नृसिंह (माणूस व सिंह याचे संयुक्त रूप असणारा) हा अवतार होय. पांचवा वामन अवतार. याचनेचे निमित्त करून याने बलिराजाला बद्ध करून ठेवलें. यज्ञयागात तो देवांचा भाग हरण करीत असे. सहावा अवतार परशुरामाचा. दुष्ट अशा क्षत्रिय राजांची समूळ हत्त्या करण्याची त्याने इच्छा केली, ब्राह्मणास पृथ्वी दान दिली, आणि पितृभक्ति करून समुद्रात जाऊन राहीला. सातवा अवतार दाशरथि रामाचा. त्याने पितृआज्ञा पाळून वनवास पत्करला व राक्षसांचा नाश केला. आठवा अवतार भगवान श्रीकृष्णाचा. तो प्रिय, दुष्टांचा नाश करणारा, आणि सोळा हजार स्त्रियांचा स्वामी होता, तरीही ब्रह्मचारी होता.

बुध्दो नवमोऽयं विस्तारितमायम् ॥
यं कोऽपि न वेद सोऽप्यावृतिमर्दः ॥२६॥
म्लेच्छक्षयकर्ता कल्की वृषभर्ता ॥
विप्रो भाविताऽर्थ्यः शूरो दशमोऽर्च्यः ॥२७॥
अन्येऽप्यवताराः सध्दर्मसुताराः ॥
तत्कर्मगुणाद्यं को वेत्त्य न वद्यम् ॥२८॥
आत्मैवमधीशो योऽजोऽव्यय ईशः ॥
मायावशतोऽर्थान्कायानभजद्यान् ॥२९॥
ते सात्वतपुष्ट्यै न स्वीयसुतुष्ट्यै ॥
पूर्णो गतकामः कोऽप्यस्य न कामः ॥३०॥
जन्मास्य सुदिव्यं कर्मापि च भव्यम् ॥
तत्त्वादिह वेत्ता सत्त्वावृतिभेत्ता ॥३१॥
रागादिविमुक्तः साक्षाजनिभक्तः ॥
जन्यार्तिविमुक्तः सन्यात्यजमाप्तः ॥३२॥

अर्थ : प्रस्तुतचा नववा अवतार बुध्दाचा असून मायेच्या आवरणामुळे त्याला कोणी जाणूं शकत नाही. परंतु तो भक्तांच्या मायावरणाचा व जन्म-मरण फेऱ्याचा नाश करणारा आहे. दहावा कल्की अवतार हा म्लेंछांचा नाश करणारा, धर्मपालक, ब्राह्मण, प्रार्थनीय आणि शूर असा होणार आहे. तो सर्वांना पूजनीय होईल. यांशिवाय खूप अवतार आहेत कीं धर्माचे रक्षण ज्यांनी केले आहे. पण त्यांचे कर्म, गुण आदि संपूर्ण जाणण्यास कोण समर्थ आहे ? आत्माच अधीशरूपाने सत्ता चालवितो. तो अज, अव्यय व सर्व सामर्थ्यवान् आहे. परंतु भक्तकामना पुऱ्या व्हाव्यात या उद्देशाने वंध असे निरनिराळे अवतार धारण करतो. त्यास स्वतःचा संतोष कांही मिळवावयाचा नसतो. कारण तो पूर्ण, तृप्त असाच असल्याने कोणतीही इच्छा उरलेली नसते. ईश्वराचे जन्मादि अत्यंत दिव्य, तसेंच कर्मही भव्य असते, हे जो खरोखर जाणतो तोच मायावरणाचा भंग करूं शकतो.

प्रेम, लोभ यांपासून मुक्त होऊन, जो साकार भगवद्भक्त होतो तो जन्ममरणादि पीडांपासून मुक्त होऊन, जन्मादिविहीन अशा परमात्म्याशी एकत्व पावतो.

एवं सुलभोऽयं त्यक्त्वामुमुपायम् ॥
नारं श्रितमायं यात्येतदपायम् ॥३३॥
स्वस्य प्रकृतिर्योस्मिन्हेतुरवार्या ॥
रागाद्यवशस्तां जह्याच्चिरमाप्ताम् ॥३४॥
सूपायदुरापः शापात्स सुखापः ॥
मुक्त्या अनुवेलं यद्भक्तिरिहालम् ॥३५॥
तस्यांशसुलीलां वक्ष्येऽमृतमूलाम् ॥
संक्षेपत एषाप्या विद्यकशोषा ॥३६॥
एकाग्रहृदं कं शङ्खासुर एत्य ॥
हृत्वाखिलवेदान्लीनोऽभवदब्धौ ॥३७॥

अर्थ : अशा प्रकारें स्वप्रकाश व अपरोक्षरूप आत्मा सुलभ आहे. परंतु ह्या भजनादिरूप उपाय न स्वीकारतां, त्याचा अनादर करून, मायाश्रित नरसमूह जन्मादिरूप अपायांच्या मार्गें धावतात. पूर्वजन्मापासून जडलेला पश्वादिसंस्कार तशी प्रकृति घडवितो. विषयस्मरणानें रागलोभादि उत्पन्न होतात. याकरतां दुःखनाशासाठीं रागादि संस्कारांचे स्मरण त्यागावें. मनन आदि उपायांनीही जो दुष्प्राप्य तो केवळ दुर्वासांच्या शापामुळें सुलभतेनें प्राप्त झाला. त्याची योग्यवेळीं केलेली भक्ति मुक्तिकरता पुरेशी आहे. मोक्षकारणभूत अशा त्यांच्या अवतारांची लीला संक्षेपानें वर्णित आहोत. ती संक्षिप्त असली तरी अविद्या, काम, कर्म, जन्म इत्यादींचा नाश करणारी आहे. मत्स्यावतारः–एकाग्रचित्त असे ब्रह्मदेव एकदा बसले असतां शंखासुरानें तेथे जाऊन सर्व वेदांचे हरण केले व स्वतः सागरांत बुडी मारून बसला.

तर्ह्येत्य विधात्रा संप्रार्थितविष्णुः ॥
भूत्वाप्यथ मत्स्योऽब्धिं प्राप स जिष्णुः ॥३८॥

हत्वाऽसुरमुग्रं वेदं च समग्रम् ॥
उद्धृत्य च गां स स्रष्ट्रेऽर्पयदर्यः ॥३९॥
लब्धाखिलवेदः स्रष्टा गतखेदः
अत्रासृजदेतत्प्राग्वत्स च तद्वित् ॥४०॥
दुर्वासऋषेर्यच्छापादमरेन्द्राः ॥
रत्नानि पयोब्धौ यातानि विदित्वा ॥४१॥
मन्त्राद्वशदैत्या देवा हतकामाः
क्षीराब्धिमथास्ते सर्वेऽमृतकामाः ॥४२॥
ते मन्दरमन्थाः सर्पेशगुणा हि ॥
मन्थेऽध इतेऽजं प्रोचुर्न उ पाहि ॥४३॥

अर्थ :–तेव्हां ब्रह्मदेवानें विष्णूची प्रार्थना केली. तात्काळ विष्णूनीं तेथे येऊन मत्स्यरूप धारण केलें, समुद्रांत जाऊन शंखासुराचा वध केला, आणि समग्र वेद व जलमग्न भूमि वर आणून ब्रह्मदेवास समर्पण केली. अखिल वेदांची प्राप्ति झाल्यावर ब्रह्मदेवाचा खेद नाहींसा झाला. वेदोक्त सृष्टीरचनेचे कार्य माहीत असल्याने त्यानें पूर्वीप्रमाणें सर्व उत्पत्ति व रचना केली, दुर्वासऋषींच्या शापामुळें सर्व रत्नें समुद्रांत पडली आहेत ही गोष्ट देवांना माहिती झाल्यावर, त्यांनीं मंत्रांचे योगे दैत्याना वश करून घेतलें व अमृताच्या प्राप्तीसाठीं क्षीराब्धि घुसळण्याच्या इच्छेनें देवदैत्यांनी मंदारपर्वताची रवी केली. नागराज वासुकीचा दोरीप्रमाणें उपयोग केला व मंथनास सुरवात केली. परंतु पर्वत खालीखाली जाऊ लागलेला पाहून विष्णूची प्रार्थना केली की, "तूं आम्हास प्रसन्न हो."

देवोपि वरेण्यो भूत्वा कमठोऽधः ॥
साद्रिं स दधौ गां पृष्ठे हतबाधः ॥४४॥
रत्नानि तदाब्धेर्जातानि विषं प्राक् ॥
लोकान्तकमीशो भेजे दयया द्राक् ॥४५॥

तप्तोपि स केऽधाद्रत्नं परमिन्दुम् ॥
तेनापि न शान्तः के चामरसिन्धुम् ॥४६॥
श्रीकौस्तुभशार्ङ्गब्जान्विष्णुरिनोऽश्वम् ॥
धन्वतरिकल्पद्रू गोगजवेश्याः ॥४७॥
प्रापेन्द्र उ दैत्यैर्लब्धोऽमृतकुम्भः ॥
तद्वञ्चितदेवान्वीक्ष्यामृतनाभः ॥ ४८ ॥
मोहिन्यथ भूत्वा लब्ध्वाऽमृतमेभ्यः ॥
मद्यं प्रददौ सा हृद्यं त्वमृतेभ्यः॥ ४९ ॥

अर्थ : वरेण्य अशा भगवान विष्णूंनी कासवाचे रूप धारण केले व मंदार पर्वतासह भूमीस आपल्या पाठीवर धारण केले. देवांचे संकट नाहीसे केले. मंथनानें समुद्रातून रत्नें वर आली. परंतु त्या पूर्वी कालकूट वीष वर आलें. ते भयंकर व लोकसंहारक पाहून दयाळू अशा महादेवानें त्याचें सेवन केलें. त्या विषप्राशनानें शंकरास फार ताप झाला. तेव्हां त्यांनी दुसरे रत्न म्हणजे चन्द्र मस्तकी धारण केला. त्यानेही शमन न झाल्याने अमरनदी गंगा ही मस्तकावर धारण केली. नंतर समुद्रातून निघालेली श्रीलक्ष्मी, कौस्तुभमणि, शार्ङ्गधनुष्य, कमलपुष्प, पाञ्चजन्य शंख या वस्तू श्रीविष्णूंना मिळाल्या. सूर्यास उच्चैः श्रवस् नावाचा घोडा मिळाला. धन्वंतरी, कल्पवृक्ष, कामधेनू, ऐरावत, वेश्या, अप्सरा या इंद्रास मिळाल्या. दैत्याना अमृतकुंभ मिळाला. तेव्हां दैत्यांनी देवांना फसविल्याचे पाहून विष्णूने मोहिनीचे रूप घेतले व दैत्यांकडून युक्तीने अमृत परत मिळविले. व ते देवांना दिले. दैत्याना सुरा (मद्य) दिले. ज्याला जे योग्य तेच त्याला द्यावे.

देवालिगराहोश्चिच्छेद कमार्था ॥
खेटोऽमृतपोऽभूत्केन्द्वन्तरनार्यः ॥५०॥
मत्ता असुरास्तेऽन्योन्यं त्वथ जघ्नुः ॥
देवाः कृतकृत्या नाकं ह्यनुजग्मुः ॥५१॥

राहुस्तु कुभागो भास्वच्छशिमर्दः ॥
पर्वण्यमुमत्रिर्वेदावृतिमर्दः ॥५२॥
रत्नानि तु यानि श्रीचन्द्रमुखानि ॥
अब्धेर्मथनात्प्राक् स्वर्गे निहितानि ॥५३॥
इन्द्रार्पितमालावज्ञाकुपितस्य ॥
शापादतिभीष्मात्तान्यत्रिसुतस्य ॥५४॥
अब्धौ पतितानि प्राप्तान्यृषिसूक्तेः ॥
नव्यानि न चातः पराशरसूक्तेः ॥५५॥
आत्रेय उ चन्द्रोऽप्यब्धेर्मुहुरासीत् ॥
अब्जामिव एवं लक्ष्म्यादिरिहासीत् ॥५६॥
अद्याप्यवतारः कूर्मोऽस्ति हि गोत्र—
स्तादृक्च वराहो दंष्ट्रोद्धृतगोत्रः ॥५७॥

अर्थ : देवांच्या पंक्तीत चन्द्रसूर्याच्या मध्ये असुर राहू जाऊन बसला. मोहिनीनें अमृत सर्वांना वाटले. त्यावेळीं तिला चन्द्रसूर्यांनी संकेताने ही गोष्ट सांगतांच तिने त्याचे मस्तक तोडले. तेव्हां तो दुष्ट ग्रह झाला. मग असुरांनी परस्परांचा वध केला. आणि देव कृतकृत्य होऊन स्वर्गास गेले. राहू पृथ्वीच्या छायेत राहून प्रतिपर्वकाळीं सूर्यचन्द्रांना ग्रहणरुपाने पीडा देऊ लागला. ही गोष्ट फक्त जन्ममरणाचा नाश करणाऱ्या अत्रिऋषींनाच माहिती आहे. श्री, चंद्र आदि जी रत्ने आहेत, ती समुद्रमंथनापूर्वी स्वर्गांत ठेवलेली होती. एकदां दुर्वास ऋषींनी प्रसन्न होऊन इंद्रास एक माळ बक्षिस दिली. परंतु तिचा त्यानें अपमान केला, तेव्हां दुर्वासांनी शाप दिला, त्यामुळें ती सर्व रत्नें सागरांत पडली. पुढें इंद्रानी क्षमा मागितल्यावर दुर्वास प्रसन्न झाले, व त्यांच्या उःशापानें ती रत्नें समुद्रमंथनातून परत मिळालीं. म्हणून ती नवीन म्हणतां येत नाहींत. जुनीच आहेत. वरील वर्णन विष्णुपुराणांत प्रसिद्ध आहे. मूळचा अत्रिसुत चंद्र, तो समुद्रांतून लक्ष्मीसह पुन्हां मिळाला म्हणून तिचा भाऊ झाला. तो ब्रह्मांश (‘ चंद्रमा मनसो जातः ’ या

श्रुतिवचनानुसार,) असूनही सागरसुत म्हणून प्रसिद्ध झाला. कूर्मावतार अद्यापिही आहे. दाढेनें पृथ्वीस वर धरून ठेवणारा वराहावतारही अजून आहे.

॥ इति श्रीदत्तपुराणे दशावतारचरितं नाम द्वितीयाष्टके षष्ठोऽध्यायः ॥

अथ वराहनारसिंहावतारौ नाम द्वितीयाष्टके सप्तमोऽध्यायः ॥

सेमावात्मसमौ मत्वा युयुत्सुः पार्षदौ प्रभुः ॥
शापं शान्तकुमारेभ्यः स्वेच्छयाकल्पयाद्यवि ॥१॥
एकदाऽव्याहतस्वैरगता विष्णुं दिदृक्षवः ॥
सनकाद्या हि वैकुण्ठं प्रापुर्भागवितोत्तमाः ॥२॥
प्रविशन्तो निषिद्धास्ते जयेन विजयेन च ॥
क्रुद्धाः शापं ददुस्ताभ्यां भवेतामसुराविति ॥३॥
ताभ्यां क्षमापितास्ते तु विष्णुना च पुनर्जगुः ॥
त्रिजन्मान्ते पुनर्विष्णु प्रासादादिह वां गतिः ॥४॥
ततस्तौ कश्यपादित्यां क्रूरौ जातौ सुरद्विषौ ॥
संध्यायां रतियोगाच्च हठाद्दित्याः फलं त्विदम् ॥५॥

अर्थ : या अध्यायात वराह व नारसिंह यांचे अवतार, प्रयोजन व लीला संक्षेपतः वर्णिली आहेत. स्वतःच्या बाहूंची रग शमविण्यासाठी युद्ध करण्याच्या इच्छेनें, स्वतःच्या तोडीचे व युद्धास योग्य कोण आहेत, असा विचार करून श्रीविष्णूनें आपले पार्षद जय व विजय हेच योग्य असें ठरविलें. परंतु ते सेवक असल्यानें या स्वरुपांत आपल्या समोर उभे राहून युद्ध करणार नाहींत, त्यावर उपाय म्हणून स्वभावतःच शांत अशा सनकादिकांकडून त्यांना शाप देवविला, आणि वैकुंठाहून त्यांचे भूलोकी अधःपतन घडवून आणलें. शांत अशा सनकादिकांनी शाप कसा दिला, व वैकुंठवासी पार्षदांना अपराध करण्याची बुद्धि कशी झाली, याचे उत्तर असे कीं श्रीविष्णू स्वेच्छेनें कांहीही करूं शकतात. एकदा परम भागवतोत्तम सनकादिक मुनी स्वैर गमन करीत श्रीविष्णूदर्शनाचे इच्छेनें वैकुंठात आले. श्रीविष्णूमंदिरांत शिरतांना द्वारपाल

जय व विजय यांनी त्यांना अडविलें. त्याबरोबर संतापून, 'तुम्ही असूर व्हा व भूलोकीं जा' असा त्यांनी शाप दिला. नंतर जय विजयांनीं व विष्णूनें त्यांची क्षमा मागितली, तेव्हा तीन जन्मानंतर विष्णूच्या कृपेनेच तुम्हास पुन्हा येथे गति मिळेल असा उःशाप दिला. नंतर विष्णूदर्शन करून मुनी निघून गेले. पुढे जय विजय कश्यपपत्नि दिती हिच्या पोटी जन्मले. परंतु दिती ही स्वतः साध्वी, कश्यप उत्तम तपस्वी, मग त्या दंपतीचे ठायीं क्रूर राक्षस कसे जन्मले ? त्याचें उत्तर असें–स्वतःच्या सवतीना उत्तम संतति झाली आहे, आपल्याला संतति नाही, वैभव नाही, असें वैमनस्य दितीस वाटूं लागलें. नंतर एकदां सायंकाळी कश्यप मुनि होम शाळेत बसले असतां, तावडतोब रतिसुख मिळाले पाहिजे असा आग्रह करून दितीनें त्यांना जबरीनें ओढले. शास्त्राज्ञेविरुद्ध वर्तन करूं नये म्हणून कश्यपांनी दितीस वारंवार निवारलें, परंतु एखाद्या कामुक वेश्येप्रमाणें निर्लज्जपणें ती त्यांना ओढू लागली. तेव्हां निरुपायानें ते कामासक्त होऊन दितीचे ठायी रममाण झाले. अशा रितीनें दितीच्या क्रूर व कामुक आचाराचे फल म्हणून असुरांचा जन्म असे म्हणता येईल.

दिव्यानुतप्तयाप्येष संस्तुतःकश्यपोऽब्रवीत् ॥
पुत्रौ विष्णोः सद्गतिगौ पौत्रस्ते वैष्णवो भवेत् ॥६॥
जातौ हिरण्यकशिपुहिरण्याक्षाभिधौ ततः
त्रिलोकीं लोकपालांश्च पीडयामासतुर्भृशम् ॥७॥
विधिं पराजिता देवाः शरणं जग्मुरातुराः ॥
चिन्ताविष्टस्य नासातः कस्य पोत्री तदापतत् ॥८॥
यज्ञवाराहमतुलं रूपं दृष्ट्वाखिलाः सुराः ॥
अजोऽयमिति मत्वा तं सूक्तैः संतुष्टुवुर्भृशम् ॥९॥
ईशेऽनीशत्वमापन्ने विमुखे च चतुर्मुखे ॥
मग्नास्तौषीत्क्ष्मा तदापि स्तब्धरोमाभवध्दरिः ॥१०॥
दीनानाथपतिस्तुष्टो दीनां गां दंष्ट्रयोध्दरन् ॥
तद्देवताहरं क्रूरं हिरण्याक्षं ददार ह ॥११॥

अर्थ : नंतर दितीला कृतकर्माचा पश्चात्ताप झाला. तिने कश्यपाची स्तुति केली. तेंव्हा कश्यप तिला म्हणाले, " तुझे दोन्ही पुत्र विष्णूकडून सद्गतीस जातील. परंतु नातू मात्र उत्तम भगवद्भक्त होईल. " त्यानंतर हिरण्याक्ष व हिरण्यकशिपु हे दोन राक्षस कश्यप दंपतीपासून जन्मले. त्यांनी तिन्ही लोकांस व लोकपालास पीडा दिली. हिरण्याक्ष व हिरण्यकशिपु या दोघांकडून पराभूत झालेले देव गोंधळून गेले व ब्रम्हदेवास शरण गेले. ब्रम्हदेव चिंताक्रांत होवून गेला असता त्याचे नाकांतून एक वराह खाली पडला. यज्ञस्वरूप व अद्वितीय अशा त्या वराहास सर्व देवांनी पाहून, त्याला साक्षात् महाविष्णू मानून वैदिक सूक्तांनीं स्तुति केली, " पाण्यांत बुडलेल्या पृथ्वीस वर काढण्यास ब्रह्मदेव व शंकर असमर्थ बनले आहेत. तेंव्हां हे महाविष्णो पृथ्वीचा उद्धार कर. " अशीच स्तुति पृथ्वीनेही केली. तेंव्हां संतुष्ट झालेल्या श्रीविष्णूच्या अंगावर रोमांच उभे राहिले. दीनांचा नाथ अशा त्या विष्णूनें दीन अशा पृथ्वीला (पृथ्वीदेवतेला) दाढेनें धरून वर काढलें व त्या देवतेचे हरण करणाऱ्या हिरण्याक्षाला फाडून ठार केले.

संस्थाप्य पूर्ववद्भूमिं तदाधारो ययौ शमम् ॥
क्रुद्धोनुजे हतेऽथान्यो द्युलोकमजयत्क्षणात् ॥१२॥
अन्तर्बहिर्दिवा नक्तं न देवान्न मृगाच्च नुः ॥
सजीवान्नापि निर्जीवादवध्यत्वं गतो विधेः ॥१३॥
तद्भार्या गर्भिणी जाता कयाधूर्भाग्यवत्यथ ॥
तां लब्धान्तर इन्द्रोऽपि धृत्वा हन्तुं समुद्यतः ॥१४॥
तदैव नारदोऽभ्येत्य गर्भोऽयं वैष्णवस्त्वया ॥
स्वक्षेमकृन्न हन्तव्य इत्यूचे सोपि तां जहौ ॥१५॥
वैष्णवोत्तमसामर्थ्यं किं वाच्यं गर्भगोऽप्यहो ॥
आददे वैष्णवीं दीक्षां गर्भोऽप्यसुरवीर्यजः ॥१६॥
ततः सा सुषुवे पुत्रं महाभागवतं शुभम् ॥
स्वपितुर्जातमात्रेण येनास्यं कलुषीकृतम् ॥१७॥

अर्थ : याप्रमाणें पृथ्वीची प्रतिष्ठापना करून विष्णू शांत झाला. वराहावतारवर्णन समाप्त झालें. स्वतःचा भाऊ मारला गेल्यावर हिरण्यकशिपूनें क्षणांत स्वर्गलोक ताब्यांत घेतला; आणि ब्रह्मदेवाकडून वरदान मिळविलें की, आंतून, बाहेरून, दिवसा, रात्रीं, देवांकडून, पशूंकडून सजीव निर्जीव अशा कोणाहीकडून स्वतःस मरण येऊं नये. नंतर हिरण्यकशिपूची पत्नी कयाधू भाग्यवशात गर्भिणी झाली. तें जाणून इंद्रानें तिला पकडलें व ठार मारण्यास उद्युक्त झाला. कारण त्या वेळीं हिरण्यकशिपु तपःसाधना करण्यासाठी गेलेला होता, ती संधि इंद्रानें साधली. इंद्र तिला ठार मारण्यास उद्युक्त झाला त्याचवेळी नारद ऋषि तेथें आले, व म्हणाले, " इच्या गर्भांत परम विष्णुभक्त आहे. तो स्वतःची मुक्ति करणारा आहे आणि तुझें कल्याण करणारा आहे. तेंव्हा त्यास ठार मारूं नकोस. " असें म्हटल्यावर इंद्रानें तिला सोडून दिलें. गर्भांत असलेल्या भागवतोत्तमाचें सामर्थ्य काय वर्णावें ? गर्भांत असतानाच त्यानें (भगवद्भक्त प्रल्हादानें) विष्णुदीक्षा घेतली होती. त्यानंतर कयाधूनें शुभकारक व महाभागवतोत्तम अशा पुत्रास योग्य काळी जन्म दिला. त्यानें (त्या पुत्रानें) जन्मल्याबरोबर स्वपित्याच्या तोंडास स्वतेजानें काळिमा आणला.

ततः प्रह्लादनामासौ ववृधेऽरिभयंकरः ॥
काले काव्येनोपनीतः शिक्षितोऽप्यभजद्धरिम् ॥१८॥
तर्जनादरणाद्यैः स न बिभेतीति तत्पिता ॥
श्रुत्वा विषीदंश्चान्येषु वैष्णवाचाराशिक्षणात् ॥१९॥
स्वशत्रुपक्षपातीति पुत्रं मत्वाऽसुराधमः ॥
विहाय पुत्रसंबन्धं तं निहन्तुं मनो दधौ ॥२०॥
भृगुपाताग्नितोयाद्यैर्मृत्यवे कल्पितोऽपि सः ॥
सर्वाधीशमहाविष्णुपदसेवी ममार नो ॥२१॥
तदा तं प्राह रे दुष्ट लोकशास्तुर्ममाग्रतः ॥
किंबलो निर्भयोस्येतं ध्यायसे स क्व तिष्ठति ॥२२॥
श्रुत्वापि परुषं वाक्यं प्रह्लादो भयवर्जितः ॥
सर्वभूतसमः प्राह पितरं चिन्तयन्हरिम् ॥२३॥

अर्थ : नंतर तो प्रल्हादनामक पुत्र मोठा होऊ लागला. तो शत्रूला महाभयंकर होता. योग्य कालीं शुक्राचार्य पुत्र शण्डामर्कानें त्यास शिक्षण दिले. विष्णुभक्ति करूं नये अशी आज्ञा देऊनही तो हरिभक्ति करीत राहिला. त्याला धाक दाखवून, सान्त्वन करून, अनेक प्रकारांनी वळविण्याचा प्रयत्न केला, परंतु प्रल्हाद स्वतः तर बदलेनाच, परंतु इतरांनाही विष्णुभक्ति शिकवूं लागला. त्यामुळें हिरण्यकशिपूस फार खेद झाला. पुत्र स्वशत्रूचा पक्षपाती आहे असें मानून त्या असुराधमानें पुत्राचा संबंध तोडला, व त्यास ठार मारण्याचा विचार केला. पर्वताच्या शिखरावरून खाली लोटणें, अग्नींत टाकणें, पाण्यात बुडविणें, इत्यादि प्रकारांनीं मारण्याचा प्रयत्न करूनही, सर्वाधीशमहाविष्णुसेवक प्रल्हाद मरण पावला नाहीं. तेव्हां हिरण्यकशिपु त्यास म्हणाला, "अरे, लोकाधीश अशा माझ्यापुढें तूं निर्भय आहेस, तर तुझा सहाय्यक कोण आहे ? तूं ज्याचे चिंतन करतोस तो कोण आहे ?" पित्याचें ते कठोर भाषण ऐकूनही निर्भय असा तो प्रल्हाद म्हणाला, (त्यावेळीं पित्यालाही तो विष्णुरूपच मानत म्हणाला.)

बलं बलवतां विष्णुस्तं विना कस्य किं बलम् ॥
स सर्वत्र स्थितोऽधीशो यं लब्ध्वास्य कुतो भयम् ॥२४॥
यदि सर्वगतोऽस्त्येष स्तम्भेस्मिन् विद्यते न वा ॥
इत्युक्तो जनकेनासावत्राप्यस्तीत्युवाच तम् ॥२५॥
ततः क्रुद्धस्तदा दैत्यः पदा स्तम्भं जघान ह ॥
तदाऽऽविरास भृत्योक्तमृतं कर्तुं ततो हरिः ॥२६॥
सिंहास्यं मनुजाकारं करालं तं नखायुधम् ॥
चित्रं दृष्ट्वाऽसुरस्तब्धापिहिताक्षोऽप्ययुध्यत ॥२७॥

अर्थ : प्रल्हाद म्हणाला, " बलवानांचे बल म्हणजेच विष्णु. त्याचे वाचून कोणाचे काय बल असणार ? तो सर्वत्र व्यापून राहिलेला आहे. तो सर्वांचा अधीश आहे. त्याची प्राप्ति ज्याला झाली, त्यास भय कोठून असणार ?" तेव्हां हिरण्यकशिपु म्हणाला, "जर हा सर्वगत आहे, तर हा खांबांत आहे काय ?" असें विचारल्यावर, " होय, येथें सुद्धां हा आहे;"

असे उत्तर प्रल्हादाने दिलें. तेव्हां क्रुद्ध अशा दैत्यानें स्तम्भावर जोरानें पायाचा प्रहार केला, तेव्हां स्वभक्ताचे वचन खरें करण्यासाठीं श्री विष्णु त्या स्तंभातून तात्काळ प्रकट झाले. सिंहाचे तोंड, मानवाची मूर्ति असें तें विक्राळ व नखायुधयुक्त रूप पाहून, त्याच्या तेजानें दिपून गेला असता सुद्धां असुरानें त्याच्याशी युद्ध केलें.

हरिः खिन्नानृषीन्देवान्भृत्यं च प्रेक्ष्य पीडितम् ॥
वरदोक्त्यविरोधात्तं दधौ हन्तुमपि च्युतम् ॥२८॥
नखैर्ददार कृत्वोर्वोस्तद्वक्षोद्वारमध्यतः ॥
संध्यायां स दधौ चण्डस्तदन्त्रं माल्यवद्गले ॥२९॥
हाहाकृतं च तत्सैन्यं जघान ववृषुः सुराः ॥
पुष्पाण्यप्सरसोऽन्ये च ननृतुश्च जगुस्तदा ॥३०॥
अदृष्टपूर्वचित्रोग्ररूपं शेकुर्न वीक्षितुम् ॥
दृष्टकामा अपि सुराः श्रीश्च भीमोच्चनिःस्वनम् ॥३१॥

अर्थ : नृसिंहरूप हरीने पकडला तरीही हिरण्यकशिपु निसटला, त्यामुळें देव, ऋषि, प्रल्हाद हे खिन्न झाले, ते पाहून, खाली नाहीं, वर नाहीं, आंत नाहीं, बाहेर नाहीं, अशा द्वारमध्यभागीं, स्वतःच्या मांडीवर घेऊन, सजीव नाहीं किंवा निर्जीव नाहीं, शस्त्रही नाहीं अशा स्वतःच्या नखांनी दिवसरात्री वर्जित अशा सायंकाळीं, हिरण्यकशिपुचें हृदय विदारण केलें. नंतर त्याची आंतडी काढून माळेप्रमाणें गळ्यांत घातलीं. हिरण्यकशिपुच्या सैन्याचा संहार करून हाहाःकार केला. सुरांनी पुष्पवृष्टि केली व अप्सरांनी नृत्य केले. गंधर्व गाऊ लागले. जे रूप आतापर्यंत कधी पाहिलेले नाहीं, अशा त्या भयंकर रूपांत देव सुद्धां श्री विष्णूस पाहूं शकले नाहींत. भयंकर गर्जना करणारे तें रूप लक्ष्मीसही भीतिप्रद वाटलें.

तैः प्रेषितोऽथ प्रह्लादः सटाक्षिप्तभमुग्रगुम् ॥
दृष्ट्वा करालमप्याह निर्भयो नृहरिं नमन् ॥३२॥
हरे प्रशममेह्यद्य नायं कल्प उपस्थितः ॥
स्वभक्ताञ्छक्तो गुप्तान्कृपयेक्षितुमर्हसि ॥३३॥

त्रिलोकशीर्षरोगोऽयं हतो दिष्ट्या न ते प्रभो ॥
दुःसहः सोऽपि पापोऽद्य साक्षान्मुक्तः करेण ते ॥३४॥
पामरेऽनुग्रहो योऽसौ मन्ये प्राक्पुण्यराशिजः ॥
अन्यथेशास्य पापस्य मोक्षशङ्का कुतो हरे ॥३५॥

अर्थ : नंतर सर्व देवांनीं नृसिंहास शांत करण्यासाठीं प्रल्हादास सामोरे पाठविले. आपल्या जटांनीं ज्यानें नक्षत्रें झांकून टाकली आहेत, आणि ज्याची दृष्टि भयंकर भीषण आहे, अशा नृसिंहाला पाहून निर्भयपणें नमन करुन प्रल्हाद म्हणाला, "हे विष्णो, शांत व्हा. ही कांही कल्पांताची वेळ नव्हे. इंद्रामुळें सुरक्षित राहिलेल्या आपल्या भक्तांवर कृपादृष्टि करावी, तिन्ही लोकांना डोकेदुखी होणाऱ्या माझ्या पित्यास आपल्या हातून मरण आलें आहे, हें योग्यच आहे. तो दुःसह व पापी होता, तथापि आपल्या हातून तो साक्षात मुक्त झाला आहे. पामर अशा त्यावर आपला अनुग्रह म्हणजे पूर्वार्जित पुण्यसंचयाचा परिणाम असेच मी समजतो. अन्यथा अशा पातक्याला मोक्ष मिळेल कसा ?

कृपालो ते नमोऽद्य त्वं प्रसन्नो भव सुव्रत ॥
देवान्पूर्ववदाश्वास्य स्वाधिकारे नियोजय ॥३६॥
एवं भक्तार्थितो विष्णुर्ययौ शान्तिं तदामराः ॥
तस्मै नत्वा तदाज्ञप्ताः सर्वे स्वं स्वं पदं ययुः ॥३७॥
तिरोदधेऽपि भगवांस्तद्रूपं तारमैच्छिकम् ॥
प्रल्हादोऽपि तदाज्ञप्तः पित्र्यं राज्यं शशास सन् ॥३८॥
आबाल्यं नारदादेशाद्धर्मे भागवते रतः ॥
भूत्वाप्यनात्मवित्त्वेन शान्तिं न परमां ययौ ॥३९॥

अर्थ : हे कृपाळू देवा, तुला नमस्कार असो. हे सुव्रता, प्रसन्न हो. देवांना पूर्ववत् अभय देऊन त्यांची स्वाधिकारावर नियुक्ति कर" याप्रमाणें भक्तानें प्रार्थना केली असतां विष्णु शांत झाला. तेव्हां त्यास नमस्कार करून, त्याची आज्ञा घेऊन देव आपआपल्या ठिकाणीं गेले. भक्तेच्छेमुळें स्वीकारलेलें

रुप टाकून नृसिंहही ॐकार रुप झाला. पुढे प्रल्हादानें त्याच्या आज्ञेनें पित्याचें राज्य करण्यास सुरुवात केली. प्रल्हाद बाळपणापासूनच ब्रह्मर्षि नारदांच्या उपदेशानुसार भागवत धर्मांत रमून गेला होता. तरीपण त्यास पूर्णपणें तत्वज्ञान प्राप्त झालें नसल्यानें त्याला परम शांति मिळालेली नव्हती. आत्यंतिक निःश्रेय मिळालेले नव्हतें.

औदासिन्येन स वनं पर्यटन्मृगयामिषात् ॥
भाग्याद्ददर्श सह्याद्रौ कावेर्यां निद्रितं भुवि ॥४०॥
कर्माद्यैर्वर्णलिङ्गाद्यैरप्रतर्क्यं रजस्वलम् ॥
नत्वा प्राहावधूतं तं निगूढामलतेजसम् ॥४१॥
कथं भोगीव धत्तेऽस्वः पीनां तनुमनुद्यमः ॥
उद्योगात्स्वं ततो भोगो भोगात्पीना तनुर्भवेत् ॥४२॥
शयानोऽनुद्यमोऽनीहो भवानिह तथाप्यसौ ।
पीना तनुः कथं सिद्धो भवान्वदतु चेत्क्षमम् ॥४३॥
विद्वान्दक्षोपि चतुरश्चित्रप्रियकथो भवान् ।
दृष्ट्वापीह जनांश्चित्रकर्मणो वर्तते समः ॥४४॥
इत्थं श्रीभगवांस्तेन प्रह्लादेनात्रिनन्दनः ।
संपृष्टः प्राह संतुष्टः कृपालुःप्रहसन्निव ॥४५॥
श्रीनृसिंहोऽवतीर्णोऽत्र यदर्थं स त्वमेव हि ।
दैत्यजोऽपि मुनिच्छात्र श्रुणु भागवतोत्तम ॥४६॥

प्रल्हादाचें मन शांत व प्रसन्न नव्हतें, तर उदासीन होते. त्यामुळें शिकारीचे निमित्य करुन तो रानांवनांतून हिंडत असे. एकदा स्वभाग्योदयानुसार, सह्याद्रिवर, कावेरी नदीच्या कांठी त्यानें जमिनीवर निजलेल्या कोणा योगी पुरुषास पाहिलें. कर्म, वर्ण, लिंङ्ग यांनी अप्रतर्क्यं, धुळीनें माखलेला, लोकांनी तिरस्कृत, स्वशक्तिनें गुढत्व पत्करलेला, रागादि मलरहित, अतिशय तेजस्वी अशा त्याला नमस्कार करुन प्रल्हाद त्याला म्हणाला, "हे मुने; तूं निर्धन असूनही एखाद्या भोगी धनिकाप्रमाणें पुष्ट शरीर कसें ? तूं कांहींच उद्योग करीत नाहींस.

उद्योगानें धन मिळते व धनामुळें भोग मिळतात; भोगामुळें शरिर पुष्ट होते; तर झोपून राहून, उद्योग न करतां, निरीच्छ राहून सुद्धां शरिर पुष्ट कसें? तसेंच तू सिद्धही दिसतोस. तर इच्छा असल्यास माझ्या प्रश्नाचें उत्तर द्यावे अशी मी आपल्यास विनंति करीत आहे. तू विद्वान् दिसतोस, व्यवहारदक्ष चतुर आहेस, तुझ्या कथाही आश्चर्यजनक व प्रिय असाव्यात; लोकांत हिंडून अनेक विध जनांना पाहूनही तुझी वृत्ती रागद्वेषादिशून्य दिसते. तेव्हां तुझे वर्तन व चरित्र अतर्क्य दिसते" याप्रमाणें विचारलें असतां तो भगवान् अत्रिनंदन श्रीदत्तात्रेय संतुष्ट होऊन कृपाळूपणें हंसत हंसत बोलू लागला (सगुणसाक्षात्कार होऊनही प्रल्हादास ज्ञानप्राप्ति झाली नसल्यानें हंसत हंसत बोलला) ज्यासाठी श्री नृसिहांचा अवतार झालेला होता तों तूच आहेस. तू दैत्यापोटी जन्माला आला असूनही भागवतोत्तम आहेस, नारदमुनींचा शिष्य आहेस. तेव्हां मी सांगतो ते सावधपणे ऐक.

॥ इति श्रीमद्दत्तात्रेय पुराणे वराहनारसिंहावतारौ नाम द्वितीयाष्टके सप्तमोऽध्यायः ॥

अथ प्रल्हादाद्युपदेशो नाम द्वितीयाष्टकेऽष्टमोऽध्यायः ॥

॥ॐ॥ मन्दः स्वज्ञो भ्रमंस्तृष्णानद्येमं लोकमागतः ॥
कर्मयोगेन मुक्तिस्वर्मोक्षद्वारं यदृच्छया ॥१॥
निवृत्तोऽस्म्यत्र यततां व्यत्ययं वीक्ष्य शर्मणे ॥
आत्मनोऽस्य सुखं रूपं क्लिष्टे नष्टे स्वयंप्रभम् ॥२॥
ज्ञात्वा संस्पर्शजान्भोगान्दुःखान्स्वप्स्यामि दैवभुक् ॥
विस्मृत्यामुं जनः स्वार्थं सन्तं यात्युग्रसंसृतिम् ॥३॥

श्रीदत्तात्रेय योगी म्हणाले, तत्वज्ञानाविषयीं आळशी, अडाणी, विषयरूपी तृष्णानदीबरोबर नानायोनीमध्यें भ्रमण करीत, स्वर्ग, मोक्ष आणि नरकाचे द्वार असणाऱ्या मनुष्ययोनींत आलो. इथें स्वतःच्या सुखासाठीं धडपडणाऱ्यांचा विफल प्रयत्न पाहून, सुखाविषयीच्या प्रयत्नापासून मी निवृत्त

झालो आहे. ह्या आत्म्यांचें स्वरूप केवळ आनंदमय आहे. अविद्या, अस्मिता, राग, द्वेष, अभिनिवेश ह्या पांच क्लेशांचा नाश झाला कीं तें स्वयंप्रभ रूप दिसतें. संस्पर्शज, इंद्रियसंयोगामुळें उत्पन्न झालेले भोग हे दुःखरुप आहेत हे जाणून, दैवानेंच सर्वप्राप्त होतें हा निश्चय करून मीं सुखाने झोपून राहिलो आहे. निरूद्योगी आहे. मग इतर लोक माझ्या प्रमाणेंच कां रहात नाहींत? याचे उत्तर असें कीं, स्वतःमध्येच वास करणाऱ्या ह्या सुखरूप आत्मरूपास लोक विसरतात व अविद्येच्या प्रभावानें देहादींच्या अध्यासांत गुरफटून, कामादींच्या योगें भयंकर स्वरुप धारण केलेल्या संसारास चिकटून रहातात.

स्वार्थं मायावृतं त्यक्त्वा तदर्थ्यन्यत्र धावति ॥
शैवालछन्नकं त्यक्त्वा यथांब्वर्थी मरीचिकाम् ॥४॥
अभाग्यस्य क्रिया मोघाः सुखप्राप्त्यै प्रयोजिताः ॥
तत्साफल्येऽप्यसद्धिः किं कार्यं मर्त्यस्य कृच्छ्रजैः ॥५॥
कामार्थेच्छोर्मोहशोकरागद्वेषश्रमादयः ॥
यतोऽजितात्मनो नैति निद्रापि भयशङ्कया ॥६॥
प्राणार्थेच्छा हि मधुकृच्छिक्षितेन मयोज्झिता ॥
राजार्थिहिंस्रचोरद्विट्कालेभ्यो न विभेम्यतः ॥७॥

अर्थ–असत्या भानरूप मायेनें आनंदपूर्ण व आत्यंतिक सुखरूप ईश्वरास झाकून टाकलेले आहे. त्यामुळे मानव प्रत्यक्त्वानुभवरुपानें ज्ञात असलेल्या आनंदघन ईश्वरास सोडून देतो. खरोखर सत्यस्वरूप त्यास हवे असते. पण तो दुसरीकडे धावत असतो. जलार्थी प्राणी पाण्यावरील शेवाळामुळें भ्रमित होऊन, तेथे पाणी नाहीं असें समजून, ते टाकून मृगजळाचे मागे धावतो. त्याचप्रमाणे मनुष्य क्षणिक सुख देणाऱ्या गोष्टींकडे, उदा. स्रक, चंदन, वनिता, यांकडे धावत असतो. अभागी अशा त्याची कर्मे फुकट जातात. सुखप्राप्तीसाठीं ती योजलेली असतात. प्रयत्न करूनही सुखप्राप्ती होत नाहीं अशा क्षणभंगुर गोष्टींचा मानवाला काय उपयोग आहे? कांहीही नाहीं. कामादि विषयांचा अभिलाष करणाऱ्यांनाच शोकमोह अधिक होतात. राग, द्वेष, श्रम, यांनी भय

आणि व्यग्रता निर्माण होते. मन स्वाधीन नसल्यामुळें व अव्यवस्थितपणामुळें रागद्वेषादि अंतःशत्रू व बाह्यशत्रू आपला घात करतील अशी भीति वाटते. त्यामुळें नीट झोपही लागत नाहीं, म्हणून मी अजगर किंवा भ्रमर किंवा मधमाशी यांना गुरु करून त्यांचे शिष्यत्व स्वीकारले आणि त्यांच्याकडून मिळालेल्या शिक्षणा-वरून प्राण, अर्थ, विषय, शरीरसुख यांची इच्छाही सोडून दिली आहे. त्यामुळें राजा, याचक, भिकारी, तस्कर, हिंस्रपशू, दरोडेखोर, शत्रू, हिंसाचारी, मरणकाल, रोग यापासून मला भीति वाटत नाही. याच कारणास्तव, द्रव्यहानी, प्राणहानी, रोगभय, शरीर क्लेश, हे भयकारक आहेत असे मला वाटत नाही.

निरिच्छः परितुष्टात्मा, यदृच्छालाभतोऽस्मि सन् ॥
बहुकालं शये नो चेद्विद्वान् धैर्यान्महाहिवत् ॥८॥
भूर्यल्पं स्वादु वाऽस्वादु कदन्नं मानवर्जितम् ॥
समानं क्वापि भुञ्जेह्नि निशि भुक्त्वापि वा नवा ॥९॥
हरत्यन्यः पतिं हत्वा कृच्छ्राप्तं मधुवद्धनम् ॥
शिक्षितं मधुकृत्तोऽतो विरक्तोऽस्म्यपरिग्रहः ॥१०॥
दैवाप्तं चर्म वल्कं वा वस्त्रं क्षौमं वसे न वा ॥
क्वचिच्छयेऽश्मभस्मादौ कशिपौ वा जने वने ॥११॥
क्वचित्स्नातोऽलंकृतोऽहं स्रग्वी सुवसनो न वा ॥
रथेभाश्वैश्चरे क्वापि मुनिवत्क्वापि मुग्धवत् ॥१२॥

अर्थ : मी निरिच्छ असूनही योगायोगानें प्राप्त झालेल्या लाभाने संतुष्ट आहे. जरी दैववशात लाभ झाला नाहीं तरी दैवच सर्व मिळवून देणारे आहे अशा प्रकारची जाणीव ठेऊन खूप काळपर्यंत अजगराप्रमाणें झोपून रहातो. यानंतर माशी व मधमाशी यांपासून काय शिकलो तें ऐक. जास्त, कमी, रुचकर, अरुचकर, कदन्न, अनादराने दिलेंलें, आतिथ्यपूर्वक दिलेलें असें कोणत्याही प्रकारचें अन्न मी कोठेंहि, रात्री किंवा दिवसां केव्हांहि ग्रहण करतो. मधमाशीनें सांठविलेला मध कोणीही येऊन माशांना ठार करून हरण करुन नेतो. तसेज आपण सांठविलेलें धन चोर, तस्कर वगैरे येऊन घेऊन जातात.

म्हणून माशीकडून असंग्रहाचे शिक्षण घेऊन मी विरक्त झालो. तसेंच अपरिग्रही बनलो. दैवयोगे मिळालेलें, चर्म, वल्कल, रेशमी, महावस्त्र, सामान्य वस्त्र, परिधान करून क्वचित दगडावर, राखेत, धुळींत, खडकांवर, वस्तींत किंवा रानावनांत, मिळेल तेथें झोपून रहातो. क्वचित् स्नान करतो, अलंकार घालतो, सुगंधी परिमलानें शरीर सुगंधित करतो; उत्तम वस्त्रें परिधान करतो, रथांत बसतो, हत्तीवर घोड्यावर बसतो, केव्हां मुनीप्रमाणें रहातो, तर कधीं मूढाप्रमाणें रानावनांत, ग्रामांत रहातो.

नाहं निन्दे न च स्तौमि स्वभावविषमं नरम् ॥
एतेषां श्रेय आशास उतैकात्म्यमथात्मनि ॥१३॥
ब्रह्मासक्तो ब्रह्मनिष्ठो ब्रह्मात्मा ब्रह्मधीरहम् ॥
संस्कृते ब्राह्मणेऽन्त्ये वा समदृग्गवि शुन्यपि ॥१४॥
समासमाभ्यां विषमसमे पूजात ओदनम् ॥
नाद्यादित्यज्ञगृहिणो दोषो न समदृग्यतेः ॥१५॥
स्वरूपेऽवासनस्तिष्ठाम्यान्वीक्षिक्यानया दिवि ।
योमुमिच्छेत्तु तस्यायमुपायो विदुषः सुखः ॥१६॥
हुनेद्विकल्पं चित्तौ तां मनस्यर्थभ्रमे तु तत् ।
वैकारिके तं मायायां तां स्वस्मिन्विरमेत्ततः ॥१७॥

अर्थ : स्तुतिनिंदादिक सुद्धां बंधनास कारणीभूत होतात. म्हणून मी कोणाची निंदा अगर स्तुति करीत नाही. कारण लोक विचित्र स्वभावाचे असतात. सर्व लोकांचे परम कल्याणच मी इच्छितो. व्यापक परमेश्वराचे ठिकाणी त्यांना एकरूपता मिळावी असे मी इच्छितो. परब्रह्माचे ठिकाणी आसक्त झालो असल्याने ब्रह्मनिष्ठ, ब्रह्मात्मा, ब्रह्मधी ही विशेषणे मला लागू पडतात. आणि म्हणून सुसंस्कृत ब्राह्मण किंवा अन्त्यज गाय किंवा कुत्रे यामध्ये मी समभावाने पहातो. " समसमाभ्यां पूजात ओदनम् " या गौतमऋषींच्या उक्तीप्रमाणे सर्व जातीविषयी समदृष्टि ठेवणे शास्त्रशुद्ध व बरोबर नाही. परंतु हे शास्त्र तत्वनिष्ठ नसलेल्या गृहस्थाश्रमींचे आहे. तत्वनिष्ठांना ते लागूं नाही.

मी स्वस्वरूपांत निमग्न झालो आहे. माझ्या ठिकाणी कोणत्याच वासना नाहीत. अंतर्मुख वृत्ति व वासनारहित मन कोणत्या उपायांनी होते ते ऐक. मनाच्या संकल्प विकल्पात्मक वृत्ति असतात. त्या वृत्तींचा लय चित्तांत करावा. विकल्पाचा लय चित्तांत करावा. चित्ताचा लय मनांत करावा. मनांत केवळ विषयांचेच अनुसंधान असते. मन वैकारिक अहंकारामध्ये वैकारिक महत्तत्व मायेमध्ये आणि माया सर्वकारणकारक वासुदेवामध्ये लीन करावी. याकरतांच मी निर्विकारपणे स्वतःचे ठायी रममाण होऊन राहिलो आहे.

शुद्धः सोऽहं परात्मैक इति दार्ढ्ये विमुच्यते ॥
हृदयं मे सुगुप्तं ते प्रोक्तं तत्त्वं विचारय ॥१८॥
इतीशेनोपदिष्टः स ज्ञात्वाऽऽत्मानं प्रपूज्य च ॥
तदाज्ञप्तो ययौ राज्यं कुर्वन्नपि स दैवभुक् ॥ १९ ॥
राज्यश्रीपुत्रदाराद्योऽप्यलिप्तः स्वात्मदृक् सदा ॥
भुक्त्वारब्धं चिरं राज्यं दत्वा पुत्रे विरोचन ॥२०॥
मुक्तसंगश्चचार क्षमां समदृक्स गुरूक्तवत् ॥
विरोचनोऽपि पितृवत्पित्र्यं राज्यं शशास तत् ॥२१॥

अर्थ : मी शुद्ध स्वरूपी परात्मा, असा निश्चय करून राहिल्याने मानव मुक्त होतो. आत्मा हा अनादि असल्याने त्याची उत्पत्ति ज्ञानाने किंवा क्रियादिकांनी होत नाही. हे जे माझ्या हृदयांतील गुप्त असे तत्त्व, ते तुला गेल्या सतरा श्लोकांत सांगितले आहे." याप्रमाणे उपदेश झाला असतां प्रल्हादाला आत्म्यांचे ज्ञान झाले व अंतर्यामी असणाऱ्या आत्मरूपाची श्रीदत्तस्वरूपाची पूजा करून, त्याच्याच आज्ञेनें तो निघून गेला. नंतर राज्य केलें परंतु तें करीत असतांना राज्य, लक्ष्मी, पुत्र, दारा यांनीं युक्त असूनही अलिप्त राहून, सदैव आत्म चिंतनांत मग्न राहिला. बराच काल राज्य करून नंतर तें स्वपुत्र विरोचन यास दिलें, आणि गुरूच्या वचनाप्रमाणें मुक्तसंग असा पृथ्वीवर संचार केला. नंतर विरोचनानेही पित्याकडून प्राप्त झालेल्या राज्याचा वडिलांप्रमाणेंच उपभोग घेतला व पालन केलें.

तत्पुत्रो बलिनामाभूद् धृतस्वर्गोऽपि येन च ॥
अदित्यां कश्यपाज्जाता देवा इन्द्रादयोऽपि तान् ॥२२॥
जित्वा तदधिकारांश्च स स्वयं स्माधितिष्ठति ॥
स्वर्गान्निराकृता देवाः श्रीविष्णुं तुष्टुवुर्हरिम् ॥२३॥
देवप्रार्थनया तुष्टो भगवान्वामनाभिधः ॥
पयोव्रतफलं दातुं पुत्रोऽदित्या अजोऽप्यभूत् ॥२४॥
पित्रा सुसंस्कृतो देवैर्भूषितो वामनो बलिम् ॥
ययाचे त्रिपदक्ष्मां तं स शुक्रेणापि वारितः ॥२५॥
संकल्प्यादाद्विराड्भूत्वा वामनोऽपि तदा भुवम् ॥
व्याप्यैकेन पदान्येन गङ्गापित्रा चैं गां स्तुतः ॥२६॥
तृतीयं बद्धबलिना सिद्ध्यै तन्मूर्ध्न्यधात्पदम् ॥
निन्ये तं सुतलं मुक्तं प्रह्लादप्रार्थितो बलिम् ॥२७॥

अर्थ : विरोचनापासून बलि नावाचा पुत्र झाला. त्याने स्वर्ग जिंकला, कश्यप मुनींना आदितिपासून झालेल्या इंद्रादिकांना जिंकलें, त्यांचे अधिकार ताब्यांत घेतले व राज्य करूं लागला. तसेंच देवांना स्वर्गातून हाकलून दिले. तेव्हां देवांनी श्रीविष्णू हरीची प्रार्थना केली. आदितीनें पयोव्रत केले होतें, त्याचे फल देण्यासाठीं म्हणून, देवप्रार्थनेनें संतुष्ट झालेल्या विष्णूनें तिच्या ठिकाणीं वामन नांवानें जन्म घेतला. कश्यपानें त्याला सुसंस्कृत केलें. उपनयनादि संस्कार केले, देवांनी त्याला भूषणें दिली. सूर्यानें गायत्री उपदेश, बृहस्पतीनें यज्ञोपवीत, कश्यपानें कटिसूत्र, भूमीनें कृष्णाजिन, वनस्पति, दंड, आकाशानें छत्र, ब्रह्मदेवाने कमंडलु, सप्तर्षिंनी दर्भपवित्रें, सरस्वतीनें अक्षमाला, कुबेरानें भिक्षापात्र, पार्वतीनें भिक्षा, याप्रमाणें देवांनीं भूषित केलेल्या वामनानें बलिराजाकडे स्वतःच्या तीन पावलें भूमीची याचना केली. दैत्यगुरु शुक्राचार्य यांनी बलीराजाचें निवारण करून म्हटलें, "अरे, हा वामन म्हणजे साक्षात् महाविष्णु आहे, भिक्षु बटु नाही, याला भूदान करूं नकोस," परंतु शुक्राचार्यांचे बलिनें ऐकलें नाहीं. दानाचा निश्चय केला. तेव्हां बटु वामनानें मोठे रुप

धारण करुन एका पावलानें पृथ्वी व्यापून टाकली; व द्वितीय पादानें स्वर्ग व ब्रम्हलोकादि सर्व व्यापलें नंतर तिसरे पाऊल ठेवण्यास जागा राहिली नाहीं. वारुणपाशानें बद्ध झालेल्या बलिनें संकल्पसिद्धीसाठीं तिसरें पाऊल स्वतःच्या मस्तकावर ठेवण्याची विनंती केली. तेंव्हां वामनानें त्याच्या मस्तकावर पाय देऊन त्यास सुतल (पाताल) लोकास पाठविलें, व मोक्ष दिला. देवशत्रूस मोक्ष कसा ? या शंकेचे निवारण असें कीं, बलिराजानें भगवान् वामनाचें पादप्रक्षालन करुन सर्वस्वदान दिलें, म्हणून त्याच्या प्रपितामहानें (प्रल्हादानें) महाविष्णूची प्रार्थना केली व बलिराजा मुक्त झाला.

राज्यं तत्सुतबाणाय देवेभ्योऽदाद्दिवं स्वयम् ॥
द्वारपोऽभूद्बलेस्तस्मै दास्यत्यैन्द्रं पदं हरिः ॥२८॥
एवंप्रभावःश्रीदत्तो यदात्मानमनीश्वराः ॥
ज्ञातुं सुरासुरा ह्याद्या मनुष्याणां तु का कथा ॥२९॥
कदाचित्पिङ्गलो नागो दृष्ट्वामुं माहुराश्रितम् ॥
कृष्णधात्रीतले वेदं पठन्तं व्रात्यवेषतः ॥३०॥
पप्रच्छ भवतः कोऽयं आश्रमो वर्णगर्हितः ॥
वर्णित्वं ते न कौपीनमौञ्जीदण्डादिवर्जित ॥३१॥
न गृहित्वं चाग्निहोत्रद्विसूत्रादिविवर्जित ॥
वनित्वं ते न चागन्तुसाधनादिविवर्जित ॥३२॥
न भिक्षुत्वं शिखाग्राम्यभोगयुक्त दिगम्बर ॥
केनोपदिष्टो मार्गोऽयं नग्न स्त्रीमद्यलालस ॥३३॥
प्रभु-प्राहतमुक्तान्यः पञ्चमोऽयं ममाश्रमः ॥
योऽविकल्पेनात्मरूपं विश्वं पश्येदभेददृक् ॥३४॥

अर्थ : श्री विष्णुनें बळीचे राज्य त्याचा पुत्र बाण यास दिलें व बळीचा द्वारपाल होऊन राहिला. त्यास इंद्रपद दिलें. श्रीदत्तात्रेयाचा प्रभाव असा आहे, ज्याचे स्वरूप जाणण्यास सुर, असुर इत्यादी असमर्थ आहेत. मग मनुष्यांची काय कथा ? श्रीदत्तात्रेयांचे चरित्र असुर, नाग, साध्यदेव हे सुद्धा जाणत

नाहींत. असुर जाणत नाहीत, हें प्रल्हाद चरित्रावरून सिद्ध झालें. नाग जाणत नाहींत याविषयीं वैदिक छंदःशास्त्रनिर्माते पिंगल ऋषींचे चरित्र येथें दिलें आहे. माहूरगडावर काळ्या जमिनीवर बसलेला, वेदपठण करणारा, घाणेरडा वेष धरणारा, संस्काररहित, अशा श्रीदत्तदेवांस पिंगल नामक नागानें एकदा पाहिलें आणि विचारलें, " काय रे ? हा तुझा आश्रम कोणता आहे ? तो सर्ववर्ण निंदित आहे. तूं ब्रम्हचर्याश्रमी नाहींस, कारण तुझ्याजवळ कौपिन, मौजीबंध, दंड वगैरे दिसत नाहींत. गृहस्थाश्रमी म्हणावें तर यज्ञोपवीतद्वय, अग्निहोत्र, हेही दिसत नाहींत. वानप्रस्थाश्रम म्हणावा, तर शमदमादि तात्कालिक साधनें तुजजवळ नाहींत. संन्यासाश्रमी म्हणशील तर तुझ्या मस्तकावर शेंडी आहे. तू ग्राम्य भोग भोगीत आहेस. नागडाउघडा आहेस. तर हा मार्ग तुला कोणी सांगितला आहे ? नग्न स्त्री आणि मद्य यांची तुला इच्छा आहे. तेंव्हां तूं कोण आहेस ते सांग. " अशा प्रकारचा पिंगल नागाचा प्रश्न श्रवण करून श्रीभगवान् दत्तात्रेय म्हणाले, " तूं म्हणतोस ते खरें आहे. परंतु तूं वर्णिलेल्या चारी आश्रमांहून निराळा असा हा माझा पाचवा आश्रम आहे. जो विश्वरूप व आत्मरूप अभेदरूपानें पहातो तोच हा आश्रम. "

वैराग्ययुक्तो वीतारिस्तस्यायं पञ्चमाश्रमः ॥
त्वया श्रुतो न वै तं हि जानीयुर्ब्राह्मणाः समाः ॥३५॥
इत्थं श्रुत्वा सोऽनसूयागर्भरत्नमिदं महः ॥
इति मत्वातिखिन्नस्तं प्रार्थयामास दीनवाक् ॥३६॥
कुत्सिता रुशती धार्ष्ट्याद्वागुक्ता मेऽनयानघ ॥
भर्त्सितोऽसीश मां शाधि दौरात्म्यं मे क्षमस्व भोः ॥३७॥
इति क्षमाप्य विश्वेशं संप्राप्तानुग्रहो विभुम् ॥
अभिवाद्य प्रसन्नात्मा स्वाश्रमं पिङ्गलो ययौ ॥३८॥
तथैव साध्यदेवेभ्यो भगवानाह हृद्गिया ॥
धृतिसत्यक्षमाद्यैर्हृद्ग्रन्थिं छित्वा शमं नयेत् ॥३९॥
गर्वाक्रोशान्यावमानद्रोहकामादयोऽर्थहाः ॥
त्याज्याः क्रूरारुन्तुदासद्वाक् च सह्या ततोऽव्यथः ॥४०॥

अर्थ : " जो वैराग्ययुक्त व शत्रूरहित असतो, त्याचा हा पांचवा आश्रम आहे. हा तू कधी ऐकला नसशील, परंतु समदर्शी ब्रह्मज्ञ मात्र याला जाणतात," या प्रमाणें भाषण ऐकून, हे अनुसयागर्भरत्न श्रीदत्तात्रेय आहेत हें पिंगलानें जाणलें, व अतिखिन्न होऊन दीन वाणीनें प्रार्थना केली, " हे भगवन्, धाष्टर्यानें, मूर्खपणानें, दुष्ट स्वभावामुळें माझ्याकडून अकल्याणकारक अभद्र अशी वाणी उच्चारली गेली; मी तुझी निर्भत्सना केली, तरी कृपा करुन माझ्या दुष्टपणाबद्दल मला क्षमा करावी. " या प्रकारें प्रार्थना केली असतां श्रीदत्तात्रेयांनी त्याला क्षमा केली, तेव्हा त्यांची कृपा संपादन करुन, त्या विश्वेश व सर्वात्मा श्रीदत्तात्रेयांना प्राणिपात करुन प्रसन्न मनानें पिङ्गल स्वतःच्या आश्रमाकडे गेला. पिङ्गलाप्रमाणेच साध्यदेवांनी विचारले असतां श्रीदत्तात्रेय अंतःकरणपूर्वक म्हणाले " सात्विक बुद्धिनें व धैर्यानें सत्यानें, शमदमांच्या सहाय्यानें, अहंकारचिदात्मैक्य दृढप्रत्यय रुप अंतःकरणग्रंथीचा छेद करावा, आणि अंतःकरण शांत करावे. गर्व, आक्रोश, अवमान, द्रोह, काम आदि अनर्थकारक गोष्टींचा त्याग करावा. दुसऱ्याची मर्ममेदी वाणी सहन करावी, आणि स्वतः तशा प्रकारच्या वाणीचा उपयोग करुं नये आणि अंतःकरण अव्यथित ठेऊन रहावें.

तद्वत्सन्मुन्यच्चोरसङ्गी रङ्गात्पटो यथा ॥
स्वयं सहिष्णुर्नो कुर्यान्निंदाघातादि दैवभाक् ॥४१॥
वाक्सेव्या व्याहृत्या सत्या प्रिया धर्म्या च सद्युजा ॥
चिन्त्योऽभावो नान्यरन्ध्रं नेक्ष्यं देयं प्रतिश्रुतम् ॥४२॥
सुहृत्सेव्योऽधमो नैव श्रद्धेयं श्रेय आत्मनः ॥
समो निन्दा प्रशंसादौ तथोत्कर्षापकर्षयोः ॥४३॥
प्रहृष्टं शोकराहित्यं दुर्वृत्ताच्च निवर्तनम् ॥
श्रेयोमार्गोऽयमादेश इतीशः प्राह तेऽभजन् ॥४४॥
एवं सुरर्षिप्रमुखा भगवद्भावमद्वयम् ॥
प्रसादेनैव संप्राप्ता भक्तिगम्यस्य चात्मनः ॥४५॥

अर्थ :- तसेंच मुनीसंगतीत मुनीप्रमाणें, असताच्या संगतीत असज्जनाप्रमाणें, चोराच्या संगतीत चोराप्रमाणें रहावें. रंगसंगतीनें ज्याप्रमाणें वस्त्र त्या त्या रंगाचे दिसतें, त्याप्रमाणें वर्तन करावे. स्वतः सहिष्णु व्हावे. निंदा व घात करु नये. दैवयोगे मिळेल त्याचा स्वीकार करावा. सत्यलक्षणा वाणी उच्चारावी. ती सत्य असावी, प्रिय असावी, धर्म्य असावी. दुसऱ्याचा नाश चिंतू नये. दुसऱ्याचें उणें पाहू नये. द्विजांना कबूल केलेलें द्यावें. उत्तम व सभ्य मित्र करावा, अधम मित्र करुं नये. आत्मकल्याणाविषयीं श्रद्धा ठेवावी. निन्दा-प्रशंसा व उत्कर्ष-अपकर्ष याबाबतीत समचित्त असावें, आनंदित असावे, शोक करू नये. दुर्वर्तनापासून पाठ फिरवावी, हाचमार्ग स्वीकारावा " असे श्रीदत्तात्रेयांनी सांगितलें आणि साध्यदेवांनी त्याप्रमाणें केलें. याप्रमाणे इंद्रप्रमुखांनी भक्तिगम्य अशा आत्म्याच्या प्रसादाने भगवद्भाव मिळविला.

परोऽसौ पुरुषो भूमा भक्त्या लभ्यो ह्यनन्यया ॥
क्रमेण पुण्यशीलेन सता नान्येन दुष्कृता ॥४६॥
स्मरणेऽस्यार्जुनोऽलर्को वन्दने दास्य आयुरित् ॥
सख्ये रामो विष्णुदत्तः सेवने यदुरर्चने ॥४७॥
कीर्तने वेदधर्मा च श्रवणे दीपको हरेः ॥
एते चान्ये च बहवः सर्वेस्यात्म निवेदने ॥४८॥
यो यो यां यां कृती भक्तिं वृणुते तस्य तस्य सः ॥
तां तां स्थिरीकृत्य दत्ते हृद्यमर्थं त्र्यधीश्वरः ॥४९॥

अर्थ : व्यापक परमात्मपुरुषाची प्राप्ती अनन्य भक्तीनेच होते. ती पुण्यशील सज्जनांना होते. अन्य दुष्कृतांना होत नाही. सज्जनांनाही ती क्रमाक्रमाने होते. ह्याची सहस्रार्जुनानें स्मरणानें, अलर्कानें वन्दनानें, आयुनें दास्य करुन, रामानें सख्यत्वानें, विष्णुदत्तानें सेवा करुन, व यदुनें अर्चन करुन भक्ति केली. वेदधर्मानें किर्तनभक्ति, तर दीपकानें श्रवणभक्ति केली. अनेक अन्य भक्तांनी सर्वस्वात्मनिवेदन केले. जो जो पुण्यवान् पुरुष ज्या ज्या भक्तीचा स्वीकार करून ईशभक्ती करतो, त्याची ती ती भक्ति त्याचे अंतःकरणांत स्थिर करून त्र्यधीश्वर श्रीदत्तात्रेय त्याची ती ती कामना पूर्ण करतो

॥ इति श्रीदत्तपुराणे द्वितियाष्टकः ज्ञानकाण्डं च संपूर्णम् ॥